ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : वैदिक आर्यांचे ज्योतिर्विज्ञान आणि वैदिक देवतांचें पुनर्दर्शन

लेखक : अ. ज. करंदीकर

प्रकाशक : अ. ज. करंदीकर, पुणे

प्रकाशन वर्ष : १९६२

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२१

# वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान
# आणि
# वैदिक देवतांचें पुनर्दर्शन

8917

लेखक
अ. ज. करंदीकर

★

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D01006

891·7
Kar
6805

मूल्य पांच रुपये

# वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान
# आणि
# वैदिक देवतांचें पुनर्दर्शन

लेखक
अ. ज. करंदीकर

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

★

मूल्य पांच रुपये

प्रकाशक :
अ. ज. करंदीकर
६०७ सदाशिव पेठ, पुणें २.

म/४०४

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | रुद्र आणि नमुचि | १ |
| २ | देवांचे जन्म | २७ |
| ३ | अग्नीचा अर्थ | ५८ |
| ४ | अर्जुनीची परंपरा | ६८ |
| ५ | ऋभु | ७९ |
| ६ | सोम | ९१ |
| ७ | दक्षिणायनाची परंपरा | १०६ |
| ८ | उशना कवि | १११ |
| ९ | त्वष्टा | १२० |
| | परिशिष्ट—सविता देवाचें कोडें | १३६ |

प्रमुख विक्रेते :
अ. ह. लिमये
व्हीनस बुकस्टॉल,
आप्पा बळवंत चौक, पुणें २.

मुद्रक :
गं. शं. दाते
कलागृह छापखाना,
६६६ सदाशिव पेठ, पुणें २.

6805
891·51 K9E
12-7-93

# प्रस्तावना

आपल्या प्राचीन परंपरेप्रमाणें शंखासुरानें वेद चोरून नेले असतां देवाला अवतार घेऊन त्यांचा उद्धार करावा लागला. या परंपरेचा प्राचीन अर्थ कोणताहि असला तरी आपल्या डोळ्यांदेखत लोकमान्य टिळकांनीं ' ओरायन ' आणि ' आर्क्टिक होम इन् दि वेदाज् ' हे ग्रंथ लिहून वेदांचा पुनरुद्धार करण्याचा मार्ग दाखवून दिला आहे, ही गोष्ट कोणालाहि नाकारतां येणार नाहीं. टिळकांच्या प्रतिभेची भरारीच फार मोठी असल्यानें त्यांच्या मागून त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें जाऊन अभिनव संशोधन करण्याचें धाडस ' हिंदु आर्यन अॅस्ट्रॉनॉमी ' या ग्रंथाचे लेखक कै. भगवानदास पाठक, बंगालचे विद्यानिधि कै. जोगेशचंद्र राय, त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील श्री. आर्. के. प्रभु आणि चिक्कोडीचे श्री. वडेर वकील यांच्या सारख्या मोजक्या लेखकांनींच दाखविलें आहे. धुळ्याचे श्री. भा. रं. कुलकर्णी यांनींहि वेदाच्या प्राचीनतेवर एक प्रबंध लिहिला आहे. पण त्यांनीं टिळकांपेक्षा कै. कृष्णशास्त्री गोडबोले, अथवा राजापूरचे पाटणकरशास्त्री यांच्या मार्गदर्शनाचाच स्वीकार केला आहे.

आमच्या घराण्यांत प्रत्येक पिढीला एक मुलगा वेदविद्येला वाहण्याची प्राचीन परंपरा होती. ही गोष्ट लहानपणीं माहीत नसतांनाहि ' श्रुतिबोध ' मासिक निघालें, तेव्हांपासून मला वेदवाचनाचा नाद लागला. पुढें कै. रा. वि. पटवर्धनांचा ' श्रुतिबोध ' आणि कै. धुंडिराजशास्त्री बापट यांचीं ऐतरेय ब्राह्मण आणि शुक्ल यजुर्वेद यांचीं भाषांतरें वाचतांना मला वेदकालीन परिस्थितीची क्रमाक्रमानें कल्पना येऊं लागली. पुढें म्हैसूरचे कै. डॉ. शामशास्त्री यांच्या निबंधांवरून वेदांतील द्यावापृथिवी या अनुक्रमें दक्षिणायन आणि उत्तरायण यांच्या प्रारंभस्थानाच्या देवता आहेत, असें कळून आलें. अग्नि हा मुख्यत: वसंतसंपाताचा देव असल्याचें प्रो. कृष्णमूर्ति यांच्या निबंधावरून समजलें. या विषयाचा अभ्यास वर्षानुवर्षें चालला असल्यानें आणि माझ्या हाताशीं एखाद्या विश्वविद्यालयाचें किंवा तत्सम संस्थेचें ग्रंथालय नसल्यानें नेमके संदर्भ मी देऊं शकत नाहीं. उपासमार, उपेक्षा आणि उपहास यांच्या संगतींत सारा अभ्यास केलेला असल्यामुळें तळटीपांचा भरीव पाया या ग्रंथांतील विवेचनाला देतां आला नाहीं. अशा परिस्थितींत हा ग्रंथ छापला जाणें अशक्यच होतें. पण टिळकतलावावरील माझे सहप्रवासी श्री. सदूभाऊ गोडबोले यांनीं आपल्या हमीवर येथील एक सुविदित स्थापत्यविशारद श्री. रा. कृ. साठे यांच्याकडून पांचशें रुपये मला उसने आणून दिले. तो विसारा मुद्रकांना देऊन हा ग्रंथ छापून तर काढला आहे. असो.

१९५६ मध्यें पंचांगसमितीचें प्रतिवृत्त प्रसिद्ध झालें. त्यानंतर एकदा हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेचे संचालक श्री. शि. शं. आपटे यांनीं मला सांगितलें कीं त्या प्रतिवृत्तांत भारतीय ज्योतिषशास्त्राचा जो संक्षिप्त इतिहास दिला आहे, त्याविषयीं राष्ट्रपति राजेंद्रप्रसादांचें मत अतिशय प्रतिकूल झालें आहे. तेव्हां राष्ट्रपतींच्या सूचनेवरून बडोद्याचे श्री. दाजी नागेश आपटे यांनीं या विषयावर दिल्लींत कांहीं व्याख्यानें देण्याचेंहि मान्य केलें होतें. पण ही कल्पना फलद्रूप होण्या-पूर्वींच दाजीसाहेब कैलासवासी झाले आणि त्यांनीं या प्रश्नावर जो प्रकाश टाकला असता, त्याला आपण मुकलों आहोंत. त्यावेळीं हा ग्रंथ लिहिण्याची कल्पना प्रथम मला सुचली. पण इतर उपाधीमुळें तेव्हां ती मागें सारावी लागली. या प्रसंगानंतर दोन तीन वर्षांनीं प्राचार्य करमरकरांनीं आपल्या कालिदासावरील इंग्रजी ग्रंथांत, वेदकालापासून आर्यांना राशी माहित होत्या या विषयावर अ. ज. करंदीकर हे स्वतंत्र प्रबंधच लिहिणार आहेत, अशी एक टीप देऊन हा ग्रंथ लिहिण्याचें नैतिक दायित्व माझ्यावर टाकलें. पण तेव्हांहि या विषयाकडे वळण्याला मला सवड नस-ल्यानें प्रस्तुत ग्रंथाचा श्रीगणेशा झाला नाहीं. त्यानंतर गतवर्षी ( १९६१ मार्च ) पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन यांनीं या विषयावर लिहिण्याचा मला आग्रह केला आणि त्यांनीं सुमुहुर्तावर केलेल्या सूचनेचें स्वागत करून मी ग्रंथलेखनाचा प्रारंभ केला. हें लेखनाचें काम चांगल्या प्रकारें चाललें असतां पानशेतचा प्रलय झाला. या प्रलयाच्या प्रसंगीं ईश्वरकृपेनें आमच्या आळींत पाणी शिरलें नाहीं आणि माझीं पुस्तकें आणि हस्तलिखितें सुरक्षित राहिलेलीं पाहून हें काम पूर्ण व्हावें, अशी देवाची इच्छाच आहे, अशी माझी भावना झाली.

मी स्वतः असहकारितेंत शाळा सोडून घरीं बसल्यामुळें महाविद्यालयांतून मिळणाऱ्या शिक्षणाचा माझ्यावर संस्कार झालेला नाहीं. त्यामुळें माझा हा ग्रंथ तरी वैदिक संशोधन मंडळाला दत्तक द्यावा, अशी इच्छा मनांत होती. पण हें दत्तविधान रीतसर होण्याला कालावधि लागेल, असें कार्यवाहांनीं सांगितल्यामुळें मी या श्रावणी पौर्णिमेला हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. दत्तक घेणाऱ्यांच्या इच्छे-प्रमाणें त्याचें दत्तविधान पुढें केव्हांहि करतां येईल.

वैदिक आर्यांना राशी माहीत होत्या, ही गोष्ट वसिष्ठांच्या प्रस्वापन सूक्तां-तील पुढील ऋचेवरून प्रथम माझ्या ध्यानांत आली. ‘ सहस्रशृंगः वृषभः यः समु-द्रात् उदाचरत् । तेन सहस्येन वयं नि जनान् स्वापयामसि ।। ’ या ऋचेचें भाषांतर माझे कैलासवासी मित्र डॉ. हरिअप्पा यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे. ‘ With the thousand rays does the great benefactor ( sun ) rise from amidst yonder sea. with his gracious help shall we send all peopel to sleep. ’ वरील ऋचेचा वास्तविक अर्थ असा आहे कीं

शरत् संपाताच्या दिवसांत सूर्यास्तानंतर वृषभ राशि उदित होत असून तिच्या प्रभावानें सर्व जनांना झोप लागण्याची अपेक्षा वसिष्ठ करीत आहेत, कारण उन्हाळ्यानें त्रस्त झालेल्या उत्तरेकडील लोकांना शरत्संपातानंतरच सुखनिद्रा लाभूं लागते. पण वैदिक आर्यांना राशी अविदित होत्या, असा ग्रह करून घेतला म्हणजे समुद्र तीरावरून सूर्योदयाचें दर्शन घेऊन आणि त्याला अर्घ्य देऊन वैदिक आर्य झोपीं जात, अशी कल्पना करावी लागते. डॉ. हरिअप्पांचा पदवीप्रबंध डेक्कन कॉलेज बुलेटिनच्या अकराव्या वर्षांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांतून वरील अवतरण घेतलें आहे.

खिस्तपूर्व १००० हाच ऋग्वेदसंहितेचा काल असें आतां अधिकारी विद्वानांनीं निश्चित ठरवून टाकलें आहे. पण हे विद्वान् असा कधीं विचार करीत नाहींत कीं पूर्वी भाद्रपद पौर्णिमेला दक्षिणायनारंभीं श्रावणी करीत, अशी सुस्पष्ट परंपरा आहे. हा काळ खिस्तपूर्व ४००० वर्षांच्या आसपास येतो. श्रावणीची परंपरा चालूं होण्यापूर्वी वेद अस्तित्वांत आले होते, ही गोष्ट तर स्वतःसिद्ध आहे. अशा परिस्थितींत केवळ पाश्चात्य गुरूंच्या आदेशावरून हे अधिकारी विद्वान् टिळकांच्या सारख्या राष्ट्रगुरूंचा जो अधिक्षेप करीत असतात, तो निदान माझ्यासारख्या टिळक परंपरेंतील लेखकाला असह्य झाला तर त्यांत नवल काय ?

अधिकारी विद्वानांच्या लेखनांत ज्योतिषविषयक अज्ञानाचें जें अद्भुत प्रदर्शन होत असतें, त्याचें एक उत्कृष्ट उदाहरण महामहोपाध्याय मिराशी यांच्या ' वाकाटक नृपति आणि त्यांचा काल ' या ग्रंथावरून येथें उतरून घेण्याजोगें आहे. ' एक दानपत्र ज्येष्ठ शुक्ल दशमीस विषुववाचनक ब्राह्मणास दिलें होतें. तें मेष संक्रान्तीच्या प्रसंगीं असावें. ' ( पान ११० ) खिस्तोत्तर काळांत ज्येष्ठ शुद्ध दशमीला मिथुन संक्रान्त येऊं शकेल. मेष संक्रान्त येऊं शकत नाहीं. पण एकदा महामहोपाध्याय बनल्यानंतर त्यांना असल्या किरकोळ विधानांची क्षिति बाळगण्याचें कारण नाहीं. मात्र त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या शिलालेखावरून ज्येष्ठ शुद्ध दशमीला ' विषुववाचनक ' ब्राह्मणाला दान देण्याची परंपरा सिद्ध होत असली तर ती परंपरा त्या काळीं निदान चार सहस्र वर्षांची तरी जुनीपुराणी झाली असली पाहिजे. या दृष्टीनें एकवार शिलालेखांचें वाचन करणें आवश्यक आहे. असो.

इतक्या निराशाजनक परिस्थितींत ज्योतिषाच्या दृष्टीनें वेदांचा उलगडा करण्याचा प्रयत्न निष्फळ ठरण्याचा संभव फार आहे. पण सोळासतरा वर्षांपूर्वीं सायणभाष्य प्रकाशनाच्या प्रसंगीं माझे मित्र डॉ. रघुवीर यांनीं ' को वेदान् उद्धरिष्यति ' या विषयावर व्याख्यान देऊन वेदोद्धार करण्याचें कर्तव्य सुस्पष्ट दाखवून दिलें असल्यानें तेव्हांपासून मी हें कर्तव्यपालन करण्याचा प्रयत्न करीत आहे. १९४६ मध्यें ' दाशराज्ञ युद्ध ' हा वेदावरील माझा पहिला ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यानंतर पुढें सहासात वर्षांनीं ज्ञानेश्वर त्रैमासिकांत ' सविता देवाचें कोडें ' उलगडलें.

त्वष्टा आणि उशना कवि हे लेख पुरुषार्थ मासिकांतून पूर्वी प्रसिद्ध झाले आहेत. इंद्र आणि सोम यांचें कोडें हा लेख इंग्रजींत ' पूना ओरिएंटॅलिस्ट ' या त्रैमासिकांत छापला होता. तेव्हां सुदीर्घ अध्ययनानंतर हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें धारिष्ट मी करीत आहे, हें वाचकांना दिसून येईल. ' इंद्र आणि सोम ' या विषयावर डॉ. परुळेकरांच्या अध्यक्षतेखालीं एकदा व्याख्यानहि दिलें होतें. त्रित, त्वष्टा, उशना इत्यादि देवां-संबंधींच्या माझ्या कल्पनाहि सभांतून सज्जनांच्या समोर मांडल्या होत्या. हें करण्याचा मुख्य उद्देश विद्वानांचे आक्षेप आगाऊ समजून घ्यावेत हाच होता. डॉ. दांडेकरांनाहि मी या ग्रंथाची सविस्तर रूपरेषा एकवार सांगितली होती. या अध्ययनांत माझी कित-पत प्रगति होत आहे, याची चौकशी माझे मित्र श्री. शरदिंदु बंद्योपाध्याय हे नेहमी करीत आणि त्यांनींच मला कै. जोगेशचंद्र राय यांचे ग्रंथ दाखवून दिल्यामुळें माझ्या संशोधनाला नवीनच वळण लागलें. इतर ग्रंथांच्याकरितां मला मुख्यतः केसरी ग्रंथालय आणि वैदिक संशोधन मंडळाचे ग्रंथालय यांच्यावरच भार टाकावा लागला. प्रस्तुत प्रबंधाचें हस्तलिखित श्री. का. वा. अभ्यंकर यांनीं पाहून अनेक उपयुक्त सूचना केल्या. श्री. मो. ल. चंद्रात्रेय यांनींहि पुस्तकें पुरवून आणि अभिप्राय देऊन या यज्ञांत भाग घेतला आहे. या सर्वांचा आणि प्रारंभींच उल्लेखिल्याप्रमाणें या प्रबंधाच्या प्रकाशनाला हातभार लावणारे श्री. रा. कृ. साठे आणि श्री. सदूभाऊ गोडबोले यांचा मी अतिशय ऋणी आहे, हें सांगायला नकोच. आतां सरतेशेवटीं हा ग्रंथ इतक्या तत्परतेनें आणि काळजीपूर्वक छापून दिल्याबद्दल ' कलागृहाचे ' चालक श्री. राजाभाऊ दाते आणि मुद्रणालयांतील कामगार या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले पाहिजेत.

श्रावणी पौर्णिमा
शके १८८४

अ. ज. करंदीकर

७८
११६२

# विष्णूसंबंधीं एक टीप

एकंदर ग्रंथ छापून झाल्यानंतर असें आढळून आलें कीं ग्रीक भाषेंत महान् पक्षी या अर्थाचा ओईस्नोस् असा शब्द असून त्यावरून वेदांतील विष्णूचा उत्कृष्ट उलगडा होतो. श्रवण नक्षत्राला पाश्चात्य ज्योतिषी आक्विला म्हणजे गरुड या नांवानें ओळखतात. श्रवण हें विष्णूचें नक्षत्र आहे, हें सर्वांना माहीतच आहे. तेव्हां एकेकाळीं महान् पक्षी या अर्थानें श्रवण नक्षत्राला ओइस्नोस् अथवा विष्णु म्हणत असावेत आणि त्यालाच आक्विला अथवा गरुड हें नांव लाभल्यानंतर विष्णूचें पक्षिस्वरुप नष्ट होऊन तो गरुडवाहन बनला. त्याचप्रमाणें सोमहरण करणाऱ्या श्येनाचें जेव्हां कालांतरानें गरुडांत रूपांतर झालें, तेव्हांच गरुडानें वाहून आणलेल्या सोमाशीं विष्णुहि तादात्म्य पावला. या काळीं विष्णु हा त्याच्या वाहनाहून भिन्न बनला होता. तैत्तिरीय संहितेंत ( १–२–१० ) यज्ञमंडपांत आलेल्या सोमाचें स्वागत करतांना ‘ विष्णवे त्वा श्येनाय त्वा सोमभृते विष्णवे त्वा ’ हीं जीं पदें वापरलीं आहेत, त्यावरून विष्णु, श्येन आणि सोम यांचा निकटचा संबंध असल्याचें कळून येतें. शतपथांत ( ३–६–३–१९ ) तर विष्णु हा सोमच असल्याचा स्पष्ट उल्लेख आला आहे.

ओइस्नोस् म्हणजे महान् पक्षी या ग्रीक शब्दावरून जसा विष्णूचा उलगडा होतो, तसाच नासातिओस् म्हणजे दीपांचे देव या ग्रीक शब्दावरून अश्विनीकुमारांच्या नासत्य या नांवाचाहि उलगडा होतो. वेदांत अश्विनीकुमारांनीं समुद्रांत बुडणाऱ्यांना वाचविल्याचा वरचेवर उल्लेख येतो, त्याचें मूळ या ग्रीक शब्दांत असलें पाहिजे, हें उघड आहे.

# एका अभ्यासकांचा अभिप्राय

वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान हा ग्रंथ वाचला. लो. टिळकांच्या Orion & Arctic Home नंतर वैदिककालीन ज्योतिष्यकीय ज्ञानासंबंधीं नवीन कल्पना पुराव्यासह देणारा हाच एक ग्रंथ झाला आहे, असें वाटतें. वेदांतील कथांचा नीट संदर्भपूर्वक अर्थ लावून काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत यांत संशय नाहीं. वैदिक देवता, ज्योतिष्यकीय परिस्थितीशीं संबद्ध आहेत हें दाखाविण्यांत नवीनच दृष्टि या ग्रंथांत आढळून आली आहे.

इंद्र, नमुचि, शकटभेद, आंगिरस आणि आदित्योपासक यांच्यांतील स्थानभेदामुळें देवतांच्या कल्पनेंत आलेला फरक, देवांच्या जन्मांचें गूढ, द्वादशवर्ष सत्राचा उलगडा, संपात आणि अग्नि या संबंधानें निरनिराळ्या काळांत दिसून येणाऱ्या भूमिका इत्यादि विषय भरपूर वचनें देऊन हाताळलेले आहेत.

अर्जुनी, ऋभु, सोम, उशना कवि, त्वष्टा ह्या प्रकरणांतून मांडलेल्या कल्पना तर ग्रंथकर्त्यांच्या गाढ अभ्यासाची आणि कल्पकतेची साक्ष देतातच. सविता देवतेचें कोडेंहि उलगडून दाखविलेलें आहे. ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या एकंदर गोष्टींमुळें संशोधकांना कितीतरी खाद्य या ग्रंथांत सांपडेल. वैदिक कालज्ञानाबद्दल हा ग्रंथ लिहून श्री. करंदीकरांनीं वेदकालीन, परिस्थितीवर परंपरेनें वेदकालीन संस्कृतीवर स्पष्ट प्रकाश टाकला आहे, असेंच कोणीहि म्हणेल. असला ग्रंथ लिहून त्यांनीं वेद आणि ज्योतिःशास्त्र यांवर उपकार करून ठेवले आहेत असें मला वाटतें.

**मो. ल. चंद्रात्रेय.**
पोतनीस बंगला पुणें ४.

# वैदिक आर्यांचें ज्योतिर्विज्ञान

## प्रकरण पहिलें

## रुद्र आणि नमुचि

आपल्या आर्यपरंपरेप्रमाणें रुद्र हा सृष्टीचा संहारकर्ता आहे. या परंपरेचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करीत असतांना एका शुभ क्षणीं ध्यानांत आलें कीं आकाशांतील धनु राशि हें धनुर्धर रुद्राचें आद्यस्वरूप असून त्याच राशींत दक्षिणायनाचें प्रारंभस्थान असतांना पृथ्वीवर अत्यंत मोठा प्रलय झाला असला पाहिजे. धनूमधील प्रधान नक्षत्र जें मूळ त्याची देवता निऋति अथवा मृत्यु असण्याचें कारण हेंच. त्याचप्रमाणें अथर्ववेदांत 'अरिष्टं मूलम्' असा त्याचा फलादेश सांगण्याचें कारणहि हेंच. माझ्या या कल्पनेला ज्योतिषाचा गंध नसलेले विद्वान् हसतील, याची मला पूर्ण कल्पना आहे. पण अज्ञानाच्या नंदनवनांत निवास करणाऱ्या या सुदैवी विद्वानांना हेंहि अविदित आहे कीं प्रस्तुत काळीं दक्षिणायनाचें प्रारंभस्थान धनु राशीच्या आणि मूळ नक्षत्राच्या प्रतियोगांतील रुद्राच्या आर्द्रा ताऱ्यापासून अवघ्या एक दोन अंशांच्या अंतरावर आलें असल्यानें पृथ्वीवर अणुपरमाणूंचें युग उत्पन्न होऊन लवकरच 'न भूतो न भविष्यति' अशा प्रकारचा प्रलय घडून येण्याचा संभव उत्पन्न झाला आहे. असो. एके काळीं मूळ नक्षत्राचा दक्षिणायनारंभाशीं संबंध आल्यामुळेंच पितर हीहि या नक्षत्राची देवता बनली आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत ( १–६–८–७ ) 'यत् समूलं तत् पितॄणाम् । समूलं बर्हिर्भवति व्यावृत्त्यै । ' या वचनांत श्लेषानें पितरांशीं मूलबर्हणीचा संबंध आणला आहे. बंगाल्यांतील एक वयोवृद्ध आणि ज्ञानवृद्ध ज्योतिषी कै. जोगेशचंद्र राय यांनीं अशी कल्पना केली आहे कीं, ऋग्वेदांतील नमुचि असुर म्हणजे मूळ नक्षत्रच. या नक्षत्राला तैत्तिरीय संहितेंत आणि अथर्ववेदांत विचृतौ असें द्विवचनी नांव असून त्यांतील चृत् धातूचा अर्थ मुक्त करणें असाच होतो. नमुचि या नांवांतील मुच् धातूचा अर्थ तोच आहे. 'त्वं जघन्थ नमुचिं मखस्युं दासं कृण्वान ऋषये विमायम् ।' ( १०–७३–७ ) म्हणजे मखलोलुप नमुचीला त्याच्या मायेचा निरास करून तूं मारलेंस. या ऋग्वचनांतील मखलोलुप नमुचीचा धनुर्मख करण्याच्या

पुरातन परंपरेशीं संबंध असूं शकेल. आतां आपण कंसाप्रमाणें धनुर्मख करीत नसलों तरी धनुर्मास पाळतोंच. कंसाचें एक नांव मूलभद्र होतें, हें इथें सांगणें आवश्यक आहे. असो. मूळ नमुचीचा पृथ्वीच्या उत्तर गोलार्धातील अवर्षणयुगाशीं संबंध असावा. वातावरणशास्त्रज्ञांचें असें म्हणणें आहे कीं, एके काळीं आफ्रिकेंतील सहारा वाळवंट हें पर्जन्यवृष्टीचें केंद्र होतें आणि त्या काळीं उत्तर गोलार्धांत पाऊस पडत नसल्यानें तिथें समा आणि हिम असे दोनच ऋतु होते. पुढें पर्जन्यवृष्टीचें केंद्र उत्तरेला सरकल्यानंतर इंद्र हा नमुचीला मारूं शकला.

## रुद्र आणि मूळ

आकाशांतील धनु राशि हें धनुर्धारी रुद्राचें आद्य स्वरूप, या संबंधीं 'पूना ओरिएंटॅलिस्ट' या त्रैमासिकांतील 'इंद्र आणि सोम यांचें कोडें' या प्रबंधांत पूर्वींच दिग्दर्शन केलें आहे. पण तेव्हां धनु राशींतहि मूळ नक्षत्राशीं रुद्राचा निकटतम संबंध असल्याचें ध्यानांत आलें नव्हतें. मूळ हेंच रुद्राचें आद्य स्वरूप असल्याचें ओळखलें म्हणजे त्याच्या प्रतियोगांतील आर्द्रा नक्षत्राचा अधिपति रुद्रच कां याचा सरळ उलगडा होतो. वैदिक परंपरेंत विष्णु हा श्रवणाचा अधिपति असून पुन्हा कश्यप प्रजापतीच्या रूपानें त्याच्या प्रतियोगांतील पुष्याचा प्रभु आहेच. 'उदगातां भगवती विचृतौ नाम तारके। विक्षेत्रियस्य मुञ्चताम् अधमं पाशम् उत्तमम्।' (अ. वे. २–८–१) या वचनावरून असें दिसतें कीं, क्षेत्रिय रोगाच्या ज्या पाशापासून आपलें मोचन करून घेण्याकरितां कवि सूक्त रचीत आहे, तो पाश नमुचि अर्थात् मोचन करण्याला दुष्कर असाच असला पाहिजे. विचृतौ नक्षत्राची देवता पितर असें तैत्तिरीय संहितेंत सांगितलें असलें तरी वरील ऋचेंतील भगवती शब्दाच्या प्रभावानें त्या देवतानामाचें कालक्रमानें पितरौ असें परिवर्तन होऊन 'भगवती विचृतौ नामतारके' हेंच द्विस्वभाव राशींतील द्वंद्व अर्धनारीनटेश्वराच्या रूपानें 'जगतः पितरौ' बनलें असावें. शिवाचें न मोडणारें धनुष्य हें अर्थात् धनुराशिरूपी धनुष्य होय. देवांनीं एक सुदृढ इषु निर्माण करून त्याची शत्रूंवर योजना करण्याला एकटा रुद्रच समर्थ असल्यानें एका सप्ताहापुरतें त्याला पशूंचें स्वामित्व देऊन बाण सोडण्याला प्रवृत्त केलें, असें काठकसंहितेंत (२५–१) सांगितलें आहे. येथील सप्ताहाचा उल्लेख फार महत्त्वाचा असून सात वारांची प्रवृत्ति या काळीं झाली असली पाहिजे.

विचृतौ नक्षत्राची देवता निऋति हिला उद्देशून अथर्ववेदांत (२–१०)

एक द्यावापृथिवींचें सूक्त आलें आहे. या अनुक्रमें दक्षिणायन आणि उत्तरायण यांच्या प्रारंभस्थानांच्या देवता असल्यानें मूळ नक्षत्राचा दक्षिणायनाशीं संबंध आल्याची स्मृति या सूक्तांत ग्रथित केली असल्याचें कळून येतें. मूळ नक्षत्रांतील विचृतौ या ताऱ्यांचें द्वंद्व जसें जगतः पितरौ हें द्वंद्व बनलें, त्याच क्रमानें त्या नक्षत्रांतील एकादश ताऱ्यांपासून एकादश रुद्रांची उत्पत्ति झाली आहे. मूलबर्हणीचे दोनच तारे सांगणारे ब्रह्मगुप्तासारखे अपवादात्मक ग्रंथकार वगळले तर बहुतेक साऱ्या सिद्धान्तग्रंथांतून त्याचे तारे एकादशच दिले आहेत. नक्षत्रें हींच देवांचीं गृहें असल्यानें मूळ नक्षत्रांत सर्व रुद्रांना स्वतंत्र गृहें मिळूं शकतात. असो. रामानें शिवधनुष्य मोडलें, शिवभक्त दशाननाचा वध केला, किंवा कांचनमृगाची हत्या केली, या साऱ्या आख्यानांचा संदर्भ मूळ आणि त्याच्या प्रतियोगांतील मृग यांच्याशींच येतो. तैत्तिरीय ब्राह्मणांत ( ३–१–२–१ ) म्हटलें आहे, 'इंद्रो ज्येष्ठाम् अनुनक्षत्रम् एति । यस्मिन् वृत्रम् वृत्रतूर्ये ततार ।' म्हणजे नक्षत्रांच्या अनुक्रमाप्रमाणें इंद्र जेव्हां जेष्ठा नक्षत्रांत येतो, तेव्हां त्यानें वृत्रयुद्धांत वृत्राला ओलांडलेलें असतें. वृत्राचा म्हणजे संस्कृत कद्रू आणि ग्रीक हायड्रा या सर्पांचा विस्तार रॉब्सनच्या सांगण्याप्रमाणें सायन सिंह पांचपासून वृश्चिक तेवीसपर्यंत असल्यानें ज्येष्ठा नक्षत्र वृत्राच्या सीमेपलीकडे आहे, हें उघड आहे. या विधानाच्या अनुरोधानेंच पुढील वचनाचा विचार केला पाहिजे. 'इंद्रो वृत्रं हत्वा असुरान् पराभाव्य । नमुचिं आसुरम् नालभत ।' ( तै. ब्रा. १–३–१–६ ) अर्थात् वृत्राला मारून ज्येष्ठांत आलेल्या इंद्राला अजून नमुचीला मारावयाला मिळालें नव्हतें. याचा अर्थ असा कीं नमुचि ज्येष्ठांच्या पलीकडे होता. आतां अयनचलन नक्षत्रक्रमाच्या उलट दिशेनें होत असल्यानें इंद्रानें आधीं नमुचीचा समाचार घेतला आणि नंतर तो वृत्राकडे वळला, ही अवांतर कथा आहे.

## नमुचि आणि इंद्र

इंद्रानें नमुचीला देवयानाच्या द्वारापाशीं मारलें, असें अनुमान टिळकांनीं पुढील वचनावरून काढलें आहे. 'त्वं चकर्थ मनवे स्योनान् पथो देवत्रांजसेव यानान् ।' ( १०–७३–७ ) या वचनांत देवानें मनूकरितां देवयानाचा मार्ग मोकळा केल्याचा तेवढा उल्लेख आहे. या ऋचेच्या पूर्वभागांत नमुचीला मारल्याचा उल्लेख असला तरी या दोन घटनांचा परस्पराशीं संबंध जोडण्याचें कांहीं कारण नाहीं. इंद्रानें नमुचीला मारलें, तें देवयानाच्या अंतीं, अथवा वर्षाऋतूच्या प्रारंभीं

मारलें. ध्रुवकटिबंधाशेजारच्या प्रदेशांत दक्षिणायनारंभापूर्वीं चार पांच रात्रींत अंधारच पडत नाहीं. या रजनींना त्या भागांतील लोक श्वेत रजनी म्हणून म्हणतात. या रात्रींतून सूर्य अस्ताला गेला असला तरी उजेड नाहींसा होत नाहीं आणि रात्रीच्या प्रभावानें येणारी झोपहि तेव्हां लोकांना येत नाहीं. दिवस नाहीं आणि रात्र नाहीं, अशा या फेनशुभ्र रजनीमध्येंच इंद्रानें नमुचीला मारलें. नमुचि ब्राह्मण असून इंद्रमित्र होता आणि त्याच्या वधामुळें इंद्राच्या मागें ब्रह्महत्या लागली, अशी परंपरा शल्यपर्वाच्या ४३ व्या अध्यायांत आली आहे. ‘ तत् शिरं नमुचेः छिन्नं पृष्ठतः शक्रम् अन्वियात् । भो भो मित्रहन् पाप इति ब्रुवाणं शक्रम् अंतिकात् ॥’ इंद्राच्या मित्रद्रुह् या पदवीचा तैत्तिरीय ब्राह्मणांतहि उल्लेख आला आहे. नमुचीच्या सदनीं सुरापान करून इंद्राची अवस्था अवघड झाली असतां सरस्वतीनें त्याच्यावर उपचार करून त्याला खडखडीत बरा केला, या घटनेच्या स्मरणार्थ सुरापानयुक्त सौत्रामणी याग प्रचलित झाला, असें शतपथांत सांगितलें आहे.

## इंद्र–नमुचींचें सोमपान

नमुचीला इंद्रानें मृग नक्षत्राशेजारच्या क्षेत्रांत मारलें असावें, अशी कल्पना करून घेऊन त्या कल्पनेला टिळकांनीं कांहीं आधारहि शोधले आहेत. पण वैदिक परंपरेप्रमाणें इंद्र हा दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाचा अधिपति असून त्याची वर सांगितल्याप्रमाणें अजून आर्द्रा ताऱ्याशींच युति व्हावयाची आहे. त्यानंतर कित्येक शतकांनीं तो मृग नक्षत्रावर प्रभाव गाजवूं लागेल. इंद्राचें स्थान वैदिक पंचांगाप्रमाणें उत्तरायणाच्या अंतीं अथवा दक्षिणायनाच्या प्रारंभीं असल्याची जाणीव टिळकांना नव्हती. ही गोष्ट खरी कीं मूळ नक्षत्रांतूनहि इंद्र त्याच्या प्रति-योगांतील मृग नक्षत्रासन्निध नमुचीचा वध करण्याला समर्थ होता. पण इंद्र हा नमुचीचा एके काळीं सहचर असून त्याच्यासह सोमपान करीत होता अशी वेद आणि ब्राह्मण ग्रंथांतील परंपरा आहे. ‘ युवं सुरामम् अश्विना नमुचौ आसुरे सचा । विपिपाना शुभः पति इंद्रम् कर्मसुआवतम् ॥ ( १०–१३१–४ ) पुत्रम् इव पितरौ अश्विना उभा इंद्र आवथुः काव्यैः दंसनाभिः । यत् सुरामम् व्यपिबः शचीभि : सरस्वती त्वा मघवन् अभिष्णक ॥ ( १०–१३१–५ ) या ऋचांतील आख्यानाचा सारांश असा कीं नमुचि असुराच्या घरीं सोमपान करीत असलेल्या इंद्रावर अश्विनी-कुमार आणि सरस्वती यांनीं वैद्यकीय उपचार केले. या उपचारांचा उल्लेख वाज-

सनेयि संहितेंत ( १९–१२ ) आला आहे, मात्र तिथें नमुचीचें नांव नाहीं. पण या सूक्तांतील प्रसंगाची शतपथांत सविस्तर माहिती आली आहे. ' नमुचिनैव असुरेण सह चचार, स ऐक्षत नमुचिः अपुनर्वा अयम् अभूत् हंता अस्य इंद्रियं वीर्यं सोमपीथम् अन्नाद्यम् हराणीति, तस्यैतयैव सुरया सोमपीथम् अन्नाद्यम् अहरत्, स ह न्यर्णः शिश्ये, तं देवा उपसंजग्मिरे श्रेष्ठो वै नो अयम् अभूत् तमियम् पाप्माविदत् । हन्त इमं भिषज्याम इति ।' ( शतपथ १२–७–१–१० ) इंद्रानें नमुचीला फेनानें मारलें खरें, पण नमुचीनेंहि इंद्राला सोम अथवा शतपथांत सांगितल्याप्रमाणें सुरा पाजून त्याचें वीर्यहरण केलें होतें, हें सहसा कोणाला माहीत नसतें. त्या प्रसंगीं शतपथांतहि अश्विनीकुमार आणि सरस्वती यांनींच इंद्रावर उपचार केले असल्यानें दशम मंडलांतील आख्यान आणि शतपथांतील आख्यानें यांचा उगम एकच असल्याचें कळून येतें.

## दशाननाचें सोमपान

ऋग्वेदांत नमुचीला कोठें असुर म्हटलें असलें तरी अन्यत्र त्याला दासहि म्हटलेलें असतें. पण अथर्ववेदांत मात्र त्याचें स्वरूप स्पष्ट सांगितलें आहे. ' ब्राह्मणो जज्ञे प्रथमः दशशीर्षो दशास्यः । स सोमं प्रथमः पपौ । स चकार अरसं विषम् । ' ( अ. वे. ४–६–१ ) सर्वांत प्रथम सोमपान करणारा हा दशशीर्ष दशानन मूळ नक्षत्रच असून दक्षिणायनाची रेषा जेव्हां त्या नक्षत्राच्या चतुर्थ चरणांत प्रथम प्रविष्ट झाली, तेव्हांच सोमकलश या तारकापुंजाच्या शेवटच्या अंशांतील तारे वसंत संपाताच्या प्रारंभस्थानीं आले. त्यामुळें मूळ नक्षत्रांतील दशानन हा सोमपान करणारा प्रथम ब्राह्मण झाला, इतकेंच नव्हे तर तो इंद्रासहच पान करूं लागला. हे उभयता एकत्र सोमपान करूं लागले, तेव्हां पृथ्वीवरील पाणी गोठलें, हा वरील ऋचेंतील उल्लेख अतिशय महत्त्वाचा आहे.

अथर्व वेदांतील वरील वचनाच्या अनुरोधानें विचार केला असतां पुढील ऋचेंत प्रत्यक्ष किंवा पर्यायानें त्याच दशग्रीव ब्राह्मणाचा उल्लेख असावा, अशी शंका येते. ' ब्राह्मणात् इंद्र राधसः पिबा सोमम् ऋतून् अनु । तव इत्हि सख्यं अस्तृतम् ।।' ( ऋ. १–१५–५ ) इथें ब्राह्मणात् या शब्दाचा अर्थ यज्ञविधींतील एका विशिष्ट पात्रांतून असा भाष्यकारांनीं केला असला तरी त्याच पात्रांतून इंद्राला सोमपान करावयाला सांगण्याचें आद्य कारण तो त्या दशग्रीव दशानन ब्राह्मणासह जवळ जवळ सहस्र वर्षें सोमपान करीत होता, हेंच असूं शकेल. ' तव इत्हिसख्यम्

अस्तृतम् ।' या शब्दांत याच सख्याचा संदर्भ आला असावा. अशा सख्याचा विश्वासघात केल्यानें तैत्तिरीय ब्राह्मणांत आणि शल्यपर्वांत इंद्राला मित्रद्रुह् म्हटलें आहे.

मूळनमुचीच्यामुळेंच इंद्राचा ऋग्वेदांत धनु राशीशीं संबंध येतो, असें नाहीं. इंद्र पुढें वज्री झाला तरी प्रथम तो धन्वी होता ' शतब्रध्नः इषुः तव सहस्रपर्णः एक इत् । यम् इंद्र चकृषे युजम् ।। ' ( ८–६६–७ ) या ऋचेंत इंद्राच्या एकमेव बाणाचा उल्लेख आला आहे. हा धनुराशींतील बाणच असल्याचें त्याच्या धनुष्याच्या वर्णनावरून दिसून येतें. ' तुविक्षं ते सुकृतं सुमयं धनुः साधुःबुंदो हिरण्ययः ।।' ( ८–६६–११ ) हें सुकृत, सुवर्णधनुष्य आपल्याला परिचित इंद्रनुधष्य नसल्यानें धनु राशींतील धनुष्यच मानावें लागतें. ' धनोरधि विषुणक्ते व्यायन् अयज्वानः सनकाः प्रेतिमीयुः ।' ( १–३३–४ ) यजन न करणारे सनक तुझ्या धनुष्यावर येऊन पडले आणि परलोकीं गेले. याच सूक्तांत पुढें इंद्राला स्थातः म्हटलें असून भाष्यकारांनीं त्याचा अर्थ स्थाणु असा केला आहे. हें शिवाचें एक सुप्रसिद्ध नांव असल्यानें शिवाच्या क्षेत्रांत इंद्राचा संचार असतांना त्याला लाभलेलें दिसतें.

## इंद्राणीचा मृगद्वेष

मूळ नक्षत्रांतील निवासामुळेंच इंद्राणीला त्याच्या केंद्रप्रतियोगांतील मृग अप्रिय झाले असावेत. सुप्रसिद्ध वृषाकपिसूक्तांत ती म्हणतें ' क्वस्यः पुल्वघः मृगः कम् अगन् जनयोऽपनः । ( १०–८६–२२ ) हा दुष्ट नीच मृग, हा जनप्रवंचक मृग कोठें गेला ? या गालिप्रदानाचा सूड पुढें कांचनमृगानें सीतेवर उगवला, असें म्हणतां येईल. असो. मूळ दशाननाच्या रूपाप्रमाणेंच त्याचें कुळ आणि नांवहि वाल्मीकींनीं वेदांतून घेतलें असावें, अशीं शंका येते. ' पाहि नो अग्ने रक्षसः । पाहि धूर्तेः अराव्ण ःII '( १–३६–१५ ) हे अग्ने, राक्षसापासून ( निऋतीपासून ) आणि अराव्णाच्या हिंसेपासून आमचें रक्षण कर. या ऋचेच्या पुढील ऋचेंतच ज्वालादंष्ट्र अग्नीला अराव्णाचें, घणानें फोडून तुकडे केल्याप्रमाणें चूर्ण कर अशी प्रार्थना आहे. याच अराव्णापासून रावण शब्द बनला असावा. पण हें विषयांतर होत आहे.

## नमुचीची स्त्रीसेना

एकदा भय पावून नमुचि असुर सूर्याच्या किरणांत शिरला आणि तिथें त्याचें इंद्राशीं सख्य झालें. अशी कथा शांतिपर्वात आली आहे. महाभारतांतील

असल्या आख्यानांचा वैदिक परंपरांशीं नेहमींच निकटचा संबंध असतो आणि वेदार्थ समजून घेण्याला त्यांचा तारतम्यानें उपयोग केल्यास चांगला उपयोग होतो.

नमुचीच्या संबंधीं अत्रिमंडलांतील तिसाव्या सूक्तांत पुढील ऋचा आल्या आहेत. ‘युजंहिमाम् अकृथाः आत्इत् इंद्र शिरो दासस्य नमुचेः मथायन् । अश्मानं चित् स्वर्यं वर्तमानं प्र चक्रिया इव रोदसी मरुद्भ्यः ॥ ( ८ ) स्त्रियो हि दास आयुधानि चक्रे किंमाकरत् अबला अस्य सेना । अंतः हि अख्यत् उभे अस्य धेने अथ उपप्रैत युधये दस्युम् इंद्रः ॥ ( ९ )’ म्हणजे इंद्रानें जेव्हां दास नमुचीची मान मुरगळली, तेव्हां द्यावापृथिवींनीं मारुतांच्या हातीं चक्राप्रमाणें भ्रमणारा अशनि दिला. त्या दासानें स्त्रियांनाच आपलें आयुध बनविलें. पण त्या अबला माझें काय वांकडें करणार ? त्या स्त्रीसेनेंत दोन धेनू पाहून इंद्रानें दस्यूंवर चढाई केली. यांपैकीं पहिल्या ऋचेचा अर्थ मूळ नक्षत्राची आकृति दृष्टीपुढें आणली म्हणजे सहज समजतो. विंचवाच्या नांगीच्या आकाराचे मूळ नक्षत्रांतील तारे प्रथम सरळ रेषेंत असून पुढें वक्र रेषेंत वळले असल्यानें इंद्रानें नमुचीची मान मुरगळ-ल्याची कल्पना कवींनीं केली आहे. त्या नक्षत्रांत आपल्या बहुसंख्य सिद्धान्त ग्रंथा-प्रमाणें एकादश तारे असल्यानें मंत्रद्रष्ट्यांना नमुचीनें आपल्या स्त्रीसेनेचेंच आयुध बनविल्याची कल्पना सुचली. या सेनेंतील दोन धेनू म्हणजे दक्षिणायनाच्या प्रारंभ-स्थानीं आलेले विचृतौ हे दोन तारे होत. दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाला वेदांत पुष्कळदा धेनु ही संज्ञा दिली आहे. मूळ नक्षत्र विंचवाच्या नांगीप्रमाणें दिसत असलें तरी आपल्या ज्योतिष परंपरेंत त्याला सिंहपुच्छ म्हणतात. ब्राह्मण ग्रंथांतून वर्षाऋतूला आणि दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाला अनेकदां पुच्छ ही संज्ञा लाविली आहे. मूळ नक्षत्राला सिंहपुच्छ ही संज्ञा लाविली जाते, त्या अर्थीं त्याच्या प्रति-योगांतील एका नक्षत्राला सिंह म्हणत असावेत, हें उघड आहे. मूळ नक्षत्राच्या प्रतियोगांत आर्द्रा आणि मृग हीं नक्षत्रें येतात. यांपैकीं मृगाला सिंहहि म्हणत असावेत, अशी कल्पना ऑ. एमलिन प्लंकेट या बाईंनीं पूर्वींच केली होती. ती वरील संदर्भावरून खरी दिसते. ‘लोपाशः सिंहंप्रत्यञ्चम् अत्साः क्रोष्टा वराहम् निः अतक्तकक्षात् । ’ ( १०–२८–४ ) या कोड्यांतील लोपाश हा ससा अस-ल्याचें भाष्यकारांनीं मान्य केलें असल्यानें पाश्चात्यांचा लेपुस् ( ससा ) हाच तो तारकापुंज असावा. याचा विस्तार सायन मिथुन पांचपासून मिथुनेच्या अंतापर्यंत असल्यानें हा आकाशांतील मृगावर, अथवा वरील मंत्रांत म्हटल्याप्रमाणें सिंहावर उडी घेत असलेला दिसतो. मृग नक्षत्राच्या शीर्षस्थानीं असलेल्या तीन ताऱ्यांतच

त्रैमूर्तिअवतार दत्तात्रेयाचें स्थान असून त्याच्या कृपेंतील सहस्रार्जुनानें रावणाचा म्हणजेच मूळ नमुचीचा पराजय केला, हें सर्वांना माहीत आहेच. रावणाचा भाऊ कुंभकर्ण सहा मास झोपेंत घालवीत असे, यावरून मूळ नक्षत्रांत दक्षिणायन असतांना वैदिक आर्यांचे पूर्वज ध्रुव प्रदेशांत, अथवा त्याच्या अतिसन्निध राहात असत, असें अनुमान निघतें.

## कुंभ आणि त्याचे कर्ण

इथें कुंभकर्ण नांवाची थोडी अधिक चिकित्सा केल्यास ती अनाठायीं होणार नाहीं. धनिष्ठेचे दोन चरण, शततारकांचे चार चरण आणि पूर्वाभाद्रपदेचे तीन चरण मिळून कुंभ राशि बनली असल्यानें या राशींतील कुंभ स्वतः शततारकाच असून त्यांच्या मागील आणि पुढील नक्षत्रांचे चरण हे तो कुंभ उचलण्यासाठीं उपयोगीं पडणारे कर्ण बनूं शकतात. या दृष्टीनें विचार केला असतां धनिष्ठा नक्षत्राचें एक प्राचीन नाम जें श्रविष्ठा त्याचें स्वारस्य कळून येतें. श्रविष्ठा शब्दाचा अर्थ आप्ट्यांच्या कोशांत श्रवणा नांवाचें नक्षत्र असाहि दिला आहे. आपण श्रवणा म्हणजे श्रवण नक्षत्र मानतों. पण संहितांतून श्रवण नांव न येतां श्रोणा असें नांव येत असून त्याचा अर्थ लंगडी गाय असा होतो. श्रवण नक्षत्राचे तीन तारे म्हणजे विष्णूचीं तीन पाउलें, मानतात. त्याप्रमाणेंच प्राचीन काळीं लंगड्या गाईचे तीन पाय मानीत असावेत. यावरून संहितांच्या युगांत श्रवण नक्षत्राचा कर्णेंद्रियाशीं संबंध नसून चरणेंद्रियाशीं संबंध असल्याचें स्पष्ट होतें आणि कुंभकर्णातील कर्ण हा श्रविष्ठा वा धनिष्ठा नक्षत्राचा उत्तरार्ध असल्याचें उघडकीस येतें. धनिष्ठेंत शरत् संपात असतांना वैदिक आर्य उत्तर ध्रुवावर निवास करीत असल्याचा पुरावा पुढें यावयाचाच आहे. असो. नमी साप्य नांवाच्या झोपाळू भक्ताकरितां इंद्रानें नमुचीची मान मुरगाळली, असें भरद्वाज मंडलाच्या विसाव्या सूक्तांत सांगितलें आहे. त्याच्या निद्रेचा संबंधहि ध्रुव प्रदेशांशीं असूं शकेल. अशा प्रकारें दशशीर्ष दशाननाचा ध्रुव प्रदेशाशीं संबंध येत असल्यामुळें तो विष अरस करूं शकला, म्हणजेच पाणी गोठवूं शकला. ध्रुव प्रदेशांतहि दशाननाचा कामज्वर तीव्र होण्याचें कारण नमुचीची स्त्रीसेनाच असली पाहिजे. टिळकांनींहि रावणकथेचा ध्रुव-प्रदेशाशीं संबंध जोडला आहे.

## मारुतींचें समुद्रोल्लंघन

रावणाच्या कथेचा ध्रुव प्रदेशाशीं निकटचा संबंध असल्याचा सर्वोत्कृष्ट पुरावा

म्हणजे मारुतीचें समुद्रोल्लंघन होय. ध्रुवस्थानांतील आकाशांत इतर कटिबंधांतील प्रदेशां- प्रमाणें सत्तावीस नक्षत्रें दिसत नसून त्यांतलीं अर्धींच नक्षत्रें दिसतात. या नक्षत्रांपैकीं शरत्संपाताच्या स्थानीं असलेलें नक्षत्र संपाताच्या वक्रगतीमुळें ध्रुवावरील गगनांतून जेव्हां लुप्त होतें, तेव्हां वसंत संपाताच्या स्थानीं नवीन नक्षत्र दृग्गोचर होतें. अशा प्रकारें अनपेक्षितरीत्या महासागरांतून एकेक नवीन रत्न उदित झाल्यानंतर त्याचें नामकरण करणाऱ्यांनीं त्याला चित्रेसन्निधच्या अप आणि अपांवत्स या ताऱ्यांच्या नांवांसारखीं वारुण नांवें समर्पण केलीं तर त्यांत कांहीं नवल नाहीं. हे तारे ध्रुवा- काशांत उदित झाल्यानंतर शेंकडों वर्षांनीं ऋग्वेदांतील वृषाकपि आणि रामायणां- तील हनुमान् हा समुद्रोल्लंघन करून ध्रुवाकाशांत उदित झाला. वृषाकपीमुळें यज्ञ बंद पडल्याचा उल्लेख ऋग्वेदांत असून त्यानें लंकानगरी जाळली, असें रामायणांत वर्णिलें आहे. धनु राशींत दक्षिणायन असतांना दक्षिणायनारंभीं पृथ्वी सूर्याच्या अतिसन्निध येत असल्यानें उत्तरगोलार्धांतील लोकांना सूर्याचा ताप असह्य होत असे. रामायणांतील हनुमान्कृत लंकादहन हें याच रवितापावरील रूपक असूं शकेल. रावणानें सीताहरण केलें, म्हणजे सूर्याच्या असह्य उष्णतेमुळें अवर्षण पडून शेती अशक्य झाली असण्याचा संभव आहे. ‘ विहि सोतोरसृक्षत नेंद्रम् देवम् अमंसत । ’ या वृषाकपिसूक्तारंभींच्या उद्गारावरून तेव्हां इंद्राला कोणींच विचारीत नसत, असें समजून येतें.

## वृषाकपि कोण ?

इथें वृषाकपि कोण याचा आतां उलगडा केला पाहिजे. कन्या तारकापुंजां- तील कांहीं तारे मिळून एका कपीची आकृति मिसर आणि चीन यांसारख्या दूर- दूरच्या देशांतील प्राचीन ज्योतिष्यांनीं कल्पिली होती. नारायणीयोपाख्यानांतील परंपरेप्रमाणें एकत आणि द्वित या ऋषींना वानरजन्मांत रामाच्या रूपानें साक्षात् दर्शन देण्याचें अभिवचन नारायणानें दिलें होतें. हेच कन्या राशींतील हस्त नक्ष- त्रांत सवित्यासह निवास करणारे एकत आणि द्वित वृषाकपिरूपानें ऋक् वेदांत आणि हनुमानरूपानें रामायणांत भेटतात. एकत आणि द्वित हे तारे वसंत संपा- ताच्या स्थानीं येऊन ध्रुव प्रदेशांतील आकाशांत दिसूं लागले, तेव्हां पृथ्वीवर उष्ण- तेची परिसीमा झाली. त्यानंतर त्यांचा कनिष्ठ बंधु त्रित आणि तो ज्या सोमकल- शाच्या अति सन्निध आहे तो कलश, हे जेव्हां ध्रुवस्थानांत उदित झाले, तेव्हां ध्रुवस्थान गोठूं लागलें. त्रिताचा सोमकलशाशीं अत्यंत घनिष्ठ संबंध असल्यानें हस्त-

नक्षत्रांतील जो तारा त्या कलशाच्या अतिसन्निध आहे तो त्रित, आणि त्याच्या वरलेच हस्तांतील दोन तारे हे द्वित आणि एकत असावेत. त्रितासंबंधीं सविस्तर विवेचन पुढें करावयाचें आहेच. त्यामुळें इथें दशाननचरित्राशीं त्याचा जो संबंध आला आहे, तेवढयापुरतीच चर्चा केली. वृषाकपीचाहि अधिक परिचय तेव्हांच करून घ्यावा लागेल.

मूळ नक्षत्रांतील रावणाचीं दहा तोंडें हींच रुद्रकालींच्या कंठांतील नररुंड-माला होय. अशी नररुंडमाला अन्य कोणत्याहि नक्षत्रांतून पाहावयाला मिळत नाहीं. यावरूनहि मूळ नक्षत्रांतील विचृतौ ताऱ्यांचें द्वंद्व हेंच जगतःपितरौ बनलें असावें, या कल्पनेला पुष्टि मिळते. या दशशीर्ष दशाननानें पृथ्वीवर प्रलय घडवून आणल्यानंतर कांहीं काळ तरी या नक्षत्राचें विचृतौ हेंच नांव प्रचारांत येऊन त्याचे दोनच तारे मानले जाऊं लागले. त्यानंतर ' ज्येष्ठघ्न्यां जातो विचृतोः यमस्य मूलबर्हणात् परिपाहिएनम् । ' ( अ. वे. ६–११०–२ ) या ऋचेंतील ज्येष्ठघ्नी-जात या पदावरून केव्हां तरी नक्षत्रांच्या पुनर्रचनेंत ज्येष्ठा नक्षत्राचा एखादा तारा मूळ नक्षत्राला जोडला गेला असावा, अशी ' Hindu-Aryan Astronomy ' या मननीय ग्रंथाचे लेखक कै. भगवानदास पाठक यांनीं कल्पना केली आहे. मूळ या नांवावरून बेंटलेनें कल्पना केली होती कीं, या नक्षत्रापासून एके काळीं वैदिक आर्यांच्या नक्षत्रगणनेचा प्रारंभ होत असावा. या कल्पनेंत तथ्यांश आहे. पण त्यापेक्षां हें नक्षत्र नुसतें मूळ नसून मूलबर्हणी असल्यानें वैदिक आर्यांचें त्यांच्या मूल स्थानांतून उच्चाटन करण्याचा उपक्रम मूळ नमुचीनें त्याची इंद्राशीं युति अथवा युद्ध झालें असतांना केला असावा, ही कल्पना माझ्यासारख्या टिळकांच्या अनुयायाला अधिक पटते.

## रुद्र आणि अषाढा नक्षत्र

वरील विवेचन लिहून झाल्यानंतर वसिष्ठांच्या रुद्र सूक्तांतील पुढील ऋचा अवलोकनांत आली. ' इमाः रुद्राय स्थिरधन्वने गिरः क्षिप्रेषवे देवाय स्वधाव्ने । अषाळ्हाय सहमानाय वेधसे तिग्मायुधाय भरता शृणोतु नः ।। ( ७–४६–१ ) तैत्तिरीय ब्राह्मणांतील ' यत् नासहन्त तत् अषाढाः । ' ( १–५–२–८ ) या वचनाचें मूळ वरील ऋचेंत दिसतें. या ऋचेंत रुद्राच्या धनुष्यासहच त्याचा अषाढ असा जो उल्लेख आला आहे, तो अत्यंत महत्त्वाचा आहे. आतांपर्यंत धनु राशीं-तील मूलबर्हणीशीं रुद्राचा असलेला निकटतम संबंध व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत

होतों. आतां या ऋचेवरून स्पष्ट कळून येतें कीं, धनुराशींतील अषाळ्हा म्हणजेच अषाढा या नक्षत्रावरूनहि रुद्राला ओळखत असल्याची स्मृति अथवा परंपरा वसिष्ठांनींहि संभाळून ठेविली आहे.

## रेवतीचें पतन

अषाढा नक्षत्रांत दक्षिणायन असतांना शरत्संपात रेवती नक्षत्रांत येतो. ध्रुव प्रदेशांत संपाताच्या वक्र गतीमुळें शरत् संपाताचें एकेक नक्षत्र क्रमानें लुप्त होत जातें आणि वसंत संपाताच्या ठायीं एकेक नवीन नक्षत्र उदित होऊन दृष्टिपथांत येतें, हें वर सांगितलेंच आहे. इथें सांगण्याजोगी महत्त्वाची गोष्ट ही कीं, एके काळीं रेवती नक्षत्र नक्षत्रवक्रांतून भ्रष्ट होऊन दिसेनासें झाल्याची आख्यायिका मार्कंडेय पुराणाच्या ७३ व्या अध्यायांत उपलब्ध होते. त्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं, ऋतवाक् नांवाच्या एका ऋषीचा पुत्र रेवतीच्या अंतीं जन्माला आल्यामुळें परदाराहरणादि पापें करूं लागला, तेव्हां त्या ऋतवाकानें म्हणजे सूर्य, चंद्र आणि ग्रह यांच्या भ्रमणमार्गाचें पूर्ण ज्ञान असलेल्या त्या ऋषीनें शाप दिला. ‘ यस्मान् ममैकपुत्रस्य रेवत्यन्त समुद्भवम् । दौःशील्यमेतत् सा तस्मात् पतताम् आशु रेवती ।। ’ दुसऱ्या एका कथेंत रेवतीचा पिता तिला ब्रह्मलोकीं घेऊन गेला होता आणि तिथून युगांतरानंतर परत आल्यावर त्यानें बलरामाला आपली कन्या अर्पण केली. या कथेचाहि ज्योतिषशास्त्रदृष्ट्या अर्थ तोच होतो.

## गुडघे टेकणारा रुद्र

असो. अषाढा नक्षत्राशीं रुद्राचा संबंध असल्याचे तुरळक उल्लेख सांपडत असले तरी मूळ नक्षत्राशींच त्याच्या चरित्राचा मुख्यतः संबंध येतो. रुद्र म्हणजे आकाशांतील व्याधाचा तारा अशीच सार्वत्रिक समजूत असली तरी हरिवंशांतील पुढील वर्णनावरून त्याचें स्वरूप स्पष्ट कळून येतें. ‘ पूर्वी स्वयंभूनें दिलेलें धनुष्य बाणासह घेऊन रुद्र रणांगणांत उभा राहिला. महादेवानें तें धनुष्य घेऊन भूमीवर गुडघे टेकून शरसंधान करून यज्ञास वेध केला. त्या बाणानें विद्ध झालेला यज्ञ आकाशांत उडाला. तो मृग होऊन ओरडत ब्रह्मदेवाकडे जाऊं लागला. ब्रह्मदेव त्या मृगास सांत्वनपूर्वक असें शुभवचन बोलला, ‘ तूं अशाच स्वरूपाचा महामृग होऊन आकाशांत राहशील. ज्याचें टोंक वाकविलेलें आहे, अशा तीन पेरांच्या शरानें जिंकला गेलेला तूं नक्षत्रांच्या शिरोभागीं रुद्रासह उभा राहा. अक्षय आणि अव्यय चंद्राशीं युक्त होऊन तारांशीं संगत होऊन तूं आकाशांत संचार कर.’ या

अवतरणांतील मृगावर महादेवानें गुडघे टेकून शरसंधान केल्याचा उल्लेख अतिशय महत्त्वाचा आहे. पाश्चात्य ज्योतिषांत सायन वृश्चिक आणि धनु या दोन राशि व्यापणाऱ्या हर्क्युलिसला Kneeler म्हणजे गुडघे टेकणारा अशी संज्ञा आहे. या गुडघे टेकणाऱ्या हर्क्युलिसच्या क्षेत्रांत मूळ नक्षत्राच्या क्षेत्राचाहि समावेश होत असल्यानें इथें महादेवाला कवीनें गुडघे टेकावयाला लाविले आहेत, हें उघड आहे. या वर्णनांत मृग हा नक्षत्रांच्या शिरोभागीं असल्याचा उल्लेख मृगाच्या प्रारंभीं उत्तरायण होतें, त्या काळाला अनुलक्षून असेल. कारण या आख्यानांत प्रजापति मृगरूपानें रोहिणीकडे जात असल्याचा उल्लेख नाहीं. ( हरिवंश भविष्यपर्व अध्याय ३२ ) ( आतां संस्कृत हरिवंश हाताशीं नसल्यानें मराठी भाषांतरांतून वरील उतारे घेतले आहेत. ) उलट हा मृग स्वतःच ओरडत रोहिणींतील ब्रह्मदेवप्रजापतीकडे जात असल्याचा उल्लेख येथें आला आहे.

## धनिष्ठापंचक

मूळ नक्षत्रांत दक्षिणायनारंभ असतांना शरत्संपात उत्तराभाद्रपदांत आणि अषाढा नक्षत्रांत असतांना रेवतींत येतो. सध्यां शरत्संपात उत्तरा फाल्गुनी नक्षत्रांत आहे. येथून रेवती हें सोळावें नक्षत्र येतें. या नक्षत्रांतील शरत् संपाताचा काळ निदान खिस्तपूर्व अकरा ते बारा सहस्र वर्षांचा येईल. येथपासूनची ज्योतिर्विज्ञानाची अखंडित परंपरा श्रुति ग्रंथांवरून आणि ज्योतिष ग्रंथांवरून दाखवितां येतें. उदाहरणार्थ, आपल्या ज्योतिषांतील सुप्रसिद्ध धनिष्ठापंचक या शब्दसमुच्चयाचा वास्तविक अर्थ धनिष्ठापासून रेवतीपर्यंतचे ध्रुवावरील शरत्संपात असाच आहे. या एका सामासिक शब्दानेंच उत्तरध्रुवावरील आर्यांच्या मूलस्थानांतील निदान चार सहस्र वर्षांच्या वसतीचें चित्र उभें राहतें.

## प्रलयापूर्वीचें ज्योतिर्विज्ञान

इतक्या प्राचीन काळीं वैदिक आर्यांना राशि, नक्षत्रें आणि ग्रहांची गति यांचें ज्ञान तरी झालें होतें कीं नाहीं, असा मूलभूत प्रश्न येथें उपस्थित होईल. या प्रश्नांची चर्चा ज्यां सिल्व्हँ बेली आणि ड्युप्युई या नामांकित फ्रेंच ज्योतिष्यांनीं पूर्वीं केली असून त्यांचे निष्कर्ष ऑ. एमलिन प्लंकेट यांच्या Ancient Calenders and constellations या ग्रंथावरून येथें उतरून घेणें सोयीचें होईल. ' Jean silvain Bailly a brilliant scholar and an eminent astronomer has contended for the view that not by any one nation

were the chief advances in astronomy made, but that before the great races of mankind separated from the parent stock, and spread themselves over the globe, the phenomena of astronomy was closely observed and scientific methods for measuring time had been adopted. Bailly speaks of 'une astronomie perfeetionnee.' of which only 'Les debris' are to be met with in the civilized races of antiquity. He claims an antedeluvian race as the originators of astronomic science. या उताऱ्याचा थोडक्यांत सारांश असा कीं प्रलयामुळें मानवांचे विभिन्न वंश परस्परांपासून विभक्त होण्यापूर्वींच ज्योतिषशास्त्र पूर्णतेला गेलें आणि त्या पूर्णतेला गेलेल्या शास्त्राचे अवशेष मात्र या वंशांच्या उपलब्ध इतिहासांत आढळून येतात. बेलीच्या वरील अवतरणांत नक्की काळाचा उल्लेख नाहीं. पण Memoire explicatif du zodiac" या ग्रंथांत ड्युप्युई या फ्रेंच ज्योतिष्यांनीं जगांतील राशिचक्रांचा आणि नक्षत्रचक्रांचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे कीं खि. पू. १२००० वर्षांच्या सुमारास मेषराशीच्या प्रारंभीं शरत्संपात असतांना हीं राशिचक्रें आणि नक्षत्रचक्रें अस्तित्वांत आलीं असावींत. या दोन लेखकांचे ग्रंथ मला पुण्यांत मिळूं शकले नाहींत. यामुळें त्यांच्या कल्पनांचा आणि पुराव्यांचा मला उपयोग करतां येत नाहीं, याचा खेद वाटतो. कारण वैदिक परंपरेवरून मूळ नक्षत्रांत दक्षिणायन असल्याचे अनेक संदर्भ सांपडतात आणि त्या काळीं उत्तराभाद्रपदा नक्षत्रांत शरत्संपात येऊं शकतो. रुद्राचा पूर्वाषाढा नक्षत्राशीं संबंध असल्याची जी परंपरा उपलब्ध आहे, तिच्यावरून रेवतींतील शरत्संपाताचा बोध होतो. तेव्हां मला असें म्हणतां येतें कीं, वैदिक परंपरेवरूनहि ड्युप्युईच्या निष्कर्षाजवळ पोंचतां येतें.

## अग्नीचे दिवंगत बंधू

वैदिक वाङ्मयांत अग्नीला 'अपाम् नपात्' म्हणजे वारिपुत्र अशी एक वैशिष्ट्यपूर्ण संज्ञा आहे. अग्नीचा जन्म जलांत होत असल्यासंबंधींचे उल्लेख वैदिक वाङ्मयांत सर्वत्र विखुरलेले आढळतात. आचार्य मॅक्डोनेल म्हणतात. 'The notion of Agni in the waters is prominant throughout the vedas. Water is Agni's home, as heaven is that of the sun. जल हें अग्नीचें सदन असून गगन हें सूर्याचें सदन होय, असाच वैदिक वाङ्मयांतून सर्वत्र सूर निघतो. अग्नि हा वसंतसंपात असल्याचें लक्ष्यांत घेतलें आणि अग्नि,

पृथ्वी, वायु, जल हा राशिचक्रांतील क्रम दृष्टीपुढें आणला, म्हणजे अग्नि हा वारिपुत्र कसा याचा, अंशतः उलगडा होऊं शकतो. पण अग्नि ही संपाताची संज्ञा ध्रुवस्थानांतील असल्याची कल्पना सुचेपर्यंत तो वारिपुत्र कां याचा पुरता उलगडा झाला नव्हता. ध्रुवावर आपल्या नक्षत्रचक्रांतील अर्धींच नक्षत्रें दिसतात. सहस्रवर्षांनीं त्यांतील शरत् संपाताच्या स्थानीं असलेलें एक नक्षत्र लुप्त होतें आणि वसतसंपाताच्या स्थानीं नवीन नक्षत्र उदित होतें. हें नवीन उदयाला येणारें नक्षत्र भोंवतालच्या महासागरांतून वर येतांना त्याला आणि त्याच्यासहच उदित होणाऱ्या वसंतसंपात-रूपी अग्नीला वारिपुत्र ही संज्ञा मिळणें स्वाभाविक आहे. अशा अद्भुत परिस्थितींत जन्माला येणाऱ्या अग्नीला सारखी मृत्यूची भीति वाटणें स्वाभाविक आहे. ऐतरेय ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंजिकेंत अग्नीला मृत्यूनें गांठलें असतां त्यानें आपली कशी सुटका करून घेतली, याचें एक आख्यानच आलें असून तैत्तिरीय संहितेंत तर एकामागून एक तीन अग्नि मृत्युमुखीं पडल्याची प्राचीन परंपराहि संरक्षून ठेविलेली आढळते. 'अग्नेः त्रयो ज्यायांसो भ्रातर : आसन । ते देवेभ्यः हव्यं वहन्तः प्रामीयन्त । सो अग्निः अबिभेत् इत्थं वावस्य आर्तिमारिष्यतीति । स निलायत । सो अपः प्राविशत् । तं देवताः प्रैषम् ऐच्छन् । तं मत्स्यः प्राब्रवीत् (तै. सं २–६–६) वैदिक अग्नीचे तिघे वडिल भाऊ होते, ते देवांसाटीं हवि वाहून नेतां नेतां थकून परलोकीं गेले. तेव्हां त्यांच्यासारखीच आपली गति होऊं नये म्हणून चौथा अग्नि भिऊन पाण्यांत लपून बसला. या पळून गेलेल्या अग्नीची चाहडी मत्स्यानें केली. दशम मंडलांतील ५१ व्या सूक्तांत या लपलेल्या अग्नीनें वरुणाला सांगितलें आहे. 'होत्रात् अहं वरुण बिभ्यत् आयम् न इत् एव मा युनजन् अत्र देवाः।' (१०–५१–४) हे वरुणा, होत्रक्रियेला त्रासून भिऊन मी इथें आलों नाहीं, तर माझी इथें देवांनींच योजना केली आहे. सौचीक अग्नीच्या सूक्ताप्रमाणें पाण्यांत लपलेल्या अग्नीचीं वरुणाशीं बोलणीं झालीं, त्यावरून तो शरत् संपात असला पाहिजे. 'ते देवेभ्यः हव्यं वहन्तः प्रामीयन्त ।' या वरील वचनावरूनहि तोच बोध होतो. ते अग्नि जर देवांसाठीं हवी वाहून नेतांना मरण पावले असले तर पुरुषसूक्तांतील 'ग्रीष्म इध्म शरत् हविः' या वचनाला अनुसरून शरत् ऋतूशींच त्यांचा संबंध येतो. हे हवि वाहून नेणारे अग्नि निधन पावतात, तेव्हां ते ध्रुवस्थानींच संपाताच्या वक्र गतीमुळें निधन पावत असले पाहिजेत. त्या प्रदेशांतील आर्यांमध्यें एखादें नक्षत्र दिसत नाहींसें झालें तर तें पाण्यांत लपून बसलें, अथवा मृत्युमुखीं पडलें असें म्हणण्याचा प्रघात होता. देवांदैत्यांच्या समुद्रमंथनांतून चौदा रत्नें वर आल्याची जी कथा

प्रचलित आहे, त्या कथेचा संबंधहि भारतीय आणि इराणी आर्यांनीं ध्रुवस्थानाचा पूर्ण त्याग करून उत्तर कुरूंत उपनिवेश स्थापल्यानंतर ध्रुवावरील मूलस्थानांत इतके दिवस अदृश्य असलेल्या चौदा नक्षत्रांचें त्यांना अनपेक्षित दर्शन झालें, या इतिहासाशींच असावा. असो. पाण्यांत लपून बसलेला अग्नि आणि त्याचे निधन पावलेले तिघे वडील बंधू हे त्या त्या काळचे शरत् संपात असावेत, हें समजण्याला वरील विवेचन पुरेसें आहे. तेवढयानें त्यांची चाहडी करणारा मत्स्य कोण हा प्रश्न तसाच राहून जातो. इथे सकृद्दर्शनीं सुचणारा मत्स्य अर्थात् मीन राशींतील मत्स्य होय. महाभारतांतील अर्जुनानें मत्स्यवेध केल्याच्या कथेचा संदर्भ कन्या आणि मीन राशींतील वसंत आणि शरत् संपातांकडे आहे, हें उघड दिसतें. कारण अर्जुनी हें पूर्वा आणि उत्तरा या दोनहि नक्षत्रांचें नांव असून मत्स्यासंबंधीं स्पष्टीकरणाची आवश्यकताहि नाहीं. निघंटूंत चित्रामघा, अर्जुनी हीं उषेचीं नांवें येतात. हीं ध्रुवस्थानांतील उषेचीं अर्थात् तत्कालीन वसंतसंपातांचींहि नांवें आहेत. आकाशांतील मीन या तारकापुंजाचा विस्तार सायन मीन १५ अंशापासून सायन मेष २३ पर्यंत आहे. पण या पुंजांतील रेवती नक्षत्र हें अर्जुनीच्या प्रतियोगांत येत नसल्यामुळें अर्जुनाच्या मत्स्यवेधांत येऊं शकत नाहीं. आर्यांच्या ध्रुवस्थानांतील निवासाच्या अंतकाळीं चित्रावसु नक्षत्रांत, धनिष्ठा नक्षत्रांत शरत् संपात होता. तेथून त्याचे तिघे वडील भाऊ मोजले तर ते शततारका, पूर्वाभाद्रपदा आणि उत्तरा भाद्रपदा या नक्षत्रांतील शरत् संपात असले पाहिजेत. The Nocturnal sun, the Fish sun (c.F. Apollon Delphinios) concealed in the waters like the vedic surya, who was drawn by gods from the ocean where he was hidden. रॉबर्ट ब्राउन यांच्या प्रिमिटिव्ह कॉन्स्टेलेशन्स या ग्रंथांतील वरील अवतरणावरूनहि आपोलो देल्फिनिओस् अर्थात् धनिष्ठा नक्षत्रांतील सूर्य हाच पाण्यांत लपलेला शेवटचा सूर्य असल्याची ग्रीक परंपरा असल्याचें सुव्यक्त होतें.

## रोहिणीशकटभेद

आर्धीच मूलबर्हणींत दक्षिणायन असतांना पृथ्वीवर प्रलय झाला. त्यानंतर प्रथम मंगळानें आणि नंतर शनीनें दक्षिणायनारंभीं आलेलें नवीन नक्षत्र जें ज्येष्ठा त्याच्या प्रतियोगांतील रोहिणीशकटाचा भेद आरंभिला आणि त्यामुळें पृथ्वीनें कापालिकीव्रत धारण केल्याचीं दृश्यें दिसूं लागलीं. मंगळ आणि शनि यांनीं रोहिणीशकटभेद केल्याची स्मृति आणि त्या शकटभेदाचीं फळें एकट्या

वैदिक आर्यांच्या परंपरेंतच उपलब्ध होतात. खि. पू. पांचसहा सहस्र वर्षांच्या सुमारास शनि रोहिणीशकटभेद करीत होता. मंगळकृत रोहिणीशकटभेदांचा काळ तर त्याच्याहि पूर्वींचा आहे. इतक्या प्राचीन काळीं वैदिक आर्यांना रोहिणी-शकटासहच शनि मंगळासारख्या ग्रहांचेंहि ज्ञान झालें होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. पण पाश्चात्यांनीं लिहिलेल्या ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांतून याचा नुसता निर्देशहि कोठें सांपडणार नाहीं.

## इंद्र आणि रौहिण

असो. रोहिणीशकटभेदावरून काढलेल्या अनुमानावर कै. जोगेशचंद्र राय यांनीं ' आमादेर ज्योतिषी ओ ज्योतिष ' या ग्रंथांत आक्षेप घेतला आहे. ' किन्तु एइ अनुमान तत बलवत् नहे। केन ना, शकटभेद प्रत्यक्ष ना करिया-ओ ताहारसंभाव्यता बलिते पारा जाय ! ' म्हणजे शकटभेद प्रत्यक्ष न पाहतां गणितानें त्याची शक्यता ठरवितां येत असल्यानें इतक्या प्राचीन काळापासून आर्यांना शनिमंगळांची माहिती होती, असें शकटभेदाच्या उल्लेखावरून निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण प्रत्यक्ष वेदांतूनच या शकटभेदाचे उल्लेख आले असल्यानें वरील आक्षेपाचें परस्पर खंडन होतें. ' अहन् अहिम् अभिनत् रौहिणम् व्यहन् व्यंसं मघवा शचीभिः ।' ( ऋ. १–१०३–२ ) ' यो रौहिणं अस्फुरद् वज्रबाहुः द्याम् आरोहन्तम् स जनास इन्द्रः ।' ( ऋ. २–१२–१२ ) त्वं रौहिणं व्यास्यो विवृत्रस्य अभिनत् शिरः ।' ( अ. वे. २०–१२८–१३ ) या सर्व वचनांतून ज्या रौहिणाचा उल्लेख येतो, त्याच्यासंबंधीं कोणतीहि माहिती भाष्यकार आणि भाषांतरकार पुरवूं शकत नाहींत. इंद्रानें ज्या रौहिणाला फोडल्याचा आणि मार-ल्याचा पराक्रम या वचनांतून वर्णिला आहे, तो वस्तुतः रोहिणीचा शकटच आहे. विशेषतः दुसऱ्या मंडलांतील द्यूवर चढाई करणाऱ्या रौहिणाचा उल्लेख विशेष महत्त्वाचा दिसतो. इंद्र जेव्हां ज्येष्ठा नक्षत्रांत होता, तेव्हां रोहिणींत उत्तरा-यण होत असल्यानें रौहिणानें द्यूवर चढून जाण्याचा उपक्रम करणें स्वाभाविक आहे. या अपराधाकरितां इंद्रानें त्याचा शकटच मोडला. तरीसुद्धा आणखी सरा-सरी दोन सहस्र वर्षांनीं रौहिण आपल्या शकटासह द्यूच्या म्हणजे दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं विराजमान झालेला दिसेलच. असो. इंद्र ज्येष्ठा नक्षत्रांत होता, तेव्हां बहुधा मंगळाकडून रोहिणीशकटभेद होत असावा. कै. दीक्षितांनीं भार-तीय ज्योतिषशास्त्राच्या इतिहासांत लिहिलें आहे. ' शकपूर्व ५२९४ या वर्षीं

रोहिणीच्या उत्तर तारेचा भोग सायन रा. १०– अं. २८–क. २ इतका येतो. त्या स्थळीं शनि आला असतां त्याचा शर दक्षिण अं २–क ३४ असा आला. यावरून तेव्हां आणि त्यापूर्वी पुष्कळ काळ शनि प्रत्येक फेरींत रोहिणीशकटाचा भेद करीत होता. मंगलकृत शकटभेदहि त्याच्यापूर्वी बराच काल येतो. (पान १४५) मंगळाकडून होणाऱ्या शकटभेदाचें गणित कै. दीक्षितांनीं केलें नाहीं. तें कोणी आधुनिक ज्योतिष्यांनीं केल्यास वेदांतील एक कोडें सोडविल्याचें श्रेय त्यांना मिळेल. इंद्रानें रौहिणाला फोडल्याचे जे उल्लेख वेदांत येतात, त्यांत शकटाचा उल्लेख नाहीं. त्याच्या उलट इंद्रानें उषेचा शकट मोडल्याचे जे उल्लेख येतात, त्यांत रोहिणीचें नांव नाहीं. कारण प्रत्यक्ष रोहिणींत वसंतसंपात आला, तत्पूर्वी दोन सहस्र वर्षांत तिचा शकटभेद झाला नव्हता. उषेच्या शकटभेदाचे उल्लेख हे आर्द्रा आणि मृग या नक्षत्रांतून वसंतसंपात असतांना वसंतऋतूच्या आगमनसमयीं रोहिणीचा पूर्वोदय झाला असतांना शनीकडून होणाऱ्या तिच्या शकटभेदाचे उल्लेख असावेत. ‘या का च बलकृतिः इंद्रकर्म एव तत्।’ (निरुक्त-अ. ७–खं. १०) या न्यायानें इंद्राच्या पराक्रमांत यांचा समावेश झाला असला पाहिजे.

## उषाशकटाचा भेद

इंद्रानें उषेचा रथ मोडून टाकला याचा अर्थ ख्रि. पू. ५५०० वर्षांच्या सुमारास शनीकडून रोहिणीचा शकटभेद होत होता, हें न समजल्यामुळें वेदिक इंडिया या ग्रंथाचे कर्ते रागोझिन यांनीं इंद्राच्या कृतीवर पुढील भाष्य केलें आहे. ‘Ushas the beautiful, the auspicious could be treated by Indra at times with the utmost severity; in seasons of drought, is not the herald of another cloudless day, the bringer of the blazing Sun, a wicked sorceress, a foe to gods and men to be dealt with as such by the thunderer, when soma-drunk, he strives with his friends the Maruts to storm the brazen stables of the sky and bring out the the blessed milch-kine which are therein imprisoned. Smashing the obnoxious one's car seems to be the one method which occurs to the great foe-smiter who is more earnest (effective) than inventive’

म्हणजे जेव्हां वर्षाॠतूंतील दुर्दिन उगवायला पाहिजेत, तेव्हांहि जर ही उषा एखाद्या वासकसज्जेप्रमाणें सजून सकाळीं उदयाचलावर दर्शन द्यावयाला लागली तर इंद्रानें तिचा रथ मोडून टाकावयाचा नाहीं तर काय करावयाचें? ‘ एतत् ह इत् उत वीर्यम् इंद्र चकर्थ पौंस्यम् । स्त्रियम् यत् दुःहनायुवम् वधीः दुहितरम् दिवः ॥८॥ दिवः चित् ह दुहितरम् महान् महीयमानाम् उषासम् इंद्र संपिणक् ॥ ९ ॥ एतत् अस्या अनः शये सुसंपिष्टम् विपाश्या । ससार सीम् परावतः ॥ ११ ॥ ( ४–३० ) इंद्रानें मोठा पुरुषार्थ काय केला तर द्यूची कन्या म्हणविणाऱ्या अजेय उषादेवीचा मोड केला. तिचा रथ मोडून पडला आणि ती दूरच्या प्रदेशांत नाहींशी झाली. या वचनावरून ही गोष्ट निश्चितपणें कळून येतें कीं, उषेचा रथ जेव्हां मोडत होता तेव्हां ती त्या रथापासून पुष्कळ दूरच्या प्रदेशांत संचार करीत होती. ती जेव्हां प्रत्यक्ष रोहिणीशकटावर आरूढ झाली, तेव्हांपासून तिच्या वाटेला जाण्याचें साहस इंद्रानें केलेलें नाहीं.

इंद्रानें रौहिणाला फोडलें, असे जेव्हां उल्लेख येतात; तेव्हां इंद्र ज्येष्ठा नक्षत्राच्या सान्निध्यांत असतांना मंगळाकडून रोहिणीशकटाचा जो भेद होत होता, त्याच्याविषयींचे हे उल्लेख असावेत आणि इंद्र जेव्हां उषेच्या रथाचा चुराडा करीत असल्याचे उल्लेख येतात, तेव्हां ते उल्लेख शनिकृत रोहिणीशकटभेदाचे उल्लेख असावेत. या दोन शकटभंगांचे कर्ते भिन्न भिन्न असल्यामुळें वैदिक ऋषींनीं त्यांच्याविषयीं विभिन्न रूपकें केलीं आहेत.

## साठ अंशांची वृश्चिक राशि

ज्येष्ठांतील दक्षिणायनाची ही चर्चा संपविण्यापूर्वीं हें नक्षत्र ज्या वृश्चिक राशींत आहे, त्या वृश्चिकेसंबंधीं थोडें विवेचन करणें आवश्यक आहे. ज्योतिषशास्त्रावर पाश्चात्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांतून असें प्रतिपादिलें जातें कीं, वैदिक आर्यांनीं द्वादश राशी अक्कड आणि सुमेर येथील सुसंकृत समाजापासून उसन्या घेतल्या. त्या मूळच्या वैदिक परंपरेंतील तर नव्हेंतच; वैदिक आर्यांपासून विभक्त झालेल्या ग्रीक रोमन समाजांतीलहि नव्हेंत. या उपमर्दकारक विधानासंबंधीं इतकें सांगितलें म्हणजे पुरें कीं ऋग्वेदांतील ‘ पंचपादं पितरं द्वादशाकृतिम् ’ या वर्णनांत सायणभाष्याप्रमाणेंहि संवत्सराच्या द्वादश आकृतींचा म्हणजेच द्वादश राशींचा स्पष्ट उल्लेख आहे. याच्या उलट अक्कड आणि सुमेर येथील संस्कृतीचे पराकाष्ठेचे पुरस्कर्ते रॉबर्ट ब्राउन यांनीं त्यांच्या ‘ Primitive Constellations ’ या

सुप्रसिद्ध ग्रंथांत स्पष्ट लिहिलें आहे, कीं त्या आसुर समाजांत तूळ आणि वृश्चिक या दोन राशी मिळून एकच प्रचंड वृश्चिकाची आकृति कल्पिली होती. 'This gigantic size of the scorpion is also reduplicated in the zodiac, where it occupied two signs, and thus gave rise to the mistake of servius ( In Georgica 133 ) that the chaldian zodiac consisted of only eleven constellations' त्यामुळें सर्व्हियस सारख्या रोमन कवीनें लिहिलें आहे कीं खाल्डियन लोकांचें संवत्सरचक्र अकराच राशींचें आहे. ज्या खाल्डियन लोकांविषयीं त्यांच्याशीं निकटसंबंध येणाऱ्या शेजाऱ्यांत असल्या अपसमजुती पसरल्या होत्या, त्यांच्यापासून म्हणे वैदिक आर्यांनीं आपलें राशिचक्र उसनें घेतलें. अक्कड आणि सुमेर या देशांतील समाजांत तूळ राशीची कल्पनाच उत्पन्न झाली नव्हती. त्यांच्या समजुतीप्रमाणें विशाखा नक्षत्रांतील तारे म्हणजे वृश्चिकानें आपल्या वदनांत धरलेलें अस्तसमयींचें सूर्यबिंब. ही कल्पना विशाखा नक्षत्रांत जेव्हां शरत् संपात आला, त्या काळाला शोभण्याजोगी आहे. पण वैदिक आर्यांची तूळ राशीची कल्पना तिच्यापेक्षां फार प्राचीन काळची असून तैत्तिरीय संहितेनें अयनचलनाच्या क्रमाला अनुसरून या सृष्टींतील जीवनविकासाचा जो क्रम आप, वायु, पृथ्वी आणि अग्नि या राशींतून सांगितला आहे, त्या क्रमांतच तूळ या वायुराशीच्या कल्पनेचें बीज आहे. त्यामुळें वृश्चिकेसारख्या जलराशीचें क्षेत्र दोन राशींच्या इतकें वाढवून तूळ या वायुराशीचें अस्तित्व लोपवून टाकणाऱ्या खाल्डियन ज्योतिष्यांचा वैदिक आर्यांनीं उपहासच केला असता आणि आपल्याकडून ज्योतिर्विद्येचीं जीं मूलतत्त्वें घेतलीं, त्यांत सुधारणा न करतां केवळ विकृति करणाऱ्या शिष्यांची त्यांनीं कींवच केली असती.

## ऊरूतदस्ययद्वैश्यः

वैदिक आर्यांना खि. पू. ६००० या काळापासून तरी तूळ राशि सुविदित असावी. कारण त्या काळीं कल्पिलेल्या नक्षत्रिय प्रजापतीच्या वर्णनांत 'चित्रा शिरः निष्ट्या हृदयम् ऊरू विशाखे' असा विशाखांचा उल्लेख आला असून पुरुषसूक्तांतील विराटपुरुषाच्या वर्णनांत 'ऊरू तदस्य यद्वैश्यः' असें सांगून ऊरूंचा म्हणजेच विशाखा नक्षत्रांचा तागडीवाल्या वैश्यवर्णाशीं संबंध जोडला आहे. विशाखा नक्षत्र तूळ राशींत असल्याचें ज्यांना आकाशांत नित्य दिसत होतें, त्यांनींच त्या नक्षत्राच्या ठिकाणीं असणाऱ्या प्रजापतीच्या अथवा विराट्पुरुषाच्या

ऊरूपासून वैश्य वर्णाची उत्पत्ति कल्पिली असली पाहिजे. तूळ राशींतील एका नक्षत्रपुंजाला खाल्डियन ज्योतिषांत केव्हां तरी तुल्कु हें नांव मिळालें असलें तरी त्यांच्या मनांत तूळ राशीची कल्पना नव्हतीच, हें रॉबर्ट ब्राउन यांच्या विवेचनावरून उघड आहे. ' We find on a euphratean gem a scorpion holding a circular object in his claws. The stars in the claws form a dim circle, representaitve of the waning sun'. या वृश्चिकाच्या आकड्यांत पकडलेल्या सूर्यबिंबाचें पुढें त्या देशांत हवन करण्याच्या वेदींत रूपांतर झालें आणि कदाचित् वैदिक आर्यांच्या तूल या राशिनामावरूनहि तिला तिचें तुल्कु हें नांव लाभलें असेल. वृश्चिकेसंबंधीं रॉबर्ट ब्राउन यांनीं असेंहि म्हटलें आहे कीं ' The scorpion was originally a symbol of darkness, and the sunslaying scorpion is equally a sunguarding scorpion.' म्हणजे वृश्चिक हें त्या देशांत अंधाराचें प्रतीक होतें; त्यामुळें एका समजुतीप्रमाणें तो अस्तमान सूर्याचा वध करतो, तर दुसऱ्या समजुतीप्रमाणें तो त्याचा संरक्षक बनतो. अक्कड आणि सुमेर या देशांतील वृश्चिक राशीसंबंधींची ही मूलभूत कल्पना लक्षांत घेतली म्हणजे या कल्पनेचा आणि एकंदरीनेंच त्यांच्या ज्योतिषशास्त्राचा जन्म वृश्चिकेंत शरत्संपात होत होता, त्या काळांतील म्हणजे खि. पू. ४५०० पासून खि. पू. २५०० या काळांतील असल्याचें उघड होतें. या पूर्वीं वृश्चिक राशींतील ज्येष्ठा नक्षत्रांत जेव्हां दक्षिणायन होत होतें, त्या काळच्या वैदिक आर्यांच्या ज्योतिर्विज्ञानाचें विवरण प्रस्तुत प्रकरणांत चालूं असल्यानें या दोन काळांतील आणि संस्कृतींतील प्रभेदाची वाचकांना आपोआपच कल्पना येईल.

खाल्डियन ज्योतिष्यांनीं राशिचक्रांत अकराच आकृति कल्पिल्या असल्या तर ती उणीव त्यांनीं नक्षत्रचक्रांत भरून काढली होती. एका आधाराप्रमाणें प्रत्येक मासामागें तीन असे त्यांचे ३६ नक्षत्रपुंज होते, तर दुसऱ्या एका आधाराप्रमाणें त्यांची संख्या तीस होती. राशिचक्राचेंहि ते ३६० अंश न मानतां प्राचीन काळीं १२० अंशच मानीत. असले ढोबळ भेद विचारांत घेतले तरी खाल्डियन लोकांचें वैदिक आर्यांनीं ज्योतिषशास्त्रांत अनुकरण करणें अशक्य असल्याचें आमच्या विद्वानांना दिसून येईल.

## आदित्योपासकांचा ध्रुवत्याग

वैदिक आर्यांमध्यें उत्तर ध्रुवाचा सर्वांत आधीं त्याग करणारे कुळ आदित्यो-

पासकांचें. या कुळानें मूळ नक्षत्रांत दाक्षिणायन होत असतांनाच ध्रुव स्थानाचा त्याग केला असेल. त्या नक्षत्रासंबंधीच्या ज्या परंपरा वैदिक वाङ्मयांत उपलब्ध होतात, त्या साऱ्या सरासरी ५० अक्षांशांच्या प्रदेशांत उपनिवेश स्थापिलेल्या आर्यांनीं संग्रहीत केल्या असाव्यात. दिवसांतून एकवार तरी आदित्याचें दर्शन लाभूं लागल्यानंतरच हे आदित्योपासक झाले असावेत. या आदित्योपासकांचें मूल स्थानाशीं दळणवळण पुढेंहि तसेंच चालूं राहिल्यामुळें ध्रुवावरील बृहस्पतीचे उपासक जे आंगिरस त्यांच्या नेहमीं आदित्योपासकांशीं स्पर्धा होत. या स्पर्धा तैत्तिरीय संहितेंत उल्लेखिलेल्या चित्रावसु नामक रात्रीचें युग येईपर्यंत चालू होत्या. चित्रावसु रात्रीचें युग म्हणजे धनिष्ठा नक्षत्रांत जेव्हां शरत्संपात येत होता, तें युग हें अन्यत्र सांगितलें आहे. या युगांत वातावरणांतील कांहीं परिवर्तनामुळें आंगिरसांनासुद्धा अग्नीच्या आश्रयानें ध्रुवावरील दीर्घरात्र कंठणें अशक्य वाटूं लागलें आणि तेव्हां त्यांनींहि ध्रुवस्थानाचा त्याग केला. यासंबंधींची एक अति महत्त्वाची आख्यायिका ऐतरेय ब्राह्मणांत अवशिष्ट राहिली आहे. एकदां आंगिरसांच्या मनांत यज्ञ करून स्वर्गाला जाण्याची इच्छा उत्पन्न झाली आणि त्यांनीं आदित्यांना आपल्या यज्ञाप्रीत्यर्थ आमंत्रण केलें. तेव्हां आदित्यांनीं त्यांना उलट असा निरोप पाठविला कीं तुमच्या आधींच आम्ही स्वतः यज्ञ करणार आहोंत, तर तुम्हीच आमच्या यज्ञाला या. या निरोपाप्रमाणें आंगिरसांनीं आदित्यांच्या यज्ञाला जाऊन त्यांचें पौरोहित्य करून तो यज्ञ साजरा केला. ' ते ह आदित्यान् आंगिरसः अयाजयन् । तेभ्यः याजयद्भ्यः इमां पृथ्वीं पूर्णां दक्षिणां अददुः । तान् इयं प्रतिग्रहीतान् अतपत् । तान्यवृञ्जन् । सा सिंही भूत्वा विजृंभन्तीजनान् अचरत् । तस्याः शोचत्याः इमे प्रदराः प्रादीर्यन्त । ( ६–५–८ ) या आख्यानाचा सारांश हा कीं, आदित्यांनीं आंगिरसांना ही पृथ्वीच दक्षिणा म्हणून समर्पण केली असतां ती त्यांना ताप देऊं लागल्यानें त्यांनीं तिचा त्याग केला. तशी ती सिंही होऊन साऱ्या जनांना उपद्रव देऊं लागली, तेव्हां संतापातिरेकानें पृथ्वीला ठिकठिकाणीं भेगा पडल्या. अशा प्रकारें पृथ्वी बिथरलेली पाहून आदित्यांनीं आंगिरसांना सूर्यच समर्पण केला आणि त्याचा आंगिरसांनीं स्वीकार केला. या संदर्भांत पृथ्वीचें सिंही हें अगदींच अपरिचित नांव भेटतें. या नांवाचा वास्तविक अर्थ कळण्याकरितां पृथ्वी आणि उषा यांच्या इतर ऐतिहासिक नांवांचा विचार केला पाहिजे. एके काळीं पुनर्वसूंत संपात होता, म्हणून त्या काळाच्या स्मरणार्थ वैदिक आर्यांनीं पृथ्वीला वसुमती आणि अदिति हीं नांवें दिलीं आहेत. त्याचप्रमाणें पुष्यांत संपात असतांना काश्यपी आणि

आश्लेषांत संपात असतांना अनंता हीं नांवें तिला लाभलीं. निरुक्तांतील चित्रामघा आणि अर्जुनी हीं दोन नांवें त्या दोन नक्षत्रांतील वसंतसंपाताची स्मृति जागी करतात. मूळ नक्षत्रांत दक्षिणायन असतांना अर्जुनी फाल्गुनींतहि वसंतसंपात होता. या अर्जुनींची उपासना होमरचा आगामेम्नन राजाहि करीत असे. ग्रीसमध्यें अर्जुनीस् या देवतेचीं सुप्रसिद्ध मंदिरेंहि होतीं. असो. या साऱ्या नामांच्या परंपरेंतीलच सिंही हें नाम असल्यानें त्याचा अर्थहि तदनुरोधानें करावा लागतो. म्हणजे तेव्हां सिंह राशींत संपात असल्यानें ऐतरेयांतील आख्यान रचणाऱ्यांनीं पृथ्वी सिंही झाल्याची कल्पना केली आहे. इथें असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं संहिताकाळाच्या अंतीं मघा नक्षत्रांत दक्षिणायन होत असल्यानें या आख्यायिकेंतील सिंही शब्दाचा अर्थ सिंह राशींत संपात असलेल्या काळची पृथ्वी असाच कां करावा, या प्रश्नाला याच आख्यायिकेची आणखी चिकित्सा केली असतां उत्तर मिळूं शकेल. आंगिरसांनीं पृथ्वीरूप दक्षिणेचा परित्याग केल्यानंतर आदितेयांच्या समोर आकाशमंडळांत तळपणारा सूर्य श्वेत अश्वाच्या रूपानें आला आणि त्यालाच त्यांनीं आंगिरसांच्या स्वाधीन केलें. ही परंपरा 'देवनीथ'संज्ञक सत्रा चरणांत संग्रहीत केलेली होती आणि ती ऐतरेयकारांनीं तशीच संरक्षून ठेविली आहे. त्यांत आंगिरसांनीं सूर्यरूपी दक्षिणेचा स्वीकार केल्यानंतर आदितेयांनीं त्यांना सांगितलें. 'अहा नेतसन्विचेतनानि इति । एष ह वा अह्नां विचेतयिता जश नेतसन्पुरोगवास इति ।' म्हणजे हा दिवसांना चेतना देणारा सूर्य आतां तुमच्या जवळच आहे, या मार्गदर्शकाचा सहवास सोडून आतां तुम्ही अंधकारांत भ्रमूं नका. खरेंच आहे. ध्रुवप्रदेशांत वस्ती असतांना आंगिरसांना पृथ्वीच्या संतापातिरेकाचा जसा परिचय झाला नव्हता, तसाच वर्षानुवर्ष नित्य नियमित दर्शन देणाऱ्या सूर्याच्या सहवाससुखाचाहि त्यांना परिचय झाला नव्हता. त्यामुळेंच त्यांनीं पृथ्वीरूपी दक्षिणेचा, अर्थात् उत्तर ध्रुवाच्या दक्षिणेकडील पृथ्वीचा तिटकारा केलेला पाहून आदितेयांनीं त्यांना समजावून सांगितलें कीं, आतां दक्षिणेकडे सहा मासांची रात्र नाहीं यांत समाधान माना. ही आख्यायिका महत्त्वाची आहे, हें प्रो. कीथ यांच्याहि ध्यानांत आलें होतें आणि हिचे सारे महत्त्वाचे अवयव छाटून टाकल्याबद्दल त्यांनीं कौषीतकी ब्राह्मणाच्या कर्त्यांना दोषहि दिला आहे. पण प्रस्तुत लेखकाप्रमाणें ते टिळकांच्या सान्निध्यांत आले नसल्यानें त्यांना तिचें ऐतिहासिक स्वरूप समजून आलें नाहीं. असो. ध्रुवस्थानाला शेवटपर्यंत चिकटून राहिलेल्या आंगिरसांना आदित्योपासकांनीं सवित्याच्या सहवासाची चटक लाविल्यानंतर

अर्वाचीन काळांतील सागरबंदीप्रमाणेंच ध्रुवकटिबंधांतील तामिस्र प्रदेशांत संचार करण्याची वैदिक आर्यांनीं आपल्या वंशजांना बंदी केली. सीताशुद्धीसाठीं चाल-लेल्या वानरांना वानरराज सुग्रीवानें सांगितलें आहे, 'न कथंचन गन्तव्यं कुरूणाम् उत्तरेण वः ।...अभास्करमर्यादं न जानीमः ततःपरम् ॥' कुरु देशाच्या उत्तरेला जाऊं नका, कारण त्या असूर्य आणि अमर्याद देशाचा आम्हांला थांगपत्ता नाहीं. सुग्रीवाच्या या वचनावरून असें समजून येतें कीं, ध्रुवकटिबंधाचा त्याग केल्यानंतर वैदिक आर्यांनीं उत्तर कुरूंत वसती केली. स्वतः सुग्रीवाला ध्रुवकटिबंधासन्निध अस-लेल्या एकाच कुरु देशाचा परिचय होता, असें वरील वचनावरून दिसतें. दक्षिणा शब्दाचा पृथ्वी असा एक अर्थ असून तो ध्रुवावरील वस्तीचा निदर्शक आहे.

## बार्हस्पत्यवर्ष

वैदिक आर्यांमध्यें गुरूच्या भ्रमणावरून कालमापन करणारे आंगिरस् आणि आदित्याच्या भ्रमणावरून कालमापन करणारे आदित्य, ( म्हणजे आदित्यपंथी, पुढें रवीचे उपासक म्हणून प्रसिद्धीला आलेल्या मग ब्राह्मणांचे पूर्वज ! ) यांच्यामध्यें आपापल्या पंचांगांच्या श्रेष्ठतेविषयीं तीव्र स्पर्धा चालत असे. 'आदित्याश्च आंगिर-सश्च सुवर्गे लोके अस्पर्धन्त । वयं पूर्वे सुवर्गं लोकं इयाम वयं पूर्व इति ।' या स्पर्धेतील सुवर्ग लोक संवत्सरच होता. 'संवत्सरः सुवर्गो लोकः । संवत्सर एव ऋतुषु प्रतिष्ठाय सुवर्गं लोकम् एति ।' (तै. ब्रा. २–२–३) या स्पर्धेत अंतीं आदित्य विजयी झाले, हें सांगायला नकोच. पण या उघड उघड दिसणाऱ्या गोष्टींत आंगिरसांनीं आदित्यांशीं स्पर्धा करण्याचें साहस केलें, तेव्हां आंगिर-सांची परंपरा, आदित्यपरंपरेपेक्षा अधिक प्राचीन असली पाहिजे आणि ज्या देशांत सहा सहा मास आदित्याला आपलें मुखमंडल दाखविण्याची सोय नसल्या-मुळें त्याला आंगिरस् बृहस्पतीपेक्षा अधिक मान मिळत नसे, अशा प्रदेशांतील असली पाहिजे. असा प्रदेश अर्थात् ध्रुवप्रदेश होय. भारतांत आदित्य दिवसाचें नियंत्रण करूं शकतो. पण ध्रुवावर साऱ्या वर्षांत एकच अहोरात्र असल्यानें आदि-त्याचा दिनगणनेशीं संबंधच येऊं शकत नाहीं. ध्रुवावरील दीर्घ रात्रींत आदि-त्यपंथी ब्राह्मणांनाहि गुरूच्या अथवा सप्तर्षींच्या ध्रुवासभोंवतीं होणाऱ्या प्रदक्षिणे-वरून दिनगणना करून रात्रिसत्रें करावीं लागत आणि याप्रमाणें सप्तर्षि आणि गुरु यांच्या साहाय्यानें केलेल्या सत्रांच्या अंतीं आदित्याचा उदय होई. या परंपरेच्या आधारामुळेंच ध्रुवस्थानापासून भ्रष्ट झाल्यानंतरहि आंगिरस् हे आदित्यांशीं स्पर्धा

करावयाला धजले. पण गुरूच्या राश्यंतरावरून वर्ष मोजतांना अंतीं आंगिरसांचीं वर्षें आदित्यांच्या वर्षांपेक्षां वाढत आणि मग त्यांना संवत्सराचा क्षय मानून आदित्यांशीं मिळतें घ्यावें लागे. महाभारताच्या शांतिपर्वांत (अध्याय ३०१) 'क्षयं संवत्सराणां च मासानां च क्षयं तथा।' असें जें वचन आलें आहे, त्याची उपपत्ति अशा प्रकारें लागते. बृहस्पतिच सूर्यचंद्रांना भ्रमवितो आणि इतकें अद्‌भुत कृत्य अन्य कोणी करूं शकत नाहीं, असें वर्णन वेदांतहि आलें आहे. 'अनानुकृत्यं अपुनः चकार यात् सूर्यामासा मिथ उच्चरातः।' (१०-६८-१०) बृहस्पतीच्या या अचाट कृत्याचें अनुकरण अन्य कोणाकडून झालें नाहीं आणि होणारहि नाहीं.

## साठ वर्षांचें संवत्सरचक्र

ऐतरेय ब्राह्मणाच्या चौथ्या पंजिकेंत आंगिरस् आणि आदित्य यांच्या स्पर्धेसंबंधीं दुसरी एक आख्यायिका आली आहे. या उभयतांमध्यें स्वर्गलोकीं कोण प्रथम पोंचतो, यासंबंधीं स्पर्धा झाली असतां आदित्य हे प्रथम पोंचले आणि आंगिरस् हे त्यांच्या मागून साठ वर्षांनीं पोंचले, असें तेथें सांगितलें आहे. हा उल्लेख उघड उघड आपल्या देशांत अद्यापि प्रचलित असलेल्या साठ संवत्सरांच्या चक्राला अनुलक्षून आहे. 'वसोः या धारा मधुना प्रपीना घृतेन मिश्रा अमृतस्य नाभयः। सर्वा:ता अवरुन्धे स्वर्गः षष्ट्यां शरत्सु निधिपा अभीच्छात्॥(१२-३-४१) या अथर्ववेदांतील मंत्रांतहि स्वर्गांतील मधुकुल्यांचा उल्लेख असून साठ वर्षांनीं निधिपाल त्यांची इच्छा करील, असें सांगितलें आहे. हें साठ संवत्सरांचें चक्र खि. पू. ३१०२ पासून चालत आलें असून आर्यभट्टाच्या काळीं याचे साठ फेरे पूर्ण झाले होते. हें विधान आर्यभट्टानें आधारावांचून केलें आहे, असें त्याचे पाश्चात्य टीकाकार म्हणतात. पाश्चात्यांच्या असल्या पूर्वग्रहदूषित आक्षेपांचा संताप येत असला तरी एका दृष्टीनें त्यांचे आक्षेप संशोधनाला उपकारकच ठरतात. कारण असल्या आक्षेपांमुळेंच या परंपरेचा ऐतिहासिक दृष्टीनें अभ्यास करण्याच्या आवश्यकतेची जाणीव होते. कै. डॉ. शामशास्त्री यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं तैत्तिरीय आरण्यकांतच या चक्राचे तीस फेरे पूर्ण झाल्याचा उल्लेख असल्यानें त्या ग्रंथाचा काळ त्या सुमाराचा असल्याचें निश्चयानें सांगतां येतें. 'बृहस्पतेर्मध्यमराशिभोगः संवत्सरं सांहितिका वदन्ति।' या भास्कराचार्यांच्या वचनावरूनहि संहितांच्या काळांत गुरूच्या मध्यम राशिभोगावर आधारलेलें संवत्सर प्रचलित असल्याचें सिद्ध होतें. आपलें साठ वर्षांचें संवत्सरचक्र कधीं चालू झालें असावें, हें सरकारी पंचांग-

समितीच्या प्रातिवृत्तावरून सहज कळून येण्याजोगें आहे. त्या प्रतिवृत्तांत बार्हस्पत्य वर्षासंबंधींच्या परिशिष्टांत म्हटलें आहे.—' The beginning of the Jovian years is determined by the entry of Jupiter into an Indian sign by mean motion, the 1st, 13th, 25th, 37th, 49th years being marked by the entry of Jupiter into the sign kumbha and not Meshha which is otherwise the first of the signs of the Siddhantas.' या अवतरणावरून असें समजून येतें कीं बार्हस्पत्यमानाच्या साठ संवत्सरांचें सध्याचें चक्र प्रचलित झालें, तेव्हां सध्याप्रमाणें मेष राशि ही प्रधान राशि नसून कुंभ राशि ही प्रधान राशि होती. त्यामुळें त्या राशींत गुरूचा मध्यरामशिभोगाप्रमाणें प्रवेश झाला कीं द्वादशवार्षिक चक्राचा प्रारंभ होई. याचा थोडा विचार केला असतां असें दिसून येतें कीं कुंभ राशींत उत्तरायणाचा प्रारंभ ज्या काळीं होत असे, त्याच काळीं साठ संवत्सरांचें बृहस्पतीच्या पांच फेऱ्यांचें हें चक्र चालू झालें असलें पाहिजे. अजूनहि प्रयाग येथें होणाऱ्या कुंभमेळ्याच्या प्रचंड यात्रेच्या निमित्तानें आपण ती परंपरा अखंडित राखली आहे. मात्र त्या परंपरेचा अर्थ समजून घेण्याची बुद्धि मात्र आपण घालवून बसलों आहों. कुंभेंत उत्तरायण होत असतांना साठ संवत्सरांच्या चक्राचा प्रारंभ झाला, हें अनुमान खरें असल्यास आर्यभट्टाच्या काळीं त्या चक्राचे साठ फेरे पूर्ण झाल्याची परंपराहि निरपवाद मानावी लागते.

## अग्नि आणि आंगिरस्

वैदिक आर्यांमध्यें उत्तरध्रुवाला आणि तेथील कालगणनेला सर्वांत अधिक काळ चिकटून राहिलेलें कुल हें आंगिरसांचेंच. यांनीं आदित्यावर आधारलेल्या कालगणनेचा स्वीकार प्रथम पुष्ययुगांत केला, असें महाभारतावरून समजतें. आरण्यकपर्वांत ( २१७ अध्याय ) अशी एक कथा आली आहे कीं, एकदां आंगिरसांच्या तेजामुळें आणि तपामुळें ज्याचा प्रभाव नष्ट झाला होता, असा अग्नि रुसून वनांत गेला. तेव्हां अंगिरा ऋषि हा स्वतःच अग्नि बनला. ' यथा क्रुद्धो हुतवहः तपस्तप्तुं वनं गतः ! यथाच भगवान् अग्निः स्वयमेवांगिराऽभवत् ।। ' पण कालांतरानें त्याला कळून आलें कीं, इथें रुसून किंवा तप करून कार्यभाग व्हावयाचा नाहीं. त्यापेक्षा आपणच अंगिरा ऋषींची भेट घ्यावी. ' सोपासर्पत् शनैः भीतः । तम् उवाच तदा अंगिराः ।। शीघ्रमेव भवस्वग्निः त्वं पुनर्लोकभावनः ।।'

तेव्हां अंगिरा ऋषीनें त्याला सांगितलें कीं, तूं परत अग्नि हो. अग्निनें उत्तर दिलें ' नष्टकीर्तिरहं लोके भवान् जातो हुताशनः ।। भवन्तम् एव ज्ञास्यन्ति पावकं न तु मां जनाः।।' माझी कीर्ति नष्ट झाली असून आपणच हुताशन झाला आहांत, मग मी पुन्हा अग्नि होऊन काय करूं ! तेव्हां अंगिरा ऋषीनें त्याच्याजवळ वर मागून त्याचें समाधान केलें. ' कुरु पुण्यं प्रजास्वर्ग्यम्। भवाग्निः तिमिरापहः।। मांच देव कुरुष्व अग्ने प्रथमं पुत्रम् अंजसा ।।' तूं प्रजेला स्वर्गाला पोचविण्याचें पुण्यकार्य कर आणि मला स्वतःच्या प्रथम पुत्राची पदवी दे. हें वचन ऐकून अग्निदेवानें अंगिरा ऋषीला बृहस्पति नामक आपला पुत्र केला. अशी बृहस्पतीच्या जन्माची कथा महाभारतांत आली असून ती कथा ' बृहस्पतिःप्रथमं जायमानः तिष्यं नक्षत्रं अभिसंबभूव ' या तैत्तिरीय ब्राह्मणांतील परंपरेला अनुलक्षून रचली आहे, हें उघड आहे. या कथेंतील अग्नीचा अर्थ वैदिक परंपरेप्रमाणें वसंतसंपात असून पुष्य नक्षत्रांत संपात असतांना बृहस्पतीची त्या नक्षत्राशीं अति निकट युति होत असे. यामुळें बृहस्पति हा पुष्य नक्षत्राचा पुत्र बनला असून गुरुपुष्य योगाचें पावित्र्यहि तेव्हांपासूनच प्रस्थापित झालें आहे. कै. वेंकटेश बापूजी केतकर यांनीं बृहस्पति आणि पुष्य यांचे शर समान होऊन त्या उभयतांची युति केव्हां होत असावी, याचें गणित केलें होतें. त्यांच्या निष्कर्षाप्रमाणें खि. पू. ४६५० या काळांत बृहस्पति आणि पुष्य यांची युति होत असे. पण पुष्य नक्षत्रांतील वसंतसंपाताचा काळ खि. पू. सात ते सहा सहस्र वर्षांचा असल्यानें या काळांत कधीं गुरूची पुष्याशीं युत होत होती कीं नाहीं, याचें पुन्हा कोणी तरी गणित करण्याची आवश्यकता आहे.

## प्रकरण दुसरें

# देवांचे जन्म

### अदितीचे सप्तपुत्र

धनु राशींतील दक्षिणायनाचें प्रारंभस्थान मागें सरून वृश्चिकेंत आलें असतांना पृथ्वी मोठ्या प्रमाणावर जलमय झाली. याच परिस्थितीला अनुलक्षून तैत्तिरीय संहितेंत म्हटलें आहे, ‘ आपो वा इदम् अग्रे सलिलम् आसीत् । तस्मिन् प्रजापतिः वायुः भूत्वा अचरत् । स इमाम् अपश्यत् । तां वराहो भूत्वा अहरत् । तां विश्वकर्मा भूत्वा व्यमार्ट् । सा अप्रथत । सा पृथिवी अभवत् । तत् पृथिव्यै पृथिवित्वम् । ’ ( तै. सं ७–१–५ ) म्हणजे पृथ्वीवर प्रथम सर्वत्र जल होतें. त्यांत प्रजापति ( दक्षिणायनाचें प्रारंभस्थान ) वायुरूपानें संचार करूं लागला, तेव्हां त्याला जलांत पृथ्वी दिसली. ती त्यानें वराहरूपानें वर काढली. त्यानंतर विश्वकर्मा बनून त्यानें तिला आकार दिला. तेव्हांपासून ती वाढूं लागली. त्या वाढीमुळेंच तिला पृथ्वी हें नांव प्राप्त झालें. ही जी सृष्टीच्या उत्पत्तीची कथा तैत्तिरीय संहितेंत सांगितली आहे, ती आकाशांतील राशींच्या अग्नि, जल, वायु आणि पृथ्वी या चार तत्त्वांत केलेल्या विभागणीला अनुसरून आणि वृश्चिक, तूळ, कन्या या राशींना अनुलक्षून सांगितली आहे, हें उघड आहे. असो. पृथ्वी अस्तित्वांत आल्यानंतर प्रजापतीनें पुनश्च तप आरंभिलें. ‘ तस्याम् अश्राम्यत् प्रजापतिः । स देवान् असृजत, वसून्, रुद्रान् आदित्यान् । ’ आपल्या तपानें प्रजापतीनें वसू, रुद्र आणि आदित्य या देवांना अर्थात् त्यांच्या नक्षत्रांना प्रसिद्धीच्या प्रकाशांत आणलें. तैत्तिरीय संहितेंत वसू, रुद्र आणि आदित्य यांचा एकत्र उल्लेख पदोपदीं येतो. त्यावरून यांचीं नक्षत्रें परस्परांसन्निध असावींत, असें अनुमान निघतें. या दृष्टीनें विचार केला असतां पुनर्वसूंतील वसू, आर्द्रांतील रुद्र आणि पुष्यांतील आदित्य यांचाच हा संयुक्त उल्लेख असावा. यांच्यापैकीं मूळचे आदित्य हे अदितीचे पुत्र अर्थात् पुनर्वसू पुढील पुष्य नक्षत्राचे सात तारे असून अदितीच्या या सप्तपुत्रांचा ऋग्वेदांत उल्लेखहि आहे. ‘ अष्टौ पुत्रासः अदितेः ये जाताः तन्वः परि । देवान् उप प्रैत सप्तभिः परामार्तांडम् ऐस्यत् ॥ ’ ( १०–७२–८ ) या ऋचेंतील देव झालेले म्हणजे तारे झालेले अदितीचे सात पुत्र पुष्याचे सात तारे असून आठवा त्यांच्यापासून दूर फेकलेला मार्तांड

हा आपला सूर्य होय. पुष्य नक्षत्राला वेदकालीं मधुकशा असेंहि एक नांव होतें. या मधुकशेवर अथर्व वेदांत स्वतंत्र सूक्त असून तिथें तिला ' माता आदित्यानां दुहिता वसूनाम् । ' असें म्हटलें आहे आणि तिच्या सात मधूंचाहि त्या सूक्तांत उल्लेख आला आहे. तेव्हां अदितीचे सात पुत्र हे प्रारंभीं तरी टिळकांनीं म्हटल्याप्रमाणें ध्रुवावरील सूर्यप्रकाशाचे सात मास नव्हते. त्यांच्या अर्थांत पुढें जीं परिवर्तनें झालीं; त्यांचा आतां विचार करावयाला नको.

## उत्तानपदाचा उलगडा

वरील ऋचा बृहस्पति आंगिरस् याच्या नांवावरील ज्या अदितिसूक्तांतून घेतली आहे, तें सारेंच सूक्त प्राचीन काळच्या देवांच्या जन्मकथेला वाहिलें आहे. ' देवानाम् नु वयम् जाना प्रवोचाम विपन्यया । उक्थेषु शस्यमानेषु यः पश्यात् उत्तरे युगे ।। १ ।। देवानाम् युगे प्रथमे असतः सत् अजायत । तत् आशाःअनु अजायन्त तत् उत्तानपदः परि ।। ( ३ ) भूः जज्ञे उत्तानपदः भुवः आशाः अजायन्त । अदितेः दक्षः अजायत दक्षात् ऊं अदितिःपरि ।। ४ ।। म्हणजे उत्तर युगांतील जनांना ज्ञान व्हावें, म्हणून आम्ही प्रथम युगांत देवांचे जन्म कसे झाले यांचें सुस्पष्ट वर्णन करीत आहोंत. देवांच्या प्रथम युगांत असतापासून सत् म्हणजे अज्ञातापासून ज्ञात निर्माण झालें. तेव्हां दिशांचा बोध झाला आणि सर्वांत वर उत्तानपद दिसूं लागला. उत्तानपदानें भूमीला जन्म दिला, भूमीनें दिशांना जन्म दिला. तिनेंच दक्षाला अदितीपासून आणि आदितीला दक्षापासून निर्माण केलें. या महत्त्वाच्या सूक्तांतील दक्ष हा पुष्याचा अधिपति कश्यप प्रजापति असून अदिति ही पुनर्वसूंची अधिष्ठात्री देवता आहे. यांतील उत्तानपद हा आपल्याला परिचित असलेला ध्रुवपिता उत्तानपाद राजा. पाश्चात्य ज्योतिषांत त्याला केफेउस् असें नांव दिलें आहे. कै. बाळशास्त्री जांभेकरांनीं त्याला वृषपर्वा हें नांव देऊन अर्वाचीन ज्योतिष्यांची दिशाभूल केली आहे. तो वस्तुतः ध्रुवाला लाथ मारणारा उत्तानपाद राजा. हा उत्तानपादच बहुधा सूर्यनारायणाचा पुत्र यमहि असावा. कारण उत्तान-पादाप्रमाणें त्यानेंहि आपल्या सावत्रमातेला मारण्याकरितां लाथ उचलल्याचा उल्लेख त्याच्याहि कथेंत येतो. असो. या अतिप्राचीन काळांत उत्तानपदापासून भूमीचा जन्म झाल्याचा जो उल्लेख वरील सूक्तांत आला आहे, त्याचा अर्थ वैदिक परि-भाषेप्रमाणें ' उत्तरायणाची रेषा ' असा होतो. वेदांमध्यें द्यू म्हणजे दक्षिणानाची रेषा आणि पृथिवी म्हणजे उत्तरायणाची रेषा हीं समीकरणें ठरलेलीं आहेत.

उत्तानपदाचा आकाशांतील विस्तार सायन मीन १७ पासून सायन कर्क ० पर्यंत असून त्याचे उत्तर अक्षांश ५५ पासून ८५ पर्यंत आहेत. त्यामुळें सात सहस्त्र वर्षें तरी उत्तरायणाची रेषा उत्तानपदाच्या पुंजांतून जात होती. पण त्यांपैकीं खि. पू. ६००० वर्षांच्या सुमारास ही रेषा उत्तानपदाच्या शीर्षस्थानांतील ताऱ्यां. मधून जात होती. आणि त्याच वेळीं वसंतसंपात अदिति देवीच्या पुनर्वसू नक्षत्रांत होता. याच परिस्थितीला अनुलक्षून वरील मंत्रांतील वर्णन आहे. म्हणून या सूक्तांत उत्तानपदाच्या जन्मानंतर दिशा, अदिति आणि दक्ष यांच्या जन्मांचा उल्लेख येतो. या साऱ्या गोष्टी वैदिक आणि पौराणिक परंपरा सुविदित असल्यास समजावयाला अगदीं सोप्या आहेत. मात्र पाश्चात्य पंडितांचे ग्रंथ वाचूनहि ज्यांचा बुद्धिभेद झाला नसेल, अशा सज्जनांनाच त्या समजूं शकतील. अदितीपासून दक्ष झाला आणि दक्षापासून अदिति झाली, या वचनानें कदाचित् पुष्य आणि पुनर्वसु यांच्यामधील संपाताचा म्हणजे खि. पू. ६४०० या काळाचाहि बोध होऊं शकेल.

## ध्रुवनिशा चित्रावसु

पुनर्वसूंतील वसंतसंपात हा वैदिक आर्यांच्या इतिहासांतील सुवर्णयुगागमच दिसतो. ‘ आजुव्हानईड्योवंद्यःच आयाहि अग्ने वसुभिः सजोषाः । ’ ( १०–११०–३ ) दशम मंडलांतील या मंत्रांत आदरानें आमंत्रिलेल्या, वंद्य, सेव्य आणि वसूंसह आनंदित होणाऱ्या अग्नीचें स्वागत केलें आहे. पुनर्वसूंतील वसंतसंपाताच्या या अनुभवामुळेंच तैत्तिरीय ब्राह्मणांत म्हटलें आहे. ‘ पुनर्वस्वोः अग्निम् आदधीत । पुनरेव एनम् वामम् वसु उपावर्तते । ’ पुनर्वसूंवर अग्नीचें आधान केल्यानें गेलेलें ऐश्वर्य परत लाभतें, या श्रुतीवरून अशी शंका मनांत आली कीं वसूंनीं युक्त अशा अन्य नक्षत्रावर वैदिक आर्यांचें पूर्वींचें ऐश्वर्य नष्ट झाल्यानंतर पूनर्वसूंच्या युगांत त्यांना सुखसमृद्धीचा आनंद पुनश्च मनसोक्त भोगतां आला कीं काय ? या दृष्टीनें विचार करतांना तैत्तिरीय संहितेंतील पुढील मंत्रांचें स्मरण झालें. ‘ आयुः दा अग्ने असि आयुः मे देहि; तनूपा अग्ने, असि तनुवंपाहि; चित्रावसो स्वस्ति ते पारम् अशीय, इंधानाः त्वा शतं हिमा द्युमन्तः समिधीमहि । ( तै. सं. १–५–५ ) निघंटूंत उषेचें चित्रमघा असें एक नांव आलें असून या स्थळीं निशेचें चित्रावसु नांव येतें. हीं दोन नांवें परस्परांशीं सदृश असून उषा आणि निशा या परस्पर-विरोधी देवतांना लाविलेलीं आहेत. मघा नक्षत्रापासून चौदावें नक्षत्र धनिष्ठा असून त्याची देवता वसुच आहे. निघंटूंत रात्रीला वस्वी अशीहि एक संज्ञा असून तिचा

चित्रावसु रात्रीशीं संबंध जोडल्यास वडाची साल पिंपळाला लावल्याचा आरोप येणार नाहीं, अशी आशा आहे. या सर्व संदर्भांवरून चित्रावसु हें धनिष्ठेचेंच एक प्राचीन नांव असल्याचें कळून येतें. जेव्हां मघा नक्षत्रांत वसंतसंपात असल्यामुळें उषेला चित्रामघा हें नांव लाभलें, त्याच काळीं धनिष्ठेंत शरत् संपात होऊन ध्रुवनिशेला चित्रावसु हें नांव लाभलें असलें पाहिजे. त्या समयीं चित्रावसु रात्रीचा म्हणजेच ध्रुवावरील दीर्घनिशेचा काळ सुखानें जावा याकरितां वैदिक आर्य वरील प्रार्थना करीत. या प्रार्थनेवर तैत्तिरीय संहितेंतच पुढील भाष्यहि आलें आहे. ' रात्रिः वै चित्रावसुः, अव्युष्टयै वा एतस्यै पुरा ब्राह्मणा अभैषुः । ( १–५–४ ) वरील विवेचन लिहून झाल्यानंतर असें आढळून आलें कीं विवाह जुळवितांना वधूवरांचीं नक्षत्रें एकच आलीं तर विवाहाला कोणतीं नक्षत्रें वर्ज करावींत या प्रश्नांचा निर्णय करतांना कालप्रकाशिका या ग्रंथांत म्हटलें आहे. ' पूर्वप्रोष्ठपदाऽश्लेषा चित्रावासव-वारुणाः । स्वातीमूलयमाश्चैव नक्षत्रैक्ये विवर्जयेत् ।। ' या श्लोकांतील चित्रवासव शब्दाचा अर्थ वस्तुतः धनिष्ठाच असून टीकाकारांनीं त्याचा अर्थ चित्रा आणि धनिष्ठा असा केला आहे. पण चित्रा हें या मालिकेंतील इतर नक्षत्रांप्रमाणें क्रूर नक्षत्र नसल्यानें प्रस्तुत चर्चेंत त्याचा संबंध येण्याचें कारण नाहीं. तें कसेंहि असो. अर्वाचीन ज्योतिषी धनिष्ठेला चित्रावसु न म्हणतां नुसतें वसु म्हणत असले तरी प्रस्तुत प्रकरणीं तेवढा आधार पुरे आहे. शकपूर्व दशसहस्र किंवा नऊसहस्र वर्षांपूर्वीं वैदिक आर्य धनिष्ठा नक्षत्राला ज्या नांवानें संबोधीत, तें नांव अद्यापि आपल्या ज्योतिष परंपरेंत त्याच स्वरूपांत, अथवा जवळजवळ त्याच स्वरूपांत संरक्षून ठेविलें आहे, ही गोष्ट त्या श्लोकावरून निर्विवादपणें सिद्ध होतें. अशा प्रकारें ज्यांनीं आपली वैज्ञानिक परंपरा अयुत वर्षांहून अधिक वर्षें अखंडित राखिली आहे, ते आर्य भार-तांत प्रवेश करण्यापूर्वीं पूर्ण रानटी होते कीं अर्धरानटी होते, याची चर्चा संयुक्त राष्ट्रसंघाच्या वतीनें मानवजातीचा इतिहास लिहावयाला बसलेले इतिहासकार करीत असल्याची जी उद्वेगजनक कथा श्री. रमेशचंद्र मुजुमदार यांच्या मुखांतून प्रस्तुत लेखकानें ऐकिली होती, तिचें इथें स्मरण होतें.

## अग्नीचे ज्येष्ठ बंधु

असो. तैत्तिरीय संहितेंतील वरील वचनांत शरत्संपातालाहि अग्नि हा शब्द लाविला आहे. अग्नि म्हणजे संपात ही परंपरा किती प्राचीन आहे, याची त्या शब्दावरून कल्पना येईल. चित्रावसु अग्नि हा कांहीं ध्रुवस्थानांतील आर्यांच्या

इतिहासांतला पहिलाच अग्नि नव्हे. याचे तिघे ज्येष्ठ बंधु देवांचे हवि वाहतां वाहतां मृत्युमुखीं पडले, (म्हणजे धनिष्ठेच्या पुढील शततारका, पूर्वाभाद्रपदा आणि उत्तरा भाद्रपदा हीं तीन एके काळीं शरत् संपातस्थानीं असलेलीं नक्षत्रें ध्रुवक्षितिजावरून लुप्त झालीं.) या संबंधींचे अनेक उल्लेख वेदांतून आहेत. या तीन सहस्र वर्षांत वैदिक आर्यांच्या अनेक कुलांनीं ध्रुवस्थानाचा त्याग करून उत्तरकुरूंत आणि इराणांत वसती केली होती. सरते शेवटीं या चित्रावसूच्या युगांत उरल्यासुरल्या वैदिक आर्यांनीं ध्रुवस्थानांतील श्रौतभूमीचा सर्वस्वीं त्याग करून दक्षिणेकडे प्रयाण केलें.

## अषाढांतील शरत्संपात

मघा नक्षत्रापासून पुनर्वसूपर्यंत वसंतसंपात मागें येण्याला सरासरी दोन अडीच सहस्र वर्षें लागतात. या अवधींत वैदिक आर्यांना मनाजोगी यज्ञभूमि शोधण्यासाठीं पुष्कळच भटकावें लागलें आणि हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. त्यानंतर पुनर्वसूच्या युगांत त्यांना मनाजोगें स्वास्थ्य लाभलें. पुनर्वसूंत पहिला संपात आला असतां दुसरा संपात अषाढा नक्षत्रांत येतो. त्याला अनुसरून आषाढी पौर्णिमेनंतर पुनर्वसुनक्षत्रावर जेव्हां अमावास्या होते, तेव्हां अग्नीचें पुनश्च आधान करावें, असें कौषीतकी ब्राह्मणाच्या प्रारंभीं सांगितलें आहे. आषाढांतील शरत्संपाताला अनुलक्षूनच त्याची देवता आपः सांगितलेली दिसते. तैत्तिरीय ब्राह्मणांतील अषाढांच्या स्तोत्रांत म्हटलें आहे, 'याःच कूप्याः याःच नद्याः समुद्रियाः । यासाम् अषाढा मधु भक्षयन्ति । ता न आपः शम् न स्योना भवन्तु । तत् नक्षत्रम् प्रथताम् पशुभ्यः । कृषिः वृष्टिः यजमानाय कल्पताम् । शुभ्राः कन्याः युवतयः सुपेशसः । कर्मकृतः सुकृतः वीर्यावतीः । विश्वान् देवान् हविषा वर्धयन्तीः । अषाढाः कामम् उपयन्तु यज्ञम् ।' या वचनांचा अनुवाद देण्याची तादृश आवश्यकता नाहीं. या साऱ्या मंत्रांतून सुखसमृद्धीची भावना ओतप्रोत भरून राहिली आहे, हें वाचकांना त्यावाचून उमगेलच.

## रुद्र वरुण झाला

अषाढा नक्षत्र रुद्राच्या धनु राशींत असल्यानें त्या नक्षत्रांत जेव्हां शरत्संपात आला, तेव्हां स्वतः रुद्रच वरुण झाल्याची कल्पना वैदिक कवींनीं केली. महाभारतांतील अनुशासन पर्वाच्या ८५ व्या अध्यायांत पुढील आख्यान आलें आहे. 'पूर्वीं भगवान् रुद्रानें वरुणतनु धारण करून यज्ञ करण्यास प्रारंभ केला

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

असतां त्याचें तें वारुण ऐश्वर्य अवलोकन करण्याकरितां साऱ्या देवतांसह देव एकत्रित झाले. तेव्हां तिथें जमलेल्या देवतांच्याकडे पाहून ब्रह्मदेवाचें चित्त विचलित होऊन त्याचें वारंवार स्खलन होऊं लागलें. त्या स्खलनापासून भृगु, अंगिरा आणि कवि यांची उत्पत्ति झाली. यांपैकीं भृगु हे वरुणरूपी रुद्रानें आपले पुत्र मानले, आंगिरसांचें पितृत्व अग्नीनें स्वीकारलें आणि ब्रह्मदेवाच्या वांट्याला कविकुल आलें. ' यांपैकीं भृगु हा स्वातीचा तारा असून सप्तर्षि हे आंगिरस् आहेत. भृगु आणि कवि हे या आख्यानांत भिन्न मानले असल्यानें कवि बहुधा शुक्र ग्रह असावा आणि त्याच्याच प्रभावानें ब्रह्मदेवाचें स्खलन झालें असल्यानें त्यानें त्याला आपल्या पुत्राचें स्थान दिलें असावें. इथें लक्ष्यांत घेण्याजोगी गोष्ट ही कीं संहारकर्त्या रुद्राची धनु राशि ही दक्षिणायनापासून ढळून शरत् संपाताच्या स्थानीं आली असल्याची जाणीव होण्याला निदान सहा सहस्र वर्षांत अयनें आणि संपात यांचीं स्थानें कोणत्या नक्षत्रांतून कोणत्या नक्षत्रांत सरकत होतीं, यांचें परंपरागत अथवा गणितागतज्ञान असावें लागतें. यांपैकीं गणितागतज्ञान पूर्ण रानटी अथवा अर्ध रानटी आर्यांना कसें असणार ! बरें, धनु राशींतील अषाढामधील दक्षिणायन मागें सरकून तें क्रमानें मूळ, ज्येष्ठा, अनुराधा, विशाखा, स्वाति, चित्रा आणि सरतेशेवटीं हस्तनक्षत्रांत येऊन पोंचल्यानें आतां पूर्वाषाढांत शरत् संपात होऊन रुद्रानें वरुण तनु धारण केली आहे, हें ज्ञान होण्याला निदान सहासात सहस्र वर्षांची नक्षत्रदर्शनाची अखंडित परंपरा तरी गृहीत धरावी लागते. वेदकालीं असे नक्षत्रदर्शी लोक होते आणि त्यांचा श्रुतींतून उल्लेखहि आहे. पण मग या नक्षत्रादर्शी लोकांच्या परंपरांचें संकलन आणि संरक्षण करणाऱ्या आर्यांना ज्योतिर्विज्ञानाची कल्पना मुळींच आली नसावी, असें मानणें कितपत समंजसपणाचें आहे, याचा तज्ज्ञांनींच विचार करावा.

## ऐतरेयांतील एक आख्यान

पुनर्वसूंतील वसंतसंपातासंबंधीं एक महत्त्वाचें आख्यान ऐतरेय ब्राह्मणांत आलें आहे. देवांनीं अग्निष्टोमाचा आश्रय केला होता, तेव्हां असुरांनीं उक्थ्यसंबंधीं स्तोत्रें आणि शस्त्रें यांचा आश्रय केला होता. ही गोष्ट भरद्वाज ऋषींच्या लक्षांत आली. ' एह्यू षु ब्रवाणि ते अग्न इत्थेतरा गिरः । ' म्हणजे हे अग्ने, तूं इकडे ये, तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगतों. ' असें म्हणून त्यांनीं अग्नीला हांक मारली. तेव्हां अग्नि आपल्याशींच म्हणाला, ' हा उंच, कृश आणि वृद्ध ऋषि काय बरें

म्हणत आहे ! ' अग्नि सन्निध येतांच भरद्वाजांनीं त्याला सांगितलें कीं असुरांनीं उक्थ्य शस्त्राचा आश्रय केला आहे, पण ही गोष्ट इतरांना समजलेली नाहीं. ' हें बोलणें ऐकतांच अग्नीनें अश्वरूप घेऊन असुरांचें निर्दलन केलें. अश्व हें पुनर्वसूंतील अग्नीचें रूप असल्यानें तेव्हांच वैदिक आर्यांचा इराणी आर्यांशीं विरोध उद्भवला होता, हें या कथेवरून कळतें. भरद्वाजकुलाचा इराणशीं किती निकटचा संबंध होता आणि पार्थव सम्राट् चायमानाचा पुरोहितहि एक भरद्वाजच होता, हें मी ' दाशराज्ञ युद्धां'त दाखवून दिलें आहे. भरद्वाजांचा इराणशीं संबंध असल्याचें हिलेब्रांट यांनींहि मान्य केलें आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली, म्हणजे एकट्या भरद्वाजांनीं असुरांचें गुप्त स्थान ओळखलें, हें सांगण्यांतील मर्म कळून येईल. असो. त्यानंतर असुरांनीं मैत्रावरुण शस्त्राचा आश्रय केला. तेव्हां तिथें पूर्वीच जाऊन बसलेल्या इंद्रानें वरुणाच्या साहाय्यानें असुरांचा कांटा काढला. याचा व्यावहारिक अर्थ कोणत्या तरी कारणाकरितां मित्र देव मागें पडला असतां त्याचें स्थान इंद्राला प्राप्त झालें, असा होतो. जरथुस्त्रानें मित्रोपासना बंद पाडण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करूनहि इराणांत ती उपासना टिकून राहिली, इतकेंच नव्हे तर ती इंग्लंडपर्यंतहि पसरली. त्याच्या उलट भारतांत मित्राचें नांव जवळ जवळ लुप्त झालें, याचें कारण इंद्रानें त्याचें पद पटकावलें, हेंच असलें पाहिजे. हा काळ पुनर्वसुयुगाच्या पुष्कळ पूर्वीचा आहे.

पुनर्वसुयुगांत उत्तरायणाच्या स्थानीं रेवती आणि दक्षिणायनाच्या स्थानीं हस्त अशीं नक्षत्रें असल्यामुळें ' देवस्य त्वा सवितुः प्रसवे अश्विनौ बाहूभ्याम् पूष्णो हस्ताभ्याम् ।' या वैदिक विधींतून वारंवार येणाऱ्या मंत्रांतून वरील तीन नक्षत्रांच्या देवांचा एकत्र उल्लेख येतो. या मंत्रांत उल्लेखिलेल्या देवांपैकीं अश्विनी कुमारांचें स्थान सायन कर्क १९ आणि २२, सवित्याचें स्थान हस्तांत सायन तूळ १९ पर्यंत

## उत्तरायणारंभाचा देव पूषा

आणि रेवतीचा अधिपति असलेल्या पूषा देवाचें स्थान सायन मेष १९ पर्यंत असल्यानें सविता आणि पूषा हे परस्परांच्या प्रतियोगांत असून पुनर्वसूंतील अश्विनी-कुमारांचा त्यांच्याशीं केंद्रयोग होतो. वैदिक परिभाषेंत उत्तरायणाच्या प्रारंभस्थानाला पृथिवि म्हणतात, हें ज्ञान सायणाचार्यांच्या काळीं लुप्तच झालें असलें तरी पूषा पृथिविच होय, अशा आशयाचीं ब्राह्मणवचनें त्यांनीं पाहिलीं असल्यानें पहिल्या

मंडलांतील ४२ व्या सूक्तावर भाष्य करतांना त्यांनीं पूषा म्हणजे पृथ्वी असाच अभिप्राय व्यक्त केला आहे. पूषानें त्या दिवसांत अश्विनीकुमारांना आपल्या पित्याचेंच स्थान दिलें होतें. ‘ पुत्रः पितरौ अवृणीत पूषा । ’ ( १०-८५-१४ ) त्याच्या उलट पूषा देवानें अग्नीला शोधून काढल्याचे उल्लेखहि अनेकदां आले आहेत. उदाहरणार्थ, ( १०–१७–३ ) ( पूषा ) ‘ स त्वैतेभ्यः परि ददत् पितृभ्यः अग्निः देवेभ्यः सुविदत्रियेभ्यः। ’ असो. अश्विनीकुमारांच्या मिथुन राशीपासून पूषा देवाची मीन राशि ही दहावी रास असल्यानें अश्विनीकुमार हे पूषा देवाचे पिते होऊं शकतात. अशा प्रकारचें दुसरें उदाहरण ऋभूंचें आहे. ऋभू हे सुधन्वापुत्र म्हणून ओळखले जातात. ऋग्वेदांत रुद्र आणि मरुत् यांनाच सुधन्वा हें पद लाविलें असल्यानें यांच्यापैकीं रुद्रच ऋभूंचा पिता होऊं शकतो. कारण मूळचा सुधन्वा म्हणजे धनु राशीचा अधिपति तोच. ऐतरेय ब्राह्मणाच्या परंपरेप्रमाणें सवित्याचे अंतेवासी असलेल्या ऋभूंची कन्या राशि ही धनूपासून दहावी असल्यानें सुधन्वारुद्र हाच त्यांचा पिता झाला असावा. पाश्चात्य फलज्योतिष्यांच्या परंपरेप्रमाणें लग्नापासूनचें चौथें स्थान पितृस्थान या परंपरेचा उगम वेदांतील उपरिनिर्दिष्ट उल्लेखांशीं तर संबद्ध नाहीं ना ? असो.

## अदितीचीं दोन शिरें

पुनर्वसूंच्या युगांत वैदिक आर्यांची स्थिरस्थावर होण्यापूर्वीं दीर्घ कालपर्यंत त्यांना भ्रमण करावें लागलें होतें. या काळाला अनुलक्षून एक उल्लेखनीय आख्यायिका तैत्तिरीय संहितेंत आली आहे. ‘ देवा वै देवयजनम् अध्यवसाय दिशो न प्राजानन् ते अन्योन्यम् उपाधावन्, त्वया प्रजानाम त्वया इति । ते आदित्यां समभ्रियन्त, त्वया प्रजानाम इति । सा अब्रवीत् वरं वृणै । मत्प्रायणा एव वो यज्ञाः मत् उदयनाः असन् इति । तस्मात् आदित्यः प्रायणीयो यज्ञानाम्, आदित्य उदयनीयः । ’ ( ६–१–५ ) ( ध्रुवस्थानापासून निर्वासित झालेल्या ) देवांनीं आपली यज्ञपरंपरा चालू करण्याकरिता नवीन देवयजन अर्थात् यज्ञभूमि शोधून काढली. पण ही भूमि शोधल्यानंतर त्यांना दिशांचा निर्णय करतां येईना. तुझ्यामुळें दिशांचा बोध होईल, तुझ्यामुळें होईल, असें म्हणत ते एकमेकांकडेच धांव घेऊं लागले. शेवटीं सर्वांनीं आपल्या मातेलाच शरण जाऊन म्हटलें कीं तुझ्यामुळेंच आम्हांला दिशांचा बोध होईल. तेव्हां तिनें वर मागितला कीं तुमच्या साऱ्या यज्ञांचा प्रारंभ माझ्यापासून होऊन माझ्यापाशींच त्यांची समाप्ति व्हावी. हा वर मिळविल्यामुळें अदिति ही

वाजसनेयि संहितेंत (४–१९) म्हटल्याप्रमाणें 'उभयतः शीर्ष्णी' म्हणजे रोममधील जानुस् देवाप्रमाणें अनागतवर्षाकडे एक आणि गत वर्षाकडे अन्य मुख असलेली झाली. ऐतरेय ब्राह्मणांत तर (१–८) 'मयैव प्राचीं दिशं प्रजानाथ' म्हणजे माझ्यावरूनच तुम्ही प्राची दिशा निश्चित करा, असा वर तिनें मागून घेतला. या साऱ्या आख्यायिका पुनर्वसूंत वसंतसंपात होता, त्याकाळीं उद्भवल्या आहेत, हें ज्योतिषाचा गंध असणाऱ्यांना लगेच ओळखेल. पुनर्वसूंच्या दोन प्रमुख ताऱ्यांपैकीं कास्टोर हा सायन कर्क १९ अंशावर असून त्याच्याहून अधिक तेजस्वी पोलक्स हा सायन कर्क २२ अंशांवर आहे. या उभयतांच्या मध्यें जेव्हां वसंतसंपात होता, तेव्हां वर्षाचा प्रारंभ पोलक्स ताऱ्याच्या थोडा अलीकडे होई आणि वर्षाचा अंत कास्टोरच्या थोडा पुढें होई. ही वसंतसंपातकालीन वस्तुस्थिति दृक्प्रत्ययानें अनुभवाला येणारी नसून गणितानें काढावी लागते. कास्टोर आणि पोलक्स यांच्यामध्यें संपात आल्याचें ज्ञान गणितानें झाल्यानंतर ज्योतिष्यांची कल्पनाशक्ति जागृत होऊन त्यांची अधिष्ठात्री देवता जी अदिति, तिला 'उभयतः शीर्ष्णी' हें उचित नामधेय लाभण्यापूर्वी एकंदरीनेंच वैदिक आर्यसमाजाची संस्कृति उच्च कोटीला गेलेली असावी लागते, असें म्हटल्यास कोणतीहि अतिशयोक्ति होणार नाहीं, अशी आशा आहे.

## पुनर्वसूंतील एक अमर्त्य

कास्टोर आणि पोलक्स या हेलेनच्या जुळ्या भावांपैकीं पोलक्स अमर होता आणि कास्टोर हा मर्त्य होता, पण कास्टोरच्या मृत्यूनंतर त्याच्या जुळ्या भावाच्या आग्रहास्तव जोव्हनें त्या उभयतांना संयुक्त अमरत्वाचा वर दिला. त्यामुळें त्यांच्यापैकीं एक मरतो, तेव्हां दुसरा जिवंत होतो आणि तो मेला कीं पुन्हा पहिला जिवंत होतो. हें वस्तुतः दिवस आणि रात्र यांच्या परस्परसंबंधाचें यथार्थ वर्णन होऊं शकेल. हें वर्णन हेलेनच्या या जुळ्या भावांना जेव्हां लाविलें, तेव्हां पुनर्वसूंत संपात आला असल्यानें वर्षारंभीं त्या नक्षत्रावर दिवस आणि रात्र समान होत असल्यामुळें लाविलें असावें, हें उघड आहे. आपले अश्विनीकुमार हे ग्रीकांचे कास्टोर आणि पोलक्स हेच असून यांच्यापैकीं एक अमर्त्य असल्याची कल्पनाहि वेदांत आढळून येते. 'जिष्णुर्वामन्यः सुमखस्य सूरिः दिवो अन्यः सुभगः पुत्र ऊहे।' (१–१८१–४) आपल्यापैकीं एक सुमखाचा सूरि असून दुसरा स्वर्गपुत्र म्हणून ओळखला जातो.

## संपात आणि ज्योतिषशास्त्र

पुनर्वसूंच्या कास्टोर आणि पोलक्स या दोन ताऱ्यांमधील तीन अंशाच्या मध्यभागीं वसंतसंपात आलेला ओळखून अदितीचें ‘ उभयतः शीर्ष्णी ’ हें नामकरण करण्याचें महत्त्व काय आहे, हें वाचकांना समजून यावें, याकरितां इथें आल्बीरुणीचा एक उतारा उतरून घेण्याजोगा आहे. अयनांच्यापेक्षां संपात निश्चित करण्याला ज्योतिषाचें किती ज्ञान असावें लागतें, याची चर्चा करतांना तो म्हणतो,

‘They have adopted the time of the summer solstice as the beginning of the yeaı for this reason in particular, that the two solstitial points are easier to bɛ ascertained by the help of instıuments and by observation, than the equinoctical points, for the former are the beginning of the advance of the sun towaıds one of the two poles of the universe and of his turning away from the same pole. If the perpendicular shadow at the summer solstice is observed, and the level-shadow at the winteı solstice, in whatever place of the earth the observation be made, the obseıver cannot possibly mistake the day of the solstice, though he may be entirely ignorant in geometry and astromony, because a variation of the level shadow takes place notwithstanding the small amount of declination if the height is considerable. On the other hand the two equinoctical days can not be ascertained unless you have found before hand the laitude of the place and the general declination. And this nobody will find out unless he studies astronomy and has profited thereby and knows how to place and use the instruments of observation.’

याचा थोडक्यांत सारांश असा कीं, शंकूची मध्याह्नींची छाया वाढलेली कोणाच्याहि अवलोकनांत येऊं शकते आणि त्या वाढीवरून आदल्या दिवशीं दक्षिणायन झाल्याचें ध्यानांत येतें. पण विषुवदिन ओळखणें इतकें सोपें नाहीं. तो समजण्याला आपल्या निवासस्थानाचा अक्षांश आणि आयनिकवृत्ताची क्रांति माहीत असावी लागते. पण या गोष्टी ज्योतिषाच्या अभ्यासावांचून आणि अवलोकनाचीं यंत्रें वापरण्याची संवय असल्यावांचून जमणार नाहींत. अयन ओळखणें

किती सोपें असतें, हें भारतांतील तेवीस अक्षांशाखालच्या प्रदेशाचा परिचय झाल्यानंतर आर्योंनीं त्याला आंतरयन ही संज्ञा दिली होती, यावरून समजून येतें. ही संज्ञा पाणिनींत असून पुढें लुप्त झाली. अल्बीरुणीनें शास्त्रीय दृष्टीनें आणि नेमस्त भाषेंत जें सत्य व्यक्त केलें आहे, त्याचें यथार्थ मूल्य काय, हें भारतीय ज्योतिष्यांची निंदा करतांना प्रो. व्हिटनी यांनीं जे अशास्त्रीय आणि असंयत उद्गार काढले आहेत, त्यावरून कळून येईल.

## भारतीय ज्योतिष्यांची निंदा

'The place of the equinox is not be determined by going out and watching the heavens; it is a deduction from observations, by combinations and inferences, which lie quite out of the power of men unskilled in astronomical science. That either the ancient or the modern Hindus have had the capacity to grasp clearly the conditions of the problem involved and to solve it successfully is to say the least not very probable. I should not expect, from them a nearer approximation than within several degrees on the one side or the other. Putting together all these sources of error, we shall see clearly that no definite date is capable of being extracted from the statement of the vedang Jyotisha. It is not easy to make a valuation of figures of elements so indefinite; but it is safe to say that a thousand years would not be too long a period to cover all the uncertainties involved.

या उताऱ्यांत प्रो. व्हिटनी यांनीं संपात बिंदु शोधून काढणें किती अवघड आहे, याचें वर्णन करूनच असें विधान केलें आहे कीं प्राचीन काळच्याच काय पण अर्वाचीन काळच्याहि हिंदूंना संपाताचें गणित समजणें असंभवनीय असल्यानें त्यांच्या उत्तरांत संपाताचें स्थान सहस्र वर्षांनीं चुकेल, असें मानल्यास फारशी चूक होणार नाहीं. या विवेचनावरून त्यांनीं असा निष्कर्ष काढला आहे कीं वेदांग ज्योतिषांत सांगितलेलीं अयनांचीं स्थानें एक सहस्र वर्षांत होणाऱ्या अयनचलनाइतकीं तरी चुकलीं असावींत. संपातांचें स्थान शोधून काढणें किती अवघड आहे याच्या विवेचनावरून वेदांग ज्योतिषांतील अयनांचीं स्थानें चूक असलीं पाहिजेत, हा निष्कर्ष या प्रोफेसरमहाशयांनीं वारुणीच्या धुंदींतच काढला असला पाहिजे.

त्यावांचून इतकें विसंगत लेखन करणें बरेंच अवघड आहे. असो. अयनांचे दिवस काढणें किती सोपें आहे, हें मी अलबीरुणीच्या उताऱ्यावरून दाखविलेंच आहे. एकदां अयनांचीं स्थानें समजलीं कीं त्यांच्यांतील अंशांना आणि दिवसांना दोनीनें भागून संपाताचें राशिचक्रांतील स्थान आणि त्याचा संवत्सरचक्रांतील दिवस सहज काढतां येतो. यांत अवघी एखाद्या दुसऱ्या दिवसाची चूक होऊं शकेल.

## रुद्राची आदित्यांवर चढाई

पुष्य आणि पुनर्वसू नक्षत्रांत वसंतसंपात असतांना अदिति आणि अदित्य यांनाच यज्ञविधींत सारे मानसन्मान मिळत असलेले पाहून रुद्रानें आदित्यांवर चढाई केली. तेव्हां आदित्यांनीं द्विदेवत्यांचा आश्रय केला, असें एक आख्यान तैत्तिरीय संहितेंत आलें आहे. या आख्यानांत आर्द्रांकडे वसंतसंपात येऊं लागल्याची स्मृति संहितांच्या द्रष्टयांनीं ग्रथित केली आहे. याप्रमाणें आदित्ययुगाची संध्या आणि रुद्रयुगाची उषा आली असतांना वैदिक ऋषींनीं आर्द्रा नक्षत्राचा आणि त्याच्यासमोरील धनु राशीचाहि देवाधिदेव असलेल्या महाकालस्वरूपी रुद्राच्या आराधनेकरितां आपल्या पंचांगाची रचनाच अशी केली कीं त्यायोगें दोनहि संपात आणि अयनें यांच्या प्रारंभाशीं धनु राशीचा आणि तिच्या प्रतियोगांतील आर्द्रा नक्षत्राचा संबंध यावा. या पंचांगाप्रमाणें धनु राशींत पौर्णिमा झाली असतां वसंत-संपात होई, त्याच राशींत मार्गशीर्ष अमावास्या झाली कीं शरत्संपात होई. त्याच राशींत चंद्र असतांना भाद्रपद शुक्लअष्टमीला दक्षिणायन चालूं होत असे आणि त्याच राशींत चंद्र आल्यानंतर फाल्गुन कृष्ण अष्टमीला उत्तरायणाचा प्रारंभ होत असे. या पंचांगाप्रमाणें ज्येष्ठी पौर्णिमेला वसंतसंपात येई. त्या पौर्णिमेला पुष्कळदा मूळ नक्षत्र येतें. त्या तिथीवर आपल्या पंचांगांतून आजहि एक मन्वादि दिला असल्यानें त्या पौर्णिमेपासून एक मन्वंतर चालूं झाल्याचें कळून येतें. वैदिक काळांत दोन दिवसांची पौर्णिमा मानीत असल्यानेंहि ज्येष्ठी पौर्णिमेचा धनु राशीशीं संबंध येतो. फाल्गुन कृष्णाष्टमीला अजूनहि पंचागांतून अष्टकाश्राद्धदिन दिलेला असतो. याप्रमाणें रुद्राच्या राशींत होणाऱ्या चंद्राच्या चार अवस्थांतरांनीं वर्षांतील अयनें आणि संपात ओळखले जाऊं लागल्यामुळेंच रुद्राला भालचंद्र हें नांव प्राप्त झालें. असो. चंद्राच्या या चार अवस्थांतरांपैकीं दक्षिणायनारंभाची निदर्शक अशी धनु राशींतील भाद्रपद शुक्लाष्टमी ही वराहमिहिराचार्यांनीं वर्णिलेल्या इंद्र-ध्वजमहोत्सवाच्या प्रारंभाची तिथि म्हणून सहस्रावधि वर्षें पाळली जात असे. या

दिवशीं मोठी मिरवणूक काढून इंद्रध्वज उभारण्याची यष्टि वनांतून राजधानींत आणीत. या इंद्रमहोत्सवाचें प्रवर्तन कधींपासून झालें असावें, या संबंधीं 'Ancient Indian chronology' या ग्रंथांत कलकत्त्याचे श्री. प्रबोधचंद्र सेनगुप्त यांनीं भाद्रपदशुक्लांतील दक्षिणायनाच्या प्रारंभावरून गणित करून या इंद्र-महोत्सवाच्या प्रारंभाचा काळ सरासरी खि. पू. ४००० वर्षें असा काढला आहे. पण या उत्सवाच्या प्रवर्तनापासूनच वैदिक कालगणनेचा प्रारंभ होतो, इकडे अद्यापि कोणाचें लक्ष गेलेलें नाहीं.

## माहेश्वरचक्र

कै. वेंकटेश बापूजी केतकर यांच्या Indian and Foreign Chronology या ग्रंथाच्या १०८–१०९ पानावर २४७ वर्षें आणि एक मास या कालावधीच्या एका युगचक्राची माहिती आली असून त्या चक्राचें महत्त्व सांगतांना कै. केतकरांनीं म्हटलें आहे. 'This Aryan cycle of $247/\frac{1}{12}$ tropical years is really a happy combination of the lunar, solar and the sidereal systems. Each new cycle begins invariably on the seventh tithi of the month with which the preceding cycle has begun. The precession of the equinox in one cycle amounts exactly to a quarter of a Nakshatra.' म्हणजे या चक्रांत केवळ चांद्रसौर मानांचाच मेळ घातला होता असें नसून त्यांत संपाताच्या वक्र गतीचाहि विचार केला होता; कारण २४७ वर्षें आणि एक मास या अवधींत नक्षत्राच्या एका चरणाइतका संपातबिंदु मागें सरकतो. या चक्रांतील आर्तव वर्षांचे दिवस दि. ३६५–ता. ५–मि. ५०–से. १० इतके येत असून अर्वाचीन कोष्टकानें दि. ३६५–ता. ५–मि. ४८–से. ४६ इतके येतात. या चक्राप्रमाणें नाक्षत्रवर्षांचे दिवस दि. ३६५–ता. ६–मि. ९–से. ५३ इतके येत असून अर्वाचीन कोष्टकानें ते दि. ३६५–ता. ६–मि. ९ से. ९ इतके येतात. हें गणित अर्थात् कै. केतकरांच्या पुस्तकावरून उतरून घेतलेलें आहे. इतकें सूक्ष्म गणित असलेलें हें माहेश्वरचक्र खि. पू. ९०० च्या सुमारास भारतीयांनीं शोधून काढलें आणि त्याचा प्रारंभ त्यांनीं खि. पू. ११९३ मानला, असें बेंटलीनें लिहिलें आहे. पण सप्तमीपासून युगचक्राचा प्रारंभ करण्याचें याचें वैशिष्ट्य लक्षांत घेतलें म्हणजे एकाष्टका या इंद्रमातेशीं याचा संबंध असल्याचें सुस्पष्ट होतें. अथर्ववेदांतील

एकाष्टकेच्या सूक्तांत सांगितलें आहे, 'एकाष्टका तपसा तप्यमाना जजान देवम् महिमानम् इंद्रम् । तेनदेवा व्यसहन्त शत्रून् हन्ता दस्यूनाम् अभवत् शचीपतिः ।। इंद्रपुत्रे सोमपुत्रे दुहितासि प्रजापतेः । कामान् अस्माकम् पूरय प्रतिगृण्हाहि नो हविः ।।' ( ३-१०-१३ ) तपानें तप्त झालेल्या ज्या एकाष्टकेनें श्रेष्ठ इंद्राला जन्म दिला, ती एकट्या इंद्राचीच नव्हे तर सोमाचीहि माता होती आणि प्रजापतीची दुहिता ( म्हणजे कन्या राशिहि ) होती. इंद्रजन्माप्रमाणेंच दक्षिणायनाचा प्रारंभहि एकाष्टकेपासून होत असल्यानें या सूक्ताच्या प्रारंभींच ती यमाची धेनु झाल्याचाहि उल्लेख आहे. कारण दक्षिणायनाचा खरा देव यमच. अशा एकाष्टकेच्या तिथीवर ज्या युगचक्राचा प्रारंभ होतो, त्या चक्राचाहि इंद्रजन्माशीं संबंध असणें स्वाभाविक आहे. २४७ वर्षें आणि एक मास या युगचक्राचे चार फेरे पूर्ण झाले कीं नवा इंद्र जन्माला येई. म्हणजे दक्षिणायनाचा प्रारंभ एक नक्षत्र आधीं होऊं लागे.

## भाद्रपदांतील अष्टका सत्यवती

एकाष्टकेनें इंद्राला जन्म दिल्याची ही जी परंपरा आहे, ती भाद्रपद शुक्ल अष्टमीला धनु राशींत चंद्र असतांना जेव्हां दक्षिणायनाचा प्रारंभ होई, त्याकाळची आहे. भाद्रपद शुक्ल अष्टमीची ही एकाष्टका अर्वाचीन विद्वानांना अगदींच अविदित असल्यानें त्यांना हें सांगणें आवश्यक आहे कीं, मत्स्य पुराणाच्या चौदाव्या अध्यायांत व्यासांची जन्मदात्री आणि भीष्मांची सापत्न माता सत्यवती हिच्या वर्णनांत पुढील उल्लेख आला आहे. 'प्रौष्ठपद्यष्टकारूपे पितृलोके भविष्यसि ।। नाम्ना सत्यवती लोके पितृलोके तथाऽष्टका । आयुरारोग्यदा नित्यं सर्वकामफलप्रदा ।।' सत्यवती ही 'मत्स्यकन्या' असल्यानें तिचा मीन राशींतील प्रौष्ठपदा नक्षत्राशीं संबंध असणें स्वाभाविक आहे आणि त्यामुळेंच प्रौष्ठपद्यष्टकेला तिचें नांव लाभलेलें दिसतें. सध्यां विद्वानांना विदित असलेली माघ कृष्ण अष्टमीची एकाष्टका ही तिच्या सावत्र पुत्राच्या निर्याणाची तिथि म्हणून प्रसिद्ध आहे. पूर्वी इंद्राप्रीत्यर्थ एक प्रौष्ठपद यागहि करीत आणि या यागांत इंद्रइंद्राणीसह अज एकपाद या देवालाहि आहुति द्यावी, असें पारस्करगृह्यसूत्रांत सांगितलें आहे. हा अज एकपाद देव पूर्वा भाद्रपदा नक्षत्राचा अधिपति असल्यानें तें नक्षत्र जेव्हां उत्तरायणाच्या प्रारंभस्थानीं येऊन पोंचलें, तेव्हां दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाचा अधिपति जो इंद्र त्याच्यासहच त्यालाहि प्रौष्ठपद यागांत आहुति मिळूं लागली असली पाहिजे. या यागाच्या प्रौष्ठपदी या नांवावरून तेव्हांच पौर्णिमेच्या नक्षत्रावरून मास ओळखण्याची परंपरा

म/४०४

चालू झाली असली पाहिजे. पुढें निरयन कन्या राशींतून दक्षिणायनाचें प्रारंभस्थान जेव्हां सिंह राशींत आलें, तेव्हां इंद्रप्रिय ज्येष्ठा नक्षत्रावर इंद्रध्वजाची यष्टि मिरवीत आणावी, ( प्रोष्ठपादे सिताष्टम्यां ज्येष्ठायोगे स्वलंकृताम् । यष्टिं पौरंदरीं राजा नगरं संप्रवेशयेत् ।। इति गर्गः ) असा संकेत ठरवून ' विश्वस्मात् इंद्र उत्तरः ' या वृषाकपि सूक्तांतील घोषणेला अनुसरून इंद्राप्रमाणेंच ' अस्माकं वीरा उत्तरे भवन्तु ' ( इति वाराही संहिता इंद्रध्वजसंपत् ) ही घोषणाहि पूर्वपरंपरेप्रमाणें तशीच पुढें चालू ठेविली. या दोन घोषणांतील साहश्यांवरून इंद्राची जेव्हां वृषाकपीशीं युति होती, तेव्हांपासून इंद्रध्वजाच्या उत्सवाची परंपरा चालू झाली असली पाहिजे, असें दिसतें. या प्रश्नाची चर्चा पुढें करतां येईल. इथें प्रसंगानुरोधानें सांगण्याची गोष्ट ही कीं, कन्येंतील हस्त आणि उत्तरा या नक्षत्रांचा त्याग करून दक्षिणायनाचें प्रारंभस्थान जेव्हां पूर्वा आणि मघा या नक्षत्रांकडे येऊं लागलें, तेव्हां वैदिक आर्यांनीं इंद्रमहोत्सवाच्या पुरातन परंपरेला वामनजयंतीची नवी जोड देऊन तिला अद्ययावत्पणा आणला. इंद्रमहोत्सवाच्या दिवसांत बलीच्या नांवानेंहि एक दिवस उत्सव करून त्या दिवशीं दीपदान करीत, असें वामनपुराणांत (९२–५६) सांगितलें आहे. इंद्रध्वजाच्या विसर्जनाचा दिवस भाद्रपद शुक्ल द्वादशी हा असून त्या दिवशीं वामनजयंती मात्र आतां अवशिष्ट राहिली आहे. बलीप्रीत्यर्थ जो दिन पाळीत असत, त्याचें स्थलांतर कदाचित् कार्तिक शुक्ल प्रतिपदेच्या बलिप्रतिपदेला झालें असेल.

## वामन अवताराचा उलगडा

भाद्रपद शुक्ल द्वादशीला ' कश्यपमंदिरीं अदितिच्या दिव्यव्रतें श्रीहरी ' वामन झाला, याचा अर्थ असा कीं विष्णु हा उत्तरायणाच्या प्रारंभींचा सूर्य असल्यानें त्या दिवशीं जी मध्याह्नींची रविच्छाया अधिकांत अधिक मोठी असते, ती इंद्रजन्माच्या दक्षिणायनारंभदिनीं लहानांत लहान होऊन तेव्हां विष्णु वामन होतो. रामायणांत देवांनीं विष्णूची प्रार्थना करतांना स्पष्टच म्हटलें आहे. ' वामनत्वं गतो लोके कुरु कल्याणम् उत्तमम् ।। ' म्हणजे हे देवा, वामनत्वाचा स्वीकार करून तूं आमचें उत्तम कल्याण कर. भाद्रपद शुक्ल द्वादशीला चंद्र मकरेच्या अंतीं किंवा कुंभेच्या प्रारंभीं असतो. वामनजयंतीचें आख्यान जेव्हां प्रचलित झालें, तेव्हां दक्षिणायनाचें प्रारंभस्थान सिंह राशींत असून उत्तरायणाचें प्रारंभस्थान सर्व जगाला दान देण्याला सिद्ध झालेल्या कुंभधारी पुरुषाच्या कुंभराशींत होतें. हा कुंभधारी पुरुषच आपल्या

पुराणांतील दानशूर बळिराजा होय. आपल्या कन्याकुमारीकडील प्रांतांतून आणि पश्चिम आशियांतील इराकमधील पुरातन काळच्या 'बाल' देवाच्या असुर-राज्यांतून उत्तरायणांत मोठ्या प्रमाणावर वृष्टि होत असल्यानें लंकेंतील आणि इराकमधील असुरांचा इंद्र बळि झाला असल्यास नवल नाहीं. यामुळेंच इंद्राचें पद दैत्यराज बळीनें विप्रप्रसादानें हरिलें. वामनाचा जन्म दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं झाला असल्यानें त्यानें पहिलें पाऊल त्या अयनावर आणि दुसरें पाऊल शरत् संपातावर ठेविल्यानंतर तिसरें पाऊल उत्तरायणाचें क्षेत्र व्यापून राहिलेल्या बळीच्या मस्तकावर ठेविणें क्रमप्राप्तच होतें. बळी वामनाला दान देण्याला सिद्ध झाला असतांना असुरगुरु शुक्रानें त्याला विरोध करणें अपरिहार्यच आहे. कारण शुक्र हा रवीपासून ४८ अंशांहून अधिक दूर जाऊं शकत नसल्यामुळें वामन-द्वादशीला तो बळीच्या प्रतियोगांतील क्षेत्रांतच असावयाचा. भाद्रपद शुक्ल द्वादशीची ही ग्रहस्थिति लक्ष्यांत घेतली कीं या आख्यानाच्या साऱ्या अंगोपांगांची संगति लागते. मात्र या तिथीला कधीं कधीं रवि कन्येंत गेला असल्यानें बळीशीं प्रतियोग करीत नसेल. हा दोष पतकरून वामनाला इंद्राचा धाकटा भाऊ बनविण्याचा हेतु इंद्रमहोत्सवाच्या परंपरागत तिथींशीं या नवीन आख्यानाचा एकजीव घडवून आणावा हाच असला पाहिजे.

## बळि हा भावी इंद्र

दुसरी गोष्ट ही कीं आकाशांतील कुंभधारी पुरुषाचा विस्तार सायन कुंभ ९ पासून सायन मीन २६ पर्यंत असल्यानें निरयन कन्येंतील रवीशींहि त्याचा कांहीं काळ प्रतियोग येतोच. कालक्रमानें उत्तरायणाचें प्रारंभस्थान शततारका आणि धनिष्ठा नक्षत्रांतून मागें सरून विष्णूच्याच श्रवण नक्षत्रांत आलें, तेव्हां पुराणकारांनीं पूर्वींच पाताळांत घातलेल्या बळीच्या द्वारपाळाचें पद विष्णूला समर्पण केलें. मत्स्य पुराणांतील वामन आख्यानांत विष्णूनें बळीला आशीर्वादहि देऊन ठेविला आहे. 'वैवस्वते तथातीते बले मन्वंतरे ह्यथ । सावर्णिके तु संप्राप्ते भवान् इंद्रो भविष्यति ।।' (२४६–७२) हे बळी, वैवस्वत मन्वंतर संपून सावर्णि मन्वंतर लागल्यानंतर तूं इंद्र होशील. सरासरी बारातेरा सहस्र वर्षांत दक्षिणायनाचे तारे उत्तरायणाच्या प्रारंभस्थानीं जातात. तेव्हां विष्णूचा आशीर्वाद खरा होईलच. सिंह, वृश्चिक, कुंभ आणि वृषभ या स्थिर राशींतील संक्रांतींना आपल्या पंचांगांतून विष्णुपदी ही संज्ञा दिलेली असते. या संज्ञेवरून खि. पू.

४५०० ते २५०० या काळांत जेव्हां वामन आणि बळी यांचें नाट्यपूर्ण चरित्र वैदिक आर्यांना प्रतिवर्षी दृग्गोचर होत होतें, त्या काळीं त्यांना विष्णुपदीच्या राशींचा पूर्ण परिचय झाला असला पाहिजे, हें उघड आहे. या साऱ्या विषयांतरित विवेचनावरून कन्या राशींत दक्षिणायनाचा प्रारंभ असतांना इंद्रध्वज महोत्सवाची परंपरा निर्माण झाली होती, असें निर्विवादपणें सिद्ध होतें. या उत्सवांत ध्वजाकरितां जे वृक्ष निवडावेत, असें वराहमिहिराचार्यांनीं सांगितलें आहे, त्यांत पहिला मान अर्जुनवृक्षाचा आहे. अर्जुनाच्या या अग्रपूजेवरून अनुमान काढल्यास कन्या राशींत अर्जुनी नक्षत्रांत दक्षिणायन असतांना इंद्रध्वजाची परंपरा चालू असली पाहिजे, असें अनुमान निघतें.

## श्रुतींतील परंपरा

वेदकालनिर्णयाच्या आणि वैदिक ज्योतिर्विज्ञानाच्या इतिहासाच्या दृष्टीनें विष्णु वामन झाल्याचें आख्यान अत्यंत महत्त्वाचें असल्यानें त्याचा सविस्तर विचार केला पाहिजे. विष्णूच्या तीन पावलांचा उल्लेख वेदांतून येतो. पण हीं पावलें त्यानें संकटांत सांपडलेल्या मनूसाठीं टाकलेलीं होतीं. ‘यो रजांसि विममे पार्थिवानि त्रिःचित् विष्णुः मनवे बाधिताय।’ (६–४९–१३) ‘वि चक्रमे पृथिवीम् एष एतां क्षेत्राय विष्णुः मनुषे दशस्यन्।’ (७–१००–४) पण ऋग्वेदांत विष्णूसह वामनाचा उल्लेख येत नाहीं. हा उल्लेख तैत्तिरीय संहितेंत प्रथम येतो. ‘देवासुरा एषु लोकेषु अस्पर्धन्त। स एतं विष्णुः वामनम् अपश्यत्। तं स्वायै देवताया आलभत। ततो वै स इमान् लोकान् अभ्यजयत्। वैष्णवं वामनं आलभेत। स्पर्धमानो विष्णुः एव भूत्वा इमान् लोकान् अभिजयति। (२–१–३) पण इथें वामनाचा बळि देऊन विष्णूप्रमाणें सर्व लोक जिंकण्याचा उल्लेख आला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत याच संदर्भांत म्हटलें आहे. ‘विष्णुः यज्ञः। देवताः च एव यज्ञं च अवरुन्धे। वामनो वही दक्षिणा। यत् वही तेन अग्नयः। यत् वामनः तेन वैष्णवः समृध्यै॥ (१–६–१–६) ऐतरेय ब्राह्मणांतील पुढील आख्यायिकेंत विष्णूनें तीन पावलांत विश्व व्यापून असुरांची प्रवंचना केल्याचा पहिला उल्लेख आढळतो. ‘इंद्रः च ह वै विष्णुः च असुरैः युयुधाते। तान् ह स्म जित्वा ऊचतुः कल्पामहा इति। ते ह तथा इति असुरा ऊचुः। सो अब्रवीत् इंद्रो, यावत् एव अयं विष्णुः त्रिः विक्रमते तावत् अस्माकम्। अथ युष्माकम् इतरत् इति। स इमान् लोकान् विचक्रमे अथो वेदान् अथो वाचम्।’ (६–३–७)

या आख्यायिकेंत इंद्र आणि विष्णु यांनीं असुरांना प्रथम युद्धांत जिंकलें आणि नंतर संधीच्या सौम्य अटी सांगून त्या पूर्ण करण्याच्या प्रसंगीं विश्वरूप दाखवून त्यांना विस्मयाभिभूत करून टाकलें. यानंतर शतपथ ब्राह्मणांत जेव्हां हें आख्यान भेटतें, तेव्हां देवांचा सपशेल पराभव होऊन असुर आपल्यांत पृथ्वी वांटून घेत असतात. अशा समयीं यज्ञरूप धारण केलेल्या विष्णूला डोक्यावर घेऊन देव त्यांच्याकडे गेले आणि त्यांनीं असुरांच्याकडे यज्ञापुरती पृथ्वीची भिक्षा मागितली. तिला असुरांनीं मान्यता दिल्यानंतर देवांनीं विष्णूची वामनमूर्ति पूर्वेकडे मुख करून पृथ्वीवर उतार्णी निजाविली. तेव्हां त्या मूर्तीनें आपला विस्तार इतका वाढविला कीं सारी पृथ्वीच तिनें व्यापून टाकली. ‘ The introduction of the dwarf as a disguise of Vishnu is natutally to be accounted for as a stratagem to avert the suspicion of the Asuras. This Brahmana story forms the transition to the myth of Vishnu's Dwaif Incarnation in post vedic literature. म्हणजे ब्राह्मणांतील या कथांवरूनच वेदोत्तर युगांतील वामनावताराच्या कथा विकसित झाल्या असाव्यात, असा आचार्य मॅक्डोनेल यांचा अभिप्राय आहे.

## असुरांचा निंदर हाच बळि

पण वेदोत्तर कालांतील वामन आख्यानाचा अर्थ समजून घेण्याची त्यांना आवश्यकता नसल्यामुळें त्यांनीं या कथेंतील बलिराजा कोण या प्रश्नाचा मुळीं विचारच केलेला नाहीं. बलि असुर होता, हें सर्वांनाच मान्य आहे. पण हा कुठला असुर आणि त्याचा इंद्राशीं विरोध कसा आला, याचा कोणीच विचार करीत नाहींत. वैदिक आर्यांपैकीं अंतीं भारतांत आश्रय घेणारें आंगिरसकुल हें बृहस्पतीची उपासना करीत असलें तरी प्राचीन इराण आणि ग्रीस येथील आर्यकुलें हीं आदित्योपासक असून त्यांचा वर्षारंभ दक्षिणायनाच्या प्रारंभापासून होत असे. प्राचीन आशियांतील रुम, रुशम, श्यावक, कृप ( यद्वा रुमे रुशमे श्यावके कृपे। इंद्र मादयसे सचा ॥’ ) ( ऋ. ८–४–२ ) इत्यादि इराक आणि इराण देशांतील प्रांतापासून भारतापर्यंतच्या भागांत इंद्र या नांवानें दक्षिणायनाच्या प्रारंभाच्या देवाची उपासना चालत असे. त्यांच्या उलट इराकच्या असुरसाम्राज्यांत शुक्र आणि चं यांचें विलक्षण माहात्म्य असून ते रवीला चंद्राची पत्नीच मानीत असत. याच असुरसमाजांत निंदर नांवाचा देव असून तो आपल्या इंद्राच्या सपशेल

विरुद्ध गुणधर्माचा देव होता. रागोझिन यांनी त्यांच्या खाल्डिया या ग्रंथांत लिहिलें आहे. 'Nindar travels through the dreary regions ruled by mulge. ( Lord of the abyss. ) Nin-Dar is also the keeper of the hidden treasures of the earth its metals and and precious stones, because they only wait like him, the moment of emerging out of the earth to emit a bright radiancy' म्हणजे निंदर हा पाताळांत संचार करीत असून पृथ्वीच्या उदरांतील धातू आणि रत्नें यांचाहि देव तो आहे. निंदरचीं जीं वर्णनें उपलब्ध झालेलीं आहेत, त्यावरून हा उत्तरायणाच्या प्रारंभाचा देव असल्याचें कळून येतें. पुढें याच देवाचें नांव त्यांच्या देशांत शनैश्वरालाहि लाभलें. शनि हा आकाशांतील मकर आणि कुंभ राशींचा अधिपति असून या राशींचा बळीच्या आख्यानाशीं काय संबंध येतो, हें पुढें कळेलच. इराकमधील असुरांच्या पुरोहितांना बरगु म्हणत. या बरगूंचा वैदिक आर्यांतील भृगु कुळांशीं संबंध होता कीं नाहीं, याचा शुष्क वाद इथें करीत बसण्याचें कारण नाहीं. असुरपुरोहितांच्या बरगु या नांवाचा भृगु असा अपभ्रंश करून आपल्या पौराणिकांनीं भृगूंना असुरगुरु बनविलें असावें, या नेमस्त विधानाला इतिहासशास्त्रदृष्ट्या आक्षेप नसेल, अशी आशा आहे. इराकमधील अतिवृष्टीचे मास जानेवारी आणि फेब्रुवारी हेच असल्यानें आपल्या पौराणिकांनीं असुरांच्या अनिंद्राला प्रति इंद्रच बनविला आणि असुरांतील बेल् म्हणजे प्रभू या नांवाकरून बनविलेलें बलि हें नांव त्याला दिलें.

## बळीचें निवासस्थान शततारका

शांतिपर्वांतील बलि आख्यानांत बळीला प्रऱ्हादाकडून अथवा ब्रह्मदेवाकडून न सुकणारा हार लाभला होता. हा हार म्हणजे शनीभोंवतालचीं वलयेंच होत. वामनानें बळीला वरुणपाशांत बद्ध केलें, असें वामनपुराणावरून समजतें. त्यावरून त्याचें निवासस्थान वरुणाच्या शततारका नक्षत्रांत असल्याचें कळून येतें. बळीचें नभोमंडलांतील निवासस्थान शनीच्या दोन स्वगृहांपैकीं कुंभ राशींत आणि वरुणदेवाच्या शततारका नक्षत्रांत असल्याचें कळून आल्यानंतर वामनानें बळीला पाताळांत घातल्याचें आख्यान किती सहस्रकांपूर्वींचें आहे, असा प्रश्न उद्भवतो. यासंबंधीं असें गणित सांगतां येईल कीं, शततारकांत किंवा त्यांच्या अति सन्निध फोमालहाउट नांवाचा पहिल्या प्रतीचा प्रसिद्ध तारा असून खि. पू. २०००

वर्षांपूर्वी त्या ताऱ्यापाशींच उत्तरायणाच्या प्रारंभाचें स्थान होतें. या ताऱ्याच्या प्रभावानें अमर कीर्ति प्राप्त होते, अशी फलज्योतिषांत प्रसिद्धि आहे. याच काळाच्या आसपास वामन आणि बळी यांच्या चरित्रांची रचना झाली असली पाहिजे. बलीपासून आपली मुक्तता करण्याची देवांनीं विष्णूजवळ मागणी केली असतां विष्णूनें त्यांना सांगितलें होतें कीं, बलि हा माझा भक्त आहे, पण तो तुम्हांला नकोसा झाला असल्यास मी लौकरच वामनावतार घेऊन त्याचें नियंत्रण करीन. ( ब्रह्मपुराण अ. ७३ ) या कथेचा अर्थहि हाच होतो कीं, बलि हा तेव्हां उत्तरायणारंभाच्या स्थानीं असल्यानें तो विष्णूचा आवडता भक्त बनला होता. असो.

## इंद्र आणि कालकंज

विष्णूने बटु वामनाचा वेष घेऊन बलीची प्रवंचना केली असली तर इंद्रानें प्रौढ ब्राह्मणाचा वेष घेऊन कालकंजांची प्रवंचना केल्याची कथा तैत्तिरीय ब्राह्मणांत आली आहे.' कालकंजा नाम वै असुरा आसन् । ते सुवर्गाय लोकाय अग्निम् अचिन्वन्त । पुरुष इष्टकाम् उपादधात् पुरुष इष्टकाम् । स इंद्र ब्राह्मणो ब्रुवाणः इष्टकाम् उपाधत्त । एषा मे चित्रा नाम इति । ते सुवर्गं लोकं आप्रारोहन् । स इंद्र इष्टकाम् आवृहत् । तेऽवाकीर्यन्त । येऽवाकीर्यन्त ते ऊर्णनाभयो अभवन् । द्वौ उदपतताम् । तौ दिव्यौ श्वानौ अभवताम् । ( १–१–२–५ ) कालकंज नामक असुरांनीं स्वर्गप्राप्तीकारितां अग्निचयनाचें अनुष्ठान आरंभिलें. तेव्हां त्यांचें अनुष्ठान विफल करावें, म्हणून इंद्र ब्राह्मणरूपानें त्यांच्यांत शिरला आणि ते ज्या विटा मांडीत होते, त्यांत त्यानें आपली चित्रा नांवाची वीट ठेविली. या अनुष्ठानाच्या प्रभावानें असुर जवळ जवळ स्वर्गापर्यंत पोंचले, तोंच इंद्रानें आपली चित्रा वीट ओढून काढली. तसे ते सारे कोसळून पडले. जे कोसळले, ते कोळी झाले. त्यांतले दोघे आकाशांत वर गेले, ते तेथील श्वान झाले. कौषीतकीब्राह्मण उपनिषदांत इंद्र म्हणतो कीं, मी प्रल्हादपुत्रांना अत्युच्च आकाशांत, पौलोमांना अंतरिक्षांत आणि कालकंजांना पृथ्वीवर मारलें. ( ३–१ ) असीरियांत कालख हें एक प्रसिद्ध नगर असून तेथील सम्राटांचे प्रासाद त्या नगरांत असत. कदाचित् याच सम्राटांना तैत्तिरीय ब्राह्मणकारांनीं कालकंज अशी संज्ञा दिली असेल. ख्रि. पू. २९३० पासून ख्रि. पू. ६०३ पर्यंतच्या अवधींत बांधलेल्या साऱ्या असुर देवालयांचें दिशासाधन चित्रा आणि बेनेट्नाश या ताऱ्यांवरून केलेलें प्रो. पी. व्ही. नायगेबौएर यांना आढळून आलें. ( ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिन खंड ३९ पान ८१ ) या माहितीवरून वरील

आख्यायिकेचें ऐतिहासिक महत्त्व कळून येतें. प्रस्तुत आख्यायिकेंतील चित्रा इष्टका जशी असुरांच्या अग्निचयनाला आधारभूत होती, तशीच अक्कड आणि सुमेर येथील परंपरेंत चित्रा आणि स्वाति हीं नक्षत्रें स्वर्गाचा आधार याच नांवानें प्रसिद्ध होतीं. 'Arctourus the star is like stachus spica ( a virginis ) called Al simak, the prop ( of heaven ) ( ब्राउन खंड पहिला १८५ ) असुर लोक चित्रास्वातींना स्वर्गाचे आधार म्हणत असत, ही गोष्ट तैत्तिरीय ब्राह्मणकारांना सुविदित होती; इतकेंच नव्हे तर त्या काळीं तेथील असुरांचा ब्राह्मणांवर विश्वास असल्यानें वामन आणि इंद्र हे त्या असुरांत ब्राह्मणवेषानेंच संचार करूं शकले. यावरून वैदिक आर्य आणि अक्कड सुमेरमधील असुर यांच्यांत विद्वत्तेच्या क्षेत्रांत आदानप्रदान चालूं होतें, ही गोष्ट उघड आहे.

## निंदर, इप आणि अप्

असुरांचा उत्तरायणाच्या प्रारंभाचा देव निंदर हा चक्क अनिंद्र दिसतो. या निंदर देवाला इप आणि निनिप अशींहि नांवें होतीं. पण या इप् देवाला उत्तरायणाच्या प्रारंभस्थानाव्यतिरिक्त दुसरेंहि एक स्थान होतें. चित्रेशेजारीं वैदिक परंपरेंतील अप आणि अपांवत्स हे तारे आहेत. चित्रा, अप, अपांवत्स इत्यादि तारे मिळून जो तारकापुंज होतो, त्याची सुमेरी देवता इप हीच आहे. या इप नांवाचा ऋग्वेदांत अप् या नांवानें पांचसात वेळा तरी उल्लेख आला आहे. इंद्राच्या असंख्य नांवांत अप्तुर हेंहि एक नांव असून 'शतक्रतुं अप्तुरं' ( ३–५१–२ ) या ठिकाणीं तें आलें आहे. 'अग्निं अप्तुरं' हें नांव ( ३–२७ –११ ) ( १–३–८ ) ( १–११८–४ ) त्याचप्रमाणें अप्तूर्यम् ( ३–१२–८ ) –( ३–५१–८ ) इत्यादि स्थळीं भेटतें. पुराणांतील इंद्रबलियुद्धांत अग्नीनें प्रामुख्यानें भाग घेतल्याचें वर्णन येतें. त्याचें मूळ ऋग्वेदांतील अग्नीच्या अप्तुर या विशेषणांतच असावें. वैदिक आर्यांचे देवच अप्तुर या विशेषणाला पात्र झाले होते, असें नसून त्यांचे विभक्त झालेले बांधव जे यवन त्या ग्रीकयवनांच्या आथेने देवीलाहि Apturia असें नांव आहे. मी केवळ अक्षरसादृश्यावरून हा बादरायणसंबंध जोडीत आहे, असें म्हणावयाला आमचे मित्र चुकणार नाहींत. पण त्यांनीं हीहि गोष्ट लक्ष्यांत घ्यावी कीं आथेने देवता ही जशी Apturia आहे, तशीच Trito-genia म्हणजे वैदिक परिभाषेंत त्रितजन्या आहे.

## आर्यांचें असुरकृत अनुकरण

प्राचीन काळापासूनच असुर लोकांना वैदिक आर्यांच्या परंपरेचें अंधानुकरण

करण्याची संवय असल्यानें आर्यांच्या दृष्टीनें ते नेहमींच हास्यास्पद होत असत. ही त्यांची सवय ऐतिहासिक काळांतहि गेली नव्हती. याचें एक उदाहरण कै. वेंकटेश बापूजी केतकर यांनीं त्यांच्या 'Indian and Foreign chronology' या ग्रंथांत उघडकीस आणलें आहे. ते म्हणतात. 'This calculation discloses the important fact that the chaldean and Egyptian era of Nabonassar and the Indian Aryan era began on a Saptami. Not only this but the length of the sidereal year is the same in both the Eras. This cannot be accidental and as the Indian Era precedes the chaldean Era by more than four centuries the chaldeans must have in all probablilty borrowed from the Indian Aryans their era and chronology. म्हणजे वरील गणितानें ही गोष्ट उघड होते कीं इराक आणि मिसर या देशांतून नाबोनास्सर राजाच्या नांवानें जी कालगणना प्रचलित होती, त्या गणनेंतील वर्षाचा आरंभ सप्तमीपासून होत असे. एवढेंच नव्हे तर त्यांचें वर्षमानहि वैदिक आर्यांच्या वर्षमानाइतकेंच होतें. नाबोनास्सरची वर्षगणना ही खिस्तपूर्व आठव्या शतकांतली होती आणि भारतीय आर्यांची कालगणना कै. केतकरांच्या मतानें खिस्तपूर्व बाराव्या शतकांतली असल्यानें या ठिकाणीं एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राचें अनुकरण केलें असल्यास इराकच्या असुरांनींच भारतीय आर्यांचें अनुकरण केलें असलें पाहिजे. म्हणजे ज्या खाल्डिया आणि मिसर या देशांपासून वैदिक आर्यांनीं ज्योतिःशास्त्र उसनें घेतलें, असें पाश्चात्यांच्या अनुकरणानें भारतीय पंडितहि प्रतिपादीत असतात, त्याच देशांनीं सप्तमीसारख्या मधल्याच तिथीपासूनचा वर्षारंभ आणि नाक्षत्र सौर वर्षाचें वर्षमान वैदिक परंपरेवरून उचललें असल्याचें कै. केतकरांच्या सारख्या श्रेष्ठ महाराष्ट्रीय ज्योतिष्यांनीं पूर्वींच दाखवून दिलें आहे.

वैदिक आर्यांच्या वर्षारंभाचा संबंध एकाष्टका या इंद्रमातेशीं असल्यानें त्यांना सप्तमीसारख्या मधल्याच तिथीवर वर्षारंभ धरावा लागे. वेदांगज्योतिषाच्या पंचवार्षिक युगाच्या पद्धतीप्रमाणें पहिल्या वर्षीं श्रावण शुक्ल सप्तमीला दक्षिणायनारंभ येत असे, असें मोक्षमूलर भट्टांनींहि त्यांच्या ऋग्वेदाच्या चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेंत दाखविलें आहे. या तिथीवरून वेदोत्तरयुगांतहि एकाष्टका ही इंद्रमाता असल्याची परंपरा कशी टिकून राहिली होती, याची कल्पना येते. पण श्रावण

शुक्लसप्तमीची एकाष्टका ही एकाच काळीं इंद्रपुत्रा आणि सोमपुत्रा होऊं शकत नाहीं. जेव्हां इंद्राची सोमकलशाच्या पुंजाशीं युति होत असे, तेव्हांची भाद्रपद शुक्लाष्टमीची एकाष्टका हीच इंद्रपुत्रा आणि सोमपुत्रा होऊं शकते. असो. इंद्रमहोत्सवाच्या अतिप्राचीन परंपरेशीं बेंटलेनें शोधून काढलेल्या माहेश्वरचक्राचा संबंध येत असल्यानें तें युगचक्रहि कन्या राशींत दक्षिणायन होत असतांनाच चालू झालें असलें पाहिजे. महेश्वराचे उपासक हेच वैदिक ज्योतिष्यांचे अग्रणी असल्यानें कालस्वरूपी महादेवानें एका इंद्राला त्याच्या पूर्वींचे चार इंद्र आपल्या गुहेंत कोंडलेले दाखविले, अशल्या आदिपर्वांतील ज्योतिषतथ्यपूर्ण कथेसारख्या कथा त्यांच्याच परंपरेंत टिकून राहिल्या आहेत.

## इराणचें प्राचीन पंचांग

मिसर आणि मेसॉपोटेमिया यांसारख्या सुदूर देशांतून भारताच्या अनुकरणानें सप्तमीचा वर्षारंभ आणि भारतीय वर्षमान चालू होतें, ही गोष्ट उघडकीला आल्यानंतर आपल्या शेजारच्या इराणांत भारतीय पंचांगाचा प्रभाव थोड्या फार प्रमाणांत तरी आढळून येतो कीं नाहीं याचा शोध घेणें आवश्यक आहे. या दृष्टीनें शोध करतांना मला असें आढळून आलें कीं, प्राचीन भारतांतील इंद्रध्वजाचा उत्सव भाद्रपद शुक्ल अष्टमीपासून शुक्ल द्वादशीपर्यंत पांचच दिवस कां करीत, याचें जें कारण मला भारतीय परंपरेंत आढळलें नव्हतें, तें पारशी लोकांच्या पंचांगांत आढळून येतें. महमूद गझनीचा समकालीन प्रख्यात ज्योतिषी अल्बीरूणी यानें त्याच्या ‘ Chronology of Ancient Nations ’ या ग्रंथांत पारशी लोकांच्या पंचांगांची पुष्कळच महत्त्वाची माहिती दिली आहे. त्याच्या सांगण्याप्रमाणें पारशी लोकांचें संवत्सर दक्षिणायनाच्या प्रारंभापासून चालू होत असें. त्या संवत्सरांत एकंदर दिवस ३६५ असले तरी बारा मासांचे प्रत्येकीं दिवस तीसच असत. उरलेले पांच दिवस संवत्सरांच्या अंतीं घालून ३६६ व्या दिवसापासून ते नवीन संवत्सराचा प्रारंभ करीत. या संवत्सरांत जी पाव दिवसाची तूट येत असे, ती एकशेवीस वर्षांनंतर एक अधिक मास धरून काढीत. या प्रसंगीं भारतांतील यज्ञसमारंभाप्रमाणेंच महोत्सव करून देशांतील सर्व विद्वान् आणि उच्चपदस्थ व्यक्तींचें संमेलन भरवीत आणि त्या सर्वांच्या संमतीनें अधिमासाची व्यवस्था लावीत. पुढें त्या देशांत अनेकदा अराजक झाल्यानंतर त्यांच्या पंचांगाची मूळची

परंपरा टिकली नाहीं. त्यामुळें त्यांचा वर्षारंभ दक्षिणायनाच्या प्रारंभापासून वसंत ऋतूपर्यंत मागें आला. आणि उन्हाळ्यांतच उचित अशीं परंपरेनें ठरलेलीं मानवस्त्रें, इराणचे सम्राट् आपल्या प्रमुख प्रजाजनांना वसंत ऋतूंतच उपहार म्हणून देऊं लागले.

## इराणांतील इंद्रदिन

अल्बीरुणीनें पारशी पंचांगाची ही जी माहिती पुरविली आहे, ती तर उपयुक्तच आहे. पण या साऱ्या माहितीपेक्षां प्रतिवर्षीं संवत्सराच्या अंतीं घातल्या जाणाऱ्या पांच दिवसांना Ander gah अर्थात् इंद्रदिन म्हणत, हें त्याचें विधान ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें आहे. पारशी लोकांच्या अवेस्ता ग्रंथांत इंद्राला अंदर म्हणतात, ही गोष्ट तज्ज्ञांना सुविदित आहे. गाह शब्दाचे अर्थ कोशांत काळ, स्थान, सिंहासन, शय्या आणि अधिकार असे दिले आहेत. संवत्सराच्या अंतीं ऋभूंनीं बारा दिवस निद्रा घेतल्याची परंपरा ज्यांना स्मरत असेल, त्यांना या अर्थोपैकीं शय्येचें स्वारस्य समजेल. पांच दिवसांत इंद्रानें इराणांत सुखशय्येवर शयन केलें काय आणि सिंहासनावर बसून राज्य केलें काय, दोहींचा निष्कर्ष एकच निघतो कीं जरथुस्त्री पंथानें वैदिक आर्यांचा धर्मच्छळ करून इराणांत त्यांचा नायनाट केल्यानंतरहि दक्षिणायनाच्या प्रारंभापासुन चालू होणाऱ्या त्यांच्या संवत्सराच्या अंतीं जे पांच दिवस घालावे लागत त्यांचें आधिपत्य परंपरेप्रमाणें इंद्राकडे राहून गेलें होतें. या पांच दिवसांचें जरथुस्त्रीकरण करण्याचा प्रयत्न धर्मवेड्या पारशी लोकांनीं केला होता आणि त्याकरितां आपल्या पंथांतील १ अहुनवैति २ उश्तवैति ३ स्पेंतमैन्यु ४ वोहुक्षत्र ५ वहिश्तोइश्ती हीं अतिपवित्र नांवें त्यांनीं त्या दिवसांना दिलींहि होतीं. पण या पांच ‘ आधिक ’ दिवसांच्या अवधीला अंदरगाह अथवा इंद्रदिन म्हणण्याची जी पुरातन परंपरा बहुजनसमाजांत रूढ झाली होती, तिचा त्यांना उच्छेद करतां आला नाहीं. अल्बीरुणीनें या दिवसांच्या इतर अनेक नामांसह या वैदिक परंपरेचा उल्लेख आणि उद्धार करून माझ्यासारख्या इतिहासाच्या अभ्यासकांवर अनंत उपकार करून ठेविले आहेत. या पांच दिवसांच्या अंतीं उत्तरायण संपून दक्षिणायन चालू होत असल्यानें भारतीय संवत्सरचक्रांत इंद्राचें नेमकें स्थान कोठें होतें, याचा एक प्रत्यंतर पुरावाहि या उल्लेखानें उपलब्ध होतो. आपल्याकडेहि अधिक मास संवत्सराच्या अंतीं घालण्याची पद्धति होती. आणि त्यामुळें दक्षिणायनाच्या प्रारंभापूर्वीं येणाऱ्या

6805



तेराव्या मासाला इंद्रमास ( अ. वे. ५–६–४ ) अशीहि संज्ञा होती. इराणांत संवत्सराच्या अंतीं घातल्या जाणाऱ्या दिवसांना इंद्रदिन म्हणत, यावरून इंद्रमहोत्सवाचा प्रारंभ वैदिक आर्यांच्या भारतप्रवेशापूर्वी सहस्रावधि वर्षें झाला असला पाहिजे, हें उघड आहे. नाहीं तर जरथुस्त्री जनांच्या धर्मच्छळाला तोंड देऊन इंद्राला पारशी पंचांगांतील आपलें सिंहासन टिकवितां आलें नसतें. या पांच दिवसांतच देवानें मानवाला जन्म दिला, अशी पारशी परंपरा आहे.

## इंद्रदिन हेच पितरांचे दिन

वरील विवेचन लिहून झाल्यानंतर अंदरगाह शब्दाच्या अर्थासंबंधीं आमचे नवे अवेस्ताचार्य श्री. मा. फ. कांगा यांच्याशीं चर्चा करीत असतांना त्यांनीं सुचविलें कीं त्या शब्दाचा अर्थ मध्यंतरींचे दिवस असाहि होऊं शकेल. केवळ शब्दार्थाच्या दृष्टीनें त्यांचें म्हणणें खरें असूं शकेल. पण अल्बीरूणीच्या ग्रंथांत तो अर्थ विवक्षित नाहीं, ही गोष्ट कोणीहि त्या ग्रंथाचा अभ्यास करण्याचे कष्ट घेतल्यास त्यांना समजून येईल. पण इतके कष्ट करण्याची स्थानिक विद्वानांची सिद्धता नसल्यानें इथें त्या ग्रंथांतील एक उतारा उतरून घेणें भाग आहे. 'The last five days of this month are called Farwardjan. During this time people put food in the halls of the dead and drink on the roofs of the houses believing that the spirits of their dead during these days come out from the places of their reward or their punishment, that they go to the dishes laid out for them, imbibe their strength and suck their taste. Regarding these days there has been among the persians a controversy. According to some they are the last five days of the month Aban, according to others they are the Andergah, i e the five epagomenae which are added between Aban and Adhar-Mah. When the controversy incresed they adopted all ten days in order to establish the matter on a firm basis, as this is one of the chief Institutes of their religion. So they called the first five days the first Farwardajan and the second five days the second Farwardajan the latter however is more important than the former. या उताऱ्याचा सारांश हा कीं प्राचीन इराणांत इंद्रदिन म्हणून प्रसिद्ध असलेले दिवस हे आकाशांतून पितर उतरण्याचे दिनहि मानले जात आणि या दिवसांत पारशी लोक आपल्या घराच्या छप-

रांवर पितरांकरितां पेयें ठेवीत आणि त्यांच्या शांतिस्थानांतून त्यांच्याकरितां अन्न नेऊन ठेवीत. हे दिवस नेमके कोणते मानावेत, याविषयीं इराणांत वाद उत्पन्न झाले होते. कांहींजणांच्या मतें अबान मासाच्या अंतीं पांच दिवस पितरांचे मानावेत आणि इतरांच्या मतें अबान मासाच्या समाप्तीनंतर अधिक म्हणून घालावयाचे पांच इंद्रदिन हे पितरांचे मानावेत. हें भांडण पितरांच्या श्राद्धदिनासारख्या पवित्र परंपरेविषयीं असल्यानें त्याचा अंतिम निर्णय सम्राटानें कसाहि केला तरी देशांत दुफळी होण्याचा संभव असल्याने एका सम्राटानें हे सारेच दहा दिवस पितरांचे म्हणून निर्णय करून वाद मिटवून टाकला. तरी सुद्धा इंद्रदिनांतील पितृश्राद्ध हें अधिक पवित्र मानलें जात असे.

## सहस्रवार्षिक संवत्सर

या अवतरणावरून भारतांतील इंद्रमहोत्सवाचा जसा पितृयानाशीं आणि पितृपक्षाशीं निकटचा संबंध आहे, तसाच इराणांतील इंद्रदिनांचाहि पारशी लोकांच्या पितृश्राद्धाशीं निकटचा संबंध असल्याचें कळून येतें. पितृश्राद्धपर्वणीशीं या दोन देशांतील इंद्रदिनांचा निकटचा संबंध असल्याचें उघडकीस आल्यानंतरहि ज्यांना अंदरगाह याचा अर्थ मध्यंतरींचे दिन असाच करावा, असें वाटेल, त्यांचें तोंड कोणत्याच पुराव्यानें बंद होणार नाहीं. असो. आतां आपल्याला बेंटलीनें उघडकीला आणलेल्या माहेश्वरचक्राकडे परत वळलें पाहिजे. हें माहेश्वरचक्र वस्तुतः वैदिक आर्यांच्या विश्वसृज् यज्ञाच्या परंपरेशीं निगडित झालें होतें, याची त्यालाच काय पण केतकरदप्तरींच्यासारख्या आमच्या ज्योतिर्विदांनाहि कल्पना आली नव्हती. पण या यज्ञचक्रासंबंधीं तांड्यमहाब्राह्मणांत जी माहिती सांगितली आहे, तिच्यावरून या चक्राचा आपल्या सहस्र-वार्षिक सत्राशीं असलेला संबंध सुव्यक्त होतो. ‘ पंच पंचाशतः त्रिवृताः संवत्सराः ’ पंच पंचाशतः पंचदशाः, पंच पंचाशतः सप्तदशाः, पंच पंचाशतः एकविंशाः विश्वसृजाम् सहस्रं संवत्सरम् । एतेन वै विश्वसृजः इंद्रं विश्वम् असृजन्त । यत् असृजन्त तस्मात् विश्वसृजः । ( तांड्य महाब्राह्मण २५–१८ ) या अवतरणाचे चुकीचे अर्थ कै. डॉ. शामशास्त्री यांनीं केले आहेत. पण याचा खरा अनुवाद कै. डॉ. दप्तरींनीं थोडक्यांत असा केला आहे कीं, त्रिवृत्स्तोम नांवाचा सोमयाग २५० वर्षें, पंचदशस्तोम नांवाचा सोमयाग २५० वर्षें, सप्तदश स्तोम नांवाचा सोमयाग २५० वर्षें आणि एकविंशस्तोम नांवाचा सोमयाग २५० वर्षें, अशा प्रकारें एक सहस्र वर्षें मिळून विश्वसृज् नांवाचा यज्ञ होतो.

हा यज्ञ करणारे विश्वस्रष्टे एकाच कुळांतील म्हणजे बहुधा आश्रमरूपी विद्यालयांतील असत आणि आपली कुलपरंपरा म्हणूनच हा यज्ञ चालवीत. वर वर्णिलेल्या पद्धतीनें सहस्र वर्षें पूर्ण झाल्यानंतर वरील चार याग प्रत्येकीं तीन वर्षें याप्रमाणें करून एक द्वादशवार्षिक सत्र करीत. अशाच एका द्वादशवार्षिक सत्रांत सूतानें शौनकांना महाभारत हा इतिहास सांगितला. यावरून अशा सत्रांत कालगणना आणि इतिहास यांची कशी सांगड घातली जात होती, याची कल्पना येईल. असो. या विश्वसृज् यज्ञानंतर नवीन संपात आणि अयनें निश्चित करून आकाशांतील विश्वाची अभिनव रचना करावी लागे. म्हणून याला विश्वसृज् म्हणत.

## विश्वसृज् यज्ञ आणि माहेश्वर चक्र

या विश्वसृज् यज्ञांतील २५० वर्षांच्या चार भागांशीं बेंटलीच्या माहेश्वर चक्राचीं चार आवर्तनें एकरूप असावींत, असें स्वाभाविकपणेंच मनांत येतें. पण ही अपेक्षा अक्षरशः पूर्ण होत नाहीं. कारण वैदिक आर्यांचें यज्ञवर्ष ३६१ दिवसांचें असल्यानें एक सहस्र यज्ञवर्षांचे दिवस ३६१००० होतात. पण बेंटलीच्या माहेश्वरचक्राच्या चार आवर्तनांचे एकूण दिवस कै. केतकरांच्या गणिताप्रमाणें ३६०९८२ इतके येतात. म्हणजे एखादा अधिक मास या परिवर्तनाच्या संधीवर आला असल्यानें इथें कमी पडणारे १८ दिवस पुढच्या वर्षी भरून येणार असावेत. तें कसेंहि असो. विश्वसृज् यज्ञाचे २५० वर्षांचे चार भाग आणि बेंटलीच्या माहेश्वरचक्राचीं चार आवर्तनें यांचा कालावधि जवळ जवळ सारखा असल्यानें या चक्राची उत्पत्तिहि विश्वसृज् यज्ञाच्या अनुरोधानेंच झाली असावी, असें अनुमान निघतें.

## द्वादशवार्षिक सत्राचा उलगडा

या विश्वसृज् यज्ञाच्या परंपरेंत एक सहस्र वर्षांचें सत्र संपल्यानंतर त्याची परिसमाप्ति म्हणून द्वादशवार्षिक सत्र करण्याची वहिवाट होती, हें वर आलेंच आहे. इथें असा एक प्रश्न उपस्थित होतो कीं सहस्र यज्ञवर्षेंआणि सहस्र नाक्षत्र-सौर वर्षें यांच्यामध्यें एखाद्या द्वादशवार्षिक सत्राला अवकाश लाभतो कां नाहीं ? याचा निर्णय करण्याकरितां या दोन विभिन्न सहस्रवर्षांचे दिवस मोजले असतां नाक्षत्र सौरवर्षांचे ४२५६।। दिवस अधिक येतात असें आढळून आलें. या दिवसांच्या राशीला बारा वर्षांनीं भागलें असतां ३५४।।। दिवस हा आंकडा

येतो. यावरून सहस्र यज्ञवर्षें आणि सहस्र नाक्षत्र सौरवर्षें यांमधील अंतर बारा चांद्रवर्षांइतकें असल्याचें आढळून येतें.

## रवि पापग्रह कां ?

वैदिक आर्यांचें यज्ञवर्ष ३६१ दिवसांचें होतें, हें टिळकांनीं वैदिक आर्यांचें मूलस्थान या ग्रंथांत सविस्तर दाखविलें आहे. पण हें यज्ञवर्ष ३६१ दिवसांचेंच कां घेत, याचा त्यांनीं विचार केला नाहीं. त्यांच्याच ग्रंथावरून ही गोष्ट निर्विवाद सिद्ध झाली आहे कीं यज्ञ करणाऱ्या आणि यज्ञांचा पुरस्कार करणाऱ्या वैदिक आर्यांचे अग्रणी आंगिरस् कुलांतील दशग्व, नवग्व, इत्यादि ऋषि आणि त्यांचीं कुलें होतीं. हे आंगिरस् बृहस्पतीचे उपासक होते, हेंहि सर्वांना मान्यच आहे. या बृहस्पतीचें एक स्वरूप तारकापुंजांत सप्तर्षींच्या रूपानें दृग्गोचर होतें आणि दुसरें गुरुग्रहाच्या रूपानें मानवजीवनावर अधिकार चालवीत असतें. आपल्या वैदिक पूर्वजांपैकीं आंगिरस् हे जसे बृहस्पतीचे उपासक, तसेच भृगु हे शुक्राचे उपासक असल्यानें गुरुशुक्रांच्या अस्तांत अजूनहि त्यांचे वंशज मंगल कार्यें करीत नाहींत. आंधळ्यांच्या देशांतील नागरिक दिवसा झोपीं जात आणि रात्रीच्या थंड वेळीं आपले दैनंदिन व्यवसाय करीत, असें एच्. जी. वेल्सनीं त्यांच्या कथेंत लिहिलें आहे. त्यांच्याप्रमाणेंच आमचे डोळस भृगु आणि आंगिरस् ध्रुवावरील दीर्घ दिवस संपून गुरुशुक्रांचें दर्शन झाल्यानंतर विवाहादिक मंगल कार्यें करीत. तैत्तिरीय ब्राह्मणांत एके ठिकाणीं भृगु, आंगिरस् आणि आदित्य असे ब्राह्मणांचे तीन भेद सांगितले आहेत. बहुधा रवीला पापग्रह न मानणारे आदित्य असावेत आणि त्याला पापग्रह मानणारे भृगु, आंगिरस् असावेत. यांना अक्षांशभेदानें कांहीं ठिकाणीं तीनच मास तर इतर कांहीं ठिकाणीं पांच मास आपल्या शुभ ग्रहांचें दर्शन होत असे. यावरून नऊ आणि सात मास अशुभ मानणाऱ्यांना नवग्व आणि सप्तगु या संज्ञा लाभल्या आहेत कीं काय याचा विचार व्हायला हवा. पण दशग्व आणि नवग्व हे आंगिरस् असल्याचें जसें निश्चित माहीत आहे, तसें सप्तगु कोण हें नक्की सांगतां येत नाहीं. तेव्हां या कल्पनेची आतांच अधिक चिकित्सा करतां येत नाहीं.

## यज्ञवर्ष म्हणजे गुरूचें राश्यंतर

असो. हे आदित्यविरोधी आंगिरस् गुरूच्या द्वादशराशींतील भ्रमणावर आधारलेलें संवत्सर उपयोगांत आणीत. आजहि आपण गुरूच्या नक्षत्रचक्रांतील

पांच भ्रमणांवर अधारलेलें साठ वर्षांचें संवत्सरचक्रच मानतो. गुरूच्या एका उदयापासून दुसऱ्या उदयापर्यंत सरासरी ४०० दिवस जातात. या कालावधीवर आधारलेलें एक संवत्सरहि पूर्वी भारतांत प्रचलित होतें. आपल्या सिद्धांतग्रंथांतूनहि बार्हस्पत्य मान संवत्सराकरितां घ्यावें, असा संकेत सांगितला आहे. गुरूला मध्यम गतीनें एक राशि ओलांडण्याला ३६१ दिवस आणि १॥ घटिका इतका काळ लागतो. त्यामुळें आंगिरसांनीं आपल्या सत्रांची उभारणी ३६१ दिवसांच्या यज्ञ-संवत्सरावर केली आहे. गुरूच्या राशिचक्रांतील सात प्रदक्षिणांना ८३ आर्तव सौर वर्षें लागतात. त्यामुळें वैदिक परंपरेप्रमाणें बृहस्पतीचा उपमर्द करणाऱ्या इंद्राला ( बृहस्पतेःप्रत्यवधीत् ऐ. ब्रा. ) ८३ वर्षांत बार्हस्पत्य मानानें ८४ संवत्सर सत्रांचा लाभहोई. म्हणजे एका राशींत एक वर्ष या गणिताप्रमाणें गुरूचीं ८४ वर्षें पूर्ण होतात, तेव्हां आर्तव सौर वर्षांचीं ८३ वर्षेंच पूर्ण होतात. या पद्धतीनें सहस्रवार्षिक सत्राचा विचार केला असतां ८४० यज्ञवर्षें जेव्हां पूर्ण होतील, तेव्हां आर्तव सौर वर्षांचीं ८३० वर्षेंच पूर्ण होतील आणि सहस्रवार्षिक सत्राचा अवधि संपण्याला १७० वर्षांचा अवकाश असेल. त्याचवेळीं बार्हस्पत्य मानाप्रमाणें सहस्र-वार्षिक संपण्याला १६० वर्षांचा अवधि असेल. हीं १६० वर्षें त्याच पद्धतीनें पूर्ण केलीं म्हणजे सहस्रवार्षिक सत्राचीं सहस्र वर्षें आणि आर्तव सौरमानाचीं सहस्र वर्षें यांत द्वादश वर्षांहून थोडें अधिकच अंतर पडलेलें आढळून येईल. या दोन गणनांतील हें अंतर बार्हस्पत्यमानाच्या द्वादश वर्षांच्या सत्रानें भरून काढलें जात असावें. कै. दीक्षितांनीं ८५ सौर वर्षांत ८६ बार्हस्पत्य संवत्सर होतात, असें त्यांच्या ज्योतिःशास्त्राच्या इतिहासांत ( पान ३८८ ) लिहिलें आहे. पण दुसऱ्यांच्या गणितावर विसंबून राहिल्यामुळें ती चूक राहून गेली आहे. वरील विवेचनाचा निष्कर्ष असा निघतो कीं सहस्रवार्षिक विश्वसृज् यज्ञ करणाऱ्या वैदिक आर्यांना गुरु ग्रह, त्याचें आकाशांतील द्वादश राशींतून होणारें भ्रमण, त्याला एका राशींतून दुसऱ्या राशींत जाण्याला लागणारा मध्यम काळ, त्याचप्रमाणें बार्हस्पत्य मानाचीं सहस्र वर्षें आणि सहस्र आर्तव सौर अथवा नाक्षत्र सौर वर्षें यांच्यांतील अंतर या साऱ्या गणिताचें पूर्ण ज्ञान होतें.

## ब्रह्मदेवाचें चतुर्मुखत्व

वर वर्णिलेल्या चतुर्विभागात्मक सहस्रवार्षिक सत्रांशीं ब्रह्मदेवाच्या चतुर्मुखत्वाचा संबंध असावा, अशी शंका आतांच मनांत आल्यानें प्राचीन चरित्रकोशांतून ब्रह्मदेव

शब्द काढून पाहिला. त्यावरून असें कळून येतें कीं चतुर्मुखाच्या पूर्वेकडील मुखापासून गायत्री छंद, ऋग्वेद आणि त्रिवृत् स्तोम यांची उत्पत्ति झाली आहे, दक्षिणेकडील मुखापासून यजुर्वेद आणि पंचदशस्तोम, पश्चिमेकडील मुखापासून सामवेद आणि सप्तदश स्तोम, त्याचप्रमाणें उत्तरेकडील मुखापासून अथर्ववेद आणि एकविंशस्तोम यांची उत्पत्ति झाली आहे. अग्निष्टोम, उक्थ्य, अतिरात्र आणि आप्तोर्याम हे यज्ञहि वरील क्रमानेंच ब्रह्मदेवाच्या चार मुखांपासून निर्माण झाले आहेत. या साऱ्या परंपरा विदित करून घेतल्यानंतरच यज्ञसत्रांवर आधारलेल्या वैदिक कालमापन पद्धतीची कांहींशी कल्पना येऊं शकते. कालाच्या चतुर्मुख स्वरूपानें गांगरलेल्या ऋषींनीं आणि देवांनीं महादेवाला त्याच्या स्वरूपाविषयीं प्रश्न विचारल्याचा उल्लेख वायुपुराणांत आला आहे. ‘ ऋषयश्चैव देवाश्च इंद्रश्चैव महातपः समाधाय मनस्तीव्रं सहस्रं परिवत्सरान् । प्रपन्नास्ते महादेवं भीताः कालस्य वै तदा । अयं हि कालो देवेश्चतुर्मूर्तिश्चतुर्मुखः । कोऽस्य विद्यान्महादेव अगाधस्य महेश्वर ।। ’ ( वायु अध्याय २१ ) या ठिकाणीं सहस्र वत्सर विचार करून नंतर महादेवाला सर्वांनीं प्रश्न केला, हा उल्लेख महत्त्वाचा आहे. यावरून चतुर्मुख कालाचा प्रथम सहस्रवार्षिक सत्राशींच संबंध असल्याचें सूचित होतें. वायुपुराणकारांनीं मात्र याचा कृतत्रेतादि चतुर्युगाशीं संबंध जोडला आहे.

## ऋषिकुलांचें सहकार्य

ब्रह्मदेवाच्या चतुर्मुखापेक्षा वसिष्ठ, भरद्वाज, जमदग्नि आणि विश्वामित्र या चार नामांकित ऋषिकुलांचा सहस्रवार्षिक सत्राच्या चार भागांशीं संबंध असल्याचें शुक्लयजुर्वेदांतील अग्निचयनाच्या प्रकरणावरून समजून येतें, ही ऐतिहासिक दृष्ट्या अधिक महत्त्वाची गोष्ट आहे. वर कल्पना केली होती कीं हें सत्र आश्रमरूपी विद्यापीठांतून एखाद्या कुलाची परंपरा म्हणून चालविलें जात असावें. त्या कल्पनेंत थोडी सुधारणा करून आतां असें म्हणावें लागतें कीं हें सत्र चार कुलांच्या सहकार्यानें चालविलें जात असावें. त्रिवृत् स्तोमाच्या सत्रांत अग्नि देव, पूर्व दिशा वसंत ऋतु, गायत्री छंद आणि वसिष्ठ ऋषि यांचें प्राधान्य होतें. त्याचप्रमाणें पंचदश स्तोमांत दक्षिण दिशा, ग्रीष्म ऋतु, त्रिष्टुभ् छंद, विश्वकर्मा देव आणि भरद्वाज ऋषि यांचें प्राधान्य होतें. सप्तदश स्तोमांत पश्चिमदिशा आदित्य देव, वर्षा ऋतु, जगती छंद आणि जमदग्नि ऋषि यांचें प्राधान्य होतें. यांत विशेष गोष्ट ही कीं सप्तदश स्तोम हा शुक्रापासून निर्माण झाल्याचा उल्लेख या स्तोमाच्या वर्णनांत

आला आहे. जमदग्नीच्या भृगुकुलाला साजेल असाच हा उल्लेख आहे. एकविंश स्तोमांत उत्तर दिशा, शरद् ऋतु, अनुष्टुभ् छंद आणि विश्वामित्र ऋषि यांचें प्राधान्य आहे. या स्तोमाच्या वर्णनांत देवाचा उल्लेख आढळत नाहीं.

## नव्या सृष्टीचें काम विश्वामित्र कुलाचें

उत्तर दिशेकडील स्वर्गाचा तेवढा उल्लेख आहे. प्राचीन रशियांत स्वरोग नांवाचा देव होता. तसाच आपला स्वर्गहि एके काळीं देव असल्यास या स्तोमाच्या वर्णनांतील वरील अभाव भरून निघेल. वर उल्लेखिलेल्या चार कुलांच्या सहकार्यानें हा यज्ञ चालत असल्यास पहिल्या वर्षीं त्रि वृ, दुसऱ्या वर्षीं पंचदश, तिसऱ्या वर्षीं सप्तदश आणि चौथ्या वर्षीं एकविंश अशा क्रमानें हा यज्ञ चालत असावा, असें वाटतें. तें कसेंहि असो. या यज्ञाची समाप्ति करून संपात आणि अयनें यांची पुनर्रचना करण्याचें कार्य विश्वामित्र कुलाकडे सोंपविलें होतें, ही गोष्ट निर्विवाद आहे. त्यामुळेंच विश्वामित्र प्रतिसृष्टिकर्ता. संहिताकालाच्या अंतीं मघांमध्यें दाक्षिणायन आणि कृत्तिकांत वसंतसंपात आला असतां विश्वामित्रांनींच संपातसूक्तें प्रथम 'पाहिलीं,' असें ऐतरेय ब्राह्मणांत सांगितलें आहे. 'नव्यंकृणोमि संन्यसे पुराजाम्' अशा नवीन इंद्र करीत असल्याचा स्पष्ट उल्लेखहि विश्वामित्रांनीं आपल्या मंडळांत केला आहे. त्यानंतरहि महाभारतांत वर्णिल्याप्रमाणें श्रवणापासून नक्षत्रगणनेचें प्रवर्तन विश्वामित्रांनींच केलें. हा काळ तर सूत्रग्रंथांच्या निर्मितीचा काळ आहे. यावरून असें दिसून येतें कीं निदान संहिताकालाच्या समाप्तीपासून बौद्ध सम्राटांनीं यज्ञांचा उच्छेद करीपर्यंत विश्वामित्रकुलानें विश्वसृज् यज्ञाच्या समाप्तीचा भार आपल्या शिरावर घेऊन पंचांगाची भारतीय कालगणनेची परंपरा संभाळली होती आणि आपल्या पंचांगाची सुव्यवस्था लावून दिली होती. या परंपरेचा उच्छेद करून वैदिक आर्य हे कालगणनेला पारखे असल्याचे अपवाद त्यांच्यावर लादण्याला वैदिक धर्माचा भयंकर शत्रु अशोक याचें कर्तृत्व कारणीभूत झालें.

प्रकरण तिसरें

# अग्नीचा अर्थ

## वस्त्रदान करणारा अग्नि

ऋग्वेदांतील पहिला शब्द अग्नि हा असल्यानें प्रथम त्या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. ' त्रीणि जाना परि भूषन्ति अस्य समुद्रे एकं दिवि एकम् अप्सु । पूर्वामनु प्रदिशम् पार्थिवानाम् ऋतून् प्रशासत् वि दधौ अनुष्ठु ।। ' ( १–९५-३ ) या ऋचेचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं अग्नीचा समुद्रांत एक, व्योममंडलांत एक आणि पाण्यांत एक असे तीन जन्म होत असून तो ऋतूंवर सत्ता चालवितो आणि पूर्वेपासून क्रमानें दिशा निश्चित करतो. अग्नीचा पहिला जन्म समुद्रांत, क्षितिजासन्निध असलेल्या समुद्रांत होत असून तो वसंत संपाताचा निदर्शक आहे. दुसरा जन्म द्युलोकांत म्हणजे दक्षिणायनाच्या प्रारंभीं आकाशांतील ज्या अत्युच्च स्थानीं रवि असतो, त्या ठिकाणीं होत असून तो दक्षिणायनाच्या प्रारंभाचा निदर्शक आहे. तिसरा जन्म पाण्यांत म्हणजे वर्षा ऋतूच्या अंतीं होत असून तो शरत्संपाताचा निदर्शक आहे. या तीन जन्मस्थानांनीं तो अनुक्रमें पूर्व, उत्तर आणि पश्चिम या दिशा दाखवून देतो आणि ऋतूंवर अधिकार चालवितो. अग्नीचा एकच जन्म सांगितला तर तो वसंतसंपात असतो. दोन जन्म सांगितले तर ते वसंत आणि शरत् संपात असतात. तीन जन्म सांगितले तर दोन संपातांसह दक्षिणायनाच्या प्रारंभाचा त्यांत समावेश होतो. चुकून कोठें चार जन्म सांगितले असल्यास ते दोन संपात आणि दोन अयनें यांचे निदर्शक होऊं शकतील. ' ऊर्ध्वय-मीति सवितेव बाहू उभे सिचौ यतते भीम ऋञ्जन् । उत् शुक्रम् अत्कम् अजते सिमस्मात् नवा मातृभ्यः वसना जहाति ।। ' ( १–९५–७ ) या ऋचेचा अर्थ वेदार्थयत्नकारांनीं पुढीलप्रमाणें केला आहे. ' तो सवित्याप्रमाणें आपले बाहू वर पसरतो. भयानक अग्नि पृथिवी आणि द्युलोक यांस वस्त्रालंकृत करण्याचा पराक्रम करतो. सकल वस्तूंवरून पांढरें वस्त्र काढून घेतो आणि आपल्या आयांना नवीं वस्त्रें देतो. या ऋचेंतील पांढरें वस्त्र हें उत्तरायणांतील पृथ्वीचें हिमवसन असून वसंतसंपातरूपी अग्नि तें वस्त्र काढून घेऊन आपल्या मातांना नवीं वस्त्रें लेववितो, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. पण अग्नि हा वसंतसंपात असल्याचें वेदार्थयत्नकारांना

अविदित असल्यानें त्यांना अग्नि नवीं वस्त्रें कशीं लेववितो, याचा उलगडा झाला नाहीं. पण ऋचांचे अर्थ होतां होईल तो शब्दशः करण्याच्या त्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या अनुवादावरून मला वेदांतील अनेक कोडीं उलगडलीं, हें कृतज्ञतापूर्वक सांगितलें पाहिजे.

## अग्नीसंबंधीं गूढ शब्द

पुढील ऋचेंत अग्नीच्या नेहमीच्या दोन जन्मांचा उल्लेख आला आहे, 'अभि-द्विजन्मा त्रिवृत् अन्नम् ऋज्यते संवत्सरे वावृधे जग्धम् ईम् पुनः।' ( १–१४०–२ ) अग्नि हा द्विजन्मा असून तीन प्रकारचें अन्न खाऊन तो खाल्लेलें अन्न पुन्हा एका वर्षांत वृद्धिंगत करतो. या ठिकाणीं अग्नीच्या दोन जन्मांचा म्हणजे दोन संपातांचा उल्लेख असून पहिल्या संपातापासूनच्या षण्मासांत खाल्लेलें अन्न दुसऱ्या संपातापासूनच्या षण्मासांत पुनश्च उगवून वाढतें, असें इथें सांगितलें आहे. अग्नि हा संपात असल्याचें उघडकीस आलें म्हणजे ऋग्वेदांतील किती तरी महत्त्वाच्या ऋचांचा अर्थ सहज रीतीनें उलगडतो.' स ईं मृगो अप्यो वनर्गुः उपत्वचि उपमस्यां निधायि। व्यब्रवीत् वयुना मर्त्येभ्यः अग्निः विद्वान् ऋताचित् हि सत्यः ।।' ( १–१४५–५ ) हा मृग अग्नि विद्वान् असून मर्त्यांना ऋताचें म्हणजे ऋतू आणि नक्षत्रें यांच्या चक्राचें रहस्य सांगतो. हें सारें मृग नक्षत्रांतील वसंतसंपाताचें वर्णन असून १४६ साव्या सूक्ताच्या पहिल्या ऋचेंतील वर्णनाच्या अनुरोधानें तें वाचल्यास त्याची अधिक चांगली कल्पना येते. ' त्रिमूर्धानं सप्तरश्मिं गृणीषे अनूनमग्निं पित्रोरुपस्थे ।, या वचनांतील द्यावापृथिवींच्या अंकावरील त्रिशीर्ष आणि सप्तरश्मि अग्नि मृगांतील वसंतसंपातच आहे. मृगांतील ज्या तीन ताऱ्यांमुळें त्रिशीर्ष दत्तात्रेयाची जयंती मार्गशीर्षांतील पौर्णिमेला साजरी करतात, त्याच ताऱ्यांना अनुलक्षून इथें अग्नीला त्रिशीर्ष म्हटलें आहे. नाहीं तर चत्वारिशृंगा या सुप्रसिद्ध मंत्रांत ' त्रयो अस्य पादाः द्वेशीर्षे, म्हणजे अग्नीला तीन पाय असून शिरें दोन असल्याचें वर्णन येतें. मृगशीर्षांतील तीन तारे आणि मृगपादाचे चार तारे मिळून हा मृगांतील वसंत-संपात सप्तरश्मि बनला आहे. अग्नि हा संपात असल्याचा अधिक पुरावा पुढील वचनांत सांपडतो. ' समानम् वत्सं अभिसंचरन्ती विष्वक्धेनू विचरतः सुमेके। अनपवृज्यां अध्वनो मिमाने विश्वान् केतान् अधि महो दधाने ।।' ( १–१४६–३ ) दोन धेनूंचा मिळून एकच वत्स, त्याच्याकडे दोन माता वेगवेगळ्या दिशांनीं येतात आणि त्याचा संवत्सरांतील मार्ग निष्कंटक करतात. या ऋचेंतील सुमेक शब्दाचा

अर्थ संवत्सर असा आहे. तैत्तिरीय संहितेंत ( ४–४–७ ) अग्निसंबंधीं परमगूढ शब्दांचा एक लहानसा संग्रह आला आहे. 'अग्ने, यत् ते परं हृन्नाम तावेहि संरभावहै पांचजन्येष्वप्येध्यग्ने यावा, अयावा एवा ऊमाः सब्दः सगरः सुमेकः ।' हे शब्द अजून गूढच आहेत. 'पूर्वपक्षावै यवा अपरपक्षा वा अयवाः तेहि इदं सर्वं युवते च अयुवतेच ।' असें शतपथांतील वचन आपटेकोशांत भेटतें. शतपथांतच एके ठिकाणीं सब्द म्हणजे दिवस, सगरा म्हणजे रात्र, यव्य म्हणजे मास आणि सुमेक म्हणजे संवत्सर असे अर्थ दिले आहेत. ( श. प. १–७–२–२६ ) हे सारे अक्कड आणि सुमेर येथील संस्कृतींत प्रचलित असलेले शब्द असावेत. यांपैकीं सब्द ( म्हणजे दिवस ) हा यहुदी लोकांचा सब्बातु म्हणजे पवित्र दिवस दिसतो. वर्षाला सुमेक हा जो शब्द लाविला आहे, त्याचा सिमाक म्हणजे चित्रातारा या शब्दाशीं संबंध असावा. असो. या साऱ्या अग्नीच्या परम हृन्नामावरून तो साधासुधा अग्निहोत्रांतील अग्नि नव्हता, ही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध आहे.

'सूक्तवाकम् प्रथमम् आत् इत् अग्निम् आत् इत् हविः अजनयन्त देवाः । स एषाम् यज्ञःअभवत् तनूपाः तम् द्यौः वेद तम् पृथिवी तम् आपः ॥' ( १०-८-८८ ) या ऋचेंत सांगितल्याप्रमाणें प्रथम सूक्तवाणी, नंतर अग्नि, त्यानंतर हवि या क्रमानें देवांनीं निर्मिति केली. अग्नि आणि हवि मिळून होणारा यज्ञ तनूपा झाला. त्याला द्यौ, पृथिवी आणि आप हीं सर्व जाणतात. या ठिकाणीं अग्नि हा वसंतसंपात असून द्यौ = दक्षिणायनारंभ पृथिवी = उत्तरायणारंभ आणि आप = शरत्संपात आहे. 'समिद्धो अग्ने आ वह देवान् अद्य यतःस्रुचे । तन्तुं तनुष्व पूर्व्यं सुतसोमाय दाशुषे, ( १-१४२-१ ) या ऋचेंत अग्नीला पूर्वेचा तन्तु ताणून धरण्याची जी प्रार्थना केली आहे, ती तो मूलतः वसंतसंपाताचा देव असल्यानें केली आहे., हें स्पष्टच आहे.

## अग्नि वारिपुत्र कां

वैदिक वाङ्मयांत अग्नीला 'अपां नपात्' म्हणजे वारिपुत्र अशी एक वैशिष्ट्यपूर्ण संज्ञा आहे. अग्नीचा जन्म जलांत होतो, असे उल्लेख वैदिक वाङ्मयांत सर्वत्र विखुरलेले आहेत. आचार्य मॅक्डोनेल म्हणतात. 'The notion of Agni in the waters is prominent throughout the vedas; Water is Agni's home as heaven is that of the sun.' जल हें अग्नीचें सदन असून गगन हें सूर्याचें सदन होय, असाच वैदिक वाङ्मयांतून सर्वत्र

सूर निघतो. अग्नि वसंतसंपात असल्याचें लक्षांत घेतलें, आणि अग्नि, पृथ्वी, वायु, जल हा राशिचक्रांतील क्रम दृष्टीपुढें आणला तर याचा अंशतः उलगडा होऊं शकतो. पण अग्नि ही वसंतसंपाताची संज्ञा ध्रुवस्थानांतील असल्याची कल्पना सुचेपर्यंत तो वारिपुत्र कां याचा पुरता उलगडा झाला नव्हता. ध्रुवावर आपल्याला दिसणाऱ्या सत्तावीस नक्षत्रांपैकीं अर्धींच नक्षत्रें दिसतात आणि सहस्र वर्षांनीं त्यांतील शरत्संपाताचें एक नक्षत्र लुप्त होतें आणि संपाताच्या वक्रगतीमुळें वसंतसंपाताच्या स्थानीं नवीन नक्षत्र उदित होतें. हें नवीन उदयाला येणारें नक्षत्र भोंवतालच्या महासागरांतून वर येतांना दिसत असल्यानें त्याला आणि त्याच्यामुळें वसंतसंपातरूपी अग्नीला वारिपुत्र ही संज्ञा मिळणें स्वाभाविक आहे. अशा अद्भुत परिस्थितींत जन्माला येणाऱ्या अग्नीला आपल्याला मृत्यु केव्हां गांठील, अशी धाकधूक वाटणें स्वाभाविक आहे. ऐतरेय ब्राह्मणाच्या तिसऱ्या पंजिकेंत अग्नीला मृत्यूनें गांठलें असतां त्यानें आपली कशी सुटका करून घेतली, याचें एक आख्यानच आलें आहे. ( ३–२–३ ) तैत्तिरीय संहितेंत तर अग्नि मृत्युमुखीं पडल्याची प्राचीन परंपराहि संरक्षून ठेविली आहे. वैदिक अग्नीचे तीन वडिल भाऊ होते, ते देवांसाठीं हवि वाहून नेतां नेतां थकून परलोकवासी झाले. तेव्हां त्यांच्या सारखीच आपली गति होऊं नये म्हणून चौथा अग्नि भिऊन पाण्यांत लपून बसला. ‘ अग्नेः त्रयो ज्यायांसो भ्रातर आसन् । ते देवेभ्यो हव्यं वहन्तः प्रामीयन्त । सो अग्निः अबिभेत् इत्थं वावस्य आर्तिमारिष्यतीति स निलायत । सो अपःप्राविशत् । तं देवताः प्रैषम् ऐच्छन् । तं मत्स्यः प्राब्रवीत् । ’ ( तै. सं. २–६–६ ) या पळून गेलेल्या अग्नीची चाहडी मत्स्यानें केली. दशममंडलांतील ५१ व्या सूक्तांत या लपलेल्या अग्नीनें वरुणाला सांगितलें आहे. ‘ होत्रात् अहं वरुण बिभ्यत् आयं न इत् एव मा युनजन् अत्र देवाः ॥ ’ ( १०–५१–४ ) ‘ हे वरुणा, होत्रकर्माला त्रासून भिऊन मी इथें आलों नाहीं, तर माझी इथें देवांनींच योजना केली आहे. सौचीक अग्नीच्या सूक्ताप्रमाणें या पाण्यांत लपलेल्या अग्नीचीं वरुणाशीं बोलणीं झालीं. त्यावरून तो शरत्संपात असावा, असें वाटतें. ‘ ते देवेभ्यः हव्यं वहन्तः प्रामीयन्त । ’ या वर उतरून घेतलेल्या वचनावरून हि तोच बोध होतो. ते अग्नि जर देवांसाठीं हव्य वाहून नेतांना मरण पावले असले तर त्यांचा शरत्संपाताशीं संबंध असणें शक्य आहे. पुरुषसूक्तांत ‘ ग्रीष्म इध्म शरत् हवि ’ असें सांगितलें असल्यानें हवीशीं शरत् ऋतूचा निकटचा संबंध येतो. हे हव्यवाहन अग्नि निधन पावत असत, यावरून अशी कल्पना मनांत येते का ध्रुवावरील शरत्संपातरूपी अग्नींचें हें वर्णन असलें पाहिजे. त्या

अद्‌भुत प्रदेशांत संपाताच्या वक्र गतीनें एकेक नवीन नक्षत्र तेथील क्षितिजावर उदित होऊन वसंतसंपाताचें स्थान पटकावीत असे, आणि त्याच वेळीं शरत् संपाताचें एकेक जुनें नक्षत्र क्षितिजाखालीं जाऊन अदृश्य झाल्यानें तें निधन पावल्याची कल्पना कवि करीत असत.

## चाहडी करणारा मत्स्य

ध्रुवावरील आकाशांत आपल्या सत्तावीस अठ्ठावीस नक्षत्रांपैकीं चौदाच नक्षत्रें दिसतात. यामुळें त्या प्रदेशांत एखादें नक्षत्र दिसेनासें झालें म्हणजे तें पाण्याखालीं लपून बसलें, अथवा निधन पावलें असें म्हणण्याचा प्रघात होता. चित्रा नक्षत्राशेजारचे अप आणि अपांवत्स हे तारे जेव्हां ध्रुवक्षितिजावर प्रथम उदित झाले, तेव्हांच ते महासागरांतून वर आल्याच्या कल्पनेनें त्यांना त्यांचीं प्रचलित नांवें प्राप्त झालीं असलीं पाहिजेत. देवादैत्यांच्या समुद्रमंथनांतून चौदा रत्नें वर आल्याची जी कथा प्रचलित आहे, त्या कथेचा संबंधहि बहुधा देवादैत्यांनीं ध्रुवप्रदेशाचा त्याग करून खालच्या अक्षांशांतील उत्तरकुरूच्या प्रांतांत प्रवेश केल्यानंतर त्यांना इतके दिवस अदृश्य असलेल्या चौदा नक्षत्रांचें दर्शन झालें, या इतिहासाशींच असावा. असो. पाण्यांत लपून बसणारा अग्नि आणि त्याचे निधन पावलेले तीन ज्येष्ठ बंधु हे आपापल्या काळचे शरत्संपात असावेत, हें सुचविण्याला वरील विवेचन पुरेसें आहे. पण तेवढ्यानें त्यांची चाहडी करणारा मत्स्य कोण हा प्रश्न तसाच राहून जातो. यांत सकृद्दर्शनीं सुचणारा मत्स्य अर्थात् मीन राशींतील मत्स्य होय. अर्जुनानें मत्स्यवेध केल्याच्या कथांचा संदर्भ कन्या आणि मीन राशींतील वसंत आणि शरत् संपातांशीं आहे, हें उघडच आहे. कारण अर्जुन हें नांव उत्तरा आणि पूर्वा या नक्षत्रांचें द्योतक असून मत्स्यासंबंधीं स्पष्टीकरणाची आवश्यकताहि नाहीं. पण ग्रीक परंपरेंतील अस्तंगत सूर्याच्या वर्णनावरून त्या समाजांत धनिष्ठा नक्षत्रालाहि मत्स्य म्हणत असत, असें कळून येतें. आकाशांतील मीन या तारकापुंजाचा विस्तार सायन मीन १५ अंशापासून सायन मेष २६ पर्यंत आहे. पण या पुंजांतील रेवती नक्षत्र हें अर्जुनीच्या प्रतियोगांत येत नसल्यानें अर्जुनाच्या मत्स्यवेधांत येऊं शकत नाहीं. तेव्हां पूर्वा आणि उत्तरा भाद्रपदा या दोन नक्षत्रांत त्या काळीं शरत्संपात येऊं शकतो. ध्रुवस्थानांतील शेवटचा शरत्संपात धनिष्ठा अथवा चित्रावसु मानला तर देवांचे हवि वाहतांना मृत्युमुखीं पडलेले त्याचे बंधु शततारका, पूर्वाभाद्रपदा आणि उत्तरा-

भाद्रपदा या नक्षत्रांतील शरत्संपात हेच असले पाहिजेत. 'The Nocturnal sun, the Fish. sun (C. F. Apollon Delphinios) concealed in the waters like the vedie surya, who was drawn by the gods from the ocean where he was hidden. ! रॉबर्ट ब्राउन यांच्या प्रिमिटिव्ह कॉन्स्टेलेशन्स या ग्रंथांतील अवरणावरूनहि पाण्यांत लपलेला अग्नि हा शरत्संपात असावा, असें दिसतें आणि आपोलो देल्फिनिओस् या नांवावरून कल्पना करावयाची झाल्यास तो धनिष्ठा नक्षत्रांतील शरत् संपात असूं शकेल. दशम मंडलांतील मूर्धन्वान् ऋषीच्या पुढील ऋचेंत अग्नीचें ज्योतिषशास्त्रांतील स्थान स्पष्टच सांगितलें आहे. 'गीर्णं भुवनं तमसा अपगूळ्हम् आविः स्वर् अभवत् जाते अग्नौ । तस्यदेवाः पृथिवी द्यौः उत आपः अरणयन् ओषधीः सख्ये अस्य ।।' (१०–८८–२) सारें विश्वच अंधकारानें गिळलें होतें. अशा परिस्थितींत अग्नीचा जन्म होतांच स्वर्लोकाचा आविष्कार होऊं लागला. (म्हणजे आकाशांतलि रचनेचा आणि नियमबद्धतेचा बोध होऊं लागला.) मग देव, (नक्षत्रें) पृथिवी, (उत्तरायणाचें प्रारंभस्थान) द्यौ, (दक्षिणायनाचें प्रारंभस्थान) आप, (शरत्संपात) आणि वनस्पति हे सर्व अग्नीशीं सख्य करूं लागले. या सर्व नामांत वसंतसंपाताचें नांव नसण्याचें कारण उघडच आहे. अग्नि हा स्वतःच वसंतसंपात आहे.

## अतिवृद्ध अति तरुण होतात

अग्नि हा वसंतसंपाताचा देव असल्याने साऱ्या देवांत म्हणजे नक्षत्रांत तो तरुण असतो. आत्रेय वसुश्रुतानें म्हटलें आहे, 'त्वम् अंग जरितारं यविष्ठ विश्वानि अग्ने दुरिता अति पर्षि ।' (५–३–११) हे अग्ने, हे तारुण्यरूपा, विश्वांतील साऱ्या पापांच्या पैलतीरावर तूं स्तोत्याला नेतोस.' त्यामुळें अग्नि ज्या नक्षत्रांत प्रवेश करतो, त्या नक्षत्रांतील पूर्वीं अतिवृद्ध असलेल्या तारका एकदम अतितरुण होतात. 'अजनिष्ट हि सः पलिक्नीः इत् युवतयः भवन्ति' (५–२–४) हें वर्णन कृत्तिकांत वसंतसंपात आला त्यावेळेचें आहे. रोहिणींत वसंतसंपात असतांना वर्षाच्या शेवटच्या पक्षाच्या द्योतक म्हणून अगदीं जराजीर्ण काळाच्या प्रतिनिधि गणलेल्या कृत्तिका वसंतसंपाताच्या प्रवेशासह एकदम तरुणी दिसूं लागल्या. त्यांनाच अनुलक्षून विश्वामित्रांनींहि लिहिलें आहे, 'सनाअत्र युवतयः सयोनीः एकं गर्भं दधिरे सप्त वाणीः।' म्हणजे एकाच मातेच्या उदरीं जन्मलेल्या सात युवती भगिनींनीं एकच गर्भ धारण केला. इथें सांगण्याजोगी गोष्ट ही कीं

अक्कडसुमेरचे लोक कृत्तिकांना एरितु म्हणजे गर्भवती म्हणत, तिकडेहि कदाचित् विश्वामित्राचा कटाक्ष असेल.

## शकधूम नक्षत्राचा उलगडा

अग्नि हा वसंतसंपाताचा देव असल्यानें तो जेव्हां ज्या तारकापुंजांत असे त्या तारकापुंजाला अनुसरून त्याचें वर्णन करीत. वसंतसंपात वृषभेंत असतांना अग्निचें वर्णन वृषभ म्हणून करीत. उदाहरणार्थ, विषुवदिनीं सूर्योदयापूर्वी कृत्तिका नक्षत्र उगवलेलें पाहून कवीनें कल्पना केली आहे कीं गोवऱ्यांचा धूर ज्या अर्थी वर दिसत आहे, त्या अर्थी खालीं वृषभ शिजविला जात असला पाहिजे. ‘ शकमयं धूमं आरात् अपश्यम् विषूवता परा एना अवरेण । उक्षाणं पृश्निम् अपचन्त वीराः तानि धर्माणि प्रथमानि आसन् ।।’ ( १–१६४ ) या ऋचेंतील कृत्तिकांच्या शकधूम या नांवाचा उलगडा अक्कड आणि सुमेर येथील ज्योतिषांतील परिभाषेचा परिचय असल्यावांचून व्हावयाचा नाहीं. तेथील भाषेंत शक म्हणजे शीर्ष आणि तुम म्हणजे पुंज. या दोन शब्दांच्या समासापासून शीर्षस्थानीं असलेला तारकापुंज या नात्यानें कृत्तिकेंत वसंतसंपात असतांना तिला हें नांव लाभलेलें आहे. शकधूम शब्दांतील शक म्हणजे शकृत् असा श्लेष करून वैदिक ऋषींनीं गोवऱ्यांचा धूर असा त्याचा अर्थ केला. वरील ऋचेंत विषुवदिनीं कृत्तिकेचा पूर्वोदय झाल्याचें जें वर्णन आलें आहे, तें आर्यांच्या ज्योतिषशास्त्राच्या ज्ञानाच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. त्यावेळीं वसंतसंपात रोहिणी किंवा मृग या नक्षत्रांत असूं शकतो. असो. पुनर्वसूंत संपात असतांना अग्नीला अश्व ( १–१४९–३, ६–१२–६ ) म्हणत. आश्लेषांतील अहींत संपात असतांना त्याला अहि हें नांव देत ‘ हिरण्यकेशो रजसो विसारे अहिः धुनिः वात इव ध्रजीमान् ।’ ( १–७९–१ ) या वचनांत अग्नीला अहि ही संज्ञा लाविली आहे. ‘ आविष्ट्यो वर्धते चारुः आसु जिह्मानां ऊर्ध्वः स्वयशाः उपस्थे । उभे त्वष्टुः बिभ्यते जायमानात् । प्रतीची सिंहं परि जोषयेते ।।’( १–९५–५ ) या महत्त्वाच्या ऋचेंत आडव्या पडलेल्या दोन मातांच्या पासून उभा अग्नि जन्माला आल्यानंतर त्या दोघीहि प्रथम भितात, पण नंतर वळून त्या सिंहाचे लाड करतात, असें वर्णन आलें आहे.

## ध्रुवत्यागानंतर चंद्रक्षय दिसला

‘ प्रजापतेः त्रयः त्रिंशत् दुहितरः आसन्, ताः सोमाय राज्ञे अददात्, तासाम् रोहिणीम् उपैत्, ताः ईर्ष्यन्तीः पुनः अगच्छन्, ताः अन्वैत्, ताः पुनः

अयाचत, ताः अस्मै न पुनः अददात्, सः अब्रवीत् ऋतम् अमीष्व यथा समावच्छ उपैष्यामि अथ ते पुनः दास्यामि इति, सः ऋतम् आमीत्, ताः अस्मै पुनः अददात् तासाम् रोहिणीम् एव उपैत्, तं यक्ष्म आर्च्छत् ।' ( तै. सं. २–३–५ ) प्रजापतीला तेहत्तीस कन्या होत्या. त्या त्यानें सोमाला दिल्या. त्यांच्यापैकीं रोहिणी-कडेच तो जाऊं लागला. त्यामुळें ईर्षान्वित होऊन त्या परत गेल्या. तेव्हां चंद्रानें परत प्रजापतीकडे जाऊन त्यांची याचना केली. प्रजापतीनें सांगितलें कीं तूं सर्वांशीं समभावानें वागण्याचें वचन दिलेंस तर मी त्यांना परत पाठवीन. तेव्हां त्यानें वचन देऊन त्यांना परत आणलें, तरीसुद्धा तो पूर्वींप्रमाणें रोहिणीकडेच जाऊं लागला, तेव्हां त्याला क्षय जडला. हें आख्यान वाचतांना एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत घेतली तरच त्याचा अर्थ कळूं शकेल. ती ही कीं, ध्रुवप्रदेशांतील वैदिक आर्यांना चंद्राची वृद्धि तेवढी पाहून माहीत होती, पण त्याचा क्षय त्यांना अगदींच अविदित होता. कारण कृष्णपक्षांतील चंद्र ध्रुवप्रदेशांतील श्रौतभूमींत कधीं दिसतच नसे. त्यामुळें ध्रुवकटिबंधापासून उत्तरकुरूंच्या प्रदेशांत आल्यानंतर त्यांना चंद्राच्या क्षयाचें कारण शोधून काढावें लागलें. तेव्हां चंद्राचा रोहिणीविषयींचा पक्षपात हें कारण त्यांनीं शोधून काढलें. तेव्हां चंद्र रोहिणीच्या बाबतींत पक्षपात करीत होता, हें खरेंच आहे. कारण त्या काळीं ज्येष्ठा आणि रोहिणी या परस्परांच्या प्रतियोगांतील दोनहि रुधिरवर्ण तारकांना रोहिणी म्हणत असत. त्यामुळें इतर पत्नींच्या मानानें चंद्राची वसती रोहिणींच्या सदनीं अधिक होत असे आणि यांचा चंद्राशीं होणारा समागमहि इतरांची दृष्ट लागण्याइतका रमणीय दिसे. या आख्यानाचा अर्थ कर-णाऱ्या अनेक ज्योतिर्विदांनीं त्याचा संबंध रोहिणींतील वसंतसंपाताकडे जोडला आहे. त्या काळीं तर प्रजापति स्वतःच रोहिणीच्या मागें लागला होता. अशा परिस्थितींत त्यानें आपल्या इतर कन्यांचें रडगाणें ऐकून सुद्धां घेतलें नसतें. तेव्हां हें आख्यान रचण्याचा योग्य काळ म्हणजे जेव्हां ज्येष्ठा नक्षत्रांत दक्षिणायन होतें आणि रोहिणींत उत्तरायण होतें, तोच. त्या काळीं या दोन रोहिणींपैकीं एकीला ज्येष्ठा ही संज्ञा देण्यांत स्वारस्य होतें आणि दुसरीहि केवळ रुधिरवर्णानें रोहिणी न बनतां सूर्याच्या उत्तरायणांतील आरोहणाचा उपक्रम तिच्यापासूनच होत अस-ल्यानें रोहिणी बनूं शकत होती.

## द्वादशाह यागप्रारंभाचा काळ

वैदिक परंपरेंत चांद्र आणि सौर वर्षमानांतील अंतरावर आधारलेल्या

...५

द्वादशाह यज्ञाला ज्येष्ठ आणि श्रेष्ठ अशी संज्ञा लाभली आहे. या यागाच्या वर्णनांत ऐतरेयकार म्हणतात, ‘ ज्येष्ठयज्ञो वा एषः यत् द्वादशाहः। स वै देवानाम् ज्येष्ठो य एतेन अग्रे अयजत।...इंद्राय वै देवाः ज्यैष्ठ्याय श्रैष्ठ्याय नातिष्ठन्त । सो अब्रवीत् बृहस्पतिम् याजय माम् द्वादशाहेन इति । तम् अयाजयत् । ततो वै तस्मै देवाः ज्यैष्ठ्याय श्रैष्ठ्याय अतिष्ठन्त।’ प्रजापतीनें प्रथम द्वादशाहाचें अनुष्ठान करून देवांत प्रथमपद प्राप्त करून घेतलें. पुढें इंद्राला ज्येष्ठ आणि श्रेष्ठ होण्याची इच्छा झाली. पण त्याला तो मान देण्याला देव संमति देईनात. तेव्हां बृहस्पतीला पुरोहित करून इंद्रानें द्वादशाहाचें अनुष्ठान केलें आणि त्याच्या प्रभावानें तो देवांमध्यें ज्येष्ठ आणि श्रेष्ठ म्हणून सुप्रतिष्ठित झाला. ‘ त्वं सुतस्य पीतये सद्यो वृद्धो अजायथाः । इंद्र ज्यैष्ठ्याय सुक्रतो ।’ ( १–५–६ ) या ऋचेंत इंद्राचा हा ज्येष्ठत्वाचा मान मान्य केलेला आहे. हा द्वादशाह याग जेव्हां प्रचलित झाला, तेव्हां कांहीं वैदिक आर्य ध्रुवस्थानाचा त्याग करून उत्तरकुरूंतील नव्या निवासस्थानांत आले असावेत. कारण उत्तर ध्रुवावर चांद्र वर्षमान या शब्दालाच लोक हसतील. त्या प्रदेशांतील कृष्ण पक्षांत चंद्र आकाशांत दिसतच नाहीं, त्याच्या उलट शुक्लपक्षांत नित्य एकेका कलेनें वाढणारा चंद्र पंधरवडाभर आकाशांत सतत दिसतो. पुन्हा तेथील सूर्याचा सुदीर्घ दिवस उगवला कीं सहासात मास तरी चंद्राला कोणी विचारीत नाहीं. उत्तर ध्रुवावर सौर वर्षमानाची आर्यांना कल्पना आली असली तरी उत्तरकुरूंत वसती करीपर्यंत त्यांना सौर आणि चांद्र वर्षमानांतील अंतराची कल्पना नसावी. ही कल्पना त्यांना ज्येष्ठा नक्षत्रांत दक्षिणायन असतांना झाली असावी, असें या दोन वर्षमानांतील अंतरावर आधारलेल्या द्वादशाह यागाच्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ या नांवांवरून दिसून येतें. यावेळींहि इंद्राला विरोध करणारा एक प्रबळ पक्ष वैदिक आर्यांत होता, असें वरील आख्यानावरून दिसून येतें. हा पक्ष प्रजापतीच्या अभिमान्यांप्रमाणेंच प्राचीन इराणांत पुढें प्रसिद्धीला आलेल्या मित्रदेवाच्या अभिमान्यांचाहि असावा. नमुचीच्या वधानें इंद्राला मित्रद्रुह ही संज्ञा प्राप्त झाल्याचें वर सांगितलेंच आहे. अशा मित्रद्रोही इंद्राच्या निषेधार्थ अनुराधा नक्षत्राचा अधिपति जो मित्र, त्याची इंद्रविरोधकांनीं प्रतिष्ठा वाढविली असण्याचा संभव आहे. ‘ सूर्याचंद्रमसावुभौ । असुराणां सुरावेतौ देवानां सांप्रताविमे ।।’ असें एक वचन वायुपुराणांत आढळतें. यावरून ध्रुवस्थानांतील आर्य सूर्यालाहि जिथें विशेष मान देत नसत, तिथें चंद्राला कितपत विचारीत असतील, याची कल्पना येते. उत्तर ध्रुवावरून खालीं उतरल्यानंतरच वैदिक आर्यांना चंद्राचा अतिपरिचय झाल्यामुळें

समुद्रमंथनांतून उद्भवलेल्या चौदा रत्नांतच त्यांनीं चंद्राचा समावेश केला आहे. या समुद्रमंथनाच्या प्रसंगीं देव हे वासुकीच्या शेपटीकडे होते, अशी व्यासपरंपरा आहे. या वासुकीचा म्हणजे आकाशांतील हायड्रा या तारकापुंजाचा विस्तार सायन वृश्चिक २१ अंशापर्यंत असल्यानें अनुराधा नक्षत्रांत दक्षिणायनारंभ असतांना वासुकीच्या पुच्छापाशींच देवयानाची समाप्ति होत होती. त्यामुळें वासुकीचा पुच्छाकडील भाग देवांनीं धरला असल्याची कथा प्रचलित झाली असली पाहिजे. त्याचप्रमाणें अनुराधा हें मित्रदेवाचें नक्षत्र असल्यानें त्याच देवाच्या साक्षीनें देवासुरांनीं अमृत वांटून घेण्याचा संकेत केला असावा. समुद्रमंथनांतून वर आलेलीं लक्ष्मी, ( चित्रा आणि कन्या राशी ) कौस्तुभ, ( स्वाति नक्षत्र ) सुरा, ( व्हिंदेमियात्रिक्स अथवा द्राक्षहरणी ) अमृतकलश, ( क्रेटर अथवा चषक ) हीं रत्नें तूळ आणि कन्या राशींतूनच असल्यानें या राशींतील नक्षत्रें संपाताच्या वक्रगतीनें ध्रुवावरील आर्यांना जशीं दृग्गोचर होऊं लागलीं, तशी त्यांची प्रतिभा समुद्रमंथनाचें आख्यान रचूं लागली. पण या इतर रत्नांत आणि समुद्रांतून निघून आकाशांत जाऊन राहिलेल्या चंद्रांत महदंतर असल्याचें सत्य वैदिक आर्यांना सुविदित होतें. ‘ इयम् अमुष्याम् देवयजनम् अदधात् यत् चंद्रमसि कृष्णमिव । ’( ऐ. ब्रा. )( ४–३–५ ) चंद्रमंडलाच्या ठिकाणीं दिसणारा कृष्णवर्ण भाग म्हणजे पृथ्वीनें द्युलोकाच्या ठायीं स्थापन केलेलें देवयजन, अर्थात् देवाच्यासाठीं यज्ञ करण्याचें स्थल होय. या वचनावरून पृथ्वीचा अंश चंद्ररूपानें आकाशांत स्थापन केला आहे, हें प्राचीन ऋषींना विदित होतें, असें कळून येतें.

प्रकरण चौथे

# अर्जुनीची परंपरा

## अर्यमा देवाचें युग

वर एके ठिकाणीं निघंटूंतील चित्रामघा, अर्जुनी इत्यादि उषानामांचा उल्लेख आला आहे. या नांवांपैकीं अर्जुनी हें नांव सर्वांत प्राचीन काळचें निदर्शक असल्यानें त्या काळाचा इथें अधिक विचार केला पाहिजे. अर्जुनी हें नांव पूर्वा आणि उत्तरा या उभय फाल्गुनींचें असून उत्तरेचा अधिपति भग आणि पूर्वेचा अधिपति अर्यमा आहे. आदित्य देवतांमध्यें अर्यमा, मित्र आणि वरुण या तिघांचे वारंवार एकत्र उल्लेख येतात. या तिघांचीं नक्षत्रें अनुक्रमें पूर्वाफाल्गुनी, अनुराधा आणि शततारका आहेत. यांपैकीं पूर्वा आणि शततारका हीं परस्परांच्या प्रतियोगांत असून तत्कालीन वसंत आणि शरत्संपातांची निदर्शक आहेत. या दोन नक्षत्रांतून संपातबिंदु मागें येत असतांना दक्षिणायनाची रेषा अनुराधा नक्षत्रांतून जात होती. मित्रावरुणांचे एकत्र उल्लेख करण्याची वैदिक वाङ्मयांतील परंपरा याच काळीं प्रचलित झाली असली पाहिजे. ' वि ये दधुः शरदम् मासम् आत् अहः यज्ञम् अक्तुंच आत् ऋचम् । अनाप्यम् वरुणः मित्रः अर्यमा क्षत्रम् राजानः आशत ।' ( ७–६६–११ ) वरुण, मित्र, अर्यमा यांनींच शरद् ( वर्ष ), मास, दिवस, यज्ञ, निशा, आणि ऋचा यांना त्यांचें निजस्वरूप प्राप्त करून दिलें. इथें वरुणासह त्याच्या सहकारी देवांचा निर्देश आला असला तरी अर्यमा आणि मित्र यांचा त्या ऋतूशीं सहसा संबंध येत नसल्यानें शरद् ऋतू-पासून चालू होणाऱ्या वर्षाचा खरा देव वरुणच होय. अर्यमा हाच यज्ञ अशा आशयाचें वचन तैत्तिरीय ब्राह्मणांत आलें आहे. ' यो वा अर्यमणंवेद । दानकामा अस्मै प्रजा भवन्ति । यज्ञो वा अर्यमा । ( २–२–५–४ ) यज्ञांचा प्रारंभ सामान्यतः वसंतसंपातापासून अथवा दक्षिणायनापासून होत असल्यानें अर्यमा हा यज्ञ, या वचनानें यांपैकीं एका काळाचा बोध होतो.

## दीर्घ तमिस्रांचा उल्लेख

अर्जुनी नक्षत्रावरील वसंतसंपाताच्या काळांत कांहीं वैदिक आर्य नुकतेच

ध्रुवकटिबंधांतून खालच्या प्रदेशांत उतरले होते, असें गृत्समदमंडलांतील पुढील ऋचेवरून वाटतें. ' अदिते, मित्र वरुण उत मृळ यत् वः वयम् चकृमा कच्चिदागः। उरु अश्याम् अभयम् ज्योतिः इंद्र, मा नो दीर्घा अभि नशन् तमिस्त्राः ।। ' ( २–२७–१४ ) हे अदिति, हे मित्रावरुणांनो, आम्ही जर तुमचा कांहीं अपराध केला असेल, तर त्याची आम्हांला क्षमा करा. हे इंद्रा, दीर्घकाल अभय आणि प्रकाश आम्हांला लाभो, आणि दीर्घ तमिस्रांचा आम्हांला अनुभव न येवो. पूर्वाफाल्गुनीच्या अलीकडील नक्षत्र मघा असून निघंटूंत चित्रामघा नांवानें त्याचाच उल्लेख आला आहे. मघा नक्षत्रांत वसंतसंपात असतांना शरत् संपात धनिष्ठा नक्षत्रांत होऊन तेथून ध्रुवावरील दीर्घ रात्रीचा उपक्रम होई. या रात्रीला तैत्तिरीय संहितेंत चित्रावसू हें नांव दिलें असून तिची चर्चा पूर्वींच केली आहे. तिच्या अनुरोधानें गृत्समदमंडलांतील वरील मंत्राचा विचार केला असतां इथेंहि ध्रुवरजनींचाच संदर्भ आला असल्याची खूण पटते.

## प्राचीला अर्यमाची स्थापना

वेदांत जेव्हां दोन देवांचे एकत्र उल्लेख येतात, तेव्हां पुष्कळदां ते दोन अयनांचे अथवा संपातांचे तरी देव असतात, नाहींतर वर आलेल्या मित्रावरुणांच्या द्वंद्वाप्रमाणें एक अयन आणि एक संपात यांचे तरी देव असतात. हीं देवताद्वंद्वें म्हणजे वैदिक ज्योतिर्विज्ञानाचीं संक्षिप्त सूत्रेंच होतीं. ऋग्वेदांतील देवताद्वंद्वांचे अगणित उल्लेख पाहून पाश्चात्य विद्वानांना विस्मय वाटतो. पण वेदकालीनच काय, आजकालच्या भारतीयांनाहि ज्योतिःशास्त्र समजणें अशक्य अशी त्यांची भावना असल्यानें त्यांना वस्तुस्थितीचा उलगडा होत नाहीं. आमचे अर्वाचीन सुशिक्षित आधीं देव मानीतच नाहींत, आणि मानलाच तर ते केवळ एकेश्वर मानतात. त्यामुळें त्यांना हे देवताद्वंद्वाचे उल्लेख अडाणीपणाचे वाटतात. प्राचीनकाळीं त्यांच्यासारखाच एक सुशिक्षित, सुधारक, धर्मप्रेषित इराणांत होऊन गेला आणि त्यानें वैदिक आर्यांचें उच्चाटन केलें. त्याच्या उदयापूर्वीं इराणांत मित्र हा फार मोठा देव होता. ही मित्रोपासना इराणांत प्रचलित होण्याचा काळ, सामान्यतः अर्यमा देवाच्या नक्षत्रांत वसंतसंपात आणि मित्रदेवाच्या नक्षत्रांत दक्षिणायन होतें, तोच असला पाहिजे. पारशी लोकांच्या धर्मग्रंथांत मित्र आणि अर्यमा या दोघांचेहि उल्लेख आढळतात. जरथुस्त्रानें इराणांतून मित्रोपासनेचा नायनाट करण्याचा विश्वप्रयत्न केला. तरीसुद्धा त्याच्या पश्चात् पारशी लोकांच्या

धर्मग्रंथांत मित्राला महत्वाचें स्थान लाभलेंच. ऋग्वेदांत अनेक स्थळीं ' अमित्रान् शत्रून् ( ६-७५-७ ६-७३-१२ ) असे उल्लेख येतात. त्यांचा अर्थ मित्रोपासनेला विरोध करणारे शत्रू असाच होतो. मित्रावरुणांच्या द्वंद्वापैकीं एकट्या वरुणाचा स्वीकार करून जरथुस्त्रानें त्याला अहुरमझ्द हें नांव दिलें, असें अनेक विद्वानांचें मत आहे. अहुरमझ्दांत त्वष्टा देवाचींहि अनेक वैशिष्ट्यें आढळून येतात असें कै. म. मो. कुंटे यांनीं दाखवून दिलें होतें. तें कसेंहि असो. प्राचीन इराणांत वैदिक आर्यांची मित्रोपासना दृढमूल झाली असली तर अतिप्राचीन ग्रीक लोकांत अर्जुनीस् या नांवानें कन्याकुमारीची उपासना चालू होती. प्राचीन ग्रीसमध्यें या देवतांचीं प्रसिद्ध मंदिरेंहि होतीं. या अर्जुनीचा आधिपति जो अर्यमा त्याची प्रासादाच्या प्राची दिशेला स्थापना करावी असा निर्देश आपल्या परंपरागत वास्तुशास्त्रांत असल्यानें त्या शास्त्राची परंपराहि पूर्वाफाल्गुनींत वसंतसंपात होता, त्या काळापर्यंत जाऊन भिडते. अर्यमा देवाचा विवाहाशीं निकटचा संबंध असल्यानें वैवाहिक जीवनाशीं निगडित असलेल्या वास्तुशास्त्राची उत्पत्ति त्याच्यापासूनच होणें स्वाभाविक आहे. अर्यमाची प्राची दिशेला स्थापना करण्याचा उल्लेख बृहत्संहितेच्या अध्यायांतून घेतला आहे.

## अवेस्ता ग्रंथांत मित्रवरुण अर्यमा

वरील विवेचन लिहून झाल्यानंतर आमचे पहिले अवेस्ताचार्य कै. डॉ. तारापोरवाला यांचा गाथाग्रंथ चाळून पाहिला असतां पारशी समाजाच्या विवाह-मंत्रांतूनहि अर्यमादेवाचा संबंध येतो, असें कळून आलें. यापेक्षां अधिक महत्त्वाचा संदर्भ मूळांतून उतरूनच घेतला पाहिजे. ' Bartholomae quotes five gatha Passages ( yas.32-7, 33-3, 33-4 , 46-V, 49-7. ) where the three words xvaetu, verezena and Airyaman occur together, he says that these were verezena the agricunturist, xvaetu or Nar the warrior and Airyaman or Hexeman, the priest. ' या ठिकाणीं बार्टोलोमाए यांनीं यथार्थ अर्थ केला असूनहि तो आमच्या अवेस्ताचार्यांना रुचला नाहीं. मी वर दाखवून दिल्याप्रमाणें वरुण हा त्या काळीं शरत्संपाताचा देव असल्यानें कृषक या शब्दानें इथें त्याचाच निर्देश आहे. इथें ख्वएतु अथवा नर या शब्दांनीं दक्षिणायनाचा क्षत्रिय देव मित्र याचा निर्देश आहे. त्याचप्रमाणें अर्यमा अथवा पुरोहित

या शब्दांनीं त्या काळीं अर्यमा हा वसंतसंपाताचा अधिपति असून तो वैदिक परंपरे-प्रमाणें अग्नि आणि पुरोहित या नांवांनीं ओळखला जात असे, हें गुहेंत निहित असलेलें सत्य सुव्यक्त होतें. ऋग्वेदाचा प्रारंभच मुळीं ' अग्निम् ईडे पुरोहितम् ' या शब्दांनीं झाला आहे. इथें बार्टोलोमाए यांनीं केलेले अर्थ वैदिक परंपरेशीं सुसंगत असल्यानें तेच यथार्थ असून त्यांच्यावर मिल्टनप्रभृति इंग्रजांच्या अनुकरणानें आमच्या दिवंगत अवेस्ताचार्योंनीं केलेली टीका चूक आहे. जरथुस्त्रानें मित्रोपासना बंद पाडली असल्यानें त्याचा आणि वरुणोपासनेचें अहुरमझ्दाच्या उपासनेंत परिवर्तन केल्याचें रहस्य लपवून ठेवावयाचें असल्यानें त्याचाहि त्याला उल्लेख करावयाचा नव्हता. पण अर्यमा हा पारशी समाजांतहि विवाहाचा देव असल्यानें त्याचें नांव त्याला दडपून टाकतां आलें नाहीं. ' अर्यम्णः पूर्वे फल्गुनी । जाया परस्तात्, वृषभो अवस्तात् । ' ( १–५–१–२ ) या तैत्तिरीय ब्राह्मणांतील वचनावरून अर्यमा देवाचा जाया आणि वृष यांच्याशीं असलेला संबंध सुव्यक्त होऊन ' अघासु हन्यन्ते गावो अर्जुन्योः पर्युह्यते । ' या वचनाचा अर्थ कळण्याला साहाय्य होतें. असो. ख्वएतु, बेरेझेन आणि अर्यमा हे देव अहुरमझ्दाची स्तुति करतात, असा उल्लेख बत्तिसाव्या गाथेंत असून तेत्तिसाव्या गाथेंत ऋताच्या मार्गावरील या तीन देवांचा उल्लेख आहे. मित्राच्या अनुराधा नक्षत्रांत जेव्हां दक्षिणायन होत होतें, तेव्हां उत्तरायणाचा प्रारंभ भरणी नक्षत्रांत होत होता. इंद्र जेव्हां रौहिणाला फोडीत होता, अथवा रोहिणींत उत्तरायणाचा प्रारंभ होत होता, त्या काळाच्या अलीकडील सहस्रकांतला हा काळ आहे.

## अर्जुनी वृक्षापासून द्यौची निर्मिति

संहिताकालाच्या समाप्तीच्या दिवसांत वसंतसंपातापासून ढळलेला अर्यमा दक्षिणायनाच्या प्रारंभीं येऊन पोचल्याचे अनेक उल्लेख वेदांत येतात. ' यत् ह स्याम् अंगिरोभ्यो धेनुं देवा अदत्तन । वि ता दुह्रे अर्यमा कर्तरि सचा एष तामूवेदमे सचा ।।' ( १–१३९–७ ) देवांनो, तुम्ही आंगिरसांना जी धेनु दिलीत, तिचें दोहन अर्यमा देवानें केलें. ती धेनु त्याला किंवा मलाच माहीत. हा मंत्रद्रष्टा दिवंगत होऊन अनेक सहस्रकें लोटल्यानंतर त्याच्या धेनूचें रहस्य मलाहि समजून आलें असून आतांचे परंपराभ्रष्ट आर्य अर्यमा देवालाच विसरले आहेत. निघंटूच्या काळींच आर्य लोक अर्यमा देवाला विसरले होते, असें आचार्य मॅक्डोनेल म्हणतात. असो. येथील धेनु ही दक्षिणायनाची धेनु असून अनुशासनपर्वांतील

गोलोकमाहात्म्यांत तिला प्राधान्य दिल्यानें रुष्ट झालेल्या इंद्राला तिची योग्यता समजावून दिल्याचें आख्यान आहे. संहितासमाप्तीच्या काळांत ही धेनु अर्यमा देवाच्या पूर्वाफाल्गुनी नक्षत्रांत जोंवर होती, तोंवर तिची धार काढण्याचें काम त्याला करावें लागे. ही गाय ज्या वनांत चरे, त्याच वनांतील वृक्षापासून द्यावापृथिवींना तासून निर्माण केल्याचा उल्लेख १०–८१–४ या स्थळीं आला आहे. 'किंस्वित् वनं कः ऊं स वृक्षः आस यतः द्यावापृथिवी निस्ततक्षुः ।' कन्या राशींतील चित्रेचा अधिपति त्वष्टा हा सुतार म्हणून प्रसिद्ध आहे, हस्त नक्षत्र हीच त्याच्या हातांतील कुऱ्हाड, कन्येंतील अर्जुनी आणि सिंहेंतील अर्जुनी या यमलार्जुन वृक्षांनीं सूचित केलेल्या वनांतच सिंह राशींतील वनराजाचा संचार होत असतो. ही वस्तुस्थिति आकाशांत प्रत्यक्ष पाहणाऱ्यांनाच संहिताकालाच्या समाप्तीच्या दिवसांत ज्या वृक्षापासून द्यावापृथिवींची निर्मिति झाली, तो वृक्ष अर्जुनी नक्षत्रांचाच आणि भग अथवा अर्यमा या देवांचाच असला पाहिजे, हें सत्य दृग्गोचर होऊं शकतें.

## पाणी नको असलेली राणी

या अर्जुनी नक्षत्रांनाच भेकी अथवा मंडुकी अशीहि संज्ञा होती. महाभारताच्या वनपर्वांत एका मंडुकीची अतिप्राचीन कथा त्या ग्रंथांत क्वचित् वापरल्या जाणाऱ्या गद्यांत दिली आहे. त्यावरूनच तिच्या प्राचीनत्वाची कल्पना येते. परीक्षित् नांवाचा इक्ष्वाकु राजा वनांत मृगयेला गेला असतां एका रमणीय सरोवरासन्निध ( सोमपात्रासन्निध ) बसलेली एक अतिसुंदर स्त्री ( अर्जुनी=महाश्वेता ) त्याच्या अवलोकनांत आली. 'ताम् अब्रवीत् राजा कस्या असि भद्रे, का वा त्वम् इति । सा प्रत्युवाच 'कन्या अस्मि इति ।' तूं कोण असें राजानें विचारलें असतां मी कन्या ( राशि ) आहे, असें तिनें उत्तर दिलें. त्यानें त्या सुंदरीशीं विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली असतां तिनें आपली अट सांगितली. 'न उदकं मे दर्शयितव्यम् इति।' पुढें एकदा राजानें ती अट विसरून तिच्यासह जलविहार करण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हां ती पाण्यांत प्रवेश करतांच मंडुकी बनली. अर्जुनी नक्षत्र हीच या कथेंतील सुंदरी. या नक्षत्रांत दक्षिणायनाचा प्रवेश झाला नव्हता, तोंपर्यंतच तिचें सौंदर्य अविकृत राहिलें. त्यानंतर वर्षा ऋतूंतील दुर्दिन त्या नक्षत्रावर येऊं लागल्यानंतर त्याच ऋतूंत कंठ फुटणाऱ्या मंडुकींत तिचें रूपांतर झालें. मंडूक शब्दाचे प्रतिशब्द जे भेक आणि दर्दूर यांचा अर्थ मेघ असाहि होतो. अर्जुनी नक्षत्रावर मेघांनीं आकाश दुमदुमलेलें पाहून आणि धरणीवर दर्दूरघोष

चाललेला पाहून अर्जुनीचें भेकींत रूपांतर झाल्याची कल्पना कवींना सुचली आहे. कन्या राशीचें एक नांव प्लवगा हें भेकींचेंहि अपरनाम आहेच. कन्या राशींत एक कपिहि असून प्लव शब्दाचा अर्थ कपि होतो.

## अग्नीचा शोध

महाभारताच्या अनुशासन पर्वांतील ८५ व्या अध्यायांत कार्तिकेयाच्या जन्मापूर्वी देवांनीं अग्नीचा शोध केल्याचें एक आख्यान आलें आहे. अग्नीच्या शोधाकरितां देवांनीं त्रैलोक्य धुंडाळलें. पण अग्नि उदकांत लपून राहिला असल्यानें त्याचा पत्ता सांपडेना. अशा वेळीं अग्नितापानें तप्त झालेल्या मंडूकानें देवांना त्याचें लपून राहण्याचें ठिकाण दाखवून दिलें. तेव्हां संतापानें अग्नीनें त्या चहाड मंडूकांना शाप दिला आणि मोठ्या तातडीनें उदकाचा त्याग करून अश्वत्थ वृक्षांत दडी मारली. तेव्हां इंद्राच्या ऐरावताप्रमाणें प्रचंड असा एक हत्ती देवांसमीप येऊन त्यांना म्हणाला कीं अश्वत्थ वृक्षांत अग्नि लपून बसला आहे. ही गोष्ट अग्नीला समजतांच त्यानें हत्तींनाहि शाप देऊन अश्वत्थांचा त्याग केला आणि शमीचा आश्रय घेतला. येथेंहि शुकानें चाहडी करून देवांना त्याचा शोध लावून दिला. या आख्यानांतील हत्ती हा हस्त नक्षत्रांतील हत्ती असून मंडूक हा वर विवेचन केल्याप्रमाणें कन्या राशि आणि अर्जुनी नक्षत्र यांचाच प्रातिनिधि आहे. यांतील अश्वत्थ आणि शमी हे अर्थात् पूर्वा आणि उत्तरा फाल्गुनी असून पोपट कोण हें मात्र कळत नाहीं. कारण यापूर्वीं नक्षत्रनामांत कोठें शुकाचा उल्लेख आलेला मी पाहिलेला नाहीं. या आख्यानांतील अग्नि वसंतसंपाताचा नसून दक्षिणायनाचा निदर्शक आहे. कारण याचा काळ कार्तिकेयाच्या जन्मापूर्वींचा असल्याचें स्पष्ट सांगितलें असल्यानें हत्तीनें दाखविलेल्या वृक्षांतील अग्नि आणि मंडूकानें दाखविलेला आपल्या निवासस्थानांतील अग्नि हे उभयतां मघा नक्षत्रांत दक्षिणायन येण्यापूर्वींचे अग्नि असले पाहिजेत. कार्तिकेयाचा जन्म कृत्तिकेंत वसंतसंपात असतांना झाला, तेव्हां दक्षिणायन मघा नक्षत्रांत होतें.

## इश्टर आणि मंडूक

वरील विवेचन लिहून झाल्यावर रॉबर्ट ग्रेव्हज् यांचें ‘ व्यवसाय, लेखक ’ या नांवाचें पुस्तक वाचनांत आलें. त्यांत त्यांनीं प्राचीन इराकमधील इश्टर देवतेसंबंधीं विवेचन करतांना म्हटलें आहे कीं त्या देवतेचा पाण्यावर अधिकार चालत होता, नदीच्या पाण्याला तांबडा रंग तिच्यामुळेंच येई. तिचे उपासक मंडूक हा

प्राणी पवित्र मानीत. गाय हें इश्टर देवतेचेंच एक स्वरूप होतें. पर्जन्यवृष्टीवर तिची सत्ता चालत असे. त्याचप्रमाणें टोळधाड आणि गारांची वृष्टि यांचा प्रसादहि तीच जगाला देत असे. हें सारें दक्षिणायनकालीन कन्या राशीचें वर्णन आहे. पण रॉबर्ट ग्रेव्हज् यांच्या मताप्रमाणें इश्टर ही चंद्रदेवता असल्यानें त्यांनीं वरील सर्व माहितीचा संबंध त्या देवतेशीं जोडण्याचा प्रयत्न केला आहे. तें कसेंहि असो. या देवतेच्या उपासकांत मंडूक हे पवित्र मानले जात असत, या उल्लेखानें महाभारतांतील मंडूकीचा अर्जुनी नक्षत्राशीं आणि कन्या राशीशीं संबंध जोडतांना माझी दिशाभूल झाली नव्हती, हें कळून येतें. ' हेंहि नसे थोडकें ! ' इश्टर ही कन्या असल्याचें साऱ्या ऐतिहासिकांना सुविदित असल्यानें त्या प्रश्नांची चर्चा नलगे.

## द्यावापृथिवींमधील तंतु

' रोहितो द्यावापृथिवी जजान तत्र तन्तुं परमेष्ठी ततान । तत्र शिश्रिये अज एकपादो अदृंहद् द्यावापृथिवी बलेन ॥ ' ( अ. वे. १३–१–६ ) या ऋचेंत रोहितानें ( सूर्यानें ) द्यावापृथिवींना ( दक्षिणायन आणि उत्तरायण ) जन्म दिला असतां त्या उभयतांच्या मध्यें परमेष्ठीनें तंतु ताणला. त्या तंतूचें दुसरें टोंक अज एकपाद या देवानें धरलें आणि त्यानें आपल्या बळानें द्यावापृथिवींना स्थैर्य प्राप्त करून दिलें. हा जो द्यावापृथिवी यांच्यांतील तन्तु आहे, तो सारखा नवनवीन करावा लागे. ' नव्यं नव्यं तन्तुम् आतन्वते दिवि ' ( १–१५९–४ ) असें द्यावा-पृथिवीसूक्तांतच दीर्घतमा आंगिरसानें सांगितलें आहे. अज एकपाद या देवाचें नक्षत्र पूर्वाभाद्रपदा असल्यानें त्या काळीं त्या नक्षत्रांत उत्तरायणाचा प्रारंभ होत असला पाहिजे. या नक्षत्राचें स्थान सायन मीन २२ या अंशाच्या आसपास असल्यानें तेव्हांपासून आतापर्यंत उत्तरायणाचा प्रारंभ ८२ अंश मागें आला असला पाहिजे. एक अंश अयनबिंदु मागें येण्याला सरासरी ७२ वर्षें लागतात. यावरून गणित केलें असतां पूर्वाभाद्रपदा नक्षत्रांत उत्तरायण असण्याचा काळ खि. पू. ४००० वर्षें हा श्री. प्रबोधचंद्र सेनगुप्त यांचा आवडता काळ येतो. या काळीं अर्जुनी नक्षत्रांतच दक्षिणायन येतें.

## तंतु ताणण्याचे समारंभ

वरील ऋचेंत तंतु ताणण्याचा जो उल्लेख आहे, त्यासारखा तंतु ताणण्याचा समारंभ मिसर देशांत देवालयांचा पाया घालतांना प्रत्यक्षच करीत. त्याचें वर्णन ॲस्ट्रॉलॉजिकल मॅगेझिनमधील सिरिल फागन यांच्या लेखावरून येथें उतरून घेतलें

आहे. ' One of the most important ceremonies in the foundation of Egyptian temples was known as Pedjeshes. ( Pedj to stretch, Shes cord ). The reigning Pharaon and a Priestess personifying seshat, the goddess of writing proceeded to the site, each armed with a golden mallet and peg connected by a cord to another peg. ' अशा प्रकारें इजिप्तचा सम्राट् आणि ललाट-लेख लिहिणाऱ्या षष्ठी ( sehsat ) देवीची भूमिका करणारी पूजारीण हीं उभयतां हातांत सोन्याचा हातोडा, दोर आणि खुंट्या घेऊन देवालयासाठीं निवडलेल्या स्थळीं जात आणि तिथें पूजारिणीनें पहिली खुंटी ठोकल्यानंतर समर्षींच्या रेषेंत दोरी ताणून राजा आपली खुंटी ठोकीत असे. हा सारा विधि वस्तुतः द्यावापृथिवींचा तंतु ताणण्याचाच होता. अशा प्रकारें तंतु ताणण्याच्या विधीची त्या देवालयांवरील प्रमुख कलाकृति असे. मिसरमधील हेलिओपोलिस्, आबिडोस्, डेंडेरा इत्यादि पुरातन नगरांतील मंदिरांवर असलीं चित्रें उपलब्ध झालीं आहेत. वैदिक आर्यांच्या कल्पनांचें प्राचीन मिसरमध्यें कसें सश्रद्ध अनुकरण होत असे, हें या चित्रांवरून सुस्पष्ट होतें. मिसरमधील या पुरातन देवालयांचा काळ खि. पू. ३००० वर्षांच्या मागें जात नाहीं. त्याच्या उलट अज एकपादा-जवळील उत्तरायणासारख्या अपेक्षाकृत अर्वाचीन युगाचा काळहि खि. पू. ४००० या सुमाराचा आहे.

## द्यावापृथिवींना धेनूंचा बळि

अथर्ववेदांतील नक्षत्रसूक्तांत ' भानुराश्लेषा अयनं मघा मे ' ( १९–७–२ ) असा स्पष्ट उल्लेख असल्यानें निदान ऋग्वेदसमाप्तीच्या काळीं दक्षिणायनाच्या प्रारंभीं सूर्योदयापूर्वीं आश्लेषा नक्षत्र उगवत होतें आणि प्रत्यक्ष अयनाचा प्रारभ मघा नक्षत्रांत होत होता, असें कळून येतें. तत्कालीन वैदिक आर्यांना अयनकाळीं सूर्योदयापूर्वीं उगवणारें नक्षत्र आणि अयनाचें नक्षत्र यांच्यांतील भेद माहीत होता, इतकेंच नव्हे तर या भेदाचा साक्षेपानें उल्लेख करण्याचें महत्त्वहि समजत होतें. ऋग्वेदसमाप्तीच्या काळांत मघामध्यें दक्षिणायन होतें, असें दर्शविणारा दुसरा पुरावाहि उपलब्ध आहे. 'सूर्यायाःवहतुः प्रागात् सविता यम् अवासृजत् । अघासु हन्यन्ते गावो अर्जुन्योः पर्युह्यते । ' ( १०–८५–१३ ) ही ऋचा याकोबीपासून प्रभूपर्यंत असंख्य विद्वानांनीं आजपर्यंत हाताळली आहे. पण तिचा अर्थ लावण्याची

गुरुकिल्ली त्यांपैकीं कोणालाच सांपडली नव्हती. या ऋचेवर कै. टिळकांनीं मंडालेंत लिहिलेलें एक अपूर्ण टांचण त्यांच्या वेदांगज्योतिषावरील ग्रंथांत छापलें आहे. इथें स्मरण झालें म्हणून लिहावेंसें वाटतें कीं १९२१ मध्येंच त्या ग्रंथांची हस्तलिखित प्रत विषय कळत नसतांहि मी चाळली होती. असो. त्या टांचणाच्या अनुरोधानें विचार करतांना एके दिवशीं अचानक ती गुरुकिल्ली सांपडली. तैत्तिरीय ब्राह्मणांत कोणत्या देवांना कोणता पशु बळी द्यावा, याची चर्चा करतांना ( १–२–५–२ ) द्यावापृथिवींना धेनु बळी द्याव्या, असें सांगितलें आहे. 'द्यावापृथिव्याम् धेनुम् आलभन्त ।' याच संदर्भात पुढें वायूला वत्स बळी द्यावा, आदितीला मेंढी अर्पण करावी, इत्यादि बलिदानांचाहि उल्लेख आला आहे. तेव्हां द्यू आणि पृथिवी यांच्या पर्वकाळीं नेमलेली धेनुहत्या दशम मंडलांत म्हटल्याप्रमाणें अघा अर्थात् मघा नक्षत्र वर करीत असले तर त्या काळीं दक्षिणायनाचें प्रारंभस्थान मघा नक्षत्रांत होतें, म्हणून ती हत्या होत होती, हें सिद्धच आहे.

## माघांतील गोहत्या

या ऋचेतील हन् धातूचा अर्थ हाणणें = हांकणें असा करून कै. दीक्षितांनीं मघा नक्षत्रावर गाईंना हांकून नेलें, असा आपल्या इतिहासांत अर्थ केला आहे. पण त्यांचा भूतदयाप्रेरित अर्थ खरा नसल्याचें टिळकांच्या टांचणावरून कळून येतें. त्यांनीं असें दाखविलें आहे कीं, महाभारतकाळीं माघमासांत खरोखरीच गाईंची मोठ्या प्रमाणावर हत्या होत असे. अर्जुनाचे तीक्ष्ण बाण लागल्यावर भीष्म म्हणतात, 'अर्जुनस्य इमे बाणा नेमे बाणाः शिखंडिनः । कृन्तन्ति मम गात्राणि माघमासे गवामिव ।।' त्याचप्रमाणें शांतिपर्वांतूनहि त्यांनीं पुढील संदर्भ शोधून काढला आहे. 'गृहस्नेहावबद्धानाम् नराणाम् अल्पमेधसाम् । कुस्त्री खादति मांसानि माघमासे गवा इव ।।' हे संदर्भ पाहून टिळकांना असा प्रश्न पडला कीं माघमासांत गाईंची अशी हत्या होत असली तर सूर्याविवाहसूक्तांतील त्या ऋचेंत सूर्याच्या नक्षत्राचा उल्लेख आला आहे कीं चंद्राच्या ? या कोड्याचा उलगडा तैत्तिरीय ब्राह्मणांतून वर उतरून घेतलेल्या वचनानें होतो. सूर्य मघा नक्षत्रांत असतांना जेव्हां दक्षिणायन होत होतें, त्याच काळीं तो मघांच्या प्रतियोगांत आला असतांना म्हणजे चांद्र माघ मासांत उत्तरायण होत असें. उत्तरायणाकरितां वाट पाहून स्वतः भीष्मांनींच आपल्या देहाचें विसर्जन माघांत केलें. या उत्तरायणाच्या उत्सवप्रसंगीं तेव्हां मोठ्या प्रमाणावर गोहत्या होती. या प्रमाणामुळें द्यावापृथिवी यांचा वेदांतील अर्थ निश्चित करण्याला स्वतंत्र पुरावाहि मिळतो. एके ठिकाणीं सोमरससेवनानें उद्दाम

झालेल्या इंद्रानें म्हटलें आहे, ‘ हन्त अहम् पृथिवीम् इमाम् निदधानीह वेह वा ।’ ( १०–११९–९ ) बोला आतां या पृथिवीला इकडे टाकूं कां तिकडे ! स्वतः इंद्र दक्षिणायनाच्या प्रारंभीं असल्यानें तो ठेवील तिथें पृथिवीला म्हणजे उत्तरायणाच्या प्रारंभाला राहणें भागच आहे ! हें सांगायला नको. ऋग्वेदकालीं मूला गौ अशी संज्ञा असल्यानें तिच्या आगमनाप्रीत्यर्थ गोहत्या करीत असत कीं काय ? कदाचित् तिला यमाची धेनु असेंहि नांव असल्यानें त्या पर्वणीला यमलोकीं धेनु धाडीत असतील.

## द्यावापृथिवींचे जन्म

ऋग्वेदांत द्यावापृथिवींना पिता आणि माता म्हणण्याचा प्रघात आहे. ‘ द्वे स्रुती अशृणवम् पितॄणाम् अहम् देवानाम् उत मर्त्यानाम् । ताभ्याम इदम् विश्व एजत् समेति यत् अंतरा पितरम् मातरम् च ।। ’ ( १०–८८–१५ ) मी दोन मार्ग ऐकले आहेत. एक पितरांचा आणि दुसरा देवांसह मर्त्यांचा. य च मार्गांनीं हें गतिमान् विश्व पित्यापासून मातेकडे आणि मातेपासून पित्याकडे जातें. वैदिक आर्यांच्या सुदीर्घ परंपरेंत वेळोवेळीं द्यावापृथिवींचीं स्थानें बदलल्यामुळें त्या त्या काळीं त्यांना जन्म देणें हें त्यांच्या देवतांचें एक महत्त्वाचें कार्यच होऊन बसलें होतें. ‘ ते मायिनो ममिरे सुप्रचेतसो जामी सयोनी मिथुना समोकसा । नव्यं नव्यं तन्तुमातन्वते दिवि समुद्रे अन्तः कवयः सुधीतयः ।। ’ ( १–१५९–४ ) ते प्राज्ञ आणि महामेधावी द्यावापृथिवींना जुळ्या बहिणीप्रमाणें एकाच उदरांत, एकाच सदनांत जन्म देतात आणि अंतरिक्षसमुद्रांत नवे नवे तंतू ताणतात. पुढील वचनांत सोमापूषांनीं द्यावापृथिवींना नवीन जन्म दिला आहे. ‘ सोमापूषणा जनना रयीणाम् जनना दिवो जनना पृथिव्याः । ’ ( २-४०-१ ) हे सोमापूषांनो, आपण ऐश्वर्यासहच द्यावापृथिवींचेहि जन्मदाते आहांत. सोमकलशपुंजाचा अंत आणि पूषादेवाच्या रेवती नक्षत्राचा प्रारंभ हे बरोबर परस्परांच्या प्रतियोगांत येत नाहींत. तरीसुद्धा सोमकलश हा हस्ताच्या हातांत असल्यानें त्या संदर्भानें सोम आणि पूषा हे द्यावापृथिवींचे जनक होऊं शकतात. पुढील ऋचेंत त्वष्ट्यानें द्यावापृथिवींना जन्म दिला आहे. ‘ य इमे द्यावापृथिवी रूपैः अपिंशत् भुवनानि विश्वा । तम् अद्य होतः इषितो यजीयान् देवम् त्वष्टारम् इह यक्षि विद्वान् ।। ’ ( १०–११०–९ ) ज्यानें द्यावापृथिवींना रूपें अर्पण करून सजविलें, त्या विद्वान् त्वष्ट्याची मी आराधना करितों.

## इंद्र अश्वपुच्छ बनला

त्वष्ट्यानें जेव्हां द्यावापृथिवींना जन्म दिला, तेव्हां दक्षिणायन चित्रा नक्षत्रांत आणि उत्तरायण अश्विनींत होतें. या अतिप्राचीन काळांतहि वैदिक आर्यांनीं

अश्वावर प्रभुत्व संपादिलें होतें. हिरण्यस्तूप आंगिरसाच्या सुप्रसिद्ध इंद्रसूक्तांत इंद्र हा अश्वपुच्छ बनल्याचा उल्लेख आहे. ‘ अश्व्यो वारो अभवः स्वत् इंद्र सृके यत् त्वा प्रत्यहन् देव एकः । ’ ( १–३२–१२ ) या वचनांतील कोड्याचा साधा अर्थ असा आहे कीं, अश्विनींत अश्वमुखापाशीं जेव्हां उत्तरायणाचा प्रारंभ होत होता, तेव्हां दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाला अश्वपुच्छ म्हणत. त्यामुळें इंद्राला अश्वपुच्छाचा अवतार घ्यावा लागला. वर्षा ऋतूला पुच्छ ही संज्ञा असल्याचें कै. दीक्षितांनीं लिहिलें असून तैत्तिरीय ब्राह्मणांतहि तसा उल्लेख आहे. वर उतरून घेतलेल्या विविध वचनांतून अश्विनी, रेवती, पूर्वा भाद्रपदा या नक्षत्रांतून उत्तरायण असल्याचे उल्लेख आले आहेत. ‘ इंद्रो मघैःमघवा वृत्रहा अभुवत् । ’ या वचनावरून वेदसमाप्तीच्या काळांत मघा नक्षत्रांत दक्षिणायन होत होतें, हें सुप्रसिद्ध आहे. मघांच्या पुढील म्हणजे अयनचलनाच्या वक्रगतीप्रमाणें अलीकडील आश्लेषापासूनच्या नक्षत्रांतील दक्षिणायनांचा वेदांत उल्लेख आढळत नाहीं. त्यामुळें वेदांच्या संहितीकरणाचा काळ मघायुगाच्या अलीकडे आणतां येत नाहीं. मग ज्योतिषाचा अभ्यास न करणारे भाषाशास्त्री पंडित कांहींहि म्हणोत. आपल्या भाषाशास्त्री पंडितांच्या व्यासंगाचासुद्धां त्यांना कसा काडीचाहि उपयोग होत नाहीं, याचें एक उत्कृष्ट उदाहरण इथें सांगण्याजोगें आहे. डॉ. दांडेकरांनीं रुद्रावरील त्यांच्या प्रबंधांत असा एक उल्लेख केला आहे कीं, इंद्रासाठीं एक प्रौष्ठपद याग करीत असत. या यागांत इंद्र आणि इंद्राणी यांच्यासहच अज एकपाद या देवालाहि आहुति द्यावी लागते. इंद्राच्या प्रचलित आख्यानांतून आतांपर्यंत तरी अज एकपाद या देवाचा संबंध आलेला मला आढळून आला नाहीं. अशा परिस्थितींत या प्रौष्ठपद यागांत मात्र त्याला इंद्रइंद्राणीसह आहुति लाभण्याचें कारण हेंच कीं प्रौष्ठपद, भाद्रपद पौर्णिमेच्या सन्निध जेव्हां इंद्राचें म्हणजे दक्षिणायनाचें स्थान होतें, तेव्हां उत्तरायणाचा प्रारंभ अज एकपादाच्या पूर्वा भाद्रपदा नक्षत्रांत होता. याकरितांच तो देव इंद्रासह आहुति स्वीकारण्याच्या मानाचा अधिकारी झाला. पण ही गोष्ट मान्य केली तर इंद्र हा मानवी वीर असून त्याच्या नेतृत्वाखालीं रानटी आर्यांनीं भारतावर स्वाऱ्या करून येथील हराप्पा संस्कृतीच्या समाजाचा आणि नगरांचा विध्वंस खि. पू. २००० वर्षांच्या सुमाराला केला, या साऱ्या अति आधुनिक संशोधनाची वाट काय ! त्यापेक्षां अज एकपादालाच विसरून जाणें सोयीचें नाहीं का !

प्रकरण पांचवें

# ऋभु

## ऋभूंच्या चमत्कारांचा उलगडा

वैदिक आर्यांच्या ज्योतिषांतील प्रगतीच्या दृष्टीनें ऋभूंचें आख्यान फार महत्त्वाचें आहे' सुदैवानें ऋभूंच्या चरित्राचा उलगडा करण्याचें काम आचार्य मॅक्डोनेल यांनीं फार सुलभ करून ठेविलें आहे. त्यांनीं म्हटलें आहे कीं ऋभूंना सौधन्वन् म्हणतात, पण त्यांचा पिता सुधन्वा कोण याचा कांहींच पत्ता नाहीं. वेदांत सुधन्वा हा शब्द अवघा दोनदा आला असून तिथें तो मरत् आणि रुद्र यांना लाविला आहे. यांपैकीं मरत् हे रुद्राचे अनुचर असल्यानें त्यांच्याकडे दुर्लक्ष्य केलेंतरी चालेल. ऋभु हे सुधन्वापुत्र आहेत आणि रुद्र हा सुधन्वा आहे. ज्योतिषाच्या दृष्टीनें याचा अर्थ असा होतो कीं रुद्राला ज्या धनुराशीमुळें सुधन्वा ही पदवी प्राप्र झाली, त्या धनु राशीशीं ऋभूंच्या चारित्राचा निकटचा संबंध असला पाहिजे. वैदिक आर्यांच्या पंचांगांत धनुराशीला किती महत्त्व होतें, हें पूर्वीं एकवार सांगितलेंच आहे. हें महत्त्व तिला प्राप्त करून दिल्यामुळें ऋभु हे सुधन्वापुत्र झाले. ऋभूंच्या चरित्रांत त्यांनीं त्यांच्या मातापित्यांना नवजीवन प्राप्त करून दिल्याचा उल्लेख वारंवार येतो. त्यासंबंधीं मॅक्डोनेलनींहि म्हटलें आहे, ' ' It is also probable that their parents who are mentioned so often represent heaven and earth,' ऋभूंनीं नवजीवन प्राप्त करून दिलेले मातापिता हे बहुधा पृथ्वी आणि स्वर्ग अथवा आकाश असावेत असें ज्योतिषाचा संसर्ग टाळणाऱ्या आचार्यांनाहि वाटतें. ऋग्वेदांत माता ही पृथ्वी अर्थात् उत्तरायणाचें प्रारंभस्थान असून पिता हा आकाश, द्यौ अथवा दक्षिणायनाचें प्रारंभस्थान असतो. संस्कृत द्यूः पितर् यापासूनचरोमन लोकांच्या जूपिटरची व्युत्पत्ति सांगितली जाते. तेव्हां ऋभूंनीं मातापित्यांना पुनर्यौवन प्राप्त करून दिलें म्हणजे उत्तरायण आणि दक्षिणायन यांच्या प्रारंभाचे दिवस नव्यानें निश्चित केले. ऋभूंनीं त्वष्ट्याच्या एका चमसाचे चार चमस केल्याची कथाहि वेदांत वारंवार सांगितली जाते. यासंबंधीं मॅकडोनेल म्हणतात कीं हा चमस चंद्र असून ऋभूंनीं त्याचे चार विभाग केले म्हणजे पौर्णिमा अमावास्या आणि दोन अष्टमीतिथी, या चंद्राच्या चार अवस्थांतरांचा त्यांनीं निर्णय

केला. माझी समजूत अशी आहे कीं ध्रुवावरील आर्यांना उन्हाळा आणि हिवाळा हे जे दोनच ऋतु परिचित होते, त्यांत वसंत आणि वर्षा यांची भर घालून ऋभूंनीं संपात आणि अयनें यांचे काळ आपल्या पंचांगांत निश्चित केले. या ऋतूंचा त्यांनीं धनु राशींतील चंद्राच्या चार अवस्थांशीं संबंध जोडल्यामुळें आचार्य मॅक्डोनेल यांचें म्हणणेंहि चूक नाहीं. धनु राशींत ज्येष्ठी पौर्णिमेला वसंत संपात, धनूंतच मार्गशीर्षांत अमावास्या झाली कीं शरत् संपात, भाद्रपदांत शुक्लाष्टमीला चंद्र धनूंत असतांना दक्षिणायनाचा प्रारंभ आणि फाल्गुनांत कृष्णाष्टमीला धनूंत चंद्र आल्यानंतर उत्तरायणाचा प्रारंभ असें पंचांग प्रथम ऋभूंनीं ठरवून दिलें आणि दक्षिणायनाचें आरंभस्थान कन्येंतून सिंहराशींत येईपर्यंत तें तसेंच चालू होतें. ऋभूंनीं चंद्राच्या चार अवस्थांतरांचा निर्णय केला, हा आचार्य मॅक्डोनेल यांचा अर्थ मान्य केला तरी या अवस्थांतरांचे नियम राशीवरच बसवावे लागत असल्यानें ऋभूंच्या काळीं वैदिक आर्यांना राशींचा परिचय झाला होता, ही गोष्ट मान्य करावी लागते. कारण रवीच्या केंद्रांतील राशींत चंद्र असतांना अष्टमी लागते आणि रवीच्या प्रतियोगांतील राशींत चंद्र आल्यानंतर पौर्णिमा होते. असो. ऋभूंनीं एका चमसाचे चार चमस कसे केले, हें पुढील ऋचेंत स्पष्टच सांगितलें आहे. 'आपो भूयिष्ठा इति एको अब्रवीत् अग्निः भूयिष्ठ इति अन्यो अब्रवीत् । वर्धयन्तीम् बहुभ्यः प्र एको अब्रवीत् ऋता वदन्तः चमसान् अपिंशत् ॥' (१-१६१-९) एक म्हणाला, उदकें सर्वांत मोठीं; दुसरा म्हणाला, अग्नि सर्वांत मोठा; तिसरा उद्गारला, भूमि सर्वांपेक्षा मोठी, याप्रमाणें ऋतासंबंधीं तीन वचनें बोलून त्यांनीं चार चमस केले. या ऋचेंतील आप म्हणजे शरद्संपात, अग्नि म्हणजे वसंतसंपात आणि भूमि म्हणजे उत्तरायणाचें प्रारंभस्थान. हे तीन बिंदु निश्चित केले कीं वर्षचक्राचे आपोआप चार विभाग होतात. या ऋचेंत दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाचा उल्लेख नसण्याचें साधें कारण हें कीं स्वतः ऋभूंचा निवासच त्या ठिकाणीं होता.

ऋभूंनीं आपल्या चमसाचे चार चमस केले, ही गोष्ट त्वष्ट्याला (आणि त्याच्या उपासकांनाहि) रुचली नाहीं. 'यदा अवाख्यत् चमसान् चतुरः कृतान् आत् इत् त्वष्टा ग्नासु अंतःनि आनजे ॥' (१-१६१-४) आपल्या चमसाचे चार चमस झालेले पाहून लज्जावनत झालेला त्वष्टा स्त्रियांच्यामध्यें लपून बसला. त्वष्ट्याचें निवासस्थान कन्या राशींतील चित्रा नक्षत्रांत असल्यानें मंत्रद्रष्ट्यांना ही कोटि

स्फुरली आहे. स्त्रियांत आश्रय घेतल्यानंतर त्वष्ट्यानें ऋभूंना आपण मारणार असल्याची वटवट जेव्हां आरंभिली, तेव्हां सोमसवनाच्या प्रसंगीं अन्य नामें धारण करणाऱ्या ऋभूंवर कन्या ही अन्य नामांनींच प्रेम करूं लागली. ' इनाम एनान् इति त्वष्टा यत् अब्रवीत् चमसं ये देवपानं अनिंदिषु: ।। अन्या नामानि कृण्वते सुते सचा अन्यैः एनान् कन्या नामभिःस्परत् ।। ( १–१६१–५ ) या ऋचेंत कन्या राशीचा स्पष्ट उल्लेखच आहे. तेव्हां वैदिक आर्यांना राशि अविदित होत्या, हें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. ऋभूंना राशींप्रमाणेंच नक्षत्रपुंजांची चांगलीच माहिती होती, असें पुढील ऋचेवरून निश्चितपणें सांगतो येतें. ' इंद्रो हरी युयुजे अश्विना रथम् बृहस्पतिः विश्वरूपाम् उपाजत ।। ' ( १–१६१–६ ) पूर्वसंदर्भानुसार याचा अर्थ असा होतो कीं, इंद्राचा घोडा, अश्विनीकुमारांचा रथ आणि बृहस्पतीची धेनु यांची निर्मिति ऋभूंनींच केली होती, म्हणजे या नक्षत्रपुंजांची कल्पना ऋभूंनींच केली होती. यांच्यापैकीं अश्विनीकुमारांचा रथ हा बहुधा पुष्य नक्षत्रांतील रासभरथ असावा. बृहस्पतीची विश्वरूपा धेनु ही इजिप्तमध्यें हाथोर या नांवानें प्रसिद्ध असलेली सप्तर्षिस्वरूपी धेनु होय. उरलेला इंद्राचा घोडा हा सुमेरी परंपरेंत हस्त नक्षत्राला अन्शुइकुर्रा म्हणजे पूर्वेकडील पशु ( म्हणजे घोडा ) म्हणतात, तोच असावा. कारण तेव्हां इंद्राचा निवास हस्तांतच होता. हस्त हाच सोमहरण करणारा श्येन असून श्येन शब्दाचा वेदांत अश्व असाहि अर्थ होतो.

ऋभूंच्यासंबंधीं ऐतरेय ब्राह्मणांत पुढील महत्त्वाची कथा आली आहे. ' ऋभवो वै देवेषु तपसा सोमपीथम् अभ्यजयन्, तेभ्यः प्रातःसवने वाचि कल्पयिषन्, तान् अग्निः वसुभिः प्रातःसवनात् अनुदत, तेभ्यो माध्यंदिने सवने वाचि कल्पयिषन्, तान् इंद्रो रुद्रैःमाध्यंदिनात् सवनात् अनुदत, तेभ्यः तृतीयसवने वाचि कल्पयिषन्, तान् विश्वेदेवा अनुनुद्यन्त नेह पास्यति नेहेति, स प्रजापतिः अब्रवीत् सवितारम् तव वा इमे अंतेवासाः, त्वम् एव एभिः संपिबस्व इति ' ( ऐ. ब्रा. ३–६ ) ऋभूंनीं देवांत सोमपानाचा अधिकार संपादिला. पण प्रातःसवनांतून अग्नीनें वसूंच्या साहाय्यानें त्यांना घालवून दिलें. नंतर माध्यंदिनसवनांतून इंद्रानें मरुतांच्या साहाय्यानें आणि सायंसवनांतून विश्वेदेवांच्या संघानें त्याच घटनेची पुनरावृत्ति केली. तेव्हा प्रजापति सवित्याला म्हणाला, ' हे ऋभू तुझे अंतेवासी आहेत, तेव्हां तूंच यांचेसह सोमपान कर. ' या कथेवरून ऋभु हस्त नक्षत्राचा अधिपति जो सविता त्याचे

अंतर्वासी असल्याचें कळून येतें. त्यांना अग्नीनें प्रातःसवनांतून वसूंच्या साहाय्यानें घालवून दिलें, यावरून तेव्हां वसंतसंपातरूपी अग्नि पुनर्वसू नक्षत्रांत होता, असें समजतें या गोष्टी लक्ष्यांत घेऊन पुढील ऋचेचा विचार केला पाहिजे. ' सुषुप्वांसं ऋभवः तत् अपृच्छत अगोह्य क इदं नो अबूबुधत् । श्वानं बस्तो बोधयितारम् अब्रवीत् संवत्सर इदम् अद्य व्यख्यत् ॥ ' ( १–१६१–१३ ) झोपेंतून जागे झालेले ऋभू सवित्याला विचारूं लागले कीं हे अगोह्या, आम्हांला कोणी जागे केलें ? तेव्हां बकरा ( बस्त ) म्हणाला कीं संवत्सर संपलें म्हणून कुत्र्यानें तुम्हांला उठविलें. या ऋचेंतील कुत्रा म्हणजे लुब्धकाच्या दोन सुप्रसिद्ध तार्‍यांपैकीं एक असावा, अशी कल्पना टिळकांपासून प्रबोधचंद्र सेनगुप्तापर्यंत सार्‍या वेदज्ञ ज्योतिष्यांनीं करून घेतली आहे. पण ती कल्पना चूक आहे. ग्रीक पुराणांत सर्वांत प्रथम मद्य करणार्‍या व्यक्तीची त्याच्या शेजार्‍यांनीं हत्या करून त्याला पुरून टाकलें असतां त्याच्या कुत्र्यानें ती प्रेत पुरलेली जागा त्याच्या कन्येला दाखवून दिली. त्या ठिकाणीं उकरल्यानंतर तिला आपल्या पित्याचें प्रेत दिसून आल्यावर तिनें गळफास लावून आत्महत्या केली. त्यानंतर आपले दोनहि प्रभू परलोकीं गेलेले पाहून त्यांच्या श्वानानेंहि प्राणत्याग केला. तेव्हां देवांनीं ती कन्या आणि तिचा श्वान या उभयतांना नक्षत्रांत स्थान दिलें. तेव्हां हस्तनक्षत्रांतील सवित्याच्या सदनीं झोपीं गेलेल्या ऋभूंच्या सन्निधच कन्या राशींत हा ग्रीक पुराणांतील श्वान येतो. कै. डॉ. शामशास्त्री यांनीं ' the vedas and the Planets ' या प्रबंधांत फाल्गुनी नक्षत्रांना श्वान ही संज्ञा कशी लागूं पडते, हें दाखवून दिलें आहे. 'As each of the two Falgunis is compared to four eyes for facility of identification in the list of the 27 asterisms the two Sarama dogs must necessarily represent the two Falgunis.' म्हणजे फाल्गुनी नक्षत्रांची नक्षत्रांच्या मालिकेंत चार नेत्रांशीं तुलना केली असल्यानें सरमेचे चार नेत्र असलेले. श्वान पूर्वाफाल्गुनी आणि उत्तरा फाल्गुनी हेच असावेत. तैत्तिरीय ब्राह्मणांतील अन्यत्र उल्लेखिलेली कालकंजकथा उत्तराफाल्गुनी आणि चित्रा यांच्या वर्णनाच्या मध्येंच आली असल्यानें अंतीं दोन दिव्य श्वान बनलेले कालकंज याच क्षेत्राच्या आसपास असावेत, असें दिसतें. या कल्पनेला बाबिलोनी परंपरेचाहि आधार आहे. रॉबर्ट ब्राउन हे प्रिमिटिव्ह कॉन्स्टेलेशन्स या ग्रंथाच्या पहिल्या खंडांत ३३९ पानावर लिहितात, ' In the Euphratean sphere it seems that the figure of a dog was 'placed behindthe lion, and flying from the

latter, fearing lest it should turn round. Agreeably with this we find the XIIIth Arabian Manzil (Lunar-mansion) is called Al-Auwa (the howler); and Smyth, speaking of Virginis says, 'Piazzi calls it Zavijava, the retreat of the barker'. Ulugh Beigh has it Min-al-auwa—i.e. the stars of the barker, or the barking bitch. The dog was not a separate constellation but was included in the lion'

या साऱ्या विवेचनावरून असें कळून येतें कीं प्राचीन इराकमधील परंपरेंत सिंहराशींतील सिंहाच्या मागें उलट दिशेला तोंड वळवून पळत असलेल्या एका कुत्र्याची आकृति कल्पिलेली होती. सिंहानें आपलें तोंड वळविलें तर केवढी आपद्या ओढवेल, याची कल्पना करून तो कुत्रा आधींच पळत असला पाहिजे. याच परंपरेच्या अनुकरणानें अरब लोकांनीं त्यांच्या तेराव्या नक्षत्राला अल्औवा म्हणजे भुंकणारा ही संज्ञा दिली आहे. पियाझ्झीनें त्याला श्वानापयान अथवा श्वानाचें पलायन हें नांव दिलें आहे. उलूगबेग या सम्राट् ज्योतिष्यांनीं याच विशिष्ट ताऱ्यांना भुंकणारी कुत्री हें नांव दिलें. ही कुत्री म्हणजेच आपली सरमापाणि-संवादांतील सरमा होय. सरमेचा सप्तर्षींतील आंगिरसांशीं निकटचा संबंध येत असल्यानेंहि तिला बाबिलोनी आणि अरबी परंपरेंतील कुत्र्याच्या सन्निध स्थान देणेंच उचित होईल. तैत्तिरीय आरण्यकांत रुद्रबृहस्पतींसह सरमेचा उल्लेख येतो. जाया भूमिः पतिः व्योम मिथुनं ता अतुर्यथाः। पुत्रौ बृहस्पतीरुद्रौ सरमा इति स्त्री पुमम् ॥' या श्लोकांत बृहस्पति आणि रुद्र म्हणजे सप्तर्षि आणि स्वाति हे द्यावा-पृथिवींचे पुत्र असून सरमा ही कन्या सांगितली आहे. तेव्हां यांच्या सन्निधच तिचा निवास असणें उचित आहे. 'वाक् वै सरमा' असें वचन मैत्रायणी संहितेंत आलें असल्यानें सरमा हीच सरस्वती असल्याचें कळून येतें. सरस्वतीची अभिलाषा ब्रह्मदेवानें केल्याची पौराणिक कथा सर्वप्रसिद्ध आहे. सोमपानाच्या अथवा सुरापानाचा इंद्रानें अतिरेक केल्यानंतर सरस्वतीनें त्याच्यावर वैद्यकीय उपचार केल्याच्या आख्याना-वरूनहि तिचें स्थान सोमकलश, द्राक्षहरणी आणि हस्तांतील प्रजापति ब्रह्मदेव यांच्या सन्निध असल्याचें कळून येतें.

## प्रजापतीचें अजशीर्ष

अर्वाचीन पाश्चात्य ज्योतिषांनींहि कन्येच्या क्षेत्रांतच कानिस व्हेनातिची या तारकापुंजाची कल्पना केली आहे. याप्रमाणें कन्या राशींत अथवा तिच्या

शेजारीं श्वान असल्याचें समजल्यानंतर बकऱ्याचा शोध करणें प्राप्त आहे. सुमेरी बाबिलोनी परंपरेंत ककब लुलिम म्हणजे अज तारकापुंज ( ककब ) नांवाचा पुंज कन्येंत असून मुल-मो-सर-रा ='Lord, the voice of heaven' हें त्याचें दैवत आहे. प्राचीन सुगध प्रांतांतील तारकापुंजांत त्याला नेता हें नांव दिलें असून खोरास्मिन्च्या परंपरेंत त्याला 'He goat of the flock, कळपाचा पुढारी बकरा हेंच नांव आहे. या सर्व संदर्भावरून कन्येंतील आय, के, एल, या ताऱ्यांना तेव्हां अज ही संज्ञा चिकटली होती, हें उघड आहे. आपल्याकडेहि प्रजापतीचें शिर कांपल्यानंतर शंकरानें त्याला बकऱ्याचें शिर लावून संजीवन दिलें, ही कथा सुप्रसिद्ध आहे. तेव्हां प्रजापतीचें शिर कांपल्यानंतर म्हणजे दक्षिणायनाचें प्रारंभस्थान चित्रा नक्षत्रांतून मागें येऊन या अजापाशीं आल्यानंतरच शंकरानें प्रजापतीला अजशीर्ष बनविला असला पाहिजे.

## ऋभु आणि इंद्र

ऋभूंचा निवास दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं असल्यामुळें त्यांचा इंद्राशीं निकटचा संबंध येणें स्वाभाविक आहे. वामदेवाच्या एका सूक्तांत त्यांना 'इंद्रस्य सूनो, ( ४–३७–४ ) ही संज्ञा लाविली असून त्यांना आपल्या यज्ञाला देवयानाच्या मार्गानीं ( पथिभिः देवयानैः ) येण्याची प्रार्थना केली आहे. देवयानाच्या क्षेत्राची समाप्ति इद्र आणि ऋभु यांच्यापाशींच होत असल्यानें ही प्रार्थना उचितच आहे. दक्षिणायनाचें प्रारंभस्थान हें उत्तरगोलार्धातील रवीचें आकाशांतील सर्वोच्च स्थान असल्यानें वैदिक ज्योतिष्यांनीं त्याला पर्वत ही संज्ञा दिली होती. या पर्वतांसह ऋभूंचा उल्लेख वामदेवमंडलाच्या चौतीसाव्या सूक्तांत आला आहे. 'सजोषस आदित्यैः मादयध्वं सजोषस ऋभवः पर्वतेभिः' ( ४–३४–८ ) या एकाच ऋचेंत ऋभूंसह इंद्राचा उल्लेख न येतां आदित्य आणि पर्वत यांचा आला असून इथें ते इंद्राचे प्रतिनिधिच आहेत. नाहीं तर ऋभूंसह इंद्राचा उल्लेख नेमानें यावयाचाच. पहिल्या मंडलांत तर ऋभु म्हणजे नवीन इंद्रच, 'ऋभुः न इंद्र शवसा नवीयान्' ( १–११०–७ ) असे उद्गार काढले आहेत. ऋभूंपैकीं ऋभुक्षन् याचें नांव हें इंद्राच्या असंख्य नांवांपैकीं एक नांव आहे.

## ऋभूंनीं निर्मिलेली धेनु

ऋभूंच्या आकाशांतील निवासस्थानांपाशींच वैदिक ऋषींच्या देवतांपैकीं द्यौःपितरचें निवासस्थान असल्यानें त्यांनीं पिता आणि माता यांना नवजीवन

दिल्याचा उल्लेख वेदांत वरचेवर येतो. ' जिव्री यत्सन्ता पितरा सनाजुरा पुनर्युवाना चरथाय तक्षथ । ' ( ४–३६–३ ) अतिजीर्ण झालेल्या पितरांना म्हणजे द्यावापृथिवींना त्यांनीं कार्यक्षम केलें. याच्याच पुढच्या ऋचेंत त्यांनीं ' निश्चर्मणो गाम् अरिणीत धीतिभिः ' म्हणजे चर्मावांचून गाय उत्पन्न केली, असें वर्णन आलें आहे. इथें भाष्यकारांनीं नुसत्या चर्मापासून गाय निर्मिली, असा जो अर्थ केला आहे, तो चूक आहे. तैत्तिरीय संहितेंत ' तारका अस्थानि ' म्हणजे तारका या अस्थि असें वचन आलें असून तारकारूपी अस्थींपासून ऋभूंनीं चर्महीन धेनु निर्मिली, असें वैदिक ऋषींना म्हणावयाचें आहे. ही धेनु वर उल्लेखिल्याप्रमाणें सप्तर्षींचे तारे मिळून बनलेली धेनु असेल, किंवा त्वष्टयाचा पुत्र विश्वरूप यालाच त्यांनीं विश्वरूपा धेनु हें नांव दिलें असेल.

## ऋभूंची उत्पत्ति

ऋभूंच्या उत्पत्तीसंबंधीं भागवतांत पुढील उल्लेख आला आहे. ' दक्षं तत् पार्षदा हन्तुमुदतिष्ठन्नुदायुधाः ॥ ( ३१ ) तेषामापततां वेगं निशाम्य भगवान् भृगुः । यज्ञघ्नघ्नेन यजुषा दक्षिणाग्नौ जुहाव ह ॥ ( ३२ ) अध्वर्युणा हूयमाने देवा उत्पेतुः ओजसा । ऋभवो नाम तपसा सोमं प्राप्ताः सहस्रशः ॥ ( ३३ ) तैः अलातायुधैः सर्वे प्रमथाः सहगुह्यकाः । हन्यमाना दिशो भेजुः उशद्भिर्ब्रह्मतेजसा । ( ३४ ) ( चतुर्थस्कंध चतुर्थ अध्याय ) याचा सारांश असा कीं रुद्राच्या गणांनीं दक्ष यज्ञाचा विध्वंस आरंभिला असतां भृगूंनीं यज्ञविध्वंसकांच्या अंतकाची उत्पत्ति करण्याकरितां यज्ञांत आहुति देऊन ऋभूंची निर्मिति केली आणि त्यांनीं प्रमथ गणांचा विध्वंस केला. या उपाख्यानावरून प्रजापतीला रुद्रानें शासन केलें, तेव्हांच आणि जिथें शासन केलें त्या ठिकाणींच, ऋभूंचा शोध केला पाहिजे, असें समजून येतें. एका मंत्रांत सोमालाच ऋभु हें विशेषण लाविलें आहे. प्रजापति ऋभूंवर रागावला, तेव्हां कन्या ही त्यांच्यावर अन्य नामांनीं प्रेम करूं लागली, हें वर आलेंच आहे. ऋभु हे हस्तनक्षत्रांतील सवित्याचे अंतेवासी असल्याचें आख्यान आपण पाहिलेंच आहे. या सर्वांचा थोडक्यांत निष्कर्ष असा निघतो कीं कन्या राशींतील हस्तनक्षत्रांतच ऋभूंचा निवास होता. इतकेंच नव्हे तर त्यांना अन्य नांवांनींहि ओळखत असत.

## ऋभूंचीं अन्य नामें

ऋभूंना लाभलेलीं हीं अन्य नामें माझ्या मतें ऋग्वेदांतील अतिगूढ एकत, द्वित

आणि त्रित हींच असावींत. आपल्या हाताचा पंजा ही हस्त नक्षत्राची आकृति नेत्रापुढें आणली तर त्यांतील अंगुष्ठ आणि तर्जनी हीं दोन बोटें वगळलीं म्हणजे उरलेलीं बोटें क्रमानें एकत, द्वित आणि त्रित यांचीं निदर्शक होतात. या तीन बंधूंपैकीं एकट्या त्रिताचाच ऋग्वेदांत अनेकवार उल्लेख येतो. त्रितासंबंधींच्या साऱ्याच कोड्यांचा सकृद्दर्शनीं उलगडा होणें शक्य नाहीं. यासाठीं त्याचें इंद्रआणि सोम यांच्याशीं संबंध काय आहेत, याचा प्रथम विचार करणें सोयीचें होईल. 'इंद्रो यद्वज्री धृषमाणो अंधसा भिनत् वलस्य परिधिः इव त्रितः।' (१–५२–५) या वचनांत वलाचे परिधि त्रित जसे फोडतो, तसेच इंद्रानें फोडल्याचा उल्लेख आला आहे. 'स पित्र्याणि आयुधानि विद्वान् इंद्र ईषितः आप्त्यः अभिअयुध्यत्। त्रिशीर्षाणं सप्तरश्मिं जघन्वान् त्वाष्ट्रं चित् निः ससृजे त्रितो गाः ॥ (१०–८–८) त्रितानें इंद्राच्या प्रेरणेनें युद्ध करून त्रिशीर्ष आणि सप्तरश्मि त्वाष्ट्राला मारलें आणि गाईंची मुक्तता केली या वचनांतील त्रिशीर्ष, सप्तरश्मि त्वाष्ट्र हा हस्त नक्षत्रच आहे. या नक्षत्रांत एकंदर सात तारे असून त्यांतले पांच तिसऱ्या प्रतीचे आणि चौथ्यापांचव्या प्रतीचे एकेक आहेत. तिसऱ्या प्रतीच्या पांच ठळक ताऱ्यांची आकृति हाताच्या पांच बोटांसारखी दिसते. यांपैकीं अंगुष्ठ आणि कनिष्ठिका वगळून उरलेल्या तीन ताऱ्यांचा त्वाष्ट्र त्रिशीर्ष बनविला आहे. याच त्वाष्ट्राला कनिष्ठिकेच्या स्थानीं निवास करणारा त्रित इंद्राच्या साहाय्यानें मारून टाकतो.

## दोन पर्जन्यदेवांचा उलगडा

इंद्र आणि त्रित यांचे परस्परसंबंध काय होते, या प्रश्नाची थोडी फार चर्चा डॉ. दांडेकरांनीं त्यांच्या 'वैदिक देवतांच्या अभिनव दर्शनांत' केली आहे. पण त्रित हा हस्तनक्षत्रांतील एक उपेक्षित तारा असून इंद्र हा दक्षिणायनारंभस्थानाचा देव आहे, या भौतिक भानगडी ज्या विद्वानांना माहीत नाहींत, किंवा मान्य नाहींत, त्यांना या दोन देवांचे परस्परसंबंध तरी कसे कळणार! डॉ. दांडेकर म्हणतात कीं त्रित ही मुख्यतः पर्जन्यसंबंधीं देवता आहे. हें त्यांचें विधान मान्य. 'प्र वो मरुतः तविषा उदन्यवो वयोऽवृधो अश्वयुजः परिज्रयः। सं विद्युता दधति वाशति त्रितः स्वरंति आपो अवना परिज्रयः ॥' (५–५४–२) प्रबल मरुद्गण पुढें जातात, विजा चमकतात, त्रित गर्जना करतो आणि पाणलोट वाहूं लागतात; असा या ऋचेचा सारांश त्यांनींच दिला आहे. याप्रमाणें त्रित हा पर्जन्यदेव असला तरी तो नक्षत्रचक्रांतील पर्जन्यदेव असून इंद्र हा ऋतुचक्रांतील पर्जन्यदेव आहे. नाक्षत्र वर्ष

अाणि आर्तव वर्ष यांच्यांत जो भेद असतो, तोच भेद त्रित आणि इंद्र या दोन पर्जन्यदेवांत अाहे. दक्षिणायनाची रेषा त्रिताच्या हस्तनक्षत्रांत येण्यापूर्वीहि त्या नक्षत्रांत रवि आला असतां वादळें होत आणि आतां ती रेषा हस्ताच्या मागें सरासरी शभर अंश गेली असली तरीहि तिथें रवि येतांच अजूनहि वादळें होतात. पण भौतिक जगांतील या भानगडी डॉ. दांडेकरांच्यासारख्या विद्वानांच्या कक्षेबाहेर असल्यानें त्यांना वेदांतील पर्जन्यदेवांसंबंधींच्या कोड्यांचा उलगडा होत नाहीं.

## वैदिक त्रित आणि ग्रीक त्रितोस्

दक्षिणायनाची रेषा त्रिताच्या नक्षत्रांत आल्यानंतर वैदिक आर्यांत त्रितदेव जसा मागें पडला आणि इंद्र प्राधान्य पावला, त्याप्रमाणेंच ग्रीसमध्येंहि त्रित मागें पडून ग्रीकांचा इंद्र झेउस् हा पुढें आला. त्रित हा वैदिक आर्यांप्रमाणेंच ग्रीकांमध्येंहि सुपरिचित होता. सर जॉर्ज कॉक्स हे हेसियड कवीच्या आधारानें लिहितात. 'If Athene is Zeus-born., the poet when he tells us this, speaks of her as Tritogeneia, the child of Tritos'. म्हणजे ग्रीसमधील कन्या राशीची कुमारी देवता आथेने ही झेउस्पासून जन्माला आली, असें आख्यान सांगतांनाहि हेसियड कवि तिला त्रितजन्या म्हणतोच. याचा अर्थ असा कीं झेउस्चें आगमन हस्त नक्षत्रांत होण्यापूर्वी आथेने ही त्या नक्षत्रांतील त्रिताची कन्या म्हणून ओळखली जात असे. पण त्रिताच्या ताऱ्यासन्निध दक्षिणायनाचें प्रारंभस्थान आल्यानंतर त्रिताचें नांव मागें पडून झेउस या ग्रीक इंद्राचें नांव पुढें आलें. वैदिक त्रित आणि ग्रीक त्रितोस् यांचें ऐक्य मो. ब्रेआल्सारख्या फ्रेंच पंडितांनी गेल्या शतकांतच दाखवून दिलें आहे. केवळ अक्षरसादृश्यावरून मी कांहीं तरी चुकीची समजूत करून घेत आहे, असें नाहीं.

## मध्याकाशांतील पांच महोक्ष

त्रितासंबंधींची एक महत्त्वाची ऋचा असें सांगते कीं प्रथम यमानें इंद्राला दिलेल्या आणि त्रितानें जोडलेल्या अश्वावर इंद्र आरूढ झाला. 'यमेन दत्तं त्रित एनम् आयुनक् इंद्र एणं प्रथमो अध्यतिष्ठत् ।' ( १-१६३-२ ) या वचनावरून यम, त्रित आणि इंद्र हे सर्व दक्षिणायनाच्या प्रारंभीं होते, त्या काळाचा बोध होतो प्रथम मंडलांत 'वित्तं मे अस्य रोदसी' असें ध्रुपद असलेलें एक प्रसिद्ध सूक्त असून त्याचा कर्ता त्रितच मानलेला आहे. त्या सूक्तांत तो विचारतो.

'यज्ञं पृच्छामि अवमं स तत् दूतो विवोचति क्व ऋतम् पूर्व्यम् गतम् कः तत् बिभर्ति नूतनो ।' ( १–१०५–४ ) देवदूत जो अग्नि अथवा यज्ञ त्यालाच मी विचारतों आणि तो मला सांगूं दे कीं पूर्वीचें ऋत कोठें गेलें आणि नूतन ऋत कोण धारण करतो. या ठिकाणीं पूर्वीचें ऋत म्हणजे अयन आणि संपात कोठें गेले, आणि आतां नवीन अयनें आणि संपात यांना ओळखण्याच्या खुणा काय असा प्रश्न केला आहे. याच सूक्तांत त्रित पुढें म्हणतो. 'अमी ये सप्त रश्मयः तत्रा मे नाभिः आतता । त्रितस्य तद् देव आप्त्यः स जामित्वाय रेभति ।।' ( १–१०५–९ ) हे जे ( सोमाचे ) सात तारे आहेत, त्यांच्या ठायीं माझा नाभि बांधला आहे, हें आप्त्य त्रिताला विदित असल्यानें तो त्यांचा स्तव करीत आहे. हें जें वर्णन इथें केलें आहे, तें केवळ आकाशदर्शनावरून केलें आहे कीं ताऱ्यांचा गोल पाहून कल्पिलें आहे, अशी शंका येते. कारण केवळ आकाशाकडे पाहून त्रिताचा नाभि सोमकलशाच्या सात ताऱ्यांत अडकला असल्याची कल्पना सुचणें अवघड आहे. याच सूक्तांत कवि पुढें म्हणतो. 'अमी ये पंच उक्षणो मध्ये तस्थुः महो दिवः । देवत्रा नु प्रवाच्यम् सध्रीचीना नि वावृतुः ।।' ( १–१०५–१० ) हे जे महोक्ष-तुल्य पांच देव आकाशाच्या मध्यभागीं असतात, ते सारेच आज स्थान सोडून अन्यत्र गेले आहेत. या ऋचेंतील पांच देव अनेकांनीं ग्रह मानले असले तरी मला ते ग्रह नसावेत, असें वाटतें. दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं यम, इंद्र, द्यौ, हे नेहमीच असतात. त्यांतच तेव्हांच्या प्रारंभस्थानीं असलेल्या हस्त नक्षत्रांतील सविता आणि त्याच्याशीं निकट संबंध असणारा प्रजापति मिळून वरील ऋचेंतील आकाशाच्या मध्यभागीं असलेले पांच महान् देव होऊं शकतील. या कल्पनेचा तज्ञांनीं विचार करावा.

## एकतद्वितांचा कपि अवतार

त्रिताचे बंधु एकत आणि द्वित यांच्या विषयीं ऋग्वेदांतून विशेष माहिती उपलब्ध होत नसली तरी शांतिपर्वांतील नारायणीयोपाख्यानांत प्रजापतिपुत्र एकत आणि द्वित यांना त्रिताचा विश्वासघात केल्याचें प्रायश्चित्त म्हणून वानरयोनींत जन्म घ्यावा लागल्याचा अतिमहत्त्वाचा उल्लेख आहे. या उल्लेखावरून त्वाष्ट्र विश्वरूपाप्रमाणेंच एकत आणि द्वित यांचें स्थानहि हस्त नक्षत्रांतच असल्याचें सुव्यक्त होतें. इतकेंच नव्हें तर या उभयतांना पुढें वानरयोनि प्राप्त झाल्याचें कळल्यानें दशम मंडलांतील सुप्रसिद्ध वृषाकपि सूक्तांतील कपि कोण हेंहि रहस्य उघडकीला येतें. वृषाकपि

सूक्तांतील इंद्राचा आवडता कपि हा हस्तांतील वर उल्लेखिलेल्या एकत आणि द्वित या ताऱ्यांचाच प्रतिनिधि आहे. ' अयमिंद्र वृषाकपिः परस्वंतम् हतम् विदत् । असिम् सूनाम् नवम् चरुम् आदेधस्यान आचितम् ।। ' ( १०–८६–१८ ) या ऋचेंत वृषाकपीला देऊं केलेलें शस्त्र, चूल, पाकपात्र आणि इंधन या सर्वांचा संबंध अवेस्ता ग्रंथांतील केरेशास्पच्या कथेंतूनहि येतो. ' "on him (the dragon) did Kereshasp cook in the iron kettle his meat about the time of midday, and the dragon grew hot and began to sweat, and he burst forth from beneath the kettle and poured out the boiling water; and affrighted started back the manly hearted-Kereshasp.' म्हणजे कृशाश्वानें ( भूमि समजून ) त्या प्रचंड सर्पाच्या पाठीवरच विस्तव करून आपली मांसाची कढई शिजायला ठेविली. पण आधींच मध्यान्ह आणि त्यांतून पाठीवरील विस्तवानें पाठ पोळूं लागलेली पाहून त्या अहीनें अंगावरील कढई लोटून दिली आणि तें कढत पाणी अंगावर उसळल्यानें शूर कृशाश्वहि चमकून मागें सरला. या आख्यानांतील कढई म्हणजे सोमपात्राचे तारे, ते दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं असतांना त्या पात्रांत कृशाश्वानें आपलें अन्न शिजवायला ठेविलें. सोमपात्र हें वृत्रासुराच्या अथवा हायड्रा सर्पाच्या पाठीवर आहे. याच पात्रांत वृषाकपिहि आपलें मांस शिजवीत असला पाहिजे. या संदर्भावरून वृषाकपीच्या सूक्ताचा उलगडा होण्याला साहाय्य होतें.

## विश्वरूप चरित्राचा उलगडा

एकत आणि द्वित यांच्यापेक्षा त्वाष्ट्र विश्वरूपाचे तारे अधिक आहेत आणि त्याच्या चरित्राचा विस्तारहि अधिक आहे. हा त्वाष्ट्र विश्वरूप त्रिशीर्ष असल्याचें तैत्तिरीय संहितेंत सांगितलें असल्यानें त्वष्ट्याचे विश्वरूप आणि त्रिशिरा हे पुत्र एकरूपच असल्याचें कळून येतें. यांच्यासंबंधीं पुढील महत्त्वाची आख्यायिका तैत्तिरीय संहितेंत आढळते. ' विश्वरूपो वै त्वाष्ट्रः पुरोहितो देवानाम् आसीत् स्वस्रीयो असुराणाम् । तस्य त्रीणि शीर्षाणि आसन् सोमपानम्, सुरापानम्, अन्नादनम् । स प्रत्यक्षम् देवेभ्यः भागम् अवदत्, परोक्षं असुरेभ्यः ।। ( २–५–१ ) या आख्यायिकेचा इतका भाग प्रस्तुत चिकित्सेला पुरे. ज्या काळीं त्वाष्ट्र विश्वरूपाचें आख्यान रचलें गेलें, तेव्हां हस्त नक्षत्राच्या क्षेत्रांत दक्षिणायन होत असल्यानें विश्वरूपाचें एक वदन दक्षिणायनांत असुरांकडे आणि दुसरें वदन उत्तरायणांत

देवांकडे असणें स्वाभाविक होतें. त्यामुळें तो सोमकलश या पुंजाकडे असलेल्या मुखानें सोमपान करीत होता आणि दक्षिणायनांतील व्हिंदेमियात्रिक्स अर्थात् द्राक्षहरणी या तारेकडे असलेल्या मुखानें सुरापान करीत असे. इथें ही माहिती सांगणें आवश्यक आहे कीं सोमकलशाचा विस्तार सायन कन्या १३ पासून सायन तूळ ३ पर्यंत असून विश्वरूपाच्या हस्तनत्राचा विस्तार सायन तूळ ५ पासून पंधरा अंशापर्यंत आहे तेव्हांच दक्षिणायनांत आलेल्या व्हिंदेमियात्रिक्स अथवा द्राक्षहरणीचें स्थान सायन तूळ ८-५० या अंशावर रॉब्सननें दिलें आहे. या तारकापुंजांची आणि त्यांतील ताऱ्यांची आकाशांतील स्थानें लक्षांत घेतलीं म्हणजे तैत्तिरीय संहितेंतील वरील आख्यायिकेचा सहज उलगडा होतो. इतकेंच नव्हे तर ही आख्यायिका सरासरी ६८०० वर्षांपूर्वी रचली गेली असली पाहिजे, हेंहि दृष्टोत्पत्तास येतें. आपल्या ज्योतिषपरंपरेचा विचार केल्यावांचून वेदांतील असलीं कोडीं आतांपर्यंत जशीं राहिलीं तशींच यापुढेंहि अज्ञात राहून जातील.

प्रकरण सहावे

# सोम

## सोमाच्या कर्णांतून सिंहवृकांचा जन्म

सोमासंबंधाच्या आख्यानांचा एक लहानसा संग्रहच श्री. कापडिया यांनीं प्रसिद्ध केला आहे. या संग्रहावरून सोमाख्यानांच्या दोन अगदीं विभिन्न परंपरा असल्याचें सुव्यक्त होतें. यापैकीं एका परंपरेप्रमाणें श्येनानें स्वर्गांतून सोम आणला असून गायत्रीनें स्वर्गांतून सोम आणला, असें दुसरी परंपरा सांगते. पहिल्या परंपरेंतील श्येन स्वत: इंद्रच असल्याचें काटक संहितेंत स्पष्ट सांगितलें आहे 'इंद्र: श्येनो भूत्वा अमृतम् निर्मुष्णात्।' ( २७-५ ) हा श्येन आकाशांतील हस्त नक्षत्र असून पाश्चात्यांनीं त्याला कार्व्हुस् अथवा रेव्हन ही संज्ञा दिली आहे. या श्येनाच्या चंचूसन्निध चषक हा तारकापुंज असून तोच वेदांतील सोमकलश आणि सोम. हा सोमकलश श्येनाच्या चंचूपाशीं असल्यानें त्यानें तो स्वर्गांतून पळवून आणल्याचें आख्यान उत्पन्न झालें. आपट्यांच्या कोशावरून असें समजतें कीं वेदांतील श्येन शब्दाचा अर्थ अश्व असाहि होतो. तेव्हां इंद्राचा अश्व आणि श्येन हे वस्तुतः एकच आहेत. अतिरिक्त सोमपानामुळें इंद्राच्या नेत्रांतून जो सोम बाहेर आला, त्यापासून सिंह निर्माण झाला आणि त्याच्या कर्णांतून बाहेर आलेल्या सोमापासून वृक निर्माण झाला, असें शतपथ, जैमिनीय आदि ब्राह्मणांतून वर्णन येतें. यांपैकीं सिंह हा सिंहराशींतील सिंह असून वृकाचें स्थान हस्त नक्षत्रांतच होतें. पण त्याची अधिक चर्चा अन्यत्र करावी लागेल. श्येन पक्ष्यानें स्वर्गांतून सोम आणला ही परंपरा अधिक प्राचीन असून गायत्रीस्वरूपी वाक् देवतेनें सोम आणल्याच्या परंपरा पहिल्या परंपरेपासून उद्भवल्या आहेत. कारण शतपथांत वाक् देवता हीच सुपर्णी असल्याचें स्पष्ट सांगितलें आहे. गायत्री, त्रिष्टुभ् आणि जगती या तीन छंदांनीं पक्षिरूपानें स्वर्गावर स्वारी करून तेथून सोम आणण्याचा प्रयत्न केला असतां त्यांत एकट्या गायत्रीलाच यश आलें.

## कद्रू-सुपर्णीची कथा

'कद्रूश्च वै सुपर्णीच आत्मरूपयो: अस्पर्धेताम् । सा कद्रूः सुपर्णीम् अजयत्।

सा अब्रवीत् तृतीयस्याम् इतो दिवि सोमः तम् आहर, तेन आत्मानम् निष्क्रीणीष्व ।' ( तै. सं. ६–१–६ ) कद्रू आणि सुपर्णी यांच्यामध्यें अधिक सुंदर कोण याविषयीं स्पर्धा झाली असतां सुपर्णीला कद्रूनें जिंकलें आणि सांगितलें कीं इथून तिसऱ्या स्वर्गांत सोम आहे, तो आणून देशील तर तुझी मुक्तता होईल. धन्याला असलें कांहीं व्यसन लावल्यावांचून दासांची मुक्तता कशी व्हावयाची ? या कथेंतील कद्रू हा ग्रीकांचा Hydra नांवाचा तारकापुंज असून त्याचा विस्तार रॉब्सनच्या तारकापुंजावरील ग्रंथांत सायन सिंह ५ पासून सायन वृश्चिक २३ पर्यंत दिला आहे. या कद्रूशीं स्पर्धा करणारी सुपर्णी ही छंदांची माता. 'छंदांसि सौपर्णेयाः ।' असें तैत्तिरीय संहितेचें वचनच आहे. छंद हे सुपर्णीपुत्र म्हटले म्हणजे सुपर्णी ही स्वतःच वाक् देवता होते. या दोन परंपरांपैकीं श्येनानें सोम आणल्याच्या परंपरेचा प्रथम विचार केला पाहिजे.

## सोमाच्या आख्यानांतील कृशानु

सोमहरण करणाऱ्या पक्ष्याला वेदांत श्येन म्हटलें असून त्यानें दिवोलोकाच्या अत्युच्च भागांतून सोम खालीं कसा आणला, याचें वर्णन वामदेवमंडलांतील २६ आणि २७ या सूक्तांतून आलें आहे. 'ऋजीपी श्येनो ददमानो अंशुम् परावतः शकुनो मंद्रम् मदम् । सोमं भरत् दादृहाणो देवावान् दिवो अमुष्मात उत्तरात् आदाय ।' ( ४–२६–६ ) ऋजुगामी ससाणा हर्षकारक आणि मदकारक सोमवल्ली घेऊन त्या अत्युच्च द्युलोकापासून देवांत आला. 'अव यत् श्येनः अस्वनीत् अध द्योः वि यत् यदि वा अत ऊहुः पुरंधिम् । सृजत् यत् अस्मै अव ह क्षिपत् ज्याम् कृशानुः अस्ता मनसा भुरण्यन् । ( ४–२७–३ ) जेव्हां ससाण्यानें द्युलोकाच्या खालीं शब्द केला, तेव्हां सोमसंरक्षक कृशानूनें संतापून त्याच्यावर प्रत्यंचा झाडली. इथें प्रश्न असा उद्भवतो कीं हा कृशानु कोण ? कृशानूचा नेहमीचा अर्थ अग्नि असला तरी ग्रासमाननें त्याचा अर्थ धनुष्याचें आकर्षण करणारा असा दिला आहे. याभिः कृशानुम् असने दुवस्यथो जवे याभिः यूनं अवन्तम् आवतम् ।' ( १–११२–२१ ) या वचनांत अश्विनीकुमारांनीं शरसंधानप्रसंगीं कृशानूला प्रशंसास्पद केलें आणि त्याचा अश्व धावत असतांना त्याचें संरक्षण केलें, असें सांगितलें आहे. स्वान, भ्राज, अंघारि, बंभारि, हस्त, सुहस्त आणि कृशानु या सात सोमसंरक्षकांचा तैत्तिरीयसंहितेंत ( १–२–७ ) उल्लेख आला आहे. यापैकीं एकट्या कृशानूनेंच सोम पळविणाऱ्या पक्ष्यावर बाण झाडला. हा कृशानु सायन वृश्चिक आणि धनु या

दोन राशि व्यापणारा ग्रीक पुराणांतील हर्क्युलिस असूं शकेल. ग्रीक पुराणांप्रमाणें गुडघे टेकलेल्या हर्क्युलिसनें त्याच्यावर आक्रमण करणाऱ्या तीन राक्षसी पक्ष्यावर एकच बाण सोडला. या परंपरेचें वैदिक स्वरूप ऐतरेय ब्राह्मणाच्या आख्यानांत आढळतें. जगती, त्रिष्टुभ आणि गायत्री या तीन छंदांनीं पक्षिरूपानें अनुक्रमानें द्युलोकावर स्वारी करून सोम आणण्याचा प्रयत्न केला असतां एकटी गायत्रीच सोम हस्तगत करूं शकली; तेव्हां सोमसंरक्षक कृशानूनें तिच्यावर सोडलेल्या बाणानें तिची एक नखी गळून दडली. त्या नखीपासून साळू हे प्राणी झाले आणि कृशानूच्या बाणापासून भिन्न भिन्न प्रकारचे सर्प झाले. अशा प्रकारें ऐतरेय ब्राह्मणकारांनींहि आपल्या आख्यानांत पर्यायानें कां होईना सर्पांचा संबंध आणला आहे. इराकमधील प्राचीन अक्कडप्रांताच्या भाषेंत चषक या तारकापुंजाला भुजंगांचें पात्र या नांवानेंच ओळखतात. गायत्रीवर बाण सोडणाऱ्या धनुर्धाऱ्याला पाय नव्हते, असें शतपथांत ( ३–३–४–१० ) सांगितलें असून धनुराशींतील दशशीर्ष दशानन ब्राह्मणानें प्रथम सोमपान केलें, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्यानेंहि आपलें पेय पळविणाऱ्या श्येनावर अथवा गायत्रीवर बाण सोडणें स्वाभाविक होय. धनुराशीच्या समोरच मिथुनेंत पुनर्वसू नक्षत्रांत अश्विनीकुमारांचें निवासस्थान असून त्यांनीं कृशानूचा अश्व आवरला आणि शरसंधानप्रसंगीं त्याला प्रशंसास्पद केलें. पण ही घटना फार प्राचीन काळची असल्यानें तिचा उल्लेख अन्यत्र सहसा येत नाहीं. प्रचलित ऋग्वेदसंहितेंत बहुतेक सर्व ठिकाणीं प्रथम सोमपान करण्याचा मान वायूला दिलेला आढळतो.

## वायु सोमरक्षक कसा

वेदांतील श्येन म्हणजेच गरुड हें विष्णूचें वाहन म्हणून प्रसिद्ध असून विष्णूच्या परमोच्च पदापाशींच मधूचा निवास असल्याचें वेदांत सांगितलें आहे. ‘ उरुक्रमस्य स हि बंधुःइत्था विष्णोः पदे परमे मध्व उत्सः ’ ( १–१५४–५ ) एवढ्या उल्लेखानें आकाशांत सोम कुठें होता, हें नेमकें कळून येत नाहीं. हें ज्ञान ‘ वायुः सोमस्य रक्षिता ’ या वचनावरून होऊं शकतें. वायु हा स्वातीचा अधिपति असून उत्तरेकडील चाळीस अक्षांशांच्या पलीकडील प्रदेशांत हें नक्षत्र आकाशांत हस्त नक्षत्राच्या पाठोपाठ उगवतें. या उभयतांमधील चित्रेचा उदय त्या प्रदेशांत स्वातीच्या मागून सरासरी पाऊण तासानें होतो. यामुळें स्वातीचा अधिपति वायु हा हस्त नक्षत्राच्या हस्तांतील सोमचषकाचा रक्षणकर्ता आणि भोक्ता बनला आहे.

तळें राखील, तो पाणी चाखील, ही म्हण सुप्रसिद्धच आहे. चित्रा नक्षत्राचा अधिपति त्वष्टा हा सोमकलशाला अधिक जवळचा असल्यानें तो त्याचा खरा स्वामी. ' सोमेन पूर्णं कलशं बिभर्षि त्वष्टा रूपानां जनिता पशूनाम् । ' ( अथर्ववेद ९-४-६ ) या वचनांत त्वष्ट्यानें सोमपूर्ण कलश ( अर्थात् आपल्या हातांत ) धारण केल्याचा जो उल्लेख आला आहे, तो त्याच्या नक्षत्रिय प्रजापति या स्वरूपाला अनुलक्षून आला आहे. ' हस्त एव अस्य हस्तः चित्रा शिरः निष्ट्या हृदयम्, ऊरू विशाखे प्रतिष्ठानूराधाः । एषवै नक्षत्रिय प्रजापतिः । ' ( तै. ब्रा. १-५-२-२ ) त्वष्ट्याचें हें नक्षत्रिय प्रजापतीचें स्वरूप लक्षांत घेतलें म्हणजे हस्ताच्या हातांतील सोमकलश त्वष्टा वहात असल्याचा उल्लेख कां येतो, याचा उलगडा होतो. नक्षत्रिय प्रजापतीचेंच पुढें दक्ष प्रजापतींत परिवर्तन झालें. कशु लोकांच्या भाषेंत दक्ष म्हणजे तारा. हेच लोक काशिकुल या नांवानें आर्यांत समाविष्ट झाले.

## त्वष्ट्याचा जावई वायु

कालांतरानें दक्षिणायनाचा बिंदु जेव्हां हस्त नक्षत्रांत आला आणि चित्रेचा अधिपति जो त्वष्टा त्याचें महत्त्व कमी होऊं लागलें, तेव्हां त्वष्ट्याच्या सदनांतील सोम इंद्रानें अर्थात् दक्षिणायनारंभाच्या देवानें धटिंगणपणानें पिऊन टाकल्याचीं आख्यानें प्रचलित होऊं लागलीं. हस्ताच्या पाठोपाठ उगवणारें स्वाति नक्षत्र हें त्वष्ट्याचें हृदयच. त्या हृदयाचा अधिपति जो वायु त्याला, त्वष्ट्याच्या हातांतील सोम प्रथम पिण्याचा मान मिळणें स्वाभाविकच आहे. या मानासहच वायूला त्वष्ट्याच्या जामाताचेंहि पद अलंकृत करावें लागलें ' त्वष्टुः जामातरं वयं ईशानं राय ईमहे । ' ( ८-२६-२१ ) सोमपानाप्रीत्यर्थ झालेल्या पळण्याच्या चढाओढींत इतर सर्व देवांना मागें टाकून वायु पहिला आल्यामुळें प्रथम सोम पिण्याचा मान त्याला मिळाला, अशी कथा ऐतरेय ब्राह्मणांत आली आहे त्यामुळेंच वायुला शुद्ध सोम प्यावयाला मिळत असल्यानें वेदांत त्याला वरचेवर शुचिपा म्हटलें आहे. इतर देवांमध्यें एकट्या इंद्राला मात्र एकवार शुचिपा म्हटलेलें आढळतें. या साऱ्या चिकित्सेवरून त्या विशिष्ट काळांत विष्णूचें परमपद आणि इंद्राचें निवासस्थान सोमकलशाच्या पुंजापाशीं असल्याची कल्पना येते. सोम हा इंद्राचा सरथ असल्याचा उल्लेख नवव्या मंडलांत अनेकदा आला आहे. सोम इंद्राचा सारथि असल्याचा उल्लेख आचार्य मॉक्डोनेल यांनीं अथर्ववेदाच्या ( ८-८-२३ ) आधारानें केला आहे. पण त्या ऋचेंत सोमाचा उल्लेख नसून चंद्राचा असल्यानें प्रस्तुत चर्चेंत हा संदर्भ निरुपयोगी आहे.

## दधीचीचा शिरच्छेद

या त्वाष्ट्र मधूचें ज्ञान सामान्य लोकांत पसरूं नये, याविषयीं वैदिक ऋषि अतिशय सावध असत. हें ज्ञान आथर्वण दधीचींना होतें आणि त्यांना अश्वाचें शिर लावून अश्विनीकुमारांनीं त्यांच्यापासून तें ज्ञान मिळविलें. 'आथर्वणाय अश्विना दधीचे अश्व्यं शिरः प्रति ऐरयतम् । स वां मधु प्रवोचत् ऋतायन् त्वाष्ट्रं यत् दस्रौ अपिकक्ष्यं वा ।' ( १-११७-२२ ) या आख्यायिकेचा वास्तविक अर्थ हा कीं हस्त आणि सोमकलश यांच्या दक्षिणेकडील दधीचि अथवा नरतुरंग या तारकापुंजावरून त्वष्ट्याच्या मधूचें स्थान निश्चितपणें ओळखतां येतें. हा तारकापुंज सध्या मनुजमुखी मानला जात असला तरी अश्विनीकुमारांनीं दधीचीपासून त्वाष्ट्र मधूचें ज्ञान संपादन केलें, तेव्हां तो अश्वमुखी गणला जात असावा. यावरून कवींनीं अशी कथा रचली आहे कीं त्वाष्ट्र मधूचें ज्ञान कोणालाहि सांगितल्यास मी तुझें शिर उडवीन, अशी इंद्रानें दधीचीला धमकी दिली होती. तेव्हां अश्विनीकुमारांनीं त्याच्या मनुजमुखाच्या स्थानीं अश्वमुख बसवून त्याच्याकडून ती विद्या संपादन केली आणि त्या रागावरून इंद्रानें दधीचीचें शिर तोडल्यानंतर त्यांनीं त्याला पहिलें मनुजमुख लावून पुन्हा जिवंत केलें. इंद्रानें उडविलेलें दधीचीचें मुख शर्यणावतांत पडल्याचा वेदांत उल्लेख आला आहे. या शर्यणावताचा सोमासह ऋग्वेदांत ( ८-६-३९, ९-६५-२२, ) उल्लेख येतो. उदाहरणार्थ, 'शर्यणावति सोमामिंद्र पिबतु वृत्रहा ।' ( ९-११३-१ ) यावरून अशी कल्पना होते कीं मधुविद्येचा रहस्यस्फोट केल्याचें प्रायश्चित्त म्हणून तोडलेलें दधीचीचें अश्वमुख मधुपात्रांतच जाऊन पडलें. या पात्रालाच शर्यणावत् सरोवर अशीहि संज्ञा वेदांत दिलेली आढळते.

## रहस्यस्फोटाचें प्रायश्चित्त

त्वाष्ट्र मधूचें जें गुप्त ज्ञान दधीचींनी अश्विनीकुमारांना सांगितलें, तें पुढें परंपरेनें याज्ञवल्क्यांना प्राप्त झालें आणि त्यांनीं त्याचा बृहदारण्यकांत उपयोगहि केला आहे. 'इदं वै तन् मधु दध्यङ्. आथर्वणो अश्विभ्याम् उवाच । तदेतत् ऋषिः पश्यन् अवोचत् । रूपं रूपं प्रतिरूपो बभूव तदस्य रूपं प्रति चक्षणाय इंद्रो मायाभिः पुरुरूप ईयते युक्ता हि अस्य हरयः शता दश ।' हाच मंत्र भारद्वाजमंडलांतील सत्तेचाळिसाव्या सूक्तांत आला असून त्या सूक्ताचा द्रष्टा गर्ग ऋषि आहे. गर्गकुल ज्योतिर्विद्येकरितां प्रसिद्ध आहेच. सहस्रवार्षिक विश्वसृज् यज्ञाचे जे

चार स्तोम आहेत, त्यापैकीं पंचदश स्तोमांत दक्षिण दिशा, ग्रीष्म ऋतु, त्रिष्टुभ् छंद, विश्वकर्मा देव आणि भरद्वाज ऋषि यांचें प्राधान्य होतें. त्याच भरद्वाजांच्या परंपरेंतील हा मंत्र त्वाष्ट्र मधूच्या रहस्यस्फोटाच्या प्रकरणांत आला असल्यानें त्याचा अर्थ ज्योतिर्विद्येच्या दृष्टीनेंच लावावा लागतो. या मंत्रांतील रूप शब्दाचा अर्थ नक्षत्र ( नक्षत्राणि रूपं तै. सं अंतीं ) असून हरि म्हणजे अश्व याचा सांकेतिक अर्थ इथें संवत्सर असा आहे. अयनबिंदूच्या चलनानें सहस्रवर्षांनीं दक्षिणायनाच्या प्रारंभाचा देव जो इंद्र, तो एका नक्षत्रांतून दुसऱ्या नक्षत्रांत जातो. हीच गोष्ट गर्ग ऋषींनीं येथें सांकेतिक भाषेंत सांगितली आहे. त्वष्ट्याचा मधु इंद्रानें आत्मसात् कसा केला, याचें स्पष्टीकरण करतांना दधीचींनीं अश्विनीकुमारांना जें रहस्य सांगितलें, तें ज्योतिर्विद्येंतील रहस्य असणें स्वाभाविक आहे. ‘Mathematica discoveries were communicated under Oath. In the 4th century B-C. Hippasus is said to have been drowned in his bath for giving away mathematical truths for nothing. (Mathematics for the Million) या अवतरणावरून प्राचीन काळीं ज्योतिर्विद्येंतील रहस्यें किती कद्रूपणानें संभाळलीं जात असत आणि तीं फोडणाऱ्यांना देहांतप्रायश्चित्त कसें मिळत असे, याची वाचकांना कल्पना येईल. आपल्या पुराणांतून दधीचीच्या अस्थी प्रसिद्ध आहेत. ‘ नक्षत्राणि रूपम्, तारका अस्थानि, ( तै. सं. ७–५–२५ ) या वचनावरून वैदिक ऋषि नक्षत्रांना रूप आणि नक्षत्रचक्रांचें स्वरूप प्राप्त न झालेल्या ताऱ्यांना अस्थी म्हणत, असें कळून येतें. यावरून दधीचि हा नक्षत्रचक्राबाहेरचा तारकापुंज कां घेतला, याची कल्पना येईल.

## सोमसिंहाचें रहस्य

त्वष्टा, इंद्र, वायु, दधीचि, श्येन, अश्विनीकुमार इत्यादिकांसंबंधींच्या वर उल्लेखिलेल्या आख्यायिकांचा केंद्रबिंदु सोम असून या आख्यायिका कल्पिल्या गेल्या, तेव्हां सोमाची इंद्राशीं युति, म्हणजेच दक्षिणायनाचें प्रारंभस्थान सोमकलशाच्या पुंजासन्निध होतें. याकरितांच वामदेवानें म्हटलें आहे. ‘ त्वा युजा तव तत् सोम सख्ये इंद्रः अपः मनवे सस्रुतः कः । अहन् अहिम् अरिणात् सप्तसिंधून् अपावृणोत् अपिहिता इव खानि ॥’ ( ४–२८–१ ) म्हणजे सोमाशीं युक्त होऊनच इंद्रानें नद्यांचे प्रवाह प्रबळ केले. यामुळें सोमहि इंद्रासहच नदीपति झाला आहे. ‘ एष रुक्मभिः ईयते वाजी शुभ्रेभिः अंशुभि : । पतिः सिंधूनाम् भवन् ॥’

( ९–१५–३ ) सोम हा सिंधूंचा राजा असल्याचा आणखीहि एक उल्लेख येथें उतरून घेतों. ' राजा सिंधूनाम् पवते पतिः दिवः ऋतस्य याति पथिभिः कनिक्रदत् ॥' ( ९–८६–३३ ) या सिंधूंच्या राजाचा सिंह असाहि मंत्रद्रष्टयांनीं उल्लेख केला असल्यानें त्याचा सिंह राशीशीं संबंध असल्याचें उघडकीस येतें. ' राजा सिंधूनाम् अवसिष्ट वासः ऋतस्य नावम् आरुहत् रजिष्ठाम् । अप्सु द्रप्सो वावृधे श्येनजूतो दुहे ईं पिता दुहे ईं पितुर्जाम् ॥ ( ९–८९–२ ) सिहं नसन्त मध्वो अयासं हरिं अरुषम् दिवो अस्य पतिम् । शूरो युत्सु प्रथमः पृच्छते गा अस्य चक्षसा परि पात्युक्षा ॥ ३ ॥ म्हणजे सिंधूचें वस्त्र परिधान करून सोमराजा ऋताच्या नौकेवर अधिष्ठित झाला, तेव्हां त्या सोमसिंहाकडे इंद्र आला आणि त्यानें विचारलें कीं धेनु कुठें आहेत. पुष्कळांची अशी समजूत आहे कीं वेदकाळीं राशी अविदित होत्या, म्हणजे वेदयुग हें ज्ञानयुग नसून अज्ञानयुग होतें. पण पुढील ऋचेवरून त्यांना आपल्या समजुतींचा पुनर्विचार करावा लागेल. ' उत स्म राशिं परियासि गोनां इंद्रेण सोम सरथं पुनानः ।' ( ९–८७–९ ) येथें इंद्रासह एका रथावर आरूढ होऊन सोम नक्षत्रांच्या राशींतून भ्रमण करीत असल्याचा स्पष्ट उल्लेख आला आहे. सोमकलशाचा तारकापुंज सिंह आणि कन्या या दोन राशींच्या क्षेत्रांत पसरलेला असल्यानें सोमसूक्तांतून सिंह आणि सूर्याची प्रिय दुहिता अर्थात् कन्या या दोन राशींचे उल्लेख येतात. ' पर्जन्यवृद्धं महिषं तं सूर्यस्य दुहिता आभरत् ।' ( ९–११३–३ ) या वचनांतील पर्जन्यवृद्ध सोमाला घेऊन येणारी सूर्याची दुहिता ही आकाशांतील कन्याच आहे. ऋग्वेदाच्या शब्दकोशांत ग्रासमाननेंहि राशि शब्दाचा sterngruppe अर्थात् तारकापुंज असाच अर्थ केला आहे, हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे.

## सोम हाच वृत्र

एकेकाळीं सोमकलश हा तारकापुंज दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानीं असल्यानें आणि या प्रारंभस्थानालाच वेदांत पर्वत हें नामाभिधान लाभल्यानें सोमरस काढावयाच्या पाषाणांना ( ग्रावन् ) अद्रि आणि पर्वत या संज्ञा लावितात. ' प्रैते वदन्तु प्र वयं वदाम ग्रावभ्यो वाचम् वदता वदद्भ्यः । यत् अद्रयः पर्वताः साकम् आशवः श्लोकं घोषं भरथ इंद्राय सोमिनः ॥ ' ( १०–९४–१ ) या मंत्रांतील ग्रावस्तुतींत अर्बुद काद्रवेयानें अद्रि आणि पर्वत या संज्ञा वापरल्या आहेत.

वेदकालीं हा पर्वत वृत्राच्या जठरांत होता. 'अंतर्वृत्रस्य जठरेषु पर्वतः ।' ( १–५४–१० ) तेव्हां दक्षिणायनाचा प्रारंभ सोमकलशाच्या पुंजांत असल्यानें आणि हा सोमकलश विधात्यानें कद्रूवृत्राच्या पाठीवर ठेवून दिल्यामुळें सोम आणि वृत्र यांचा वस्तुतः एकजीव झाला होता. त्यामुळें शतपथांत वारंवार सोम हाच वृत्र असल्याचा उल्लेख येतो. 'Now Soma was वृत्र. When the gods slew him. his head rolled off. It became the द्रोणकलश. There; into flowed together as much of the juice as it could hold.' ( ४–४–३–७ ) शतपथाचा पूर्वार्ध माझ्या हातीं नसल्यानें एगलिंगच्या भाषांत-रांतून हा उतारा घेतला आहे. यावरून असें दिसतें कीं वृत्राच्या अनेक मस्तकां-पैकीं एक मस्तक त्याच्यापासून अलग करून सोमकलश हा तारकापुंज बनविला होता.

## सोमाचें विष्णूंत परिवर्तन

सोमाचें वाहन श्येन होतें आणि त्याचें स्थान कद्रूवृत्राच्या पाठीवर होतें. हें पाहिलें म्हणजे स्वाभाविकपणेंच मनांत कल्पना येते कीं हा सोमदेव वेदोत्तरका-लांत विष्णूच्या स्वरूपांत विलीन झाला असला पाहिजे. विष्णु हा सोमाप्रमाणेंच शेषशायी असून गरुडवाहन आहे. विष्णूच्या परमपदापाशींच मधूचा उत्स, म्हणजे मधूचें स्थान आहे. 'विष्णोः पदे परमे मध्व उत्सः ।' एकेकाळीं त्वष्टयाच्या घरांत सोमपान करणाऱ्या इंद्राला पुढें विष्णूच्या सदनींच सोमसेवन करावें लागे. 'यत् सोमम् इंद्रविष्णवि यत् वा घ त्रित आप्त्ये । यत् वा मरुत्सु मंदसे समिन्दुभिः॥' ( ८–१२–१६ ) इथें त्रित, मरुत् आणि विष्णू यांच्या सदनांत इंद्रानें सोमपान केल्याचा उल्लेख आहे. या ऋचेवरून ऋग्वेदकालांतच विष्णूचें सदन त्रिताच्या सन्निध सोमकलशाच्या पुंजांत आल्याचें दिसून येतें. सोमाचा सूर्येशीं विवाह झाला असून ती सूर्यदुहिता आकाशांतील कन्याराशीच आहे. हीच कन्या इराक-मध्यें इश्तर या नांवानें प्रसिद्ध असून तिच्या पतीचें नांव दामुजी असेंच वाचा-वयाला पाहिजे, असें तज्ज्ञ सांगतात. पाश्चात्यांच्या ग्रंथांतून त्याचा तम्मुझ असा उल्लेख येतो. दामुजी हें तर विष्णूचें कृष्णावतारांतील एक नांव आहे. प्राचीन इराकच्या भाषेंत त्याचा अर्थ रक्तवर्णी असा होत असून संस्कृत कृष्ण शब्दाचा मूळचा अर्थ रशियन कास्नायप्रमाणेंच रुधिरवर्णाचा असा असल्याचें मी चित्पाव-नांच्या पूर्वपीठिकेंत दाखवून दिलें होतें. इराकमधील दामुजी हा गोप असून Lord of the riverbank' म्हणजे नदीतीरांचा प्रभु म्हणून प्रसिद्ध आहे.

या संज्ञा कृष्णालाहि लागूं पडतात. इस्तर ही लक्ष्मीप्रमाणेंच भार्गवी आणि सागरकन्या असून लक्ष्मीप्रमाणेंच तिचेंहि चांचल्य प्रसिद्ध आहे. तेव्हां ऋग्वेदांतील सोमाचेंच विष्णूंत परिवर्तन झाल्यामुळें त्याला कृष्णावतारांत सोमकुलांत जन्म घ्यावा लागला असेल. सोम चोरणाऱ्या विश्वावसूला विष्णूनें लाथ मारल्याचा उल्लेख तांड्य ब्राह्मणांत येतो.

## ब्रह्मदेवाचें मूळ स्वरूप

वैदिक सोमाचें पौराणिक विष्णूंत परिवर्तन झालें, हें ऐतिहासिक सत्य लक्ष्यांत घेतलें तरच ब्रह्मदेवाच्या पौराणिक स्वरूपाचा उलगडा होऊं शकतो. पुराणांतील ब्रह्मदेवाचें मूळस्वरूप म्हणजे वैदिक प्रजापति. या प्रजापतीचें सारें महत्त्व इंद्रानें आत्मसात् केल्यानंतर त्याला क हें नाम प्राप्त झाल्याची कथा ब्राह्मण ग्रंथांतून आली आहे. क हें देवाचें नांव मिसरमधील परंपरेंतहि उपलब्ध होत असल्यानें ब्रह्मदेवाच्या स्वरूपाचा उलगडा करतांना तेथील परंपरेचा आधार घेणें अनुचित होणार नाहीं. मिसरमधील राज्यकर्तेंहि मध्यआशियांतूनच त्या देशांत गेले असल्यानें त्यांच्या परंपरा प्राचीन आर्यांच्या परंपरांशीं केव्हां केव्हां फार सदृश असतात. “The throne of Osiris is set upon a running stream, and from the waters rises a single lotus-blossom. Upon the blosson stand the four children of Horus. The first has the face of the man, the second the face of an ape, the third the face of a jackal, and the fourth the face of a bird of prey.’

म्हणजे ओसिरिस देवाचें सिंहासन वाहत्या पाण्यावर असून त्यांतून एक कमल उमलून वर आलें आहे. त्या कमलावर होरुस् देवाचीं चार मुलें बसलीं असून त्यांचीं मुखें अनुक्रमें मानव, कपि, कोल्हा आणि ससाणा या चार प्राण्यांचीं आहेत. हें सारें वर्णन सोमकलशाशेजारच्या हस्त नक्षत्राला लागूं पडतें. वरील चार मुखांपैकीं कपीचा उल्लेख एकत आणि द्वित यांच्या अथवा वृषाकपींच्या चर्चेंत आला होता. हस्त नक्षत्रालाच वेदांत श्येन हें नांव असून त्यानेंच अत्युच्च स्वर्गांतून सोमहरण केलें. ‘क्रोष्टा वराहं निः अतक्त कक्षात्’ या वचनांतील वराहाचा म्हणजे सप्तर्षींचा प्रतिस्पर्धी कोल्हा हा हस्तांतच असावा, असें अनुमान मिसरी परंपरेंतील वरील उताऱ्यावरून निघतें. आपल्या प्रजापतीला अजमुख लाभण्यापूर्वी मानवी मुख होतें. त्यामुळें होरुस् देवाच्या चार मुलांच्या चार प्रकारच्या मुखांचा

हस्त नक्षत्रांत आणि वैदिक परंपरेंत हि बोध होऊं शकतो, इतकें कळून येतें. अशा तुलनात्मक विचार केला असतां ब्रह्मदेवाच्या नक्षत्रचक्रांतील स्थानाचा आणि त्याच्या स्वरूपाचाहि चांगला उलगडा होऊं शकतो.

## जंबूककथा

वर उल्लेखिलेल्या कोल्ह्याची ग्रीक परंपरेंत अधिक माहिती उपलब्ध झाली आहे. खि. पू. सातव्या शतकांतील आर्किलोकोस् नांवाच्या ग्रीक लेखकानें गरुड आणि कोल्हा यांच्या संबंधीं लिहिलेल्या एका अर्धांच सांपडलेल्या कथेचा उतारा रॉबर्ट ब्राउन यांच्या प्रिमिटिव्ह कॉन्स्टेलेशन्स या पुस्तकाच्या अंतीं आला आहे. 'A fox and eagle made once upon a time a league together..... The serpent is described as the eagle's companion....The eagle having treacherously devoured the cubs of the fox, retires to a lofty crag, on which he says, 'I seat making light of thy warfare'. The fox then appeals to Zeus exclaiming, 'Father Zeus, thine is the lordship of heaven and to thee the wrong-doing of beasts and its punishment is a care.'

या कथेचा यापुढील भाग नष्ट झाला आहे. पण या कथेंतील सर्प आणि गरुड यांची मैत्री, गरुडानें कोल्ह्याशीं प्रथम सहकार्य करून नंतर त्याचा केलेला विश्वासघात त्याचप्रमाणें पर्वतशिखरावर बसलेल्या गरुडाला शासन करण्याची कोल्ह्यानें झेउस्ला केलेली प्रार्थना या साऱ्या घटना, हस्त अथवा श्येनगरुडाच्या नक्षत्रांत दाक्षिणायन होतें, त्या काळाच्या निदर्शक आहेत. वैदिक, ग्रीक आणि मिसरी अशा तीन परंपरांतून ज्या कोल्ह्याचा उल्लेख येतो. त्याचा ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें अर्थ काय हें समजून घेण्याकरितां या तीनहि परंपरांचा एकत्र विचार करणें अनैतिहासिक ठरणार नाहीं, अशी आशा आहे.

## ब्रह्मदेवाचें कन्यागमन

ब्रह्मदेव हा अभिजित् नक्षत्राचा अधिपति असल्याची परंपरा प्रधान मानून श्री. भा. रं. कुलकर्णीं यांनीं श्रवण, धनिष्ठा आणि अभिजित् या नक्षत्रांवरून विष्णु, लक्ष्मी आणि ब्रह्मदेव यांच्या पौराणिक वर्णनाचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांच्या समीकरणांपेक्षा वैदिक प्रजापतीचेंच पुढें पौराणिक ब्रह्मदेवांत परिवर्तन झालें, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन मी वर दाखवून दिलेलीं सादृश्यें अधिक महत्त्वाचीं

आहेत, असें मला वाटतें. प्रजापतीप्रमाणें ब्रह्मदेवाचीहि कन्यागमनामुळें दुष्कीर्ति झाली आहे. या कलंककथेचा जन्म प्रजापतिब्रह्मदेवाचें म्हणजेच दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाचें कन्या राशींत आगमन झाल्यामुळें झाला, ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत घेतल्यावांचून वैदिक आर्यांच्या ज्योतिषशास्त्रांतील परंपरेचा कांहींच बोध व्हावयाचा नाहीं. प्रजापतिब्रह्मदेवाच्या चरित्राचा कन्या राशीशीं असलेला अतिनिकटचा संबंध कोणत्याहि निमित्तानें तोडतां येत नाहीं, ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन विष्णु, लक्ष्मी, ब्रह्मदेव इत्यादींचा उलगडा करणें उचित आहे.

## अभुक्त सोम

दशममंडळांतील सूर्याविवाहाच्या सूक्तांत सोमाचें पुढील वर्णन आलें आहे. ' सोमेन आदित्या बलिनः सोमेन पृथिवी मही । अथो नक्षत्राणाम् एषाम् उपस्थे सोम आहितः ।। सोमं मन्यन्ते पपिवान् यत्संपिषन्त्योषधिम् । सोमं यं ब्रह्माणो विदुः न तस्य अश्नाति कः चन ।। ( ९-८५-३ ) या ऋचांतून नक्षत्रमंडळांत सोम अधिष्ठित असल्याचा उल्लेख असून ज्या सोमाला ब्रह्मवेत्ते जाणतात, त्याचें कोणीहि भक्षण करूं शकत नाहींत, असें स्पष्ट सांगितलें आहे. या ऋचांतून ओषधिस्वरूपी सोम आणि नक्षत्रस्वरूपी सोम यांच्यातील प्रभेद दर्शविला असून नक्षत्रस्वरूपी सोम त्या काळींहि तज्ज्ञांवांचून इतरांना पूर्णपणें अज्ञात असल्याचें सुचविलें आहे. त्यानंतर आकाशांतील सोमाचें रहस्य जें लुप्त झालें, तें मला वाटतें, मला स्वतःला उमगेपर्यंत सर्वस्वीं लुप्त झालें होतें. खरें सांगायचें म्हणजे हें रहस्य उमगल्यामुळेंच मी वैदिक आर्यांच्या ज्योतिर्विज्ञानाचा इतिहास आरंभिला आहे.

## पाश्चात्यांनीं तोडलेले तारे

या रहस्यांचा ज्यांना वाससुद्धा लागलेला नाहीं, असे पाश्चात्य विद्वान् कसे तारे तोडत असतात, याचें एक उदाहरण इथें उतरून घेणें आवश्यक आहे. वायूलाच प्रथम सोमपान करण्याचा अधिकार कां मिळाला, यासंबंधीं ऐतरेय ब्राह्मणांत आलेल्या आख्यानावर टीका करतांना वेदिक इंडियाचे कर्ते रागोझिन म्हणतात. ' This is the way in which the Brahmanas dispose of all obscure or puzzling points by stories made up to explain them. The result is generally obscurity doubly intensified, confusion inextricable, often sickening absurdities and sometimes gems of philosophy and poetry. ' रागोझिन यांच्या या

उताऱ्याचा अनुवाद करण्याची तादृश आवश्यकता नाहीं. या पाश्चात्य पंडितांना गोष्टींच्या स्वरूपांत सांगितलेल्या देवकथाहि कळत नाहींत आणि आंकड्यांच्या भाषेंत स्पष्ट शब्दांत निवेदन केलेल्या गोष्टीहि कळत नाहींत, त्यामुळें त्यांच्यापुढें श्रुतींना हात टेकण्याचीच पाळी येते.

## इंद्राचा गर्भवास सहस्रवर्षें

उदाहरणार्थ, वामदेव या ज्योतिर्विद ऋषींनीं इंद्रजन्मासंबंधीं लिहिलेल्या सूक्तांत इंद्राच्या गर्भवासाचा काळ सहस्रमासच नव्हे तर सहस्रवर्षें असल्याचें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे. ' किं स ऋधक् कृणवत् यम् सहस्रम् मासो जभार शरदश्च पूर्वीः ।' ( ४–१८–४ ) या वचनांतील पूर्वीः या वचनावरून इंद्रमातेनें पुष्कळदा, त्याचा गर्भ सहस्रमासच काय पण सहस्रवर्षें धारण केला असल्याचें कळून येतें. पण असा सरळ अर्थ न करतां सहस्रमास आणि पुष्कळवर्षें इंद्राचा गर्भ त्याच्या मातेनें धारण केला होता, असा अर्थ भाष्यकारांपासून गेल्डनेर-पर्यंत सर्वच विद्वानांनीं केला आहे. पण असा विचित्र अर्थ करतांना वरील वचनाचा अर्थ काव्याच्या परंपरेप्रमाणें लावला पाहिजे, ही गोष्ट सर्वजण विसरले आहेत.

## गर्भांत शृंखलाबद्ध इंद्र

इंद्राचा गर्भ त्याच्या मातेला इतकीं वर्षें कां वहावा लागला, यासंबंधीं भिन्न भिन्न आख्यायिका मैत्रायणीसंहितेंत आढळून येतात. अदितीनें गर्भांतच इंद्राला लोहशृंखलांनीं बद्ध केलें होतें आणि त्या शृंखलांसहच तो जन्माला आला असतांना एका यज्ञांतील हविर्भागाच्या प्रभावानें त्या शृंखला गळून पडल्या. ( मै. सं. २–१–१२ ) याच संहितेंत दुसरी अशी आख्यायिका आहे, कीं इंद्र आणि विवस्वान् हे गर्भांत असतांनाच म्हणाले कीं आपण जन्मल्यानंतर आदित्यांचेंच पद प्राप्त करून घेऊ. ' अंतरेव गर्भः सन्ता अवदताम्, आवाम् इदम् भविष्यावो यत् ऊ आदित्या इति । ' हें बोलणें ऐकून अंश आणि भग या आदित्यांनीं त्या उभयतांना गर्भांतच मारण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें विवस्वान् हा मार्तंडस्वरूपानें जन्माला आला, पण इंद्रावर त्यांचा मात्रा न चालल्यानें तो आपल्या पूर्ण प्रभावासहच प्रकट झाला. ( मै. सं. १–६–१२ ) इंद्राला गर्भांत मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या अंशाचें स्थान अविदितच आहे. पण त्याचा साहाय्यक भग हा उत्तराफाल्गुनीचा अधिपति असल्यानें त्या नक्षत्रांत इंद्राचा म्हणजे दक्षिणायनाच्या प्रारंभस्थानाचा प्रवेश झाला, तेव्हां भगाच्या उपासकांनीं इंद्रोपासना मारून टाकण्याचा प्रयत्न केल्याची स्मृति

या आख्यायिकेंत अवशिष्ट राहिली आहे, असें म्हणतां येतें. इराणांत आणि त्या देशाच्या उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील सर्व स्लाव्ह वंशाच्या लोकांत भग या शब्दाचे बग, बोगुस् इत्यादि अपभ्रंश देव या अर्थानें वापरले जात असल्यानें भगानें इंद्राला गर्भातच मारून टाकण्याचा प्रयत्न केल्याच्या आख्यानांतील ऐतिहासिक सत्य काय असावें, याची कल्पना येते. याच आख्यानाचा प्रतिध्वनि तैत्तिरीय संहितेंत ऐकूं येतो. ‘ देवा वै राजन्यात् जायमानात् अबिभयुः तम् अंतरेव सन्तम् दाम्ना अपौम्भन्त्स वा एषोऽपोब्धो जायते यत् राजन्यो यत् वा एषा अनपोब्धो जायेत वृत्रान् घ्नन् चरेत्, यं कामयेत राजन्यम् अनपाब्धो जायेत वृत्रान् घ्नन् चरेत् इति तस्मा एतं इंद्राबार्हस्पत्यं चरुं निर्वपेत्, ऐन्द्रो वै राजन्यो ब्रह्म बृहस्पतिः, ब्रह्मणैवेनं दाम्नोऽ पोम्भनान् मुञ्चति, हिरण्मयं दाम दक्षिणा, स क्षात् एवैनं दाम्नोऽपोम्भनात् मुञ्चति ( तै सं. २–४–१३ ) क्षत्रिय इंद्र जन्माला येत असल्याचें पाहून देव भ्याले आणि त्यांनीं त्याला गर्भातच पाशबद्ध केलें. त्यामुळें तो पाशबद्ध असाच जन्माला आला. तो पाशमुक्त झाला तर वृत्रांना मारीत फिरेल, अशी देवांना भीति वाटली. राजन्य पाशमुक्त असावा आणि त्यानें वृत्रांना मारीत फिरावें, असें ज्यांना वाटेल त्यांनीं इंद्रबृहस्पतिचरु त्याला अर्पण करावा. इंद्र राजन्य असून बृहस्पतिरूपी ब्रह्मा-कडून त्याची पाशापासून मुक्तता होऊं शकते, सुवर्णपाश ही दक्षिणा दिली कीं त्याची पाशापासून मुक्तता होते. उत्तराफाल्गुनींत इंद्राला पाशबद्ध केल्याची ही कथा पाहून यशोदेनें कृष्णाला दामोदर केल्यानंतर त्यानें यमलार्जुन वृक्ष पाडले, या प्रसंगाचें स्मरण होतें. या दोन आख्यानांचें मूळ एकच असलें पाहिजे.

## श्वान शिजविण्याची कथा

वामदेवाच्या इंद्रजन्मसूक्तांतील शेवटच्या ऋचेंत श्वानाचीं आंतडीं शिजविल्याचा उल्लेख आहे. ‘ अवर्त्या शुन आन्त्राणि पेच न देवषु विविदे मर्डितारम् । अपश्यम् जायाम् अमहीयमानाम् अध मे श्येनो मधुआ जभार ।।’ ( ४–१८–१३ ) ‘ संकटांत सांपडून मी कुत्र्याचीं आंतडीं शिजविलीं. देवांपैकीं कोणींहि तेव्हां माझ्यावर दया केली नाहीं. पत्नीची दुर्दशा मी पाहिली. तेव्हां श्येनानें मला मधु आणून दिला.’ वामदेवानें कुत्र्याचीं आंतडीं धर्मपालनाकरिताच शिजविलीं, असें बृहद्देवतेंत सांगितलें आहे. ‘ न त्यजेद् धर्ममर्यादाम् अपि क्लेशदशाम् गतः । वामदेवः शुनो धर्मम् पक्त्वात्राणि चचार यत् ।।’ एवढ्या उल्लेखानें त्या ऋचेचा फारसा कांहीं उलगडा होत नाहीं; पण ब्रह्मपुराणांतील ९३ वाव्या अध्यायांत

वामदेवाच्या स्थानीं विश्वामित्राचें नांव घालून त्यानें श्वमांस शिजविल्याचें जें आख्यान आलें आहे, त्याचा ज्योतिषाच्या दृष्टीनें विचार केला असतां हें कोडें उलगडतें. एकदा दुष्काळ पडला असतां विश्वामित्रानें आपल्या शिष्यांना मिळेल तें भक्ष्य आणण्याची आज्ञा केल्यावरून त्यांनीं एक मरून पडलेला कुत्रा विश्वामित्राकडे आणला. त्यानें तो कुत्राच शिजवून देव, ऋषि, पितर, अतिथि, गुरु या सर्वांना तृप्त करून नंतर त्याचें मांस भक्षण करण्याचा निश्चय केला. ही वार्ता देवदूत अग्नीनें इतर देवांना सांगितली. तेव्हां इंद्रानें श्येनरूपानें श्वमांस शिजवीत असलेली ती स्थालीच पळवून नेली. ही घटना शिष्यांनीं विश्वामित्रांना निवेदन केली असतां ऋषिवर्यांनीं हें श्येनरूपी इंद्राचेंच कर्म असल्याचें ओळखून त्याला शाप देण्याचा संकल्प केला. ‘ ततः चुकोप भगवान् शप्तुकामः तदा हरिम् । ततो ज्ञात्वा सुरपतिः स्थालीं चक्रे मधुप्लुताम् ।।’ पण ही मधुपूर्ण स्थाली पाहून भडकलेल्या ऋषींनीं इंद्राला आज्ञा केली कीं आम्हांला हा मध नको; आम्हांला आमचें श्वमांस परत दे. तेव्हां इंद्रानें उत्तर दिलें. ‘ मधु हुत्वा यथान्यायम् पिब पुत्रैः समन्वितः। किमनेन श्वमांसेन अमेध्येन महामुने ।।’ तेव्हां विश्वामित्रांनीं उत्तर दिलें कीं देवांनीं देशांत दुष्काळ पाडला असल्यानें मी आतां त्यांना श्वमांसाच्याच आहुति देणार; या आहुति नको असल्यास देशांत सुकाळ करा, म्हणजे मी या श्वमांसाच्या आहुति देणार नाहीं. तेव्हां इंद्रानें वृष्टि करून जगावरील संकट दूर केलें. या कथेंतील श्येनस्वरूपी इंद्र हा हस्ताचा तारकापुंज असून त्यानें श्वमांस शिजवितांना पळवून मधूनें भरून आणून दिलेली स्थाली अर्थात् सोमकलशच होय. इथें शिजविलें जात असलेलें श्वमांस इंद्राच्या सरमेचेंच मांस असावें. ब्रह्मपुराणांतील या आख्यानांत बृहद्देवतेंतील वामदेवाच्या स्थानीं विश्वामित्राचें जें नांव आलें आहे, तें कदाचित् वामदेवानें ऐतरेय ब्राह्मणांत सांगितल्याप्रमाणें विश्वामित्राचीं संपातसूक्तें आत्मसात् केल्यामुळें या दोघांच्या नांवांचा घोटाळा होऊं लागल्यानें आलें असेल. तें कसेंहि असो. वामदेवाच्या इंद्रजन्मसूक्तांतील त्या ऋचेचा उलगडा ब्रह्मपुराणांतील वरील आख्यानानेंच होऊं शकतो.

## इंद्र आणि कुत्स

इंद्र, सोम आणि वृत्र यांच्या परस्परसंबंधांच्या इतिहासांत ख्रि. पू. ४२०० हें शतक अतिशय महत्त्वाचें आहे. त्या शतकांत सध्या सायनसिंह ५ अंशापासून पुढें १०८ अंश पसरलेल्या वृत्राच्या मध्यांतून दक्षिणायनाची रेषा जात होती,

इतकेंच नव्हे तर वृत्राच्या पाठीवरील सोमकलशाचाहि त्या रेषेकडून छेद होत होता. हें स्थळ म्हणजे सायन कन्या २९ होय. या अंशांत उत्तरा फाल्गुनी नक्षत्र येतें. याच दिवसांत इंद्र हा आर्जुनेय कुत्साचा परममित्र बनला असावा. आर्जुनेय कुत्स म्हणजे अर्थात् अर्जुनी नक्षत्रावर येणारे वर्षा ऋतूंतील दुर्दिन. या कुत्साचें आणि इंद्राचें स्वरूप अगदीं सारखें असल्यानें इंद्रपत्नीला सुद्धा इंद्र कोण आणि कुत्स कोण हें म्हणें ओळखतां येत नसे.

प्रकरण सातवें

# दक्षिणायनाची परंपरा

## विशाखा हीच राधा

मूळनमुचीला मारून पृथ्वीवरील अवर्षणाचें युग संपवून इंद्रानें जेव्हां मुसळधार वृष्टि आरंभिली, तेव्हां त्याचा निवास ज्येष्ठा नक्षत्रांत होता. ‘ इंद्रो ज्येष्ठाम् अनुनक्षत्रमेति यस्मिन् वृत्रं वृत्रतूर्ये ततार । ’ या वचनांत इंद्र ज्येष्ठांत असल्याची स्मृति जशी टिकून राहिली आहे, तशीच ज्येष्ठांच्या अलीकडील अनुराधा नक्षत्र देवयानांत असल्याची स्मृतिहि ‘ तन् मित्र एति पथिभिः देवयानैः हिरण्मयैः वितते अंतरिक्षे । ’ ( तै. ब्रा. ३–१–२–१ ) या वचनांत टिकून राहिली आहे. अनुराधा हें मित्रदेवाचें नक्षत्र असून मित्र हें इंद्राचेंच एक पुरातन नाम आहे. अनुराधा नक्षत्राच्या अलीकडील विशाखा नक्षत्राचें मूळचें नांव राधा असून श्रीकृष्णाचा प्रियतमा राधा ती हीच, असें उत्तरहिंदुस्थानांतील एका विद्वान ज्योतिष्यांनीं प्रतिपादिलें आहे. या रम्य कल्पनेंत सत्यांशहि असेल. पण ही राधा श्रीकृष्णापूर्वी इंद्राची प्रिया बनली तेव्हां तिनें आपलें मूळचें नांव टाकून विशाखा हें नांव धारण केलें असावें. ‘ नक्षत्राणां अधिपत्नी विशाखे श्रेष्ठाविंद्राग्नी भुवनस्य गोपौ । ’ ( तै. ब्रा. ३–१–११ ) या वचनांत विशाखाराधेसह गोपांचाहि उल्लेख आहे. विशाखेनें आपलें नांव बदललें, तेव्हांपासून तिची प्रियसखी जी अनुराधा तिला आपल्या नांवाची सार्थकता पटवून देण्याकरितां पुनः पुनः पूर्वेतिहास सांगावा लागतो.

## पुष्य ही दुसरी राधा

विशाखा नक्षत्रांतून दक्षिणायनाची रेषा जात असतांना वसंतसंपात पुष्य नक्षत्रांत होता. ‘ राधे विशाखे पुष्ये तु ’ या अमरकोशाच्या वचनाप्रमाणें पुष्य आणि विशाखा या दोहोंना राधा नांव लाभण्याचें कारण कदाचित् हेंच असलें पाहिजे भारतीय ज्योतिष्यांच्या परंपरेप्रमाणें परस्परांच्या केंद्रात असणाऱ्या विशाखा आणि आश्लेषा या नक्षत्रांना कुलालचक्र ही संज्ञा लाभलेली आहे. त्वष्टा प्रजापति यानें आपला जामाता जो सूर्यनारायण, त्याला ज्या कुलालचक्रावर भ्रमवून त्याचें तेज शांत केलें, तीं हींच कुलालचक्रें. एक आयानिक वर्षाचें कुलालचक्र आणि दुसरें सांपातिक

वर्षाचें कुलालचक्र. ' विश्वकर्मा त्वनुज्ञातः शाकद्वीपे विवस्वतः । भ्रमिमारोप्य तत्तेजः शातनायोपचक्रमे । ' ( मार्कंडेय १०३–४० ) या पुराणांत सांगितल्याप्रमाणें ही घटना घडली, तेव्हां वैदिक शाकद्वीपांत निवास करीत होते. अर्वाचीन भारतांत नव्हे. या साऱ्या परंपरा पुराणांनीं साक्षेपानें जपून ठेवल्यामुळें त्यांचा आज अंशतः तरी उलगडा करणें शक्य झालें आहे. विशाखांत दक्षिणायन होतें, तेव्हांच इंद्र त्या नक्षत्राचा अधिपति झाला. पुढें वेदकालाच्या अंतीं शरत्संपात जेव्हां विशाखांमध्यें येऊं लागला, तेव्हां इंद्रासह अग्नीलाहि त्याचें अधिपत्य लाभलें. तैत्तिरीय ब्राह्मणांतील विशाखावर्णनांत ' युगानि परस्तात् ' असा उल्लेख आला आहे. त्यावरून विशाखांपासून एक युगांतर चालू झालें, अशी भावना त्या ग्रंथाच्या काळींहि असल्याचें कळून येतें. विशाखांत दक्षिणायन होत असतांना वसंतसंपात आश्लेषा आणि पुष्य या परस्परांच्या अतिसन्निध असलेल्या नक्षत्रांत होता. आश्लेषांतील वसंतसंपाताच्या काळींच पृथ्वी शेषाच्या पाठीवर अधिष्ठित असल्याची कल्पना रूढ झाली, इतकेंच नव्हे तर पृथ्वीलाहि सर्पराज्ञी ही संज्ञा प्राप्त झाली. कारण आश्लेषा नक्षत्राची देवता सर्प हीच आहे. भारत, इराक आणि ग्रीस या तीनहि देशांच्या पुराणांतून आश्लेषा नक्षत्राला सर्पच मानतात. भारतीय पुराणांतील शेषाप्रमाणेंच प्राचीन इराकमधील पुराणांत तैमात नांवाच्या सर्पाच्यापाठीवर पृथ्वी अधिष्ठित असल्याची कल्पना केली आहे. आश्लेषांची देवता सर्पअसल्यामुळेंच त्या नक्षत्रपुंजाला सर्पाचें वारूळहि म्हणतात. याच वारुळाचा उल्लेख कालिदासानें ' वल्मीकाग्रात् प्रभवति धनुःखंडमाखंडलस्य ।' या चरणांत केला आहे. आश्लेषा आणि पुष्य हीं नक्षत्रें परस्परांच्या अतिसान्निध असल्यानें आश्लेषांपासून वसंतसंपात मानणारे अहि आणि पुष्यापासून वसंतसंपात मानणारे वैदिक आर्य यांच्यांत जुन्या नव्या पंचांगांच्या अभिमान्यांइतकींच तीव्र भांडणें होतीं. या कलहांचा प्रतिध्वनि महाभारताच्या प्रारंभीं आलेल्या पौष्यपर्वांत ऐकूं येतो. या पर्वांत उत्तंकानें पौष्य राजाच्या राणीकडून मागून आणलेलीं कुंडलें पळवून वारुळांत शिरणारा नाग आश्लेषांचा अधिपतिच आहे. याच पर्वांतील उत्तंककृत अश्विनीकुमारांचें स्तोत्र हें त्या देवांचें रहस्य उकलण्याच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. पण ज्योतिषाची दृष्टिच नसणाऱ्यांना त्याचा कांहींच बोध व्हावयाचा नाहीं. असो.

## पुष्यापासून पंचांगपरंपरा

पुष्य नक्षत्रांत वसंतसंपात आला, त्या काळापासूनची वैदिक आर्यांच्या

पंचांगाची परंपरा आज सांगतां येते. पुष्याला प्राचीन काळीं तिष्य, कश्यप, कूर्म इत्यादि संज्ञा होत्या. कश्यपापासूनच सर्व आदित्यांना प्रकाश लाभतो, ( ते अस्मै सर्वे कश्यपात् ज्योतिः लभन्ते ) ( तै. आ. १–७ ) असें श्रुतिवचनहि आहे. याहून अधिक स्पष्ट वचन अथर्ववेदांत आढळतें. ' कालः प्रजा असृजत. कालो अग्रे प्रजापतिम् । स्वयंभूः कश्यपः कालात् तपः कालात् अजायत ॥' ( १९–५३ –१० ) म्हणजे प्रजा, प्रजापति, स्वयंभू कश्यप आणि तप कालापासूनच उद्भवलें. वेदवाङ्मयांत प्रजापतीचा अर्थ संवत्सर असा होत असल्यानें स्वयंभू प्रजापति म्हणजे पुष्य नक्षत्र संवत्सराच्या प्रारंभीं असल्याचा पुरावा या श्लोकांत आहे, हें स्पष्टच आहे. याच परंपरेसंबंधीं शतपथकारांनीं लिहिलें आहे. ' स यत् कूर्मो नाम । एतत् वै रूपं कृत्वा प्रजापतिः प्रजा असृजत । यत् असृजत तत् अकरोत् । तत् यत् अकरोत तस्मात् कूर्मः । कश्यपो वै कूर्मः तस्मात् आहुः सर्वाः प्रजाः काश्यप्यः इति । स यः स कूर्मः असौ स आदित्यः ।' ( शतपथ ७–५–५ ) आतां कूर्म शब्दा-संबंधीं विचार करूं. हें कूर्मरूप धारण करून प्रजापतीनें प्रजेची सृष्टि केली. ही जी कृति त्यानें केली, त्या कृतींतील कृ धातूवरून त्याला कूर्म हें नांव लाभलें. कश्यप आणि कूर्म एकच. याकरितांच साऱ्या प्रजेला कश्यपाची संतति म्हणतात. हा जो कूर्म तोच आदित्य.

## मधुमास आणि मधाचें पोळें

कश्यप प्रजापति हें नांव सर्वांनाच सुविदित आहे. पण त्याचा अर्थ कश्यपा-पासून म्हणजे पुष्य नक्षत्रापासून चालू होणारा संवत्सर असा आहे, हें कोणाला माहीत नाहीं. वैदिक आर्यांच्या परिभाषेंत अग्नि हा ऋतु ( अर्थात् पहिला ऋतु ) आणि प्रजापति हा संवत्सर आहे. उदाहरणार्थ, पुढील वचन पहा. ' अग्निः ऋतुः प्रजापतिः संवत्सरः' ( तै. ब्रा. ३–१०–९–८ ) त्याच्याच थोडें पुढें दशम अनुवाकाच्या आरंभीं म्हटलें आहे. ' इत्थं वाव सरघा । तस्या अग्निरेव सारघं मधु ।' तेव्हां अग्नि हें ऋतूचें नांव होतें, इतकेंच नव्हे तर त्या ऋतूलाच मधमाशांनीं पोळ्यांतून काढलेला मधु असेंहि म्हणत. ऋग्वेदकालीन सौर वर्षाचा प्रथममास जो मधुमास, त्याला पुष्यनक्षत्रांतील मधमाशांच्या पोळ्यावरूनच मधु ही संज्ञा लाभली होती. पुष्य नक्षत्राला ग्रीकरोमन लोकहि मधमाशांचें पोळें म्हणत. या नक्षत्राच्या उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील दोन ताऱ्यांना वैदिक आणि पाश्चात्य आर्यांनीं गर्दभ ही संज्ञा दिली असल्यानें पाश्चात्यांत पुष्याला गाढवांची

गवाणिहि म्हणतात. यज्ञवेदीची रचना करतांना या गर्दभांचा संदर्भ येतो. अथर्ववेदांत पुष्याला मधुकशा हें नांव दिलें असून त्याच्यावर स्वतंत्र सूक्तहि रचलेलें आहे. त्या सूक्तांत मधुकशेला 'माता आदित्यानाम् दुहिता वसूनाम्' असें म्हटलें असल्यानें हें पुष्य नक्षत्राचेंच वर्णन असल्याचें सिद्ध होतें. याच सूक्तांत 'अश्विना सारघेण मा मधुङ्क्तं शुभस्पती।' असा उल्लेख असल्यानें अग्नीला सारघ मधु हें नांव कसें लाभलें, याचें दिग्दर्शन होतें. 'यो वै कशायाः सप्त मधूनि वेद मधुमान् भवति। ब्राह्मणश्च राजा च धेनुश्च अनड्वांश्च व्रीहिश्च यवश्च मधु सप्तमम्। (अथर्व ९-१-२२) या मधुगणनेवरून पुष्याचे तेव्हां सात तारे मानत असून त्या सात ताऱ्यांचे सात मधु ब्राह्मण, राजा, धेनु, वृषभ, व्रीहि, यव आणि मधु असे मानले जात असल्याचें व्यक्त होतें. त्या काळीं आर्यांनीं बहुधा अश्वयुगांत प्रवेश केला नव्हता. त्यामुळेंच मधूचे भोक्ते जे अश्विनीकुमार त्यांना रासभरथांतून मिरवावें लागतें.

## पुष्य हाच भृंगी

पुष्याला ग्रीक आणि मिसरमधील समांजातहि भृंग अशी संज्ञा होती. या संज्ञेचा अवशेषहि शंकराच्या गणांतील भृंगी या नामांत आपल्या परंपरेंत राहून गेला आहे. आर्द्रा नक्षत्रांतील रुद्राच्या शेजारींच सायन कर्क ० अंशापासून सिंह १६ अंशापर्यंत पाश्चात्य ज्योतिष्यांत प्रसिद्ध असलेला एकशृंग (मोनोसेरोस) नांवाचा तारकापुंज आहे. हाच शंकराच्या गणांतील सर्वांत प्रमुख शृंगी, या शृंगीच्या शेजारींच सायन सिंह ७॥ अंशांच्या आसपास असलेलें पुष्य नक्षत्र हेंच भृंगी. येथें उल्लेखिलेला शृंगी हाच रामायणांतील ऋष्यशृंग ऋषि असून या प्रश्नाची चर्चा पुढें करतां येईल.

## आर्द्रापासून दशांचा प्रारंभ

पुष्य नक्षत्राचें शंकराच्या गणांत रूपांतर होण्यापूर्वी एकदा रुद्रानें आदित्यावर चढाईच केली 'देवा एव यज्ञात् रुद्रम् अंतरायन्। स आदित्यान् अन्वाक्रमत। ते द्विदेवत्यान् प्रापद्यन्त। तान् न प्रति प्रायच्छन।' (तै. सं. ६-५-६) म्हणजे देवांनींच रुद्राला यज्ञापासून दूर केला, तेव्हां त्यानें आदित्यावर आक्रमण केलें. आदित्यांनीं द्विदेवत्यांचा (पुनर्वसूंतील अश्विनीकुमारांचा) आश्रय घेतला. या कथेचा अर्थ हा कीं पुष्य आणि पुनर्वसू या नक्षत्रांतून वसंतसंपात असतांना पुष्यांतील सात आदित्य आणि त्यांची माता अदिती यांचेंच यज्ञविधींत सारें महत्त्व होतें.

तेव्हां रुद्राला यज्ञविधींत कोणी विचारीत नव्हतें. पण पुनर्वसूंतील वसंतसंपात मागें सरकून जसा आर्द्रा या रुद्रनक्षत्राकडे येऊं लागला, तेव्हां रुद्रानें आदित्यावर आक्रमण केल्याचें आख्यान उत्पन्न झालें. आर्द्रा नक्षत्रांत वसंतसंपात आल्या-वेळेपासूनची भारतीय फलज्योतिषाची परंपरा आज उपलब्ध आहे. आपल्या दशापद्धतींतील अत्यंत प्राचीन दशा अष्टोत्तरी आणि योगिनी असून या दोनहि दशांचा प्रारंभ आर्द्रा नक्षत्रापासून होतो. तेव्हां वेदकालनिर्णय या ग्रंथांत कै. टिळकांनीं ज्या मृगयुगाची स्थापना केली, त्याच्यापूर्वी सातआठशें वर्षांपासून तरी वैदिक आर्यांना फलज्योतिषाचीं मूलतत्वें चांगल्या प्रकारें अवगत झालीं होतीं; इतकेंच नव्हे तर त्यांना राहुकेतूंचें गणितहि आयत्त झालें होतें, असें निश्चितपणें सांगतां येतें. कारण अष्टोत्तरी दशेंत एकट्या राहूचाच अंतर्भाव केला असला तरी त्या राहूसहच केतूचाहि त्यांना परिचय झाला होता, असें तर्कशास्त्राप्रमाणें म्हणावें लागतें. आजहि बहुतेक सायन ज्योतिषी कुंडली मांडतांना एकट्या राहूचाच उल्लेख करीत असले तरी त्याच्या प्रतियोगांतील केतूचें त्यांना ज्ञानच नाहीं, असा कोणी आक्षेप घेत नाहीं. आर्द्रा नक्षत्राची देवता रुद्र असल्यानेंच त्या नक्षत्रांत वसंतसंपात आल्यानंतर अग्नि हें रुद्राचें सौम्य स्वरूप असल्याच्या परंपरा प्रचलित झाल्या असाव्या. तत्पूर्वी आर्द्रांच्या प्रतियोगांतील मूळ नक्षत्रांत दाक्षिणायन असतांना रुद्रानें रुद्रावताराचा जगाला अनुभव दिलाच होता. श्रुतींमध्यें ग्रह आणि राहु यांचे स्पष्ट उल्लेख अथर्ववेदाच्या एकोणिसाव्या कांडांतील शांतिसूक्तांत आढळतात. ‘ शं नो दिविचरा ग्रहाः । शं नो ग्रहाः चंद्रमसाः । शमादित्यांश्च राहुणा । ’

## शिबिकथेचा उलगडा

विशाखा नक्षत्रांत शरत्संपात आला असतांना त्या नक्षत्राचे देव जे इंद्र आणि अग्नि यांच्यापैकीं इंद्रानें श्येनाचें रूप घेऊन कपोताचें रूप घेतलेल्या अग्नीचा पाटलाग आरंभिला. तेव्हां श्येनाच्या तावडींतून सुटण्याकरितां कपोतानें शिबिनृपाचा आश्रय घेतला. पण आपलें भक्ष्य आपल्याला मिळालेंच पाहिजे, असा हट्ट श्येनानें धरल्यानें राजानें त्याला कपोताच्या भारंभार आपलें स्वतःचें मांस द्यावयाचें मान्य केलें आणि कपोताला तूळ राशीच्या एका पारड्यांत बसवून दुसऱ्या पारड्यांत स्वतःचें मांस टाकण्याला प्रारंभ केला. पण राजाचें मांस संपलें तरी कपोताचें पारडें कांहीं हलेना. हें सारें आख्यान तूळ राशीचीं पारडीं आणि इंद्राग्नींचीं पक्षिसृष्टींतील प्रतीकें यांच्या नांवांवर श्लेष करून रचलेलें आहे.

## प्रकरण आठवें

# उशना कवि

### इंद्राची उशना कवीशीं युति

उशना कवि हा अतिप्राचीन काळीं होऊन गेला, असे तुरळक उल्लेख ऋग्वेदांत आढळतात. ' त्वम् वृधः इंद्र पूर्व्यः भूः वरिवस्यन् उशने काव्याय। ( ६–२०=२१ ) या वचनांत पूर्व्यः भूः ' अशा इंद्रानें म्हणजे पूर्वीच्या एखाद्या आपल्या अवतारांत इंद्रानें उशना कवीवर कृपा केल्याचा उल्लेख आला आहे. पुढील ऋचेंत सोमाची उशन्याशीं तुलना केलेली आढळते. ' ऋषिः विप्रः पुरएता जनानाम् ऋभुः धीरः उशना काव्येन । स चित् विवेद निहितं यत् आसाम् अपीच्यं गुह्यं नाम गोनाम् ।। ' ( ९–८७–३ ) हें सोमसूक्तांतील वचन असल्यानें, सोम हा ऋषि, विप्र, ऋभु, धीर असा असून काव्यप्रतिभेनें जणूं दुसरा उशना कविच आहे; त्यालाच या धेनूंचें गुप्त नाम विदित आहे, असा या ऋचेचा अर्थ होतो. उशना कवीसंबंधीं अत्यंत महत्त्वाच्या दोन ऋचा पहिल्या मंडलाच्या ५१ या सूक्तांत आल्या आहेत. ' तक्षत् यत् ते उशना सहसा सहः वि रोदसी मज्मना बाधते शवः। आ त्वा वातस्य नृमणोः मनोयुज आपूर्यमाणम् अवहन् अभिश्रवः ।। ( १–५१–१० ) मन्दिष्ट यत् उशने काव्ये सचा इंद्र वंकू वंकुतरा अधितिष्ठति । उग्रो, ययिम् निः अपः स्रोतसा असृजत् वि शुष्णस्य दृंहिताः ऐरयत् पुराः ।। ( १–५१–११ ) या ऋचांचा अर्थ मीं अंशतः कै. शंकर पांडुरंग पंडित यांच्या ' वेदार्थयत्नाच्या ' च्या आधारानें आणि अंशतः कोशांच्या आधारानें पुढीलप्रमाणें लाविला आहे. ' हे इंद्रा, जेव्हां उशना कवीनें तुझ्या सामर्थ्याशीं आपल्या सामर्थ्याची युति घडवून आणली, तेव्हांच रोदसी म्हणजे द्यू आणि पृथिवी या दोघी, एक एका टोकाला आणि दुसरी दुसऱ्या टोकाला, अशा गेल्या. हे नरहितचिंतक इंद्रा, मनांत येतांच जुंपले जाणारे वायूचे अश्व तुझ्याकरितां सिद्ध केलेल्या हविरत्नाकडे तुला घेऊन आले. जेव्हां इंद्र उशनाकाव्यासह सोमपान करून तल्लीन झाला, तेव्हां तो वायूच्या वक्र आणि वक्रतर गति असणाऱ्या अश्वांवर आरूढ झाला आणि त्या उग्र इंद्रानें ययि देवाकरितां उदकांचे प्रवाह मुक्त केले आणि शुष्णाचीं पुरें विदारलीं. ' वरील

ऋचांतील ' विबाधते ' या पदाचा अर्थ कै. पंडितांनीं असा केला आहे, ' विबाधते विविधं एकाम् एकस्यान् दिशि अन्याम् अन्यस्याम् दिशि व्यस्तवत् । ' ' तक्षत् ' या पदाचा अर्थ करतांना कोशांतील तासणें आणि आच्छादणें या दोन अर्थांपैकीं आच्छादणें अर्थात् युति करणें हा अर्थ मी स्वीकारला आहे. उशना कवीनें इंद्राचें सामर्थ्य तासलें नसून त्याच्या सामर्थ्याशीं आपल्या सामर्थ्याची युति घडवून आणली, असाच त्या ऋचेचा भावार्थ आहे. उशना आणि इंद्र यांची युति झाल्या-नंतर उभयतांनीं स्वाभाविकपणेंच सोमाचें सहपान केलें आणि मग वायूच्या वक्रगामी अश्वांवर इंद्र आरूढ झाला. या साऱ्या विधानांचा निष्कर्ष असा निघतो कीं वायु देवाच्या स्वाति नक्षत्रालाच ऋग्वेदांत उशना कवि हें नांव दिलेलें आहे आणि इंद्रानें उशन्याशीं युति केली, याचा अर्थ असा कीं तेव्हां दक्षिणायनाचा बिंदु स्वाति नक्षत्रांत आला होता.

## वायूचा सारथि इंद्र

वायु आणि इंद्र या उभयतांनीं आपसांत संगनमत करून प्रथम सोम पिण्याचा मान कसा वांटून घेतला, यासंबधीं एक कथा ऐतरेय ब्राह्मणांत आली आहे. प्रथम सोम पिण्याच्या मानासाठीं साऱ्या देवांत स्पर्धा झाली असतांना वायुच विजयी होणार हें पाहून इंद्रानें वायूला सुचविलें कीं आपण दोघे ही स्पर्धा एकत्र जिंकूं आणि सोमरसाच्या समान भागाचें सेवन करूं. पण ही गोष्ट वायूनें अमान्य केली. तेव्हां इंद्रानें सोमरसाचा तिसरा भाग आपल्याला मिळाला तरी पुरें, असें सुचविलें. पण तेंहि म्हणणें वायूनें अमान्य केलें. सरतेशेवटीं इंद्रानें वायूला गळ घातली कीं मला निदान चौथा भाग तरी दे. तें म्हणणें मान्य झालें आणि मग वायु आणि इंद्र या उभयतांनीं सारख्याच वेळांत ती स्पर्धा पूर्ण केली, अशी घोषणा झाली. प्राचीन काळीं रथीनें मिळविलेल्या लुटीचा चौथा भाग सारथ्याला लाभत असे. वायु आणि इंद्र यांच्या जोडींत वायूच्या चतुर्थांश सोम इंद्राच्या वांट्याला आल्यानें इंद्र हा त्याचा सारथि ठरला. ' ज्या येई लघुता न अन्यसदनीं ऐसा न कोणीचहि ।' या नियमानेंहि या काळीं इंद्र वायूच्या सदनीं निवासासाठीं आला असला पाहिजे. प्राचीन ग्रीकरोमन लोकहि स्वाति नक्षत्र हें वादळाचें नक्षत्र म्हणून ओळखत आणि त्याचबरोबर न्यायदेवतेचें नक्षत्र म्हणूनहि ओळखत. कर्नाटकांतील लोकांतहि स्वातीच्या वादळांची अशीच प्रसिद्धि आहे. असल्या वादळी नक्षत्रांत इंद्राचें आगमन झाल्यानंतर द्यावापृथिवी या

एक एका टोकाला आणि दुसरी दुसऱ्या टोकाला, गेल्या असल्या तर त्यांत नवल काय! असो, उशना कवीसंबंधींच्या वरील ऋचांतील वर्णनावरून उशना कवि इंद्रासह एकाच रथावर आरूढ होत होता आणि सोमरसाचें सहपान करीत होता, ही गोष्ट सिद्ध आहे. ऐतरेयांतील आख्यायिकेवरून इंद्र हा वायूचा सारथि म्हणून ओळखला जात होता आणि सारथ्याचा चतुर्थांश त्याच्याकडून संपादन करीत होता, असें कळून येतें. या दोन कथांचा मेळ घातला म्हणजे वरील ऋचांतील उशना कवि हा आर्यांचा परिचित वायु देवच असल्याचें कळून येतें. इथें प्रश्न येवढाच उपस्थित होतो कीं इंद्राचें स्वाति नक्षत्रांत आगमन झालें, तेव्हां उशना हा असुरगुरु झाला होता कीं नाहीं? मला वाटतें कीं त्या काळीं इराणांतील असुरांची संस्कृतिसुद्धा वैदिक आर्यांच्या संस्कृतीहून सर्वस्वीं भिन्न झाली नसावी. प्रजापतीनें जेव्हां कन्या राशींत प्रवेश केला तेव्हांपासून, म्हणजे चित्रा नक्षत्रांत दक्षिणायनाचें प्रारंभस्थान आल्यापासून त्याच्या कन्यागमनाविरुद्ध जेव्हां वैदिक आर्यांनीं आख्यानें रचण्याला प्रारंभ केला, तेव्हांपासून या दोन संस्कृतींचे संबंध दुरावत गेले. उशना कवीचें शुक्रग्रहांत रूपांतर होऊन इराकी असुरांनीं त्याची उपासना आरंभिल्यानंतर उशना हा असुरगुरु बनला.

## कन्या राशि हीच देवयानी

उशना कवीचें निवासस्थान स्वाति नक्षत्रांत आहे, हें उघडकीला आलें म्हणजे कचदेवयानी आख्यानाचें रहस्य क्रमाक्रमानें उकलूं लागतें. उशना कवि हा स्वतः असुर पक्षाचा, पण त्याची कन्या मात्र देवयानी. याचा अर्थ हा कीं तेव्हां आकाशांतील कन्या राशि ही पूर्णपणें देवयानांत होती, म्हणून तिला देवयानी म्हणत. उशना कवीनें कुबेराचें धन लुटलें म्हणून शंकरानें त्याला गिळून टाकलें, त्यानंतर तो शंकराच्या लिंगांतून शुक्ररूपानें बाहेर पडला, असें आख्यान शांतिपर्वांत आलें आहे. स्वातीचा तारा पुढें भूतेशरुद्रांत समाविष्ट झाला, या प्रसंगाला अनुलक्षून ही कथा रचलेली दिसते. उशना कवीला संजीवनी मंत्र येणें स्वाभाविकच आहे. कारण वायूच्या स्वाति नक्षत्रावर अधिकार चालविणाऱ्या उशना कवीची सत्ता प्राणवायूवरहि चाललीच पाहिजे. त्याचप्रमाणें 'वायुः सोमस्य रक्षिता' या श्रुतीप्रमाणें अमृतत्व अर्पण करणाऱ्या सोमकलशावरील वायूच्या अधिकारांतहि उशनाकवि हा सहभागी असलाच पाहिजे. स्वातीसमीप

...८

असलेला सप्तर्षि हाच उशना कवीचा प्रतिस्पर्धी बृहस्पति. स्वातीच्या ताऱ्याला ग्रीकादि पाश्चात्य आर्य सप्तर्षींच्या बृहद्दक्षावरील पाहरेकरी असेंच म्हणतात. सप्तर्षींच्या खालीं आणि सिंह राशीच्या वरती कन्या राशिजवळच असलेला बेरेनिचे राणीचा केशकलाप हाच कचदेवयानी आख्यानांतील कच. हस्त नक्षत्रांतील त्रित ज्या लांडग्यांना भ्याला, त्याच लांडग्यांना असुरांनीं कचाचा देह खावयाला घातला. या लांडग्यांना बुजून त्रित ज्या कूपांत पडला, त्याच कूपांत देवयानीला शर्मिष्ठेनें लोटून दिलें. मागें एका प्रबंधांत मी असें दाखवून दिलें होतें कीं ग्रीक झेउस्मध्यें इंद्र आणि बृहस्पति यांचें मिश्रण झालें होतें. आपल्या बृहस्पतीचा पुत्र कच जसा मारला गेला, तसाच झेउस्चा पुत्र झाग्रेअेस् हाहि हेरेच्या मत्सरानें मारला गेला. त्या झेउस्च्या पट्टराणीच्या सांगण्यावरून तितनांनीं म्हणजे ग्रीक दैत्यांनीं झाग्रेओस्चे राईराईएवढे तुकडे केले; पण त्याचें हृदय मात्र जसेंच्या तसेंच ठेविलें. तें हृदय ग्रीकांची कुमारीदेवता जी आथेने, तिनें झेऊस्ला आणून दिलें. त्यानें तें सेमेलेला खावयाला दिलें आणि त्याच्या सेवनानंतर डायोनिसस् अथवा बॅकुस् हा ग्रीकांचा मदिरादेव तिच्या उदरीं जन्माला आला. आपल्या कचदेवया-नींच्या कथेंत कचाची रक्षा स्वतः उशना कवि सेवन करतो आणि त्याच्याच उदरांतून कच बाहेर येतो. त्यानंतर पश्चात्तप्त उशना हा मद्यपाननिषेधक बनतो. हीं सारीं साम्यें आणि वैषम्यें विचारणीय आहेत. असो.

## त्वष्टा हा उशना कवीचा पुत्र

उशना कवि हा स्वातींतील दक्षिणायनाचा देव मानला म्हणजे तेथून दक्षिणायनाचा बिंदु मागें सरून ज्या चित्रा नक्षत्रांत येतो, त्या चित्रा नक्षत्राचा अधिपति त्वष्टा हा उशना कवीचा पुत्र बनतो. त्याप्रमाणें पुराणपरंपरा असून त्याला आंगीपासून शंड, मर्क, वरुत्रिन् आणि त्वष्टा असे चार पुत्र झाल्याचा उल्लेख आहे. या चार पुत्रांपैकीं शंडश् याची उपासना आनाटोलिया प्रांतांत प्राचीन काळीं चालू होती. आपल्या यज्ञविधींतहि शंडामर्कांचा एकत्र उल्लेख येतो. त्वष्टा हा वैदिक परंपरेंतील पहिला प्रजापति म्हणून प्रसिद्ध आहे.

वैदिक परंपरेबाहेरील आर्यांच्या दैवतांत उशना कवीचें स्कंदनाभि देशांतल्या (स्कॅंडिनेव्हियन) पुराणांतील वोटान या दैवताशीं विशेष सादृश्य आहे. वोटान हा त्या देशाच्या पुराणांतील वातदेवच असून त्याच्या नांवाची व्युत्पत्तिहि तद्वाचक शब्दापासूनच आहे. उशना आणि वायु या उभयतांचा स्वाति नक्षत्राशीं संबंध

असल्यामुळें उशना कवीचा पर्यायानें वोटानशीं संबंध येतोच. पण त्यापेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट ही कीं वोटान आणि उशना हे दोघेहि एकाक्ष आहेत. वोटानचा एकमेव नेत्र हा सूर्य असावा, असा अभिप्राय तुलनात्मक दैवतशास्त्राच्या अनेक अभ्यासकांनीं व्यक्त केला असला तरी तो नेत्र म्हणजे स्वातीचा विशाल आणि तेजस्वी तारा असावा, असा माझा निष्कर्ष आहे. वोटानच्या सह गेरी आणि फ्रेकी नांवाचे दोन लांडगे असतात. लांडग्यांचा संबंध उशना कवीच्या आख्यानांतहि येतो, हें आपण वर पाहिलेंच आहे. वोटाननें प्रजापतीला शासन केल्याचें आख्यान जर्मनींत प्रचलित आहे, अशा आशयाचें प्रो. कून यांचें एक पत्र कै. राजेंद्रलाल मित्रांनीं आपल्या ' ऋष्य ' या प्रबंधांत छापलें आहे. उलटपक्षीं प्रजापतीला शासन करणाऱ्या रुद्रानें उशना कवीला आत्मसात् केल्याच्या महाभारतांतील आख्यानाचा उल्लेख वर आलाच आहे. त्या आख्यानानें उशना हा रुद्राशीं सायुज्यता प्राप्त करून घेऊन पर्यायानें प्रजापतीला शासन करणारा बनतोच. उशना हा कवि म्हणजे वैद्यराजहि आहे आणि रुद्रहि जलाषभेषज या नांवानें प्रसिद्ध आहे. शुक्राप्रमाणें वोटान हा स्वतः कवि नसला तरी त्याचा पुत्र ब्रागी हा कवि आहेच. ब्रागी हें नांव उशना कवीच्या सुविदित भृगु कुलाच्या नांवाशीं संबद्ध आहे, हें सांगायला नकोच. या साऱ्या प्रमाणांवरून उशना आणि वोटान यांची एकरूपता सुव्यक्त होते.

## वात हाच कवि

वरील मुद्रितें तपासतांना लाटिन भाषेंत वात या शब्दाचा अर्थ कवि होत असल्याचें होरेस कवीच्या एका वचनावरून ( vat ) ( Genus irritabile vatum ) कळून आलें. या शब्दामुळें वायु देवाचें उशना कवींत कसें परिवर्तन झालें असेल, याची कल्पना येते.

## ऋग्वेदांतील वल आणि रशियांतील व्होलोस्

उशना कवीच्या आख्यानांत कच हा अंतीं त्याचा पुत्र बनतो. या कचाशीं सदृश असा वोटानचा वालि नांवाचा पुत्र असून त्याच्या केसाला फणि लागण्यापूर्वीच त्यानें आपल्या वडिल भावाच्या मारेकऱ्याचा कांटा काढला, अशी कथा त्या पुराणांत प्रचलित आहे. या कथेवरून त्याचें सामर्थ्य सॅम्सन प्रमाणेंच त्याच्या केसांत होतें, हें उघड आहे, हें अगदीं अकल्पितपणें मला कळून आलें. ' इंद्रो यत् वज्री धृषमाणो अंधसा भिनत् वलस्य परिधिः इव त्रितः। ' या वचनांत त्रिताप्रमाणेंच इंद्रानें वलाचे परिधि फोडल्याचा उल्लेख आहे. ऋग्वेदांत वलाचा जिथें जिथें उल्लेख

येतो, तिथेंतिथें इंद्र, बृहस्पति, आंगिरस् यांच्यापैकीं कोणी तरी गाईंची मुक्तता केल्याचाहि उल्लेख येतो. वलाची चर्चा करतांना मी ' दाशराज्ञयुद्धांत ' कर्नल थॉमस होल्डिच यांच्या ' हिंदुस्थानाचीं प्रवेशद्वारें ' या ग्रंथाच्या ( गेटस ऑफ इंडिया ) २०१ पानावरील एक वाक्य उतरून घेतलें होतें. ' The Bolous or Belus lived in the plains to the north right up to the foot of the mountains, and these are the people (according to Longworth Dames) who hailing originally from the Caspian province are the typical Baluch-tribes-people to-day.' या अवतरणावरून असें समजतें कीं एके-काळीं कास्पियन समुद्रतीरावर राहणारे बोलुस् अथवा बेलुस् हेच सध्याचे बलुची लोक आहेत. १९४६ मध्यें ' दाशराज्ञ युद्ध ' प्रसिद्ध झाल्यानंतर यंदा अनपेक्षित-पणें ही गोष्ट माझ्या अवलोकनांत आली कीं प्राचीन काळीं स्लाव्ह समाजांत व्होलोस् नांवाचा एक पशुपाल देव होता. ऋग्वेदांतील देवासुरांचीं नांवें स्लाव्ह वंशांतील देवनामांत सांपडण्याचा हा कांहीं पहिलाच प्रसंग नव्हे. आपल्या भग देवाचें नांव हें रशियांतील देवाचें सामान्य नामच आहे. लिथुआनियांतील प्रजापति पेर्कोनोस् हाच ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांचा विषय झालेला पर्जन्यदेव आहे. स्लाव्ह वंशाचा सर्वांत प्रमुख देव आणि त्याचें निवासस्थान यांना स्वरोग या नांवानेंच ओळखतात. हा स्वरोग स्वर्गाचाच अपभ्रंश आहे, हें सांगायला नकोच. तेव्हां स्कंदनाभि देशांतील वलि आणि रशियांतील व्होलोस् यांचा इंद्रशत्रुवलाशीं संबंध असणें अगदीं शक्य आहे. हें विधान मी केवळ अक्षरसादृश्यावरून करीत नसून त्यांच्या आख्यायिकांमधील सादृश्यावरूनहि करीत आहे. केवळ अक्षरसादृश्यामरून पूर्वीं सेनार्त या फ्रेंच पंडितांनीं बलराम हाच ऋग्वेदांतील वल असावा, अशी कल्पना केली होती. पण हलधर बलराम हा आकाशांतील Bootes, अथवा भूतेश असून वल अथवा व्होलोस् हा बेरेनिचे राणीचा केशपाश असला पाहिजे. कारण रशियन भाषेंत व्होलोस याचा अर्थ केश होतो.

## केशीचें रुद्रासह विषपान

सध्या ज्याला बेरेनिचे राणीचा केशपाश म्हणतात, तो तारकापुंज ऋग्वेद-कालीन आर्यांना केशी या नांवानें सुपरिचित होता. उदाहरणार्थ ' केशी विषस्य पात्रेण यद्रुद्रेणापिबत् सह । ' या वचनांत भूतेश रुद्रासह विषपात्राचें सेवन करणारा म्हणजे रुद्रासह अस्तसमुद्राचें सेवन करणारा केशी हा वर उल्ले-

ाखिलेला तारकापुंजच आहे. मात्र ही घटना भारतांतील अक्षांशांत दृक्प्रत्ययाला येणारी नसून रशियांतील अक्षांशांत दिसून येणारी आहे. मुद्गलमुद्गलानींच्या सूक्तांतहि ' सारथिः अस्य केशी ' असा जो उल्लेख आहे, तो वरील केशीचाच आहे. इथें लक्षांत घेण्याजोगी घटना ही कीं पश्चिमेला रशियांत व्होलोस् केशीची उपासना करणारे आणि स्वतःहि तेंच नांव धारण करणारे जसे लोक होते, तसेच पूर्वेला मोंगोलियांतहि स्वतःला ' जटा ' म्हणविणारे आणि ( आपल्या पुराणांत वर्णिल्या-प्रमाणें ) परमेश्वराच्या क्रोधापासून आपली उत्पत्ति झाली असल्याचें अभिमानानें सांगणारे मोंगल लोक होते. या उभयतांमधील प्रदेशांतहि स्वतःला कशु, काशि, केशी म्हणविणारे शक लोक रहात असत. याप्रमाणें पश्चिमेपासून पूर्वेपर्यंत व्होलोस्, केशी, जटा इत्यादि नांवानीं ओळखले जाणारे जे समाज संचार करीत होते, त्याच्यांत कोणत्या तरी कारणांनीं केशी या तारकापुंजाला विशेष महत्त्व दिलें जात होतें, हें उघड आहे. बहुधा हे समाज धूमकेतूंच्या जातीचे असल्यानें आकाशांतील चिरंतन धूमकेतु अशा कल्पनेनें हे केशीची उपासना करीत असा-वेत. व्होलोस, केशी, जटा इत्यादि नामांच्याच परंपरेंतील कचदेवाचें नाम असून कश्यपसमुद्राजवळचे बोलुस् हे ज्या बलुचिस्थानांत सध्या स्थिर झाले आहेत. त्याच देशांत स्वतःला कच अथवा कज म्हणविणाऱ्या टोळ्यांचाहि निवास आहे. बलुचिस्थानांतील बोलुस कुळाचा रशियांतील व्होलोस् आणि ऋग्वेदांतील वल यांच्याशीं संबंध असल्यास त्यांच्यांत कच हें नांव सांपडायला पाहिजे, अशा अपेक्षेनें यंदा पुन्हा कर्नल सर थॉमस होल्डिच यांचा ग्रंथ चाळला आणि अपेक्षे-प्रमाणें त्या देशांत कच गंदव, कच मकरान् अशीं प्रांतनामें असल्याचें उघडकीला आलें. तेव्हां या संशोधनांत माझी दिशाभूल झाली नसावी, अशी अपेक्षा आहे.

## पणींचें मूलस्थान

वरील विवेचनानें इंद्राचा वल नामक शत्रु कोण, याचा निर्णय लागल्यानंतर त्याच्याच अनुरोधानें वलासहच ज्या पणींचा उल्लेख येतो, ते पणि कोण याचा विचार केला पाहिजे. वलाचा रशियाशीं संबंध असल्याचें उघडकीस आल्यानंतर पणींचाहि शोध त्याच देशांत करणें युक्त होईल. या कल्पनेनें रशियाची माहिती चाळत असतांना सायबेरियांतील ओबी नदीच्या उगमापासून लापलंडच्या बर्फा-च्छादित भागापर्यंतच्या विस्तृत आणि विरल वस्तीच्या प्रदेशांत फेनिक वंशाच्या आठ विभिन्न टोळ्या निवास करीत होत्या, असें कळून आलें. नित्य उपयुक्त

अशा गिबननें एका टीपेंत सांगितलें आहे. 'The eight tribes of the Fennic race are described in the curious work of M. Zeveque. Histoire des Peuples soumis a la Domination de La Russie. Tom I.P. 361-561.' या संदर्भांत सांगितलेलीं दोनशें पानें तपासल्यावांचून पणींचा अन्यत्र शोध करणें चूक होईल. विशेषतः ऋग्वेदांतील पणींशीं ज्या सरमेचें नांव निगडित झालें आहे, तिच्या नांवाशीं सदृश अशा सरमाटियन कुळाची वसती फार प्राचीन काळीं उराल पर्वतांत होती, असें गॉर्डन चाइल्ड यांनीं दाखविलें असून अवेस्ता ग्रंथांतहि इराणच्या वायव्येला सैरिमा प्रांत असल्याचा उल्लेख येत असल्यानें सरमा आणि पणि यांच्या सुप्रसिद्ध संवादाचें स्थळहि त्याच भागांत असलें पाहिजे. सरमापणि-संवादासंबंधीं विस्तृत, विद्वत्त्वपूर्ण आणि विफल विवेचन माझे दिवंगत मित्र डॉ. हरिअप्पा यांनीं त्यांच्या पदवीप्रबंधांत केलें आहे. या प्रबंधांत तैत्तिरीय आरण्य-कांतील पुढील अवतरण आढळलें. 'जाया भूमिः पतिः व्योम । मिथुनंः ता अतुर्यथाः ।। पुत्रौ बृहस्पतीरुद्रौ । सरमा इति स्त्री पुमम् ।। ' या वचनाचा टीका-कारांनीं जो अर्थ केला आहे, त्यावरून असें समजतें कीं द्यावापृथिवींचे बृहस्पति आणि रुद्र हे पुत्र असून सरमा ही कन्या होती. इथें बृहस्पति आणि रुद्र हीं नांवें एकत्र कशीं आलीं याचा उलगडा डॉ. हरिअप्पांना न झाल्यामुळें त्यांनीं त्यांचा विचित्र आणि विस्मयजनक युग्म ( a queer combination ) म्हणून उल्लेख केला आहे. बृहस्पति म्हणजे सप्तर्षि आणि ( Bootes ) भूतेश हा रुद्र हें ज्योतिषांतील रहस्य ज्यांना अविदित आहे, त्यांना या विस्मयजनक युग्माचा उलगडा व्हावयाचा नाहींच. या उभयतांसह सरमेचा उल्लेख आला असल्यानें तिचा लुब्धक व्याधाशीं कांहीं संबंध नसून ती सिंह राशींतील शुनी आहे, असेंच म्हणावें लागतें.

## स्वाति हाच स्यमंतक मणि

स्वातीचा तारा दक्षिणायनाच्या रेषेंत होता, त्याच काळांत कचदेवयानीचें आख्यान रचलें गेलें असावें, कारण पुढें त्या आख्यानाचा अर्थ वैदिक आर्यांनाहि कळेनासा झाला. कालांतरानें उशना कवि हा शुक्र ग्रह बनला आणि बृहस्पतीचें नांव बदललें नसलें तरी त्याचें गुरु ग्रहांत रूपांतर झालें. देवयानी या नांवाचा ज्योतिषशास्त्रांतील एका विशिष्ट घटनेशीं संबंध असल्याची स्मृति नष्ट झाली आणि कच हा तारकापुंज असल्याचें ज्ञानहि लुप्त झालें. ज्योतिषशास्त्रांतील या पुच्छ-

प्रगतीवरून देवयानी हें नांव जेव्हां सार्थ होतें, त्याच काळीं तिचें आख्यान रचलें गेलें, हें उघड आहे. त्या आख्यानाचा अर्थ लुप्त झाल्यानंतर कृष्णचरित्रकारांनीं स्वातीच्या ताऱ्याला अनुलक्षूनच स्यमंतकमण्याचें आख्यान रचलें. स्यमंतक मणि कंठीं बांधून प्रसेन मृगयेला असतांना त्याला सिंहानें मारलें आणि त्यानंतर त्या सिंहाला मारून आस्वलानें मणि आपल्या सदनीं नेला. सरतेशेवटीं कृष्णानें आस्वलाचा पराजय करून आणि त्याच्या मुलीशीं लग्न करून तो मणि आंदण म्हणून मिळविला. या कथेंतील स्यमंतक मणि हा स्वातीचा तारा असून त्यासाठींच सिंहराशींतील सिंहाची सप्तर्षिपुंजांतील अस्वलाशीं लढाई झाली. या आस्वलालाच ग्रीक कथाकारांनीं आस्वली बनवून नि तिला कॅलिस्टो हें नांव देऊन झेउस्‌ची एक प्रेयसी बनविलें. तेव्हां कृष्णपारिणीता अस्वली कोण, हें कोणालाहि आतां कळणें शक्य आहे. वेदांतील इंद्रहि विलिष्टेंगा नांवाच्या दानवीच्या नादीं लागून तिच्याजवळ स्त्रीवेषानें निवास करीत होता. ही विलिष्टेंगाहि कॅलिस्टोच असावी. कारण झेउस्‌नें स्त्रीवेषानेंच तिच्याशीं समागम केला होता. स्यमंतक मण्यामुळें वेळच्या वेळीं वृष्टि होत असे, असा उल्लेख हरिवंशांत आहे. त्यावरूनहि त्याचें तारकामय स्वरूप सुव्यक्त होतें.

## अथेन्सची देवयानी आथेने

ग्रीक परंपरेंतील कन्या राशीची एक देवता आथेने हिला पालास आथेने असें एक नांव असून त्या नांवाचा रशियन व्होलोस् देवाशीं संबंध असावा, असें वाटतें. कारण पालास् हें नांव अनेकदा पाल्लोस् आणि फाल्लोस् या रूपांतहि आढळून येतें. ग्रीक परंपरा अशी आहे की आथेने ही फाल्लोस्‌ची कन्या, पण तो राक्षस तिचा अभिलाष करूं लागला, तेव्हां आथेनेनें त्याला मारून टाकलें. अर्थात् अथेन्सच्या देवयानीचा त्यांच्या कचानें अभिलाष केला म्हणून तो मारला गेला. हें बहुधा कचदेवयानींच्या आख्यानाचें प्राचीनतम स्वरूप असावें.

प्रकरण नववें

# त्वष्टा

## त्रियांत लपणारा त्वष्टा

उशना कवीनंतर वैदिक देवतांमधील सर्वांत प्राचीन दैवत त्वष्टा प्रजापति. आठव्या मंडलांतील २९ साव्या सूक्ताच्या प्रारंभीं इंद्र आणि त्वष्टा यांची तुलना करतांना मारीच कश्यप म्हणतात. ‘ बभ्रुः एको विषुणः सूनरो युवा । अञ्जि अंक्ते हिरण्ययम् ।। १ ।। योनिम् एक आससाद द्योतनः । अंतः देवेषु मेधिरः।।२।। वाशीम् एको बिभर्ति हस्ते आयसीम् । अंतः देवेषु निध्रुवि ।। ३ ।। वज्रम् एको बिभर्ति हस्ते आहितम् । तेन वृत्राणि जिघ्नते ।। ४ ।। ’ एकजण किंचित् पिंगट, सर्वसंचारी, शूर आणि तरुण असून त्याच्या अंगावरील हिरण्यभूषण स्पष्टपणें दृग्गोचर होतें. दुसरा स्वस्थानीं विराजमान झालेला, देदीप्यमान् आणि अत्यंत प्रज्ञावान् आहे. एक आपल्या हातांत पोलादाची बर्ची धारण करून देवांमध्यें अचल उभा राहतो. एक आपल्या हातांत वज्र धारण करून वृत्रांचा निःपात करतो.’ इथें प्रथम ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं त्वष्ट्याच्या काळीं लोहयुग कधींच चालू झालें होतें. त्यामुळें त्या युगाचें प्रतीकच अशी पोलादाची बर्ची तो आपल्या हातांत धरतो. त्वष्टा हा चित्रा नक्षत्राचा अधिपति. ‘ हस्त एव अस्य हस्तः । ’ म्हणजे तैत्तिरीय ब्राह्मणाच्या मताप्रमाणें हस्त नक्षत्र हाच त्याचा हात. या हस्त नक्षत्राच्या आकाशांतील आकृतीला अनुलक्षूनच त्याच्या हातीं पोलादी बर्ची असल्याची कल्पना केलेली दिसते. त्वष्ट्याच्या अवयवांपैकीं केवळ त्याच्या हातांचा सुपाणि असा उल्लेख ऋग्वेदांत अनेकदा येतो. त्वष्ट्याप्रमाणेंच सवित्याच्याहि हातांचा वेदांत वारंवार उल्लेख येतो. पण त्वष्टा आणि सविता हे सामान्यतः एकरूपच मानलेले आहेत. ‘ गर्भे नु नौ जनिता दंपती कर् देवः त्वष्टा सविता विश्वरूपः ।’ ( १०–१०–५ ) या वचनांत त्वष्ट्यालाच सविता आणि विश्वरूप हीं नांवें लाविलीं आहेत. इतके ते एकात्म असले तरी देवांविषयीं कथानकें रचणाऱ्यांनीं त्यांचें विभिन्न अस्तित्व गृहीत धरलेलें आहे. त्वष्टा हा अत्यंत कुशल कारागीर म्हणून प्रसिद्ध होता. जगांतील सर्व वस्तुमात्रांना आणि प्राणिमात्रांना त्यानेंच रूप दिलें असलें तरी त्यांतल्या त्यांत त्याचा चमस हा वेदांत

फार प्रसिद्ध आहे. इंद्राला त्याचें वज्र त्वष्ट्यानेंच ( त्वष्टास्मै स्वर्यं वज्रं ततक्ष ) करून दिलें असलें तरी त्याचा त्याला आपल्या चमसाइतका अभिमान नव्हता. त्याच्या चमसाचे ऋभूंनीं चार चमस केले, ( उत त्यं चमसं नवं त्वष्टु र्देवस्य निष्कृतम् । अकर्त चतुरः पुनः ॥ १–२०–६ ) तेव्हां तो लाजेनें स्त्रियांमध्यें वदन लपवून बसला. ' यदा अवाख्यत्चमसान् चतुरः कृतान् आत् इत् त्वष्टा ग्नासु अंतःनि आनजे । ( १–१६१–४ ) या वचनांतील चार चमसांचा साऱ्याच अनुवादकांनीं अयनबिंदु आणि संपातबिंदु यांच्याशीं संबंध जोडला असल्यानें त्वष्टा स्त्रियांत लपून बसला, याचा अर्थ त्याकाळीं दक्षिणायन चालू होत असलेल्या कन्या राशींत त्वष्ट्याचा निवास होता, असा करावा लागतो. त्वष्ट्याच्या काळीं म्हणजे दक्षिणायन कन्या राशींत होत होतें, त्या काळीं ऋषींना राशींची कल्पना होती कीं नाहीं, याविषयीं अनेकांना संशय येतो. वस्तुतः तसा संशय येण्याचें कांहींहि कारण नाहीं, हें ( १–१६१–५ ) पुढील ऋचेवरून दिसून येईल. ' हनाम एनान् इति त्वष्टा यत् अब्रवीत् चमसम् ये देवपानम् अनिंदिषुः ॥ अन्या नामानि कृण्वते सुते सचा अन्यैः एनान् कन्या नामभिः स्परत् ॥' म्हणजे देवांचें पानपात्र यांनीं निंदिलें म्हणून यांना मारूं, असें त्वष्टा म्हणाला; तेव्हांपासून कन्या ही सोमसवनाच्या प्रसंगीं अन्य नामें धारण करणाऱ्या ऋभूंवर अन्य नामांनींच प्रेम करूं लागली. या ऋचेंत कन्या राशीचा स्पष्ट उल्लेखच आहे, याविषयीं निदान ज्योतिष जाणणाऱ्यांत तरी दुमत होणार नाहीं.

## त्वष्टा हाच अहुरमझ्द

वर देवांचें पानपात्र म्हणून उल्लेखिलेल्या चमसाला १–११०–३ या ठिकाणीं ' असुरस्य भक्षणम् ' म्हणजे असुरसेवित अशी संज्ञा दिली आहे. यावरून त्वष्टा हा असुर होता, हें कळून येतें. तो मेधिर् म्हणजे अत्यंत ज्ञानी असल्याचें वर आलेंच आहे. अहुर मझ्द या शब्दाची असुर मेधस् ही व्युत्पत्ति सत्य असल्यास त्वष्ट्याच्या उपासनेचें जरथुस्त्रानें अंशतःतरी अहुरमझ्दाच्या उपासनेंत रूपांतर घडवून आणलें असावें, असें अनुमान काढावें लागतें. पुरुषमेधांतील बळींमध्यें, मेधायै रथकारम् ' म्हणजे मेधा देवतेला रथकार बळी द्यावा, त्याचप्रमाणें ' हेत्यै धनुष्कारम् ' म्हणजे हेति देवतेला धनुष्यें करणारा बळी द्यावा यासारखे जे उल्लेख आहेत, ते वैदिक आर्यांच्या शेजाऱ्यांच्या देवतांना अनुलक्षून आहेत कीं काय अशी शंका येते. जरथुस्त्राच्या नांवातील उस्त्र हा त्याच्या त्वाष्ट्र परंपरेचाच

द्योतक आहे. कारण अरुण वर्णाचा उष्ट्र हा प्रजापतीच्या वीर्यापासून निर्माण झाला असून गृह्यसूत्रांतील उष्ट्राच्या स्तुतीमध्यें तूं त्वष्टा देव आहेस, असाहि उल्लेख आढळतो.

## चित्र म्हणजे पुत्र

अथर्ववेदांत त्वष्ट्याच्या हातांतील सोमकलशाचा उल्लेख आला आहे. ' सोमेन पूर्णं कलशं बिभर्षि त्वष्टा रूपाणां जनिता पशूनाम् ।' ( अ. वे. ९–४–६ ) वर उल्लेख केल्याप्रमाणें हस्त नक्षत्र हा नक्षत्रिय प्रजापतीचा हस्त असल्याकारणानें त्या हस्ताशेजारचा चषक अथवा क्रेटर हा तारकापुंजच त्वष्टा प्रजापतीचा सोमकलश होऊं शकतो. ' भूरिरेता ' सोमप्रिय त्वष्टा हा केवळ पशूंचाच जनिता नसून अखिल विश्वांतील सर्व विविध प्रजेचा तो जनिता आहे. त्याला प्रजेचा हव्यास फार होता, असें तैत्तिरीय ब्राह्मणावरून समजतें. ' त्वष्टा वा अकामयत । चित्रं प्रजांविंदेयेति । स एतं त्वष्ट्रे चित्रायै पुरोडाशं अष्टाकपालं निरवपत् । ततो वै स चित्रं प्रजाअविंदत । चित्रं ह वै प्रजा विंदते । य एतेन हविषा यजते । ' हें वचन उतरून घेतांना आमचे अवेस्ताचार्य डॉ. तारापोरवाला यांनीं प्राचीन इराणांत चित्र शब्दाचा अर्थ पुत्र अथवा संतति होत असल्याचें सांगितलें होतें, त्याची आठवण होत आहे. चित्र शब्दाचा हा अर्थ लक्षांत घेतला म्हणजे चित्रा ताऱ्याचा मूळचा फलादेश आणि त्वष्ट्याचें प्राचीनतम इराणशीं असलेलें नातें सुव्यक्त होतें. चित्र हीहि प्रतिकृति आणि संतति हीहि प्रतिकृति. तेव्हां डॉ. तारापोरवाला यांनीं सांगितलेला अर्थ असंभवनीय मुळींच नाहीं. समाजशास्त्राच्या इतिहासांत एक रमणीवेष्टित, गुहा-वासी, प्रौढपुरुष वारंवार भेटतो. तो पुरुष त्वष्ट्याच्या परिवारांतलाच असावा. ऋग्वेदांत १–९३–५ येथें ' बृसयस्य शेषः ' आणि ६–६१–३ येथें ' सरस्वति, देवनिदः निबर्हय प्रजां विश्वस्य बृसयस्य मायिनः । ' असे उल्लेख आले आहेत. या दोनहि ठिकाणीं सायणाचार्यांनीं बृसय हें त्वष्ट्याचेंच नाम मानून अर्थ केला आहे. यापैकीं पहिल्या उल्लेखापुरता त्यांचा अर्थ मलाहि खरा वाटतो. पण दुसऱ्या अवतरणांतील बृसयाचा, ब्राहुई टोळीशीं संबंध असावा. यासंबंधीं अधिक विवेचन मी पूर्वींच ' दाशराज्ञयुद्ध ' या ग्रंथांत केलें आहे. ही टोळी तेव्हां त्वष्ट्याची उपासना करीत असेल आणि स्वतःला त्वष्ट्रपुत्र ही संज्ञाहि लावीत असेल. आजहि स्वतःला त्वष्ट्याचे वंशज म्हणून घेऊन वेदाध्ययन करणाऱ्या पांचाळांचा समाज महाराष्ट्रांत आहेच. या समाजासंबंधींहि पूर्वीं ' दाशराज्ञ युद्धां ' त चर्चा केली असल्यानें इथें द्विरुक्ति करीत नाहीं.

## अश्विनीरूपी सूर्यपत्नी

त्वष्टयाच्या संततीपैकीं त्याची कन्या सरण्यू हिच्या विवाहासंबंधींचें एक सूक्तखंड दशममंडलांत आलें आहे. या सूक्ताची चर्चा करण्यापूर्वी एक महत्त्वाची गोष्ट इथें सांगितली पाहिजे. ती ही कीं इराणच्या उत्तरेकडाल सीमेवरून वहात जाऊन कास्पियन अथवा कश्यप समुद्राला मिळणारी अत्रक नदी ही प्राचीन काळीं सरण्यू या नांवानें प्रसिद्ध होती. यावरून त्वष्टा प्रजापतीच्या काळीं वैदिक आर्य कश्यप समुद्राच्या सन्निध निवास करीत असावत, असें अनुमान निघतें. या प्रदेशांत त्वष्टयानें कन्येचा विवाह आरंभिला आणि सारें विश्वच त्या विवाहसमारंभाला अत्सुकतेनें आलें. ' त्वष्टा दुहित्रे वहतुं कृणोति इति इदं विश्वं भुवनं समेति । यमस्य माता पर्युह्यमाणा महो जाया विवस्वतो ननाश ।। १०–१७–१ ।। अपागूहन् अमृताम् मर्त्येभ्यः कृत्वी सवर्णा अददुः विवस्वते । उत अश्विनौ अभरत् यत् तदा आसीत् अजहात् द्वा मिथुना सरण्यूः ।।' १०–१७–२ । म्हणजे यमाची माता आणि महान् विवस्वानाची पत्नी विवाह लागत असतांनाच नाहींशी झाली. त्या अमर रमणीला मर्त्यांच्या दृष्टीपासून गुप्त ठेविली आणि तिची सवर्णा करून ती विवस्वानाला दिली. त्यानंतर तिनें अश्विनीकुमारांना जन्म दिला. सरयूनें दोन मिथुनें मागें ठेविली. इथें ही गोष्ट लक्ष्यात घेतली पाहिजे कीं आपल्या पौराणिक परंपरेप्रमाणें सूर्याचा ताप असह्य होऊन सरण्यू ही सूर्यापासून सर्वांत दूर अशा प्रदेशांत अश्विनीच्या रूपानें जाऊन राहिली. याचा अर्थ असा कीं हें आख्यान प्रचलित झालें, तेव्हां दक्षिणायनाचा बिंदु चित्रा नक्षत्रांत आणि उत्तरायणाचा बिंदु अश्विनी नक्षत्रांत होता. त्याचवेळीं वसंतसंपात पुनर्वसू आणि पुष्य यांच्या मध्यावर असला पाहिजे. पुनर्वसूंचे तारे कोणी दोन मानतात कोणी चार मानतात. हींच दोन मिथुनें अथवा जुळीं सरण्यूनें आपल्या मागें ठेविलीं आहेत. यांच्यापैकीं मिथुन या तारकापुंजाच्या अंतीं असलेले अति तेजस्वी कॅस्टर आणि पोलक्स हे दोन तारे म्हणजेच अश्विनीकुमारांचें जुळें होय, याविषयीं शंका नाहीं. वेदचर्चेंत ज्योतिषशास्त्राचा उल्लेख आला कीं अधिकारी विद्वान् नाकें मुरडतात, हें मला माहीत आहे. पण ते सर्वजण ही गोष्ट विसरतात कीं ज्योतिषशास्त्राचा चक्षू ज्यानें प्राप्त करून घेतला नाहीं, त्याला वैदिक परंपरेप्रमाणें वेद वाचण्याचा अधिकार नाहीं. त्यांनीं केलेली वेदाची चर्चा ही सारी अनधिकारी लोकांनीं केलेली चर्चा होय. अलीकडे श्री-प्रबोध चंद्र सेनगुप्त यांनीं अश्विनीकुमारांच्या रहस्याचा उलगडा एकट्या अश्विनी नक्षत्रावरून करण्याचा प्रयत्न केला

आहे. अश्विनी झालेल्या सरण्यूला विवस्वान् अश्वरूपानें भेटला, तेव्हांच अश्विनी-कुमारांची उत्पत्ति झाली, असें आख्यान हरिवंशादि पुराणांतून आलें असलें तरी वैदिक अश्विनीकुमारांचा पुनर्वसू आणि पुष्य या नक्षत्रांशींच निकटचा संबंध आहे. पण त्या देवांची चिकित्सा करतांना या प्रश्नाचा सविस्तर विचार करतां येईल.

## सूर्याला त्वष्ट्यानें तासलें

सरण्यूच्या चरित्रांतील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे तिला विवस्वानाचा ताप सहन होत नाहीं, असें पाहून त्वष्ट्यानें विवस्वानाला कुलालचक्रावर घालून तासून काढलें, ही होय. मेजर जनरल ड्रेसन या ज्योतिष्यांनीं असें प्रतिपादिलें आहे कीं सूर्यभ्रमणाच्या मार्गाचा पृथ्वीच्या भ्रमणमार्गाशीं जो कोन होतो, तो सरासरी २३।। अंशापर्यंत कमी होतो आणि ३५।। अंशापर्यंत वाढतो. या आंदोलनाचा एक फेरा पूर्ण होण्याला ३१६८२ वर्षें लागतात. मेजर जनरल ड्रेसन यांनीं त्यांच्या गणितावरून असा निष्कर्ष काढला आहे कीं खिस्तपूर्व १३५४४ या वर्षीं ३५।। अंशांचा कोन होऊन पृथ्वीवर उन्हाळ्यांत अत्यंत उष्णता आणि हिवाळ्यांत अत्यंत थंडी अशी परिस्थिति निर्माण झाली आणि त्यामुळें लंडनबेर्लिन रेषेच्या उत्तरेकडील दीडशें मैलांपलीकडील प्रदेशांत ध्रुव-प्रदेशासारखीच परिस्थिति निर्माण झाली होती. तिचें पर्यवसान हिमयुगांत आणि जलप्रलयांत होऊन पुढें खिस्तपूर्व ५६२४ या वर्षापासून सध्याच्या वायुमानाशीं सदृश असें वायुमान आणि वातावरण अस्तित्वांत आलें. ज्योतिषशास्त्रांतल्या या कल्पना सर्वमान्य झाल्या तर त्वष्ट्यानें विवस्वानाला कुलालचक्रावर घालून तासून काढल्याच्या आख्यानांत तत्कालीन इतिहास दडून राहिला आहे, असें म्हणतां येईल. नाहीं तर कल्पनेची भरारी म्हणून त्या आख्यानाला स्वतंत्र महत्त्व आहेच. ज्योतिषशास्त्रांतील या वादाचा इथें अपरिहार्य म्हणूनच उल्लेख केला आहे. कारण विवस्वानाशीं विवाह होतांक्षणींच म्हणजे युति होतांच अदृश्य होणाऱ्या सूर्यपत्नीच्या चरित्रांत ज्योतिषशास्त्राचा संबंध हा यावयाचाच. जूपिटरच्या पुत्रानें सूर्याचा रथ भलत्याच मार्गानें हाकल्यानें पृथ्वी दग्ध होऊं लागली, असें आख्यान ग्रीक पुराणांतहि आलें आहे.

## भूतवानाची उत्पत्ति

त्वष्ट्यानें आपली कन्या सरण्यू हिचा विवाह विवस्वानाशीं लाविला असला तरी

विवस्वान् हा त्वष्ट्याशीं एकरूपच होता, असें अनेकांनीं प्रतिपादिलें आहे. हें प्रतिपादन सत्य मानल्यास सरण्यू ही पतिसदनांतून पळून जाणारी पहिली आर्य-स्त्री न बनतां केवळ पितृसदनांतून पळून जाणारी पहिली आर्यदुहिता बनेल. पण प्रजापतीनें कन्येचा अभिलाष केल्याच्या आख्यानांत सरण्यूचें नांव येत नाहीं. हें आख्यान सांगतांना ऐतरेयकारांनीं म्हटलें आहे. 'प्रजापतिः स्वां दुहितरं अभ्य-ध्यायत्, दिवमित्यन्ये आहुः, उषसमित्यन्ये ।' म्हणजे प्रजापतीला आपल्या कन्ये-चाच निदिध्यास लागला. कोणी म्हणतात कीं ती द्यू होती, तर इतरांच्या मता-प्रमाणें ती उषा होती. या वाक्यांतील द्यू म्हणजे दक्षिणायनाचा बिंदु असून उषा म्हणजे वसंतसंपाताचा बिंदु होय. या दोन पर्यायांपैकीं वर्षरूपी प्रजापति वसंतसंपा-ताच्या क्षणीं रोहिणीशीं युति करूं लागला, ही कल्पना ग्राह्य मानून ऐतरेय ब्राह्मण-कारांनीं आपलें पुढील आख्यान लिहिलें आहे. पण त्यांतहि मूळच्या त्वष्टृकालीन कथानकाचा अवशेष राहून गेला आहे. 'तं देवा अपश्यन् अकृतं वै प्रजापतिः करोति इति, ते तम् ऐच्छन् य एनं मारिष्यति इति, एतं अन्योन्यस्मिन् अविंदन् तेषां या घोरतमाः तन्वः आसन् ता एकधा समभरन् ताः संभृता एष देवो अभवत्, तस्य एतत् भूतवत् नाम भवति ।' देवांनीं पाहिलें कीं जें करूं नये तें प्रजापति करीत आहे. तेव्हां त्याला मारण्याला समर्थ असा आपल्यांत कोणीहि नाहीं हें पाहून त्यांनीं आपल्या घोरतम तनू एकत्र करून एक प्रचंड पुरुष निर्माण केला आणि त्याला भूतवत् हें नांव दिलें. या भूतवानानें प्रजापतीला शासन करण्याच्या विनिमयांत पशूंचें आधिपत्य मागून घेतलें. तोंपर्यंत त्वष्टाच पशूंचा अधिपति होता. या आख्यानाचा संदर्भ ऐतरेयब्राह्मणकारांनीं त्यांच्या समजुतीला अनुसरून लुब्धकव्याध आणि मृग यांच्याकडे लाविला असला तरी ज्योतिषशास्त्रांत लुब्ध-काला कोणीच भूतवत् आणि पशुपति म्हणून ओळखत नाहींत. तो मान चित्रा नक्षत्रापलीकडील स्वातीचा तारा ज्या तारकापुंजांत प्रमुख आहे अशा भूतप-अथवा ग्रीक Boot'es अर्थात भूतेश या तारकापुंजाला लाभला आहे. चित्रा नक्षत्रांत दक्षिणायनाचा बिंदु होता, त्याचकाळीं हा तारकापुंज कश्यपसमुद्रा-शेजारच्या प्रदेशांतील आकाशांत अत्यंत प्रामुख्यानें शोभत होता. ऑ. एमेलिन प्लंकेट या विदुषींनीं Ancient Calendars and Constellations, या विद्वत्वपूर्ण प्रबंधांत लिहिलें आहे. 'For the first depicting on the vault of heaven of the figure of Boote's, I claim with much stronger conviction the date of 6,000 B. C. and latitude of 45

north. For then and there Boote's might be seen at midnight of the summer-solstice, standing upright on the northern horizon his head reaching nearly to the pole of the heavens. Never since that date has he held a so commanding position in the sky, nor at any more southern latitude could his whole figure have been represented as standing on the horizan. The name Boote's has been translated as oxdriver and of him Aratos says. 'The Bearward whom mankind the plough man call, Because he seems to touch the wainlike Bear.' The seven bright stars which mark the tail and part of the body of the Great Bear are often spoken of as the plough and on the large remaining space allotted to to the sphere of Ursa Major, it would not be difficult to include oxen harnessed to the brightly marked celestical plough.'

म्हणजे 'भूतप या तारकापुंजाची कल्पना ख्रि.पू. ६००० वर्षांच्या सुमारास (कश्यप समुद्राच्या आसपास) ४५ अक्षांशावर केली असली पाहिजे, असें जवळ जवळ निश्चितपणें सांगतां येतें. कारण त्याच काळीं आणि ४५ अक्षांशांवरच दक्षिणायनाच्या दिवसांत मध्यरात्रीं उत्तरेकडे उन्नतमस्तक करून क्षितिजावर पाय ठेवलेला हा प्रचंड पुरुष दिसत असे. त्यानंतरच्या कोणत्याहि काळांत या भूतपाचें इतकें प्रभावी स्वरूप दिसणें शक्य नाहीं. ४५ अक्षांशाच्या खालच्या भागांत तो क्षितिजावर उभा असलेला दिसायचा नाहीं. Boot'es या नांवाचें भाषांतर सामान्यतः बैल हाकणारा असें करतात. हा भूत-प सप्तर्षींच्या अगदीं निकट असून सप्तर्षींना अनेक राष्ट्रांतून लांगल हीच संज्ञा लाभली असल्यानें या भूत-पाला लांगलधारी असेंहि म्हणतात.' आपल्या श्रौत वाङ्मयाच्या बाहेर या भूतवानाचा उल्लेख अन्यत्र कोठें आढळत नाहीं. त्याचें एक कारण हें कीं पुढें कृष्णचरित्र रचणाऱ्यांनीं या भूतवानाचेंच बलरामांत रूपांतर केलें. बलराम हा गोप आणि हलधर तर आहेच. इतकेंच नव्हें या भूत-पाच्या प्रतियोगांतील रेवतीचा रमणहि आहे. या साऱ्या विवेचनावरून ऐतरेयब्राह्मणांतील भूतवान् आणि कृष्णचरित्रकारांचा बलराम यांची एकरूपता सुव्यक्त होते.

## प्रजापतीला शासन

प्रजापतीला शासन करण्याच्या आख्यानाचा ऐतरेयब्राह्मणकारांनीं मृग, रोहिणी आणि लुब्धक यांच्याकडे संबंध लाविला असला तरी शतपथब्राह्मणांतील

याच आख्यानांत त्यांचा संदर्भहि येत नाहीं. त्या आख्यानांत नाभानेदिष्टाच्या सूक्तांतील ‘ पिता यत् स्वां दुहितरम् अधिष्कन् क्ष्मयारेतः संजग्मानो निषिंचत् । सुआध्या अजनयन् ब्रह्म देवाः वास्तोष्पतिं व्रतपां निः अतक्षन् ॥’ ( १०–६१–७ ) या ऋचेचा उतारा घेऊन शतपथकारांनीं प्रजापतीला शासन करणाऱ्या व्रतपा वास्तोष्पतीचा नाभानेदिष्टाच्या आख्यानांतील भूतपतीशीं संबंध असल्याचें सुचविलें आहे. शतपथकार आणखी असेंहि सांगतात कीं प्रजापतीला रुद्रानें शासन केल्यानंतर त्याचें वीर्य भूमीवर गळलें, तेव्हां तें वाया जाऊं नये म्हणून देवांनीं यज्ञविधीपूर्वक तें भग, पूषा आणि बृहस्पति यांना अर्पण केलें. पण त्याच्या दर्शनानेंच भगाला अंधत्व आलें आणि त्याच्या सेवनानें पूषा देवाचे दांत पडले. हें पाहून बृहस्पतीनें सविता देवाला तें शांत करण्याकरितां विनविलें. या आख्यानांत उत्तर आणि दक्षिण अयनबिंदूशेजारच्या पूषा आणि भग या देवांचा उल्लेख आला असला तरी संपातबिंदूंजवळच्या देवांचा किंवा त्यांच्या रोहिणी मृग इत्यादि ताऱ्यांचा कांहींच उल्लेख नाहीं. ही महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत ठेवूनच भूतवान् रुद्राची चर्चा केली पाहिजे.

## प्रजापतीचा द्यूशीं संबंध

हें अवधान न राहिल्यामुळें श्री. प्रबोधचंद्र सेनगुप्त यांनीं आपल्या Ancient Indian chronology या ग्रंथांत, या विषयाची आपल्यापूर्वीं चर्चा करणाऱ्या टिळकदीक्षितांचा अधिक्षेप करून आणि त्यांना न कळलेलें रहस्य आपण सांगत असल्याचा आव आणून सारथि पुंजांतील प्रजापति नांवाचा एक चौथ्या प्रतीचा अप्रसिद्ध तारा रोहिणीसह खस्वतिकीं केव्हां येत असे, त्याचा काळ काढून ठेविला आहे. या विषयावरचें त्यांचें विवेचन एकंदरीनें वायां गेलें आहे. कारण वेदयुगांत त्यांचा प्रजापति तारा द्यूशीं समागम करूंच शकत नव्हता आणि या आख्यानाच्या परंपरांतून प्रजापतीची द्यू आणि उषा यांच्याशीं युति होण्याची शक्यता गृहीत धरलेली आहे. तेव्हां या आख्यानांतील प्रजापति हा सारथि पुंजांतील एखादा चौथ्या प्रतीचा अप्रसिद्ध तारा नसून तो संवत्सर प्रजापतिच असला पाहिजे. याच विषयावर मुंबईचे डॉ. कर्णिक यांनीं त्यांचे आचार्य श्री. वेलणकर यांच्या साहाय्यानें एका निबंध लिहिला आहे. पण या उभयतांना ज्योतिषाची दृष्टिच नसल्यानें, या आख्यानाच्या विभिन्न परंपरा शोधून त्यांनीं जी माहिती एकत्रित केली आहे, तिचा त्यांना सदुपयोग करतां आला नाहीं.

## भूत-प आणि लुब्धक

'ओरायनकार' टिळकांनीं लुब्धक हाच रुद्र मानून त्यानें छेदलेलें प्रजापतीचें शिर म्हणजे मृगशीर्ष असें दाखवून दिलें आहे. टिळकांचा हा निर्णय यथार्थ असला तरी त्यांत थोडी भर घालणें आवश्यक आहे. ती ही कीं त्यांनीं ओरायनच्या आख्यानाचा जसा ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला आहे, तसाच Boot'es चाहि एकदा विचार केला पाहिजे. Boot'es अथवा भूतपालाच लाटिन भाषेंत Clamans, clamator, Viocferator आणि अरबी भाषेंत Al Auwa अशीं मोठा ध्वनि करणारा अर्थात् आपला रुद्र, या अर्थाचींच नांवें मिळालीं आहेत. त्यालाच Ploughman म्हणजे बलरामाप्रमाणें हली म्हणत असून लाटिनमध्यें Septentrios master of the septentriones म्हणजे सात नांगरांना जोडलेल्या बैलांचा धनी असेंहि म्हणतात. त्यालाच Arkos, Arkto Phylaxe, Hastatas आणि Lanceator अशींहि नांवें आहेत. या नांवांवरून तो तेजस्वी ऋक्षप्रिय आणि भालाधारी असल्याचें कळून येतें. भूत-पाच्या खालच्या भागांत स्वातीचा अत्यंत तेजस्वी तारा असून प्राचीन ग्रीकरोमन ज्योतिषांपैकीं अनेकांनीं त्याचा भूत-पांतच समावेश केला होता. मला वाटतें, आपली वैदिक परंपराहि अशीच असावी. कारण मरुद्गणांना रुद्रपुत्र म्हणण्याचा प्रघात स्वातीचा तारा भूत-पांत समाविष्ट केल्यानेंच पडला असावा. मरुद्गण हे वस्तुतः वायुपुत्र, पण वायु ज्या स्वातीचा अधिपति ती स्वातिच भूत-पांत म्हणजे रुद्रांत समाविष्ट झाल्यानें त्यांनाहि रुद्रपुत्र म्हणावें लागलें. ज्या रॉबर्टब्राऊन यांच्या primitive Constellations या अत्यंत उपयुक्त ग्रंथावरून वरील सारी माहिती संकलित केली, त्यांनीं असेंहि म्हटलें आहे. Boote's is not merely an armed warrior but also a shepherd, and moreover described as the guardian of heaven in Arabic. This Lance-bearing warrior Arktourus-Boote's, who bears the proud title of guardian of heaven, appropriately introduces another, and a very curious fact that Boote's was called orion and orion Boote's म्हणजे ग्रीसमध्यें ओरायनला भूतेश आणि भूतेशाला ओरायन म्हणत. ज्योतिःशास्त्राचा इतिहास लिहिणारे फ्रेंच लेखक (Dupuis) ड्युप्युई यांनींहि साधार विधान केलें आहे. Theon et Hesuchious donnent aussi le nom d'orion au Bootes ou a Arcture, म्हणजे थेओन आणि

हेसुचिऊस् यांनीं भूत-पाला ओरायन हें नांव दिलें आहे. ओरायनला भूत-प आणि भूत-पाला ओरायन असा जो विशेषनामांचा विनिमय झाला आहे, त्याचा उलगडा केवळ आपल्या श्रौत परंपरेनेंच होऊं शकतो. कारण आपल्या विभिन्न परंपरां-प्रमाणें प्रजापतीनेंच द्यूचाहि अभिलाष केला आणि उषेचाहि अभिलाष केला. त्याला शासन मात्र एकट्या रुद्राकडूनच झालें. त्यामुळें वसंतसंपाताच्या समयीं मृगरूप धारण करून अकृत करणाऱ्या प्रजापतीला आणि दक्षिणायनाच्या समयीं शतपथाच्या परंपरेप्रमाणें रूपांतर न करतांच अपराध करणाऱ्या प्रजापतीला आकाशांतील ज्या प्रभावशाली देवांनीं शासन केलें, त्यांना एकच नांव मिळणें अगदीं स्वाभाविक आहे. आपला ओरायन हा ग्रंथ लिहितांना टिळकांना ही सारी माहिती उपलब्ध नव्हती. कारण ज्या रॉबर्ट ब्राऊनच्या ग्रंथावरून मी ही माहिती संकलित केली, त्यांचा ग्रंथच मुळीं १८९९ आणि १९०० या वर्षीं दोन खंडांत प्रसिद्ध झाला. त्यानंतर टिळकांनीं या विषयाकडे लक्षच दिलें नसल्यानें या दुसऱ्या ओरायनचा उलगडा करण्याचा उद्योग मी आतां करीत आहे.

## रुद्र प्रजापतीचा जावई कसा

भूत-पांत स्वातीचा समावेश होत होता, हें कळल्यानें रुद्र मरुद्गणांचा पिता कसा, हें कोडें जसें उकलतें, तसेंच रुद्र हा प्रजापतीचा जावई कसा, हें रहस्यहि उघड होतें. ८–२६–२१ आणि २२ या ऋचांतून वायूला त्वष्ट्याचा जावई म्हटलें आहे. ' तव वायो ऋतस्पते त्वष्टुः जामातर् अद्भुत । अवांसि आवृणीमहे ॥ त्वष्टुः जामातरं वयं ईशानं राय ईमहे । सुतावन्तो वायुं द्युम्ना जनासः ॥ ' ' हे वायु, हे ऋतस्पति, हे त्वष्ट्याच्या जामाता, हे आश्चर्यरूपा, तुझ्या कृपालोभाची आकांक्षा आम्ही धरीत आहोत. त्वष्ट्याचा जामात अशा ईशान वायूजवळ सोमसवन करणारे आम्ही धन मागत आहो. ' वायु हा त्वष्ट्याचा जावई खरा, पण त्याच्या पत्नीचें नांवच कळत नाहीं, असें मॅक्डोनेलनींहि म्हटलें आहे. ते कळो, किंवा न कळो. या वचनांवरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं त्वष्ट्याचा जावई असलेल्या वायूचें नक्षत्र जें स्वाति, तें रुद्र भूतवानांत समाविष्ट झाल्यानें कालक्रमानें रुद्राहि प्रजापतीचा जावई झाला. मग प्रजापतीच्या सदनीं रुद्रपत्नीचा अपमान झाल्याच्या निमित्तानें त्यानें आपल्या श्वशुराला शासन केल्याचीं आख्यानें रचलीं जाऊं लागलीं.

## भूत-प हाच आशुतोष

स्वातीच्या स्वामित्वासह रुद्राला श्वशुरलाभ झाला तरी एकंदरीनें त्याला तें

नक्षत्र मानवलेलें दिसत नाहीं. कारण स्वातीचें वैदिक नाम निष्ट्या असें असून ती चांडाल जातीची म्हणून प्रसिद्ध आहे. या चांडालीच्या संसर्गानें श्मशान हेंच शंकराचें निवासस्थान बनलें आणि त्याला भुताप्रेतांची कुसंगति लाभली. त्यामुळेंच शंकराला देवसमाजांत सहजासहजीं कोठें स्थान मिळेना. या चांडालीच्या प्रभावानेंच कीं काय कोण जाणे, भूतवत् तारकापुंजाला भारतीय जनता सपशेल विसरून गेली. पण सुमेरी आणि ग्रीक संस्कृतींतील समाज कांहीं त्याला विसरला नाहीं. होमर कवीनें त्याचा उल्लेख केला असून अस्तंगत होतांना तो अगदीं मंद गतीनें अस्ताला जातो, ही वस्तुस्थितिहि त्यानें सांगितली आहे. कारण उदयाच्या वेळीं क्षितिजावर आडवा पडलेला दिसत असल्यानें तो लौकर उगवतो आणि अस्त-समयीं तो ताठ उभा दिसत असल्यामुळें लौकर दृष्टिपथांतून नाहींसा होत नाहीं. शिवाला आशुतोष म्हणण्याचें मूळ कारण या भूतवानाचा द्रुत उदय हेंच असलें पाहिजे. इथें ही महत्त्वाची गोष्ट सांगितली पाहिजे कीं प्राचीन अक्कडचे लोकहि आपल्या शिवाला सिब म्हणजे पशुपति याच नांवानें ओळखत असत. भूतवान् आणि ओरायन या उभयतांनाहि ते सिबजी अन्न हीच संज्ञा देतात. त्यांच्या भाषेंत अन्न शब्दाचा अर्थ स्वर्ग असा असून सिबजी अन्न याचा अर्थ स्वर्गीयांचा पशुपति असा होतो. ग्रीसमध्येंहि मदिरेचा देव बॅकुस् याची सिबजी या नांवानें उपासना करणारा एक प्रसिद्ध पंथ होता. भूतेशाला ग्रीकमध्यें अर्क असें नांव असून त्याचा अर्थ संस्कृतांत लिंग असा होतो, याचा इथें उल्लेख केला पाहिजे.

## रुद्राचें स्पष्टीकरण

रुद्रासंबंधीं मी वर जें विवेचन केलें आहे तें विश्वविद्यालयांतील विद्वानांच्या विवेचनाशीं सर्वस्वी सुसंगतच आहे. मात्र ते जें कांहीं लिहितात, त्याचा त्यांना स्वतःला अर्थ कळत नाहीं. तो ज्योतिषशास्त्राच्या आधारानें त्यांना समजावून सांगण्याचा आभारशून्य उद्योग इथें करणें भाग आहे. १९५२ मध्यें पुणें विद्या-पीठाच्या मुखपत्रांत डॉ. दांडेकरांनीं ‘ रुद्र’ या विषयावर ५५ पानांचा विस्तृत लेख लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात. ‘ ऋग्वेदांतील ८–२९–५ या ऋचेंत हा देव कोण असें कोडें घालून रुद्राचें वर्णन आलें आहे. ‘ तिग्ममेको बिभर्ति हस्त आयुधम् शुचिःउग्रो जलाषभेषजः ।’ या ऋचेंतील उग्र, शुचि, हातांत तीक्ष्ण आयुध धारण करणारा जलाषभेषज देव हा रुद्रस्वरूपी स्वातीचा तारा आहे. स्वातींत दक्षिणायनाचा बिंदु होता, त्यावेळेचें हें वर्णन असून त्या काळानंतर एक

दोन सहस्र वर्षेंच हें परंपरेंत राहिलें असावें. त्याच प्रबंधांत डॉ. दांडेकरांनीं म्हटलें आहे कीं इतर देव पूर्वेला असले तर रुद्र उत्तरेला असतो. हेंहि वर्णन यथार्थ आहे. भूतेशाचा तारकापुंज उत्तरध्रुवापासून फार दूर नाहीं. त्यामुळें रुद्राचें वसतिस्थान उत्तरेला आहे, हें म्हणणें त्रिवार सत्य आहे. वेदांतील देवतांमध्यें रुद्राचा मरुतांशीं सर्वांत निकटचा संबंध आहे, असें दांडेकर म्हणतात. भूतेशांत समाविष्ट असलेल्या स्वातीचा अधिपति वायु असल्यानें त्याचा मरुतांशीं निकटचा संबंध आहेच. रुद्राचा स्वातीशीं संबंध असल्यामुळेंच तो मरुत्पिता झाला आहे. त्यानंतर ऋग्वेदाच्या दशममंडलांतील मुनिसूक्तांत रुद्राचा संबंध येतो, याचा डॉ. दांडेकरांनीं उल्लेख केला आहे. त्या सूक्तांतील मुनींसंबंधीं मला कांहींच म्हणावयाचें नाहीं. केशीसंबंधीं इतकें सांगितलें म्हणजे पुरें कीं आज भारतीय ज्योतिषी ज्याला अरुंधतीकेश ही संज्ञा देतात, त्याच तारकापुंजाला ऋग्वेदांत केशी ही संज्ञा दिली असून तो तारकापुंज पन्नास अक्षांशावरच्या प्रदेशांत रुद्रासहच अस्ताला जातो. त्यामुळें ‘ केशी विषस्य पात्रेण यत् रुद्रेणापिबत् सह ।’ असें ऋग्वेदांत वचन आलें आहे. हें कोडें उकलण्याचा प्रयत्न करीत असतांना नुकतेच दिवंगत झालेले ज्योतिर्विद श्री. ढवळे माझ्याकडे आले होते. त्यांना मी ही वस्तुस्थिति दाखवून दिली होती. रुद्र आणि सर्प यांच्या परस्परसंबंधाचा डॉ. दांडेकरांनीं उल्लेख केला आहे. सर्पांचा भूतेशरुद्राशीं संबंध नसून धनुराशींतील धनुर्धारी रुद्राशीं त्यांचा संबंध आहे, हें आकाशांतील धनुर्धारी आणि भुजंगधारी यांच्या स्थानांवरून कोणालाहि कळून येईल. रुद्र हा वादळांचा देव असला पाहिजे, असें सरसकट पाश्चात्य वेदविदांचें मत आहे, असें डॉ. दांडेकर सांगतात. स्वातींत दक्षिणायनाचा बिंदु होता, त्या काळाला अनुलक्षून वेदांत जीं रुद्राचीं वर्णनें आलीं आहेत, त्यांचा पाश्चात्य वेदविदांनीं काढलेला निष्कर्ष यथातथ्य आहे. ऋग्वेदांतील अनेक वचनांचा उल्लेख करून डॉ. दांडेकर म्हणतात कीं रुद्राचा धनुष्यबाणांशीं आणि धनुर्धारी जनांशीं निकटचा संबंध आहे. रुद्राचा धनु राशीशीं असलेला संबंध ज्योतिषी लोकांना अविदित नाहीं, इतकें सांगितलें म्हणजे पुरें. रुद्र हा मृत्यूचा देव असल्याचाहि डॉ. दांडेकरांनीं उल्लेख केला आहे. धनुराशींत दक्षिणायन असतांना उन्हाळ्यांत अति उष्णता आणि हिवाळ्यांत अति शीत होऊन पृथ्वीवर प्रलय झाला, त्याची स्मृति वेदकालांत विलुप्त झाली नसल्यानें रुद्राचा मृत्यूशीं असलेला संबंध ते विसरले नव्हते.

## प्रजापतिशासनाची ग्रीक परंपरा

प्रजापतीला शासन करण्याचें आख्यान आपल्या श्रौत वाङ्मयाप्रमाणेंच ग्रीक वाङ्मयांतहि आढळून येतें. ग्रीकांच्या परंपरेप्रमाणें युरेनस् प्रजापति अखंड प्रजोत्पत्ति करीत होता, पण ती प्रजा आज नाहीं उद्या आपल्याला पदच्युत करील, अशी त्याला भीति वाटत होती. त्यामुळें प्रजानिर्मिति झाली कीं त्या प्रजेला तो गेआच्या म्हणजे पृथ्वीच्या उदरांत दडपून टाकी. सरतेशेवटीं प्रजापतीची प्रचंड प्रजा पृथ्वीच्या उदरांत मावेनाशी झाली. तेव्हां तिनें लोहनिर्मिति करून त्या लोहाचा विळा बनविला आणि तो आपल्या मुलांच्या हातीं देऊन त्यांना प्रजापतीचें लिंग कापण्याची तिनें आज्ञा केली. पण एकट्या क्रोनोस्वांचून इतरांना तें धारिष्ट झालें नाहीं. त्यानें मात्र रात्रीं युरेनस गेआकडे आला असतांना त्याचें लिंग छाटून तें दूर समुद्रांत फेकून दिलें. त्या लिंगांतून जें वीर्य गळलें तें सागरफेनाशीं संयुक्त होऊन त्यापासून व्हीनस देवतेची उत्पत्ति झाली. आपल्या प्रजापतीच्या आख्यानाशीं या आख्यानाचें थोडेंच साद‍ृश्य आहे. पहिली गोष्ट ही कीं ग्रीक प्रजापतीप्रमाणेंच आपल्या प्रजापतीलाहि लोहयुगांत शासन मिळालें. ग्रीक कथेंत गेआनें लोहनिर्मिति करून त्यापासून विळा बनविल्याचा उल्लेख आहे, तर आपल्या कथेंत स्वतः त्वष्ट्याच्या हातांतच आयसी वाशी म्हणजे पोलादी बर्ची असल्याचा उल्लेख आहे. दुसरें साद‍ृश्य हें कीं ग्रीक कथेप्रमाणें आपल्या कथेंत प्रजापतीचें लिंग छाटल्याचा उल्लेख नसला तरी दोनहि कथांतून प्रजापतीचें वीर्य गळून प्रजा निर्माण झाल्याची कथा सारखीच आहे. ग्रीक क्रोनोस्नें आपल्या मातेच्या सांगण्यावरून प्रजापतीला प्रजोत्पत्ति करणें अशक्य करून टाकलें असलें तर वैदिक देवांनीं आपल्या भगिनीचा कैवार घेऊन प्रजापतीला शासन करविलें आहे. थोड्या वेगळ्या दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येतें कीं ग्रीक देवांनीं सत्ता संपादनाकरितां प्रजापतीचा कांटा काढला असला तर वैदिक देवांनीं नैतिक कारणाकरितां प्रजापतीला शासन केलें. ग्रीक आणि वैदिक प्रजापतींच्या आख्यानांतून असे कांहीं अंशीं विभिन्नत्व असलें तरी हीं दोनहि आख्यानें उभय समाजांत एकाच काळीं उद्भवलेलीं असूं शकतील. याकरितां त्यांचा एकत्र विचार होणें आवश्यक आहे. असो.

## रुद्रकृत मखविध्वंसन

आपल्या देवांविषयींच्या आख्यानांचा ग्रीक आणि रोमन दैवतकथांच्या

अनुरोधानें विचार केल्यावांचून त्यांचा वास्तविक अर्थ कळूं शकत नाहीं. याचें एक उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रुद्रकृत मखविध्वंसनाचें आख्यान होय. रुद्र आणि यज्ञ यांच्या विरोधाच्या अनेक कथा श्रौत वाङ्‌मयांत प्रचलित आहेत. त्यापैकीं सर्वांत पुरातन कथा बहुधा तैत्तिरीय संहितेंतली असावी. ' देवा वै यज्ञात् रुद्रम् अंतरायन् । स यज्ञम् अविध्यत् । तं देवा अभिसमगच्छन्त । कल्पतां न इदम् इति ते अब्रुवन् । स्विष्टं वै न इदं भविष्यति यदिमं राधयिष्याम इति । ( तै. सं २-६-८-२ ) म्हणजे देवांनीं रुद्राला यज्ञांतून वगळलें, म्हणून त्यानें यज्ञाचा वेध केला तेव्हां देवांनीं असा विचार केला कीं याची आराधना केली तर आपलें इष्टच होईल. हीच कथा शतपथांत थोड्या भिन्न स्वरूपांत आली आहे. ती अशी कीं देव यज्ञ करून स्वर्गाला गेले, तेव्हां त्यांनीं पशुपतीला यज्ञभूमीवरच टाकून दिलें. त्यामुळें चिडून तो हातांत शस्त्र घेऊन उत्तरेकडे उभा राहिला. हें पाहून देवांनीं त्याला यज्ञांत भाग देऊन त्याची समजूत काढली. याच कथांचें पुढें पौराणिकांनीं दक्षयज्ञविध्वंसनाच्या कथेंत परिवर्तन अथवा विडंबन केलें आणि त्यामुळें रुद्र हा कोणी तरी यज्ञविरोधी अनार्य देव असल्याच्या कल्पना अज्ञानी लोकांनीं प्रसृत केल्या. रुद्र आणि यज्ञ यांच्या विरोधाचें मूळकारण हें आहे कीं यज्ञवेदी हा तारकापुंज दाक्षिणध्रुवाच्या बाजूला आहे आणि भूतवान्, भूतेश, रुद्र अथवा ग्रीक Boote's हा तारकापुंज उत्तरध्रुवाच्या बाजूला आहे. आराटोस् या ग्रीक ज्योतिषी कवीनें म्हटलें आहे.

Now beneath the glowing sting of that huge sign, The Scorpion, near the south the Altar hangs; And this you note but
little time aloft,
For opposite Bear-watcher doeth it rise,
While his course is wholly high in air,
It quickly speeds beneath the Western sea,

म्हणजे वृश्चिकाच्या नांगीच्या खालीं यज्ञवेदी टांगलेली दिसते. ही यज्ञवेदी अस्वलांवर पहारा करणाऱ्या रुद्राच्या अगदीं समोर असून तो आकाशांत वर चढूं लागतांच ही चपलचरणा पश्चिम समुद्रांत अस्ताला जाते. या यज्ञवेदीसंबंधीं लिहितांना रॉबर्ट ब्राऊन आपल्या ग्रंथांत म्हणतात. ' The altar though small was yet considered as of great importance. Aratos calls it a ' mighty sign ', and speaks of the Southern Altar's

sacred seat. Manilius says. 'Ara mundi templum est,' म्हणजे ही यज्ञवेदी लहानच असली तरी तिचा प्रभाव फार मोठा मानला जात होता. आराटोसनें तिच्या प्रभावाचें आणि पावित्र्याचें विस्तारानें वर्णन केलें आहे. मानिलिउस्नें तर तिला अखिल विश्वाचें देवतामंदिर ही संज्ञा दिली आहे. 'Proctor refers to the statement of Aratos, quoted from the old astronomers that Ara is to be seen above the horizon for as many hours as Arcturus remains below the horizon. This relation has not been fulfilled since some 3800 years ago, when the star Arcturus was 50 degrees from the North Pole and the middle of Ara 50 degrees from the South Pole, If as is probable, the whole of Ara is meant, then the epoch must be placed four centuries further back.'

## मखविध्वंसनाचा काळ

म्हणजे आराटोस्नें प्राचीन ज्योतिष्यांच्या आधारानें असें विधान केलें आहे कीं स्वातीचा तारा जितके तास क्षितिजाखालीं असतो, तितके तास यज्ञवेदी क्षितिजाच्या वर असते. यावरून प्रॉक्टर या गेल्या शतकांतील प्रसिद्ध इंग्रज ज्योतिष्यानीं गणित करून असा निष्कर्ष काढला कीं स्वातीचा तारा जेव्हां उत्तर ध्रुवापासून ५० अंशांवर होता, तेव्हांच यज्ञवेदीचा मध्य दक्षिणध्रुवापासून ५० अंश अंतरावर होता. हा काळ सरासरी ३८०० वर्षांपूर्वींचा आहे. पण आराटोसच्या म्हणण्याप्रमाणें संपूर्ण यज्ञवेदी स्वातीप्रमाणें ध्रुवापासून समान अंतरावर येण्याचा काळ काढला तर तो आणखी ४०० वर्षें मागें जाईल. म्हणजे यज्ञ आणि रुद्र यांचा विरोध आकाशांत प्रत्यक्ष दिसूं लागण्याचा काळ खि. पू. २३०० वर्षांच्या सुमारास येईल. पण आपल्या श्रौत वाङ्मयाचा अर्थ कळण्याकारितां प्रॉक्टरचा अभ्यास करावा लागतो, हेंच ज्यांना आजपर्यंत पटलेलें नाहीं, अशांच्या पुढें प्रॉक्टरचें गणित मांडण्यांत अर्थ काय ?

## ऋग्वेदकाळाची अंतिम मर्यादा

इथें सांगण्याजोगी महत्त्वाची गोष्ट ही कीं रुद्रकृत मखध्वंसाचा उल्लेख ऋग्वेदांत कोठेंहि येत नाहीं. एवढया एका गोष्टीवरूनहि ऋग्वेदाचा काळ खि. पू. २३०० च्या पूर्वींचा ठरतो. यावर कोणी असा आक्षेप घेतील कीं ऋग्वेदकाळीं ही यज्ञवेदी ऋषींना परिचित होती, याला आधार काय ? या विधानाला सर्वांत मोठा

आधार प्रतिसृष्टिकर्त्या विश्वामित्रांच्या चरित्राचाच आहे. ज्या विश्वामित्रांनीं कृत्तिका नक्षत्रांत संपात आल्यानंतर त्याच्या स्मरणार्थ संपातसूक्तें लिहिलीं आणि आपण नवीन इंद्र करीत असल्याचा आपल्या सूक्तांतून स्पष्ट उल्लेख केला, त्यांनींच, ‘ या यज्ञवेदीवर यज्ञ करून त्रिशंकूला सदेह स्वर्गांत पाठविलें. ’ म्हणजे त्यांच्या वेळींच यज्ञवेदी आणि त्रिशंकु हे तारकापुंज वैदिक आर्यांना परिचित झाले होते. ते त्यांच्यानंतर लागलीच विसरणें शक्य नाहीं.

# परिशिष्ट

# सविता देवाचें कोडें

## सूर्याची उसनवारी

सविता आणि सूर्य यांच्यासंबंधीं लिहितांना प्रो. मॅकडोनेल यांनीं 'वेदिक मायथॉलॉजी या ग्रंथांत म्हटलें आहे.' सवितृ is celebrated in eleven whole hymns of ऋग्वेद eight or nine of these are in the family books, while all but three of those to सूर्य are in the first and tenth.' म्हणजे ऋग्वेदांतील पुरातन अशा कुलमंडलांतून सवित्याला पुरेसें महत्त्व दिलें असून त्यांतून सूर्यदेवाला उद्देशून लिहिलेलीं सूक्तें बहुतकरून आढळून येत नाहींत. सूर्य, सूर्या इत्यादि देवता वैदिक आर्यांनीं कशु, काशि, शक इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या कुळापासून पुढें उसन्या घेतल्या, असें मी 'नवभारतांतील' एका लेखांत लिहिलें होतें. कुलमंडलांतून सूर्यदेवाला उद्देशून लिहिलेलीं सूक्तें मुख्यतः शकांशीं निकटचा संबंध असलेल्या वसिष्ठांच्या मंडलांतच आढळतात. वैदिक देवतांमध्यें सूर्य अगदींच अर्वाचीन असल्याचें उघडकीला आलें म्हणजे सवित्याचें सत्य स्वरूप समजण्याचा संभव अधिक, यासाठीं ही प्रस्तावना करावी लागली. इथें स्वाभाविकपणेंच असा प्रश्न उद्भवतो कीं, सविता स्वतःच दिनकर असला तर कशु, काशि, शक या कुळाकडून सूर्याची उपासना उसनी घेण्याची वैदिक आर्यांना आवश्यकता तरी काय होती? या महत्त्वाच्या प्रश्नांत सविता आणि सूर्य यांच्या परस्परासंबंधाचेंच नव्हे तर वैदिक आर्यांच्या उत्क्रांतीचेंहि रहस्य लपून राहिलें असल्यानें या प्रश्नांचा सविस्तर विचार करणें अपरिहार्य आहे. यासाठीं या चर्चेंत सकृद्दर्शनीं अनेक विषयांतरेंहि करावीं लागतील. पण त्यांवांचून या विषयाचें व्यापक स्वरूप वाचकांना कळून येणार नाहीं.

## सूर्य आणि एतश यांची स्पर्धा

सविता आणि सूर्य यांच्या परस्परसंबंधाचें रहस्य उकलण्याच्या दृष्टीनें विचार करतांना त्या उभयतांच्या वर्णनांतून आढळून येणाऱ्या एतश शब्दानें सकृद्दर्शनींच माझें चित्त वेधून घेतलें. या एतशासंबंधीं विवेचन करतांना प्रो. मॅक्डोनेल लिहितात, 'सवितृ is the steed (एतश) who measured out the terrestrial regions, (यः पार्थिवानि विममे स एतशः रजांसि देवः सविता महित्वना ५-८१-३)

The swift god (एतश) draws the bright form of the sun, (यत् ईं आशुः वहति देवः एतशः विश्वस्मै चक्षसे अरम् ७–६६–१४) yoked to the pole एतश moves the wheel of the sun, (समानम् चक्रं परि आविवृत्सन् यत् एतशः वहति धूः सु युक्तः ७–५३–२) he brought the wheel of the sun. (त्वं सूरो हरितो रामयो नृन् भरत् चक्रं एतशो नायम् इंद्र, १-१२१-१३)(सूरः चित् रथं परितक्म्यायां पूर्वं करत् उपरं जूजुवांसम्। भरत् चक्रम् एतशः सं रिणाति पुरः दधत् सनिष्यति क्रतुं नः ५–३१–११) इंद्र helped एतश contending in a race with सू॰. (प्र एतशम् सूर्ये पस्पृधानम् सौवश्व्ये सुष्विम् आवत् इंद्रः १–६१–१५). It may be gathered from stray references to this mythical contest that एतश being at first behind takes up the lost wheel of the sun and fixes it to the car of सूर्य; he has now gained the lead and in the end सूर्य seems to concede to him the place of honour before his own car. It appears to be impossible to suggest any satisfacfory interpretation of this myth. अर्थात् विदेशी विश्वविद्यालयांतील आचार्यांना एतश आणि सूर्य यांच्यामधील स्पर्धेचें कोडें उलगडत नसलें तरी असहकारितेच्या निमित्तानें शाळा सोडून घरीं बसणाऱ्या माझ्यासारख्या उनाड विद्यार्थ्याला असलीं कोडीं सोडविणें म्हणजे केवळ पोरखेळ आहे. कारण असलीं कोडीं सोडवायला जें विविध विषयांचें सामान्य ज्ञान लागतें, तेंच नेमकें विश्वविद्यालयांतील विद्वान् विशेषज्ञांपाशीं नसतें.

## एतशानें आणलेलें सूर्यचक्र

'प्र एतशम् सूर्ये पस्पृधानम् सौवश्व्ये सुष्विम् आवत् इंद्रः' म्हणजे कोणाचे घोडे चांगले याविषयीं एतश आणि सूर्य यांच्यामध्यें स्पर्धा चालू असतांना आपला घोडा दौडविणाऱ्या (सुष्विम्) एतशाचें इंद्रानें संरक्षण केलें. याच प्रसंगाचें नेमकें याच्या अगदीं उलट वर्णन दुसऱ्या एका मंत्रांत आढळतें. 'अयं चक्रं इषणत् सूर्यस्य नि एतशम् रीरमत् ससृमाणम्' (४–१७–१४) म्हणजे ह्या इंद्रानें सूर्याच्या चक्राला गति दिली आणि सूर्यावर सरसावून येणाऱ्या एतशाला शांत केलें. वेद-समाप्तीच्या काळांत 'दक्षिणा दिक् इंद्रो अधिपतिः' म्हणजे दक्षिणायनाच्या प्रारं-भाचा अधिपति इंद्र मानला जात असे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे उत्तराय-णाच्या अंतीं अगदी मंद गतीनें जाऊं लागलेल्या सूर्यचक्राचा वेग दक्षिणायनाच्या

आरंभीं इंद्रानें वाढविला आणि त्याच्यावर चालून येणाऱ्या एतशाला शांत केलें, असा वरील वचनाचा वास्तविक अर्थ असल्याचें कळून येतें. त्या काळीं सूर्याच्या दैनंदिन गतीचें सूक्ष्म गणित सूक्तकर्त्यांना कळत नव्हतें असें गृहीत धरलें तरी उत्तरायणाच्या अंतीं सूर्य आकाशांत फार रेंगाळतो, ही वस्तुस्थिति त्यांच्या डोळ्यांना नक्की दिसत होती. वेदकाळीं दक्षिणायनापासून एक वर्षारंभ होत होता आणि हा वर्षारंभ होण्यापूर्वी ३६० दिवसांच्या सावन वर्षांत उणे पडणारे पांच दिवस अधिक घालून त्याची आर्तव वर्षाशीं सांगड घातली जात असे. याच घटनेला अनुलक्षून एतश हा सूर्याचें चक्र वाहून आणतो, अशी मंत्रद्रष्टयांनीं कल्पना केली आहे. 'भरत् चक्रं एतशो नायमू इंद्र ' अथवा 'भरत् चक्रं एतशःसं रिणाति' या वर उतरून घेतलेल्या वचनांचा अर्थ हाच आहे. हा एतश सूर्याचें चक्र वाहून आणत असला तरी सूर्य त्याला उपद्रव द्यावयाला चुकत नाहीं. 'यत् तुदत् सूर एतशम् वंकू वातस्य पर्णिना । वहत् कुत्सम् आर्जुनेयम् शतक्रतुः त्सरत् गंधर्वम् अस्तृतम्' (८–१–११) म्हणजे सूर्यानें जेव्हां आपल्या उष्णतेनें एतशाला उपद्रव दिला, तेव्हां वक्रगामी वायुरूपी अश्वाच्या रथांत बसून आर्जुनेय कुत्सासह इंद्र त्याच्या रक्षणाला गेला. अर्थात् दक्षिणायनाच्या प्रारंभीं होणाऱ्या वादळावर आरूढ होऊन इंद्र सूर्यतापानें तप्त झालेल्या एतशाच्या संरक्षणाला गेला. या वचनांतील आर्जुनेय कुत्साचाहि अजून उलगडा झालेला नाहीं. पण अथर्ववेदांत सांगितल्याप्रमाणें 'अयनं मघा मे' म्हणजे तेव्हां दक्षिणायन मघा ताऱ्यापाशीं होत असल्यानें आणि त्या ताऱ्याच्या पुढचीं पूर्वा, आणि उत्तरा हीं दोनहि नक्षत्रें अर्जुनी नामकच असल्यानें आर्जुनेय कुत्स म्हणजे त्या नक्षत्रावर येणारे दुर्दिन, अर्थात् पावसाचे दिवस असा मी त्याचा सध्या अर्थ करतों.

## वैदिक वर्षारंभ

आतां यापुढील विवेचनाकडे वळण्यापूर्वी निरनिराळ्या वैदिक वर्षारंभांसंबंधीं थोडी माहिती शतपथाच्या आधारानें इथें एकत्रित केली पाहिजे. 'अमावास्यायां अग्न्याधेयम्' अर्थात् अमावास्येला अग्निहोत्राचा स्वीकार करावा, असें शतपथाच्या परंपरेला अनुसरून कात्यायनानें सांगितलें आहे. त्याचप्रमाणें ब्राह्मणांनीं वसंत ऋतूंत आणि क्षत्रियांनीं ग्रीष्म ऋतूंत अग्निहोत्र घ्यावें, असेंहि शतपथाचें सांगणें आहे. याच्याहि पुढें जाऊन कृत्तिका, रोहिणी, मृग अथवा फाल्गुनी, हस्त, चित्रा या नक्षत्रांवर (होणाऱ्या अमावास्येला) तें व्रत घेणें श्रेयकर, विशेषतः क्षत्रियांनीं तर

चित्रा नक्षत्रावरच अग्न्याधान करणें प्रशस्त असें शतपथकारांचें म्हणणें आहे. हींच नक्षत्रें निवडण्याचें कारण हें कीं, तेव्हां वसंतांतील अमावास्या कृत्तिका, रोहिणी, मृग आणि ग्रीष्मांतील अमावास्या फाल्गुनी, हस्त, चित्रा या नक्षत्रांवर होत होत्या. म्हणजे वसंत संपातापासून एक आणि दक्षिणायनाच्या प्रारंभापासून एक असे दोन वर्षारंभ तरी वैदिक आर्यांमध्यें पुरातन कालापासून प्रचलित होते आणि त्या वर्षारंभांशीं वर उल्लेखिलेल्या नक्षत्रांचा संबंध येत असे. ही गोष्ट लक्षांत घेऊन आतां एतश कोण याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एतश हें सूर्याच्या अश्वाचें नांव आहे, असें सायणाचार्य म्हणतात. पण या आचार्यपरंपरेक्षां इथें व्युत्पत्तिशास्त्राचाच उपयोग अधिक होऊं शकेल. सध्या दक्षिणायनाच्या प्रारंभीं पाऊस आणणाऱ्या ज्या वाऱ्यांना मान्सून वारे म्हणतात, तसल्याच वाऱ्यांना पूर्वी ग्रीक लोकांच्या अनुकरणानें Etesian winds म्हणजे ऐतश वारे म्हणत असत. ग्रीक भाषेत Etos म्हणजे वर्ष आणि Etesios म्हणजे वार्षिक हे सर्वविदित शब्द आहेत. याच शब्दांवरून दक्षिणायनाच्या प्रारंभींच्या ऋतूला फ्रेंचमध्यें अजूनहि Ete म्हणतात. वेदांतील एतश शब्दाचा अर्थ ग्रासमानानें वेगवान् असाच केला असून मंत्रद्रष्ट्या ऋषींमध्येंहि एतश वातरशन नांवाचा एक ऋषि आढळून येतो. या साऱ्या वैदिक, ग्रीक आणि फ्रेंच परंपरांचा साकल्यानें विचार केला म्हणजे एतश शब्दाचा दक्षिणायनाच्या प्रारंभाशीं आणि त्या वेळीं सुटणाऱ्या पावसाळी वाऱ्याशीं निकटचा संबंध असल्याचें उघडकीला येतें. एतश शब्दाचा हा अर्थ कळला म्हणजे केव्हां तो सूर्याशीं स्पर्धा करतांना कां आढळतो आणि केव्हां तो रवीच्या रथाला जुंपलेला कां आढळून येतो, किंवा सूर्यतापानें तापलेल्या एतशाच्या संरक्षणासाठीं वंकू वाताच्या घोड्यांना दौडवीत इंद्र कां येतो, तसेंच एतश हा इंद्राचा सखा असतांनाहि तो सूर्यावर सरसावून जाऊं लागला म्हणजे इंद्र त्याला शांत कां करतो, इत्यादि साऱ्या परस्परविरोधी वैदिक कथांचा समाधानकारक उलगडा होतो. एतशाच्या प्रचंड नैसर्गिक शक्तीमुळें त्याला मंत्रद्रष्ट्यांनीं देवहि म्हटलेलें आहे, इतकेंच नव्हे 'यः पार्थिवानि विममे स एतशः रजांसि देवः सविता महित्वना' म्हणजे एतश सवित्यानें सारे भूप्रदेश मोजून टाकले. यासारख्या वचनांतून स्वतः सवित्यालाच एतश ही संज्ञा दिली आहे. इथें हीहि गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, ग्रीकमध्यें एतोस् शब्दाचा गरुड असाहि अर्थ असून गरुडाचा भाऊ अरुण हाच पौराणिक परंपरे-प्रमाणें आपल्या सूर्याचा सारथि आहे. कोणाचे अश्व अधिक चांगले यावरून एतश आणि रवि यांची स्पर्धा होण्याच्या आख्यायिकेपेक्षां गरुड आणि रवि यांच्या स्पर्धेची

आख्यायिका प्राचीनतर असली पाहिजे, हें उघड आहे. Tbe eagle and the cpative sun या ग्रंथांत कदाचित् या प्रश्नाची चर्चा केलेली असेल. पण तो ग्रंथ मी अजून पाहिलेला नाहीं.

## ऐतशाचा आकाशगामी रथ

खरें म्हणजे वरील विवेचन एतश शब्दाच्या अर्थनिश्चितीला पुरेसें होतें. पण याच वेळीं मालाकारांनीं वाखाणलेला ग्रोटकृत ग्रीसचा इतिहास चाळण्याची मला वासना झाली आणि त्या ग्रंथांत ( एतश ) सूर्यानें आपल्या ऐतश ( Aietes अथवा Aetes ) पुत्राला स्वतःच्या रथाबारखाच आकाशगामी रथ दिल्याचें आख्यान अचानक आढळून आलें. हा रथ आणि आपला धाकटा सावत्र भाऊ अप्सूर्तुस् यांसह ऐतशाची इराणी कन्या मिडिया ही आपल्या ग्रीक प्रियकराचा हात धरून त्याच्या आर्गो या दैवी नौकेंतून पळून चालली असतांना ऐतशानें निकरानें तिचा पाठलाग केला. तेव्हां त्याला थांबविण्याकरितां मीडियेनें पित्याच्या देखत अप्सूर्तु-सूला चिरून त्याचीं खांडोळीं समुद्रांत फेकलीं. त्यामुळें तीं सारीं गोळा करून आपल्या अपत्याचा अंत्यसंस्कार करण्याकरितां ऐतशाला थांबावेंच लागलें. ही संधि साधून मीडिया त्याच्या तावडींतून निसटून गेली. 'There was a placecalled Apsarus on the westcoast of Euxine, west of trapezus where the tomb of Apsurtus was shown and where it was affirmed he had been put to death' या ग्रोटच्या ग्रंथांतील पदर्टापेवरून असें कळून येतें कीं, इक्षु म्हणजे काळ्या समुद्राच्या दक्षिण तीरावर अप्सरुस् नांवाचें एक बंदर होतें आणि तिथेंच अप्सूर्तस्चे अवशेष पुरले असल्याचें स्थानिक लोक सांगत असत.

## अप्सरुस्नदी अप्सरांचें मूलस्थान

ग्रीक इतिहासभूगोललेखकांच्या ग्रंथांवरून असें समजतें कीं, आशियामायनर आणि कॉकेशस यांच्या सीमेवरील प्रांताला प्राचीन काळीं कोल्चिस म्हणत असत आणि या प्रांतांत अप्सरुस् नांवाची नदी होती. या नदीतीरावरील स्त्रियांनाच कुरुकुलां-तील लोक अप्सरा म्हणत असत. मूळचें कुरुक्षेत्र अथवा ब्राह्मणग्रंथांतील उत्तरकुरु आणि उत्तरमद्र हे देश कॉकेशस मधील कुरु नदीच्या खोऱ्यांत होते. या कुरुक्षेत्रा-पासून जवळच असलेल्या आशिया मायनर प्रांताला प्राचीन आर्यांनीं प्लक्षद्वीप म्हणजे अंजिरांचें द्वीप अशी संज्ञा दिली होती. उर्वशी आणि पुरूरवा यांच्या पुनर्मीलनाचें क्षेत्र जें अन्यतःप्लक्षाः सरोवर, तें कुरुक्षेत्र आणि प्लक्षद्वीप यांच्या सीमेवर असलें पाहिजे हें उघड आहे. कोल्चिस प्रांताला ग्रीक लोक मुळीं जादूगा-

रांचा देशच म्हणत असत आणि मीडिया ही त्या देशांतली सर्वांत भयंकर जादू-गारीण म्हणून प्रसिद्ध आहे. याच प्रांतांतील उर्वशीनें स्त्रियांचीं हृदयें सालावृकांच्या हृदयासारखीं असल्याचें स्वानुभवानें वर्णन केलें आहे. या प्रांतांतली सर्वांत क्रूर लांडगी जी मीडिया हिनें पुढें पतीचा सूड घेण्याकरितां स्वतःचीं असहाय अपत्यें-सुद्धा चिरल्याचें वर्णन ग्रीक नाटककार युरिपिडीस यानें केलें आहे. अप्सरांच्या मूलस्थानासंबंधीं हें सारें विवेचन करण्याचें कारण हें कीं, आपल्या परंपरेप्रमाणें सूर्य आणि अप्सरा यांचा निकटचा संबंध आहे. प्रत्येक मासांत सूर्याला दोन अप्सरा सहचरी लागतात. या कारणामुळेंच ऐतशाच्या ग्रीक कथेंत अप्सरस् नदीतीरावरील अप्सरस् नगराचा आणि अप्सूर्तुस् पुत्राचा उल्लेख येत असला पाहिजे. सूर्यपुत्र ऐतशाचें ग्रीक आख्यान जिथें निर्माण झालें, तिथेंच आपल्याकडील अप्सरांच्या आख्यायिकाहि प्रथम प्रचलित झाल्या. ग्रीक लोक सागरसंचारी असल्यानें दैवी किंवा मानवी नौका सागराला सादर समर्पण करणाऱ्या ऐतशाची त्यांना आठवण राहिली. त्यांच्या उलट वैदिक आर्य हे स्थलसंचारी असल्यामुळें उर्वशीमेनकांच्या सारख्या मोहिनी सर्पिणीसम सुंदरी अविश्वासिनींच्या अविस्मरणीय स्मृतींतच ते दंग होऊन गेले आपल्या पुराणांतील अप्सरा या केवळ सूर्याच्या सहचरी असल्या तर ग्रीक काव्यांतली मानवांना वराहावस्थेला नेणारी मायाविनी सर्स ही स्वतः सूर्याची कन्या आणि ऐतशाची भगिनीच आहे. असल्या मायाविनींच्या नादानें मानवाला जी निरयगति प्राप्त होते, तिचें स्पष्टीकरणहि ग्रीकपुराणाच्या आधारानेंच होऊं शकतें. भर्तृहरीनें ज्या निरयनगरद्वाराचा उल्लेख केला आहे, त्या निरयनग-राचा उलगडा युरोभारतीय काळांतील अस्तगामी सूर्याच्या ( Nereus ) या ग्रीक नांवानेंच होऊं शकतो. ग्रीक पुराणांतील ऐतशाचा ज्या मद, मद्र, मीड इत्यादि नांवांनीं सुविदित असलेल्या कुळाशीं संबंध असल्याचें त्याच्या कन्येच्या नांवावरून सुव्यक्त होतें, त्या मद्रकुलांतील मुली अतिसुंदर असल्याची भारतीय समाजांतहि प्रसिद्धि होती. मद नामक महासुराच्या साहाय्यानेंच च्यवनांनीं अश्विनी-कुमारांना यज्ञांत हविर्भाग देणें इंद्रभक्तांना भाग पाडलें, असें महाभारतावरून समजतें. म्हणजे सूर्यपुत्र अश्विनीकुमारांची उपासना, सूर्याच्या सहचरी ज्या अप्सरा त्यांच्या कथा आणि एतशाची सूर्यनारायणाशीं झालेली स्पर्धा या साऱ्या परंपरांचा वैदिक आर्यांमध्यें मागाहून समाविष्ट झालेल्या एका कुळाशीं संबंध येतो. एतश हा एक राजर्षि असल्याचा उल्लेख सायणाचार्यांनीं केला आहे. पण त्याचें चरित्र त्यांना अविदित आहे. वास्तविक पाहतां या साऱ्या गोष्टी प्रो. मॅक्डोनेलसारख्या विदेशी

विद्वानांच्या सहज ध्यानांत येण्याजोग्या आहेत; पण त्या दृष्टीनें पाहण्याची कल्पना त्यांच्या धोपटमार्गीपणामुळें त्यांना सुचली नाहीं, म्हणून मला हा सारा विस्तार करावा लागला.

## सविता सुहस्त कां

सविता आणि सूर्य यांच्या वर्णनांत वारंवार येणाऱ्या एतश शब्दाची इतकी चिकित्सा केल्यानंतर आतां सवित्याचें सत्य स्वरूप समजावून घेणें पुष्कळच सुकर झालें आहे. डॉ. दांडेकर सवित्याचें सूर्यत्व नाकारीत असले तरी 'विनाकम् अख्यत् सविता वरेण्यः अनु प्रयाणं उषसो विराजति' (५–८१–२) या वचनांत वर्णिल्याप्रमाणें उषेच्या पाठोपाठ प्रकाशमान होणारा आणि प्रवासाला निघणारा सविता सूर्य नव्हे, या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. सवित्याचें वैशिष्ट्य सांगतांना गृत्समदानें म्हटलें आहे, 'आपः चित् अस्य व्रत आ निमृग्राः अयं चित् वातो रमते परिज्मन्' (२–३८–२) म्हणजे वारि आणि वायु हे सवित्याच्या नियमाप्रमाणें चालतात. सविता आणि एतश यांचे वर वर्णिलेले परस्परसंबंध लक्षांत घेतले म्हणजेच वारिवायूंचें नियंत्रण सवित्याकडे कां आलें होतें, याचें कारण कळून येतें. विश्वामित्राच्या नदीसूक्तांतहि नद्या सांगतात, 'देवो अनयत् सविता सुपाणिः तस्य वयं प्रसवे याम उर्वीः' म्हणजे सुंदर हस्तांनीं युक्त अशा सविता देवानें आम्हांला मार्गदर्शन केलें असून त्याच्याच प्रेरणेप्रमाणें आम्ही मार्गक्रमण करीत आहोंत. या वचनांतील सवित्याचें सुपाणि हें विशेषण विशेष महत्त्वाचें आहे. वेदांत सवित्याला सुपाणि, पृथुपाणि, हिरण्यहस्त इत्यादि विशेषणें वारंवार लाविलीं आहेत. ब्राह्मण ग्रंथांवरून असेंहि समजतें कीं हस्त नक्षत्राची देवता सविताच आहे. हस्त आणि सविता यांचा हा अविच्छेद्य संबंध पाहिला म्हणजे माझ्यासारख्या 'ओरायन' कारांच्या परंपरेंतील लेखकाला असें अनुमान काढणें अपरिहार्य होतें कीं, हस्त नक्षत्रांत दक्षिणायन होत असतांनाच सवित्याला या सुपाणिप्रभृति संज्ञा लाभल्या असल्या पाहिजेत. स्वतः डॉ. दांडेकरांनीं आपल्या सवित्यावरील लेखांत अशी माहिती पुरविली आहे कीं, मध्य आशियापासून मध्य युरोपापर्यंतच्या पुरातन गुहाचित्रांतून आकाशापर्यंत हात भिडविलेल्या एका देवाचें चित्र वरचेवर आढळून येतें. केव्हां, केव्हां त्या देवासन्निध सूर्यनारायणाचें चक्रहि काढलेलें दिसत असल्यामुळें डॉ. दांडेकरांच्या मताविरुद्ध जाऊन असें निश्चितपणें विधान करतां येतें कीं, तेव्हां हस्त नक्षत्रामध्यें दक्षिणायन होत असलेल्या सवित्याचेंच तें चित्र असलें

पाहिजे. ज्या हस्त नक्षत्रावर तेव्हां दक्षिणायन होत होतें, त्याच्यावरच आतां शरत् संपात होतो. यावरून ढोबळ रीतीनें गणित केलें तरी असें दिसतें कीं, त्या काळाला आतां ६५०० वर्षें लोटलीं आहेत. या सुदीर्घ कालावधींत सध्यां महाराष्ट्रांत रहावयाला आलेल्या आर्यांनीं तरी हस्ताच्या तत्कालीन माहात्म्याचा स्वतःला विसर पडूं दिला नसून आतांहि त्या नक्षत्रांत सविता आला असतांना महाराष्ट्रीय मुली हस्ताचीं गाणीं म्हणून तो पंध्रवडा साजरा करितात आणि त्यामुळेंच ऋग्वेदांतील सावित्याच्या सत्य स्वरूपाचा मला इतक्या सहज रीतीनें उलगडा करतां आला. हस्ताच्या रूपानें सवित्याचा एकच हात आकाशांत दिसत असल्यामुळें दुसऱ्या हाताची त्यानें यज्ञांत अाहुति दिल्याची आख्यायिकाहि श्रौत वाङ्मयांत प्रचलित झाली आहे.

## अधिकारी विद्वानांची उलटी विचारसरणी

पण माझा हा निष्कर्ष अधिकारी विद्वानांना पटण्याचा संभव फारच थोडा दिसतो. कारण माझ्यासारख्या ' ओरायन ' कारांच्या परंपरेंत वाढलेल्या लेखकाला ज्या गोष्टी अगदीं साध्या आणि सरळ दिसतात, त्याच आमच्या अधिकारी विद्वानांना नेमक्या अगदीं उलट्या दिसतात. उदाहरणार्थ, आमचे डॉ. दांडेकर काय म्हणताहेत पहा. ' सवितृ Is सुपाणि, पृथुपाणि, हिरण्यपाणि, हिरण्यहस्त, स्वंगुरिः सुबाहु' etc. In तै. सं. too it is said: देवस्य त्वा सविता उद्वपतु सुपाणिः, स्वंगुरिः सुबाहुः उत शक्त्या. This gesture of सवितृ by means of his huge golden hands was so deeply rooted in the mind of the vedic poets that even in later Brahmanic literature the हस्त नक्षत्र was regarded sacred to सवितृ on the basis of बंधुता philos ophy.' म्हणजे हस्त नक्षत्राशीं संबंध आल्यामुळें सवित्याचे हात गगनाला भिडले नसून त्याचे हात आधींपासून गगनाला भिडत असल्यामुळें आकाशांतील हस्त नक्षत्राचें आधिपत्य त्याला प्राप्त झालें ! नाथांच्या घरची उलटीच खूण म्हणतात, तिचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अधिकारी विद्वानांच्या आणि माझ्या विचारसरणींत असा आकाशपातालप्रभेद असल्यामुळेंच त्यांचीं मतें पालटण्याचा मी सहसा प्रयत्न करीत नाहीं. तथापि तैत्तिरीय ब्राह्मणांतील नक्षत्रिय प्रजापतीच्या वर्णनांत ' हस्त एव अस्य हस्तः ' असा जो उल्लेख आला आहे, तिकडे यांचें लक्ष वेधलें पाहिजे, असो.

## ज्येष्ठी पौर्णिमेचा संदर्भ

वर मी वसंतांतील अमावास्या कृत्तिका, रोहिणी, मृग आणि ग्रीष्मांतील अमावास्या फाल्गुनी, हस्त, चित्रा या नक्षत्रांवर होत असल्याचा शतपथाच्या आधा-

रानें उल्लेख केला आहेच. त्यानंतर वसंतऋतूंतील पौर्णिमा ज्येष्ठा आणि अषाढा नक्षत्रांवर होत असल्याचा शुक्ल यजुर्वेदाच्या तेराव्या अध्यायांत व्यंजनेनें उल्लेख आला असल्याचें माझ्या निदर्शनाला आलें आहे. ‘ मधुश्च माधवश्च वासंतिकौ ऋतू अग्नेः अंतःश्लेषः असि कल्पेतां द्यावापृथिवी कल्पन्ताम् आपः ओषधयः कल्पन्ताम् अग्नयः पृथक् मम ज्यैष्ठ्याय सव्रताः । २५ अषाढा असि सहमाना सहस्व अरातीः सहस्व पृतनायतः । २६ या लागोपाठाच्या दोन कंडिकांतील ज्येष्ठा आणि अषाढा यांचे पर्यायानें आलेले उल्लेख हे आपल्या अर्वाचीन ज्येष्ठ आणि आषाढ मासांनाच अनुलक्षून आले आहेत असें म्हणावयाचें नसल्यास निदान ज्येष्ठी पौर्णिमेला आणि आषाढी पौर्णिमेला अनुलक्षून आले आहेत, हें उघड आहे. ज्येष्ठ आणि आषाढ या माससंज्ञांचा उद्गम येथूनच झाला असला पाहिजे. शुक्ल यजुर्वेदाच्या वरील अवतरणांतील ‘ ज्यैष्ठ्याय ’ या शब्दावरून ज्येष्ठा नक्षत्राचाच बोध होतो, हें तैत्तिरीय ब्राह्मणांतील पुढील वचनावरून सिद्ध होतें. ‘ इंद्रो वा अकामयत । ज्यैष्ठ्यं देवानाम् अभिजयेयम् इति । स एतम् इंद्राय ज्येष्ठायै पुरोडाशम् एकादशकपालं निरवपन् महाव्रीहीणाम् । ततो वै स ज्यैष्ठ्यं देवानाम् अजयत् । ज्यैष्ठ्यं ह वै समानानाम् अभिजयति । य एतेन हविषा यजते । य उ च एनत् एवं वेद । सः अत्र जुहोति । इंद्राय स्वाहा ज्येष्ठायै स्वाहा । ज्यैष्ठ्याय स्वाहा अभिजित्यै स्वाहेति । ’ तेव्हां वरील अवतरणांतील ‘ मम ज्यैष्ठ्याय सव्रताः ’ यांतल्या ज्यैष्ठ्याय शब्दावरून ज्येष्ठा नक्षत्राचा बोध होतो, हें वैदिक परंपरेपासून भ्रष्ट न झालेल्या कोणाहि विद्वानाला मान्य करावें लागेल. मग ज्या काळीं वसंतांतील अमावास्या रोहिणीवर येत होती, त्या काळच्या वसंताच्या वर्णनांत पर्यायानें कां होईना ज्येष्ठा नक्षत्राचा उल्लेख आला तर तो ज्येष्ठी पौर्णिमेला उद्देशून आला असला पाहिजे, हें उघड आहे.

## प्रथम सविता, नंतर वरुण

वरील चर्चेच्या अनुरोधानेंच सविता आणि हस्त यांच्यासंबंधीं तैत्तिरीय ब्राह्मणांत ( ३–१–१–९ ) आलेल्या माहितीचा विचार केला पाहिजे. ‘ आयातु देवः सवितोपयातु । हिरण्मयेन सुवृता रथेन । वहन् हस्तं सुभगं विद्मनापसम् । हस्तः प्रयच्छत्वमृतं वसीयः दक्षिणेन प्रतिगृभ्णीम एनत् । या मंत्रांतून हस्तासह येणाऱ्या सवित्याचें स्थान दक्षिणेला असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. त्याचप्रमाणें सविता हा वरुणापेक्षा पुरातन देव असल्याचेंहि त्याच ब्राह्मणांतील पुढील वचनावरून उघडकीला येतें. ‘ प्रजापतिः सविता भूत्वा प्रजा असृजत । ता एनम् अत्यमन्यन्त । ता अस्मादपाक्रामन् । ता वरुणो भूत्वा प्रजा वरुणेनाग्राहयत् । ताः प्रजा वरुणगृहीताः

प्रजापतिं पुनरुपाधावन् नाथमिच्छमानाः । स एतान् प्रजापति वरुणप्रघास अपश्यत् ( १–६–४–१ ) या वचनावरून असें समजतें कीं प्रजापतीनें सविता होऊन प्रजा निर्माण केल्या, तरी त्या साऱ्या त्याच्या अधिकाराला जुमानीनात. तेव्हां त्याला वरुण बनून त्यांना पाशबद्ध करावें लागलें. म्हणजे वैदिक देवतांच्या उत्क्रांतींत सवित्याच्या मागून वरुणाची उपासना प्रचलित झाली. एतेरयांतील शुनःशेपाच्या आख्यानांतहि सवित्याच्या नंतरच वरुणाचें स्थान असल्याचें उघड दिसतें. राज्याभिषेकविधीवरूनहि हेंच अनुमान काढावें लागतें. असो. प्रजापतीनें वरुण बनून ज्या वरुणप्रघास यज्ञाची सृष्टि केली आणि उत्शृंखल झालेल्या प्रजेच्या दुर्वतनाला आळा घातला, त्याचा इथें थोडा विचार केला पाहिजे. हा यज्ञ वसंतऋतूंत आषाढी पौर्णिमेला करीत असत. या यज्ञाचा उद्देश, यजमानाची तोंपर्यंत जन्मलेली आणि पुढें जन्म घेणारी प्रजा निर्दोष आणि निकोप व्हावी, हा असे. या यज्ञांत इंद्र, अग्नि, वरुण, मरुत्, प्रजापति इत्यादि देवतांना यजमानपत्नीनें हवि द्यावयाचा असतो. मात्र हा हवि देण्यापूर्वी एक ऋत्विज ‘ तुला कोणी जार आहेत काय आणि असल्यास ते कोण कोण आहेत ’ असा प्रश्न यजमानपत्नीला विचारीत असे. या प्रश्नाला तिनें खोटें उत्तर दिलें तर तो वरुण देवाचा अपराध केल्याप्रमाणें होऊन, त्याकरितां क्रुद्ध वरुण हा तिच्या निकटच्या नातेवाईकांचा घात करील, अशी तेव्हां सार्वत्रिक समजूत होती. या प्रश्नोत्तरांवरून प्रजेच्या कोणत्या पापाला प्रतिबंध करण्याकरितां वरुणप्रघासाची सृष्टि झाली होती, याची अर्धवट कल्पना येऊं शकते.

## सावित्याची स्थानबद्धता

सविता देवाची कल्पना आणि उपासना ही खिस्तपूर्व ४५०० वर्षांच्या सुमाराची असली तरी त्याच्या वर्णनाचीं सध्यां उपलब्ध होणारीं सूक्तें खिस्तपूर्व २४०० च्या सुमाराला संकलित केलेलीं आहेत. या सुदीर्घ कालावधींत हस्तांतील दक्षिणायन मार्गे सरून तें अथर्ववेदांतील ‘ अयनं मघा मे ’ या वचनांत सांगितल्याप्रमाणें मघा ताऱ्यापाशीं आलें होतें. हस्तापासून मघापर्यंतच्या तीन तारकात्मक नक्षत्रांतून अयनबिंदु मागें सरकण्याला सरासरी इतकींच वर्षें लागतात. याप्रमाणें दक्षिणायन मागें हटल्यामुळें हस्त नक्षत्राशीं हस्तांदोलन करणाऱ्या सवित्याला त्या अयनबिंदूच्या आधिपत्याचा त्याग करून तो मान मघवन् इंद्राला अथवा पितरांना

...१०

अर्पण करावा लागला. अथर्ववेदांतच ‘ दक्षिणा दिक् इंद्रो अधिपतिः ’ असें वचन आढळत असल्यामुळें तेव्हां इंद्राला दक्षिणादिशेचा अधिपति बनविला होता, हें उघड आहे. पण इंद्र मघवन् बनला तरी मघा नक्षत्राचें आधिपत्य त्याला न लाभतां तें पितरांनाच लाभलें. त्यामुळें सरतेशेवटीं इंद्राला दक्षिण दिशा यमाच्या स्वाधीन करून पूर्वेकडे वळावें लागलें. असो, वर वर्णिल्याप्रमाणें हस्ताच्या हस्तांत सवित्याचा हस्त अडकल्यामुळें त्याचा अयनबिंदूशीं असलेला संबंध जसा एकेका नक्षत्रानें दुरावत चालला, तसतसा तो केवळ सविता म्हणजे चेतना देणारा, चित् देणारा, चित् तत्त्वाचा प्रतिनिधि बनून आपल्या मूळच्या दिनकरस्वरूपापासून दूर जाऊं लागला. या अवस्थेंतच डॉ. दांडेकर किंवा त्यांचे पाश्चात्य गुरु त्याला पहात असल्यामुळें सविता म्हणजे दिनकर नव्हे, असें ते म्हणूं लागले आहेत. याकरितां त्यांना फारसा दोष देण्यांतहि अर्थ नाहीं. कारण एतश सवित्याचें मूळ स्वरूप अथर्ववेदाच्या काळींच दुर्बोध झालें असल्यानें त्यांतील ऐतश प्रलापांचा तेव्हांहि बोध होत नव्हता आणि त्यामुळेंच आपल्या पित्याला वेड लागलें असें समजून ऐतशपुत्रानें त्याचें तोंड बंद करून ते प्रलाप थांबविले, अशी आख्यायिका आहे. याप्रमाणें दिनकराच्या कर्तव्यांचा जेव्हां प्रजापति सवित्यानें त्याग केला, तेव्हांच कशुकुलांतील सूर्यदेवाला आपला घरजावई करून घेऊन त्यानें आपलें आद्यकर्तव्य त्याच्याकडे सोंपविलें. सूर्य हा त्वष्टा प्रजापतीचा जांवई असला तर सविता हा स्वतः त्या प्रजापतीशीं एकरूप आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली तर त्या उभयतांचे विभिन्न उल्लेख एकाच सूक्तांतून कां येतात, याचा उलगडा होईल. सविता देवाविषयीं वाटणाऱ्या आत्मीयते-मुळें त्याच्या नांवापासून उद्भवलेलें सावित्री हें नांव आपल्या समाजामध्यें अद्यापि प्रचलित असलें तरी सूर्य नामापासून उद्भवलेलें सूर्या हें स्त्रीलिंगी नांव इराण-अफगाणिस्थानांतून अद्यापि प्रचलित असूनहि भारतांतील हिंदूंमधून तें कधींच लुप्त झालें आहे. हाहि सूर्यनारायणाच्या उसनवारीचा एक पुरावा होऊं शकेल.

## नैतिक कल्पनांतील परिवर्तन

सविता देव मागें पडण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण म्हणजे दक्षिणायन हस्तांतून मागें सरून मघा ताऱ्यापाशीं येईपर्यंतच्या काळांत वैदिक आर्यांच्या नैतिक कल्पनांत फार महत्त्वाचें परिवर्तन घडून आलें होतें. अगदीं प्राचीन काळीं पशूंच्याप्रमाणेंच नरपशूंचा समागमहि फारसा एकांतांत होत नसे आणि त्या दृश्यांच्यामुळें उत्तेजित, उद्दीपित झालेल्या त्यांच्या बालकांच्याकडून त्यांचें अनेकदा

अनुकरण होत असे. विवाहविधींतील वधूवरांच्या समागमाचें प्रात्यक्षिक साऱ्या पाहुण्यांनीं पाहण्याची वहिवाट कोणकोणत्या समाजांतून किती किती काळापर्यंत चालू होती, यासंबंधीं बरीचशी माहिती वेस्टरमार्कनीं आपल्या विवाहसंस्थेच्या इतिहासांत दिली आहे, त्यावरून वरील कल्पना खरी असावी, असें वाटतें. अशा प्रकारें श्रृंगारचेष्टांची चटक लागलेलीं मुलें अगदींच स्वैराचारी बनूं नयेत, यासाठीं अतिप्राचीन काळच्या समाजाच्या नेत्यांनीं भावाबहिणींनीं परस्परांशींच विवाह करावेत, अशी स्मृति निर्माण केली होती. कदाचित् अत्यंत विरळ वसतीमुळें त्या काळीं अन्य कुटुंबांतील व्यक्तींशीं शरीरसंबंध घडणेंहि दुष्कर असल्यानें असले प्रकार घडत असतील. कोणत्याहि कारणानें कां होईना, पण या प्रकारच्या विवाहांची एक धर्माधिष्ठित परंपराच निर्माण झाली होती आणि त्या परंपरेशीं त्वष्टा, सविता, विश्वरूप इत्यादि नांवानीं ओळखल्या जाणाऱ्या देवांची उपासनाहि निगडित झाली होती. यमयमीसूक्तांत यमीनें म्हटलेंच आहे. 'गर्भे नु नौ जनिता दंपती कर्देवः त्वष्टा सविता विश्वरूपः' या वचनांत भ्रात्याशीं विवाह करण्याचा अधिकार आपल्याला सविता देवानेंच दिला असल्याचें यमीनें आग्रहानें प्रतिपादिलें आहे. या प्रकरणीं 'ऋग्वेद-अथर्ववेदांतील नात्यागोत्यासंबंधींचे शब्द' या प्रबंधांत सौ. इरावतीबाई कर्वे लिहितात, "Brother-sister marriages seem to have been the rule in the family of the God सवितृ i.e. sungod. Not only did he marry his sister उषस् but also his children married among themselves." सौ. इरावतीबाईंच्या या अवतरणावरून सवित्याची उपासना ही भावाबहिणींच्या विवाहाच्या परंपरेशीं किती निगडित झाली होती, हें कळून येतें. या परंपरेला यमराजानें तीव्र विरोध केल्यामुळेंच त्याला धर्मराज हें नांव प्राप्त झालें असून सवित्याच्या परंपरेच्या जागीं आपल्या परंपरेची त्यानें प्रस्थापना केल्यामुळेंच सवित्याच्या हातून गेलेल्या दक्षिणायनबिंदूच्या सिंहासनाचा कांहीं काळपर्यंत इंद्रानें उपभोग घेतला असतांनाहि त्याला तेथून खो देऊन वैदिक आर्यांनीं त्या सिंहासनावर यमराजाची स्थापना केली. सवित्याच्या नीतीच्या जागीं आपल्या नीतीची प्रस्थापना करणाऱ्या यमधर्मालाच सवित्याचें सिंहासन समर्पण करणें अत्यंत समुचित आहे, हें उघड आहे.

## अवेस्त्यांतील यमाचा अधिक्षेप

आपल्या यमराजाचें महत्त्व कमी करण्याकरितां अवेस्ताग्रंथांत पुढील संवाद

घालण्यांत आला आहे. 'Beside to me Zarathustra, to whom hast thou taught the law which is derived from Ahura? Then answered Ahura-Mazda, to Yama the beautiful, O pure Zarathnstra. With him first of of mankind have I conversed. I who am Ahura-Mazda. Beside you Zarathustra I have taught to him the law derived from Ahura. Then I said to him, obey me O Yima the fair, as the recorder and the bearer of the law. Then answered me Yima the fair. 'I am not the creator, nor the teacher, nor the recorder, nor the bearer of the law,'—म्हणजे आपला संदेश लेखनिविष्ट करून त्याचा जनतेंत प्रसार करण्याचें काम अहुरमझ्दानें यमाला सांगितलें असतांना तें म्हणे यमानें नाकारलें! असें लिहिण्याचा हेतु हाच कीं वैदिक आर्यांनीं यमधर्माच्या नीतीचा स्वीकार केल्यामुळें त्यांच्यापासून फुटून निघालेल्या वंचितांची, यम हा परमेश्वराचा पहिला प्रेषित नसून त्याचा पहिला प्रेषित जरथुस्त्रच आहे अशी समजूत करून द्यावी. कारण आमच्या विवाहनीतीचा प्रारंभ जसा यमधर्मापासून झाला आहे, त्याप्रमाणेंच आमची आत्मज्ञानाची परंपराहि विवस्वानापासून यमाला आणि यमापासून नचिकेताला प्राप्त झाली आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं या साऱ्या परंपरांचा उलगडा सध्यां आपल्यांत जे इतिहासनामधारी ग्रंथ वावरत आहेत, त्यांतून कोठेंहि केलेला आढळत नाहीं.

## यममनूंचे परस्परसंबंध

यम हा पहिला मर्त्य पुरुष होता, अशी आपली परंपरा आहे. या परंपरेवर आक्षेप घेऊन अनेकांनीं मनु हा साऱ्या मानवांचा पूर्वज होता, अशा आशयाच्या वेदांतील वचनांचा निर्देश केला आहे. पण सकृद्दर्शनीं परस्परविरोधी दिसणारीं वेदांतील दोनहि विधानें खरीं आहेत, हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. माता, भगिनी आणि पत्नी यांच्यातील भेद पशूंना माहीत नसतात आणि यमाच्या जन्मापूर्वीं या जगांत वावरणाऱ्या नरपशूंनाहि ते माहीत नव्हते. हे भेद ओळखणारी पहिली व्यक्ति यमच असल्यानें यमालाच पहिला मर्त्य पुरुष मानणें अत्यंत उचित आहे. स्त्री-पुरुषांमध्यें विधीनें केलेल्या भेदाव्यतिरिक्त आणखी कांहीं कृत्रिम भेद निर्माण करण्याच्या अपराधाबद्दल तत्कालीन इतर नरपशूंनीं त्याला लौकरच बाळि दिला असावा. त्याचा सावत्रभाऊ मनु यानें यमाचें अनुकरण न केल्यामुळें त्याला मात्र दीर्घायुष्य लाभलें आणि त्याची संतति पृथ्वीवर वाढली. यामुळें आजच्या मनुजांचा आद्य पूर्वज मनु

ही कल्पनाहि तितकीच खरी आहे. श्रीकृष्णानें गीतेंत सांगितलेला धर्म मनूच्या परंपरेंतला असून ती परंपरा शुक्ल यजुर्वेदाची दिसते. उलट वर उल्लेखिलेली यम-नचिकेतांची कठोपनिषदांतील परंपरा ही कृष्ण यजुर्वेदाची आहे. असो. सौ. इरावती-बाईंनीं यमासंबंधीं आणखी लिहिलें आहे. 'यम however died childless, he was the first mortal to die and became the king of the dead. मनु generated the mortals with the help of श्रद्धा. Prof. Sarkar has shown that she was a sister of मनु. The यम myth in its Iranian version is still more interesting. यिम was a mythical king who instead of marrying his sister यमी married another woman-the sister of a देव and gave his sister यमी to that देव in exchange. The future of the human race was thus jeopordised but यमी managed to secure a son from यिम while he was in a drunken fit and saved mankind.' या उताऱ्यावरून इराणांत भावाबहिणींच्या विवाहांची प्रथा किती प्रबळ होती, याची पुरेशी कल्पना येऊं शकेल. या प्रथेला विरोध करतांना यमानें मित्रावरुणांचाहि आधार घेऊन यमीला सांगितलें होतें. 'न तिष्ठान्ति न मिषन्त्येते देवानां स्पश इह ये चरन्ति' म्हणजे मित्रावरुणांचे हेर कधीं थांबत नाहींत, कधीं चुका करीत नाहींत, तेव्हां त्या हेरांच्या भीतीनें तरी तूं हें पाप करूं नकोस. मित्रावरुणांच्या जोडीपैकीं मित्र देव हा सरसकट वचनभंग करणाऱ्यांना शासन करतो आणि वरुण हा वैवाहिक नीतीचें नियमन करतो, अशी वैदिक आर्यांची समजूत होती. या जोडीपैकीं एकट्या मित्राचाच जरथुस्त्री पंथानें स्वीकार केला आणि वरुणाला मात्र त्यांनीं आपल्या देवतांमध्यें स्थान दिलें नाहीं. यावरून वैदिक आणि जरथुस्त्री आर्यांतील मतभेदाचें मूळ काय असावें याची कल्पना येते.

## भग आणि अर्यमा यांचें कार्य

प्रजापति सविता होता, तोंपर्यंतचा इतिहास एकंदरीनें एकसूत्री होता. पण वर उतरून घेतलेल्या तैत्तिरीय ब्राह्मणांतील वचनांत सांगितल्याप्रमाणें वरुण बनून त्यानें पुरुषस्त्रीसंबंधाचें नियंत्रण करण्याचें कर्तव्य स्वतःकडे घेतलें, तेव्हांपासूनचा इतिहास बराच गुंतागुंतीचा झाला आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत हस्ताच्या अलीकडील उत्तरा आणि पूर्वा या नक्षत्रांचे अधिपति अनुक्रमें भग आणि अर्यमा हे सांगितले

आहेत. हे दोघेहि अदितीचे पुत्र असून वरुण हा अदितीपुत्रांचा प्रमुख असल्यानें ते त्याचेच प्रातिनिधि आहेत. या दोघांचा अवेस्त्यांतहि उल्लेख येतो. या उभयतांचें कार्य मुख्यतः लग्नें जुळविण्याचेंच दिसतें. इथें पुन्हा मला सौ. इरावतीबाईंचेच आधार उतरून घेणें भाग आहे. 'अमाजूरिव पित्रोः सचा सती समानात् आ सदसः त्वां इये भगम्' ( २–१७–७ ऋ ) 'I call on you ( इंद्र ) as an old maid living with her father calls on भग." 'अमाजुरः चित् भवथो युवं भगो ( १०–३९–३ ) 'you are like भग the husband bringer god, to spinster' 'अश्रमत् इयं अर्यमन् अन्यासां समनं यती। अंगो नु अर्यमन् अस्याः समनं आयति.' 'This girl oh अर्यमन्, has toiled going to other girl's marriage assembly now oh अर्यमन्, shall other women come to her marriage assembly' 'अयम् आयाति अर्यमा पुरस्ताद् विषितस्तुपः अस्या इच्छन् अग्रुवै पतिम् उत जायाम्अजामये.' 'Here comes अर्यमन् with locks loosened in front, seeking a husband for this spinster and a wife for a wifeless one.' या साऱ्या अवतरणांवरून भग आणि अर्यमा यांच्या कार्यक्षेत्राची पुरेशी कल्पना येते.

## भग, भव आणि अग्नि

ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला असतांनाहि त्यांच्याकडे लग्नें जुळविण्याचेंच कार्य येणें स्वाभाविक दिसतें. जोंपर्यंत प्रजापति आपल्या कन्येचा अभिलाष करीत होता, तोंपर्यंत विवाहाचा प्रश्न मुळीं उत्पन्नच होत नव्हता. पुढें प्रजापतीला रुद्रानें शासन केल्यानंतर म्हणजे कन्यागमनाचा निषेध प्रस्थापित झाल्यानंतर मगच पित्याच्या घरीं अविवाहित राहणाऱ्या मुली आपलें लग्न जुळविण्यासाठीं भग आणि अर्यमा यांच्या प्रार्थना करूं लागल्या. भगासंबंधीं मॅक्स मुल्लर लिहितात. 'भग another solar deity in the वेद occurs in the अवेस्ता as बघ and has become there a general name for god. This word must be as old as देव, for it occurs in the slavonic languages as बोग, god.' या भग शब्दाचा गुह्येंद्रियांशीं संबंध आहे, हें तज्ज्ञांना सांगायला नकोच. याच्या अर्थासंबंधीं कोणाला संशय असल्यास त्यांनीं शुक्लयजुर्वेदांतला राज्याभिषेकविधीमधील पुढील मंत्र पहावा. 'आनंदनंदावांडौ मे भगः सौभाग्यं पसः' याप्रमाणें भग शब्दाचा अर्थ निश्चित झाला म्हणजे स्वाभाविकपणेंच भग देवाचा शंकराशीं कांहीं

संबंध आहे कीं नाहीं, हा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नासंबंधीं माझें मत असें आहे कीं ऋग्वेदांतील भग आणि ऋग्वेदोत्तरकालांतील भव हे दोनहि देव विभिन्न नसून एकरूपच आहेत. पश्चिम इराणांतील लोकांत 'व' चा अपभ्रंश 'ग' होत असे, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे पर्शुभारतीय समाज परस्परांपासून विभक्त होण्यापूर्वीच्या काळांत भग आणि भव या दोन नांवांनीं वस्तुतः एकाच देवाची उपासना प्रचलित होती, हें रहस्य उघडकीला येतें. भारताच्या पश्चिमेकडील बाहीक देशांत रुद्राला भव म्हणत असत, असा शतपथांत (१–७–३–८) उल्लेख आढळतो. 'अग्निः वै स देवः तस्य एतानि नामानि। शर्वः इति यथा प्राच्याः आचक्षन्ते, भवः इति यथा बाहीकाः पशूनाम् पतिः रुद्रो अग्निः इति.' शतपथाच्या पूर्वी शुक्लयजुर्वेदांतहि भव नांवाचा उल्लेख आलेला आहे. इथें पुन्हा भव हा अग्नि कसा या कोड्याचा उलगडा केला पाहिजे. ऋग्वेदांत अग्नि हा वसंतसंपाताचा देव आहे. याचा अर्थ असा कीं अग्नि हा यौवनाचा देव आहे आणि त्यामुळें शुक्ल यजुर्वेदांत (२–२०–३) (सुषदा योनौ स्वाहा वाट् अग्नये संवेशपतये स्वाहा) त्याला संवेशनाचा अधिपति ही संज्ञा दिली आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे अग्नि, भग, भव यांचे परस्परसंबंध सुस्पष्ट होतात. आपल्या परंपरेप्रमाणेंहि भगाचा एकादश रुद्रांत समावेश होतो.

## उषा ही वसंतसंपाताची देवता

वेदकालांत अग्नि, भग इत्यादि नांवांनीं अधिक परिचित असलेल्या रुद्रानेंच कन्यागमन करणाऱ्या प्रजापतीला शासन केलें, असें आपली परंपरा सांगते. 'प्रजापतिः वै स्वाम् दुहितरम् अभ्यध्यायत्, दिवम् इति अन्ये आहुः उषसम् इति अन्ये (ऐतरेय ब्रा. ३–२–९) म्हणजे प्रजापतीला ज्या कन्येचा अभिलाष उत्पन्न झाला, ती द्यू असें कोणी म्हणतात आणि उषा असें कोणी म्हणतात. यांपैकीं पहिली अयनबिंदूची देवता असून दुसरी संपातबिंदूची देवता आहे. यावरून त्याकाळीं अयनबिंदूपासून एक आणि संपातबिंदूपासून एक असे दोन वर्षारंभ मानले जात असत, असें दिसून येतें. यांच्यापैकी द्यू देवतेसंबंधीं कै. डॉ. शामशास्त्री यांनीं त्यांच्या विविध प्रबंधांतून पुरेशी चर्चा केली असल्यानें ती अयनबिंदूची देवता असल्याचें सिद्ध करण्याची आवश्यकता नाहीं. पण उषेची गोष्ट तशी नाहीं. उषा ही वसंतसंपाताची देवता असल्याचें मला प्रथम केंद्रसरकारांतील एक मंत्रि डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या Religion In Vedic Literature' या ग्रंथांतील

पुढील वाक्यावरून कळून आलें, Excepting the Vedic goddess of dawn in whom tne Vedic poet personifies dawns in general, this goddess, in practically all the other I. E. branches is a deity which denotes merely the sunrise which heralds the beginning of the spring or the dawn which commences the spring. (Die am Fruhlingsanfang neuaufgehende sonne oder vielmehr die erste Morgenrote des neuen Fruhlings. 'Die Religion der indogermanen Wilke ') डॉ. पंजाबरावांनीं फारशी चिकित्सा न करतां उतरून घेतलेल्या या अवतरणाप्रमाणें युरो-भारतीय आर्यांच्या सर्व शाखांमध्यें वसंत ऋतूच्या प्रारंभींच्या एकाच उषेला जर उषा ही संज्ञा लाभली असली, तर त्यांच्या वर्षांत तेवढी एकमेव उषाच त्यांना दिसत असली पाहिजे, असें अनुमान काढणें अपरिहार्य होतें. ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे ऐतरेय ब्राह्मणकारांनीं वसंतसंपाताला अनुलक्षून उषा हा शब्द कां वापरला, हें कळून येतें. या उषेलाच प्राचीन संस्कृतांत अहना आणि दहना अशींहि नांवें होतीं. यांची चिकित्सा करतांना 'मोक्षमुल्लराचार्यों'नीं म्हटलें आहे, 'From the roots अह and दह are produced the names अहना the vedic dawn goddess and Athene, as well as the संस्कृत दहना and the Hellenic Daphne.' वर सांगितल्याप्रमाणें उत्तरध्रुव प्रदेशांत उषा आणि वसंत याचा अविच्छेद्य संबंध असल्यामुळें उषेच्या दहनवाचक नांवाशीं सदृश असें अग्नि हें नांव वसंताला लाभलें. असा या नांवाचा संक्षिप्त उलगडा आहे.

## शतपथाचा आधार

या विवेचनाला शतपथाचाहि (६–१–३) आधार आहे. त्या आख्यानांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, संवत्सरानें त्याची पत्नी उषा हिच्यापासून अग्नि नामक कुमार उत्पन्न केला. रुद्र, शर्व, भव, उग्र, पशुपति, अशनि, ईशान आणि महादेव हीं सर्व त्याचींच नांवें आहेत. हा कुमार अग्नि जन्मतःच मला नांवें ठेवा म्हणून हट्ट धरून रडूं लागला, याकरितां त्याला इतकीं नांवें ठेवावीं लागलीं असें शतपथानें सांगितलें असलें तरीं अग्नि, भग, भव यांसारख्या सौम्य देवतांच्या रूपानें प्रजापतीच्या कन्यागमनाच्या सवयीचें निर्मूलन करणें अशक्य झाल्यामुळेंच त्या देवाला शेवटीं रुद्रावतार धारण करावा लागला, हें ऐतरेयकारांचें म्हणणेंच इतिहासाशीं अधिक

सुसंगत आहे. 'तेषां या एव घोरतमाः तन्व आसन् ता एकधा समभरन् । ताः संभृता एष देवः अभवत्. '.

## संचारक्षेत्राचा विस्तार

प्रजापतीच्या कन्यागमनाचा प्रतिरोध करण्याकरितां एकीकडे अग्नीनें रुद्रावतार धारण केला असला तर दुसरीकडे त्याच्या कन्यांनींहि असल्या अत्याचाराला बळी पडण्यापेक्षां घरांतून पळून जाण्याचाच मार्ग स्वीकारला. बृहदारण्यकांत ( १-४-४) सांगितलें आहे. 'सा उ ह इयम् ईक्षांचक्रे । कथं नु मा आत्मनः एव जनयित्वा संभवति हन्त तिरोऽसानीति. ' म्हणजे त्या स्त्रीनें पाहिलें कीं, स्वतःपासून मला उत्पन्न करून हा माझ्याशींच कसा समागम करतो ! त्यापेक्षां आपण घरांतून नाहींसें व्हावें. घरांतून पळणारी पहिली कन्या हरिणीप्रमाणें उड्या मारीत पळून जात असतां प्रजापतीनें हरिणरूपानें तिला गांठलेंच. पण त्यानंतर लौकरच मानवाचा अश्मयुगांत प्रवेश झाला आणि त्वष्ट्याची कन्या सरण्यु ही आपल्या तापदायक पतीच्या घरांतून घोडीच्या रूपानें म्हणजे घोडीच्या साहाय्यानें पळून गेली. सांगण्याचा इत्यर्थ हा कीं, मानवाला पशुपालनाची, विशेषतः अश्वपालनाची विद्या साध्य झाल्यानंतर त्याचें संचारक्षेत्र जसें विस्तृत होऊं लागलें, तसें प्रजापतींच्या कन्यांचें त्यांच्या दुर्वर्तनापासून परित्राण पण होऊं लागलें. प्रजापतीचें शासन करणाऱ्या रुद्रानें देवांकडून स्वतःसाठीं पशूंचें आधिपत्य मागून घेतलें, तें यासाठींच होय.

## अग्नीला नरबलि

अग्नीनें रुद्रावतार धारण केल्याचा वर जो उल्लेख केला आहे, त्याचें इथें आणखी थोडें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. अग्नि म्हणजे वसंतसंपाताचा बिंदु. हा बिंदु आकाशांत एखाद्या ठळक तारकेपाशीं असला तरच तो वैदिक आर्यांना सहज ओळखतां येत असे. याच्या उलट तो एखाद्या तारकेपासून सरकून अंतरिक्षांतील पाण्यांत म्हणजे आकाशाच्या निळ्या पोकळींत लुप्त झाला तर त्यांचा मोठाच घोटाळा होत असे. अशाप्रकारें तैत्तिरीय संहितेच्या परंपरेप्रमाणें वैदिक आर्यांचे तीन अग्नि त्यांना सोडून गेले, म्हणजे त्यांचा वसंतसंपात तीन नक्षत्रांतून मागें आला. त्यानंतर दशम मंडलांतील ५१ सूक्ताप्रमाणें चौथा वसंतसंपात यमानें दाखवून दिल्यानंतर त्यानें तरी आपल्याला टाकून जाऊं नये, यासाठीं देवांनीं 'घृतं चापां पुरुषं चौषधीनाम् ' या आहुति देण्याचें अभिवचन दिलें. या वचनाचें स्पष्टीकरण करतांना सायणाचार्यांनीं 'शरीरदाया ह वा अग्नयो भवन्ति ' आणि

'पुरुषाहुतिर्यस्य प्रियतमा' या कौषीतकीब्राह्मणांतील वचनांचाहि आधार घेतला आहे. वर उल्लेखिलेल्या सौचीक अग्नीच्या सूक्तांत सारे देव लपलेल्या अग्नीला बाहेर येण्यासाठीं विनवीत असतांना त्यानें एकट्या वरुणाशींच संभाषण केलें, यावरूनहि अग्नीचें वरुणाशीं कांहीं विशेष नातें असल्याचें व्यक्त होतें. पण वरुणाचा अग्नि, रुद्र, मन्यु इत्यादि देवतांशीं असलेला संबंध सुव्यक्त करण्यासाठीं स्वतंत्रच लेख लिहावा लागेल, सध्यां इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, भग आणि अर्यमा या देवतांना वैदिक आर्यांप्रमाणेंच मान्यता देऊन इराणी आर्यांनीं व्यवहारतः विवाहसंस्थेला मान्यता दिली असली तरी कन्यागमनाचा प्रतिषेध करणारा रुद्र अथवा शर्व आणि भगिनीगमनाचा प्रतिषेध करणारा यम या उभयतांच्या आराधनेला त्यांनीं निकरानें विरोध केला. रुद्र आणि यम यांनींच सवितादेवाच्या उपासकांमधील सामाजिक अराजकाचा अंत घडवून आणला असल्यामुळें सविता देवाचें कोडें उलगडण्याच्या प्रयत्नांची परिसमाप्ति इथेंच करणें इष्ट आहे.

# अशोक ते कालिदास

( छापत आहे. )

**लेखक : अ. ज. करंदीकर**

कालिदासानें पुष्यमित्र, अग्निमित्र आणि विक्रम या तीन ऐतिहासिक सम्राटांचा उल्लेख केला आहे. यांच्यापैकीं पुष्यमित्राच्या चरित्राचा उलगडा करण्याकरितां अशोकाच्या चरित्राचाहि पुनर्विचार करावा लागतो. यामुळें या ग्रंथाला अशोक ते कालिदास हें नांव दिलें आहे. या ग्रंथांत अशोकचरित्राचा पुनर्विचार, पुष्पमित्राचें चरित्र, अथेन्सच्या कवींचा कालिदासावरील प्रभाव, कुमारसंभवाची प्रस्तावना, कालिदास आणि अश्वघोष, कालिदासकृतींचें रसग्रहण, विक्रमादित्य चरित्र, पतंजलि चरित्र इत्यादि अपूर्व संशोधनानें भरलेलीं प्रकरणें आहेत. कालिदासाविषयीं चर्चेचें चर्वितचर्वण आज शंभर वर्षें सतत चाललें असलें तरी प्रस्तुत ग्रंथानें या कालखंडावर अगदीं अभिनव प्रकाश पडणार आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर कालिदासावरील यापूर्वींचे बहुतेक सारे ग्रंथ कालाच्या उदरांत लुप्त होतील याविषयीं संशय नाहीं.

# अशोक ते कालिदास

( छापत आहे )

लेखक : अ. ज. करंदीकर

कालिदासानें पुष्यमित्र, अग्निमित्र आणि विक्रम या तीन ऐतिहासिक सम्राटांचा उल्लेख केला आहे. यांच्यापैकीं पुष्यमित्राच्या चरित्राचा उलगडा करण्याकरितां अशोकाच्या चरित्राचाहि पुर्नविचार करावा लागतो. यामुळें या ग्रंथाला अशोक ते कालिदास हें नांव दिलें आहे. या ग्रंथांत अशोकचरित्राचा पुर्नविचार, पुष्यमित्राचें चरित्र, अथेन्सच्या कवींचा कालिदासावरील प्रभाव, कुमारसंभवाची प्रस्तावना, कालिदास आणि अश्वघोष, कालिदासकृतींचें रसग्रहण, विक्रमादित्य चरित्र, पतंजलि चरित्र इत्यादि अपूर्व संशोधनानें भरलेलीं प्रकरणें आहेत. कालिदासाविषयीं चर्चेचे चर्वितचर्वण आज शंभर वर्षें सतत चाललें असलें तरी प्रस्तुत ग्रंथानें या कालखंडावर अगदीं अभिनव प्रकाश पडणार आहे. हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर कालिदासावरील यापूर्वींचे बहुतेक सारे ग्रंथ कालाच्या उदरांत लुप्त होतील याविषयीं संशय नाहीं.